
म. ग्रं. मं. ठाणे
विषय
सं. नं.

# स्वाध्याय संदेश




REFBK-0002228

॥ काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ॥

गोविंदाग्रज ग्रंथमाला, पुष्प ५ वें.

# स्वाध्याय-संदेश

स. नि. ३५

अथवा

## श्री. केशव सीताराम ठाकरे, यांचे निवडक निबंध.

संपादक

मोरेश्वर बाळकृष्ण देशमुख, बी. ए.

REFBK-0002228

प्रकाशक

गोविंदाग्रज मण्डळ, दादर, मुंबई नं. १४.

२२२८

किंमत [illegible] रुपया.

Printed by M. N. Kulkarni at Karnatak Press,
434 Thakurdwar, Bombay.

and

Published by M. B. Deshmukh, B. A. (Hons.), Honorary
Secretary, Govindagraj Mandal, Dadar, Bombay.

# संपादकीय बोल.

वाचका, आपण हातीं घेतलें आहे हें गोविंदाग्रज-ग्रंथमालेचें पांचवें पुष्प! मालेंत प्रथमच काव्यलतेचीं चार पुष्पें गुंफून मालाकारानें यथाशक्ति कविजनांचा सत्कार केलाच आहे. आजपर्यंत पद्यपुष्पांनीं रसिकांची पूजा बांधिली; आतां जनताचरणीं हें पहिलेंच गद्यकुसुम अर्पीत आहें. कल्पनामय काव्याचा पद्यप्रदेश सोडून आज काव्यमय कल्पनांच्या गद्यप्रदेशांत प्रवेश करितांना, रसिका, आपल्याला नवख्या अनोळखीपणानें गांगरून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. "स्वाध्याय-संदेश" हें सुंदर कल्पनांनीं खच्चून भरलेलें एक गद्य-काव्यच आहे! पद्यजनक काय, किंवा सुंदर गद्याचा कर्ता काय, कल्पनेच्या करामतीवर 'कवि' या संज्ञेला दोघांचाही सारखाच हक्क पोहोंचतो. फरक एवढाच कीं कलेच्या मंदिरांत कवितेला कायमचें माहेर मिळाल्यामुळें, फक्त सौंदर्योत्पादनाशिवाय इतर कोणताही कायदा कवि बेगुमानपणें मोडूं शकतो, व म्हणून त्याचा मार्ग सुकर असतो. गद्यलेखकाला तसें करणें शक्य नसतें; म्हणून त्याचा मार्ग दुष्कर असतो. कल्पनेच्या भरारी बरोबर उंचावतां उंचावतां कवि स्वतःला कोठेंहि हरवून बसला तरी तें त्यास भूषणास्पदच होतें. काल्पनिक अस्मानांत गद्यलेखकानें मात्र स्वतःला विसरणें नेहमीं दूषणास्पद असतें.

'हें सारें मनिं आणुनि मग—' स्वाध्याय-संदेश हातीं धरा. 'स्वाध्याय-संदेश' हें श्रीयुत ठाकरे यांच्या पंधरा वर्षांच्या लेखकी आयुष्यांतील निरनिराळ्या विचारस्थितींचें चित्र आहे! आरंभीचा आवेश, रंगाचा भडकपणा, आणि कल्पनांचा स्वैर विहार, मध्यमावस्थेंतील स्थिरावलेला विचार, आणि सुसंघटित कल्पना व परिणतावस्थेंतील गंभीर विचार, योजक मांडणी व पूर्ण विकसित कल्पना, आणि आरंभापासून अखेरपर्यंत नवमतवादाची सत्यप्रेमी तडफ व ओजस्विता वगैरे छटा, वाचका, आपण निरखून घ्यावयाच्या आहेत. असो!

संदेशांतील सुंदर संग्रह प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल श्रीयुत ठाकरे यांचा व अतिशय अल्पावधींत त्याकरितां विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल प्रि० भाटे यांचा, मंडळाच्या वतीनें मी अत्यंत आभारी आहें. वक्त-

शीर सुंदर छपाई हा श्रीयुत कुळकर्णी यांच्या कर्नाटक छापखान्याचा विशेषच आहे. मंडळाच्या तर्फे त्यांचें आभार मानणें माझें कर्तव्य आहे. श्रीयुत शंकरराव किर्लोस्कर, श्री. सुंदरराव वैद्य व श्रीयुत दत्तोपंत देशमुख या कुशल चित्रकार बंधूंनीं स्वाध्याय-संदेशच्या सौंदर्यांत घातलेली भर केवळ आभार प्रदर्शनानें भरून येणें नाहीं !

स्वाध्यायाश्रम<br>दादर, मुंबई<br>२३-१-१९२३.

सर्वांचा नम्र सेवक,<br>**मोरेश्वर बाळकृष्ण देशमुख.**

माघ शु. शिवशक, २४९.

## प्रिन्सिपाल गो. चिं. भाटे, एम्. ए.
(विलिंग्डन कॉलेज, सांगली.)
यांची
# प्रस्तावना.

वाङ्मयक्षेत्रांत नेहमीं वावरणाऱ्या माणसाला वाङ्मयाची व्याख्या काय, असें विचारल्यास तो सुद्धां चटकर उत्तर देण्यास कचरेल. कारण 'वाङ्मय' हा शब्द जरी अलीकडे लोकांच्या फार तोंडीं आहे, तरी वाङ्मयाच्या स्वरूपाकडे फारच थोड्यांचें लक्ष गेलेलें असतें. आधीं या शब्दाला व्यापक व विशिष्ट असे दोन अर्थ आहेत, हें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. यामुळें या दोन अर्थांचा मनांत गोंधळ होतो व वादविवाद करतांना वाङ्मयाचा एकदां एक अर्थ मनापुढें असतो तर दुसऱ्यांदा दुसराच अर्थ मनांत येतो. व्यापक अर्थी वाङ्मय म्हणजे एखाद्या भाषेंत जें जें कांहीं लिहिलेलें असतें व म्हणून ज्याला ज्याला बोलण्यापेक्षां टिकाऊपणा आलेला असतो तें तें सर्व होय. जुने कागदपत्र, जुने जमाखर्च, जुनीं टिपणें, जुन्या बखरी, जुनें करारनामे, सारांश जीं जीं जुनीं लिहिलेलीं चिटोरीं सांपडतील त्याला सुद्धां वाङ्मय म्हणून कवटाळणारे लोक सांपडतात. परंतु या अत्यंत व्यापक अर्थी वाङ्मयाचें स्वरूप निश्चित करणें कठीण आहे व तें निरुपयोगी आहे. असले किरकोळ लेख वास्तविक वाङ्मयाच्या व्यापक अर्थांत सुद्धां येत नाहींत. असले लेख इतिहासाचीं साधनें किंवा इतर शास्त्रीय वाङ्मयाचीं साधनें असतील, पण तें वाङ्मय पदवीस पोचत नाहीं. वास्तविक 'वाङ्मय' शब्दाच्या व्यापक अर्थाला सुद्धां थोडीशी मर्यादा आहे. ज्ञान, मनोरंजन किंवा उपदेश करण्याच्या बुद्धीनें मुद्दाम लिहिलेले लेख किंवा ग्रंथ म्हणजे व्यापक अर्थानें वाङ्मय होय. अशा वाङ्मयाचे दोन वर्ग होतात. एक शास्त्रीय वाङ्मय, दुसरें ललित वाङ्मय. सृष्टिकृत किंवा मनुष्यकृत वस्तुजाताचें किंवा त्याच्या एका भागाचें ज्ञान किंवा माहिती वर्णन करणारें वाङ्मय तें शास्त्रीय वाङ्मय

होय. सत्यस्वरूप यथातथ्य कथन करणें हा या वाङ्मयाचा मुख्य उद्देश असतो. या सत्य स्वरूपाचें आकलन, अवलोकन व तर्क या मानवी मनाच्या शक्तींच्या योगें होतें. अर्थात् असलें शास्त्रीय वाङ्मय हें त्या त्या विषयांची गोडी अगर गरज असणाराकरतां असतें. गणितशास्त्राचें वाङ्मय गणित्याला उपयोगी. वनस्पतिशास्त्राचें वाङ्मय तज्ज्ञाला उपयोगी, सामान्यजनाला त्याचें काय होय ? असल्या वाङ्मयाचा उपयोग सामान्य जनाकरितां नसतो. पण ललितवाङ्मय हे सर्वांकरितां असतें. तें सर्व स्त्री पुरुषांच्या प्रीतीस पात्र होण्यासारखें असतें. त्यांतील विषय सर्वांना समजण्यासारखे असतात; सर्वांच्या अनुभवाचे असतात; व सर्वांना त्याची आवड असते. ललितवाङ्मयाचा उद्देश ज्ञान देणें किंवा माहिती देणें हा नसतो; तर मनुष्याचें मनरंजन करणें व त्याच्या मनोवृत्ती उद्दीपित करणें हा असतो. या ललितवाङ्मयोदयाच्या बुडाशीं मानवी मनाच्या चार प्रवृत्ती असतात. पहिली, आपल्या मनांतील विचारविकार दुसऱ्यास व्यक्त करून दाखविण्याची उत्कट इच्छा; दुसरी मानवजात व तिच्या हातून घडणारीं कृत्यें यांबद्दलचा आपलेपणाचा भाव; तिसरी, आपण राहतों ती सत्यसृष्टि व मनुष्यानें कल्पनेनें निर्माण केलेली कल्पनासृष्टि यांची आवड; व चवथी, व्यवस्थितपणा नीटनेटकेपणा रमणीय रूपरंग वगैरे सौंदर्यपोषक गुणांची गोडी. कांहीं लेखकांच्या मतें तर ललितवाङ्मयाचा मानवीमनाची सौंदर्यप्रतीति हा खरा आत्मा आहे. कारण ललितवाङ्मय ही ललितकलासप्तकापैकीं एक कला आहे असें मानण्यांत येतें. आतां ललितकलांचा उद्देश सृष्टींतील वस्तुजातामध्यें गूढ असलेलें सौंदर्य व त्यांत भरलेली भव्यता यांचें आविष्करण करणें होय. वस्तुजातांतील सत्याविष्करण हा शास्त्राचा उद्देश आहे, तर वस्तुजातींतील सौंदर्याविष्करण हा ललितकलांचा उद्देश आहे. मनुष्य आपल्या बाह्य डोळयांनीं व आपल्या बुद्धीनें वस्तूंच्या स्वरूपाचें आकलन करतो. बुद्धि ही पृथक्करणात्मक आहे. ती अवलोकनानें वस्तूचे अवयव, अन्तर्भाग व ज्ञानेंद्रियांनीं कळणारे रूपरसादि गुण इत्यादि जाणूं शकते, व अशा तऱ्हेचे पृथक्करणात्मक व इंद्रियगोचरगुणात्मक स्वरूप सांगणें हें शास्त्रीय वाङ्मयाचें काम आहे, तर मानवी प्रतिभाशक्तीना गोचर होणारें वस्तुजातांतील अतींद्रीय सौंदर्य व भव्यता यांचा सर्वांना प्रत्यय आणून देणें हें ललितकलांचें काम आहे. अर्थात् ललितवाङ्मयाचेंही तेंच कार्य आहे. म्हणून ललितवाङ्मय हें बुद्धिप्रभावानें उत्पन्न होत नाहीं. बुद्धीनें मनुष्य शास्त्रीय ज्ञान मिळवील, किंवा शास्त्रीय ज्ञानाचें आकलन करूं शकेल. पण बुद्धिवान् मनुष्य ललितवाङ्मय निर्माण करूं

शकणार नाहीं. त्याला प्रतिभाशक्ति किंवा कल्पनाशक्ति यांची जरूरी आहे. हिलाच कविप्रतिभा म्हणतात. ही दिव्य दृष्टीप्रमाणें आहे. ती सर्व मनुष्यांत असतेच असें नाहीं. ही एक उपजत शक्ति आहे. ती मेहनत करून साध्य होणार नाहीं. म्हणूनच ललितवाङ्मय निर्माण करण्याला त्या जातीचेंच मनुष्य पाहिजे. तें येरा गबाळाचें काम नाहीं. ही दिव्य दृष्टी ज्याला आहे त्याला प्रत्येक वस्तूंतील अन्तर्गूढ सौंदर्य दिसतें. म्हणून ललित वाङ्मयाला कोणताही विषय वर्ज्य नाहीं. प्रतिभावान् माणूस कशाबद्दलही लिहो, त्याचे लिहिणें ललितवाङ्मय बनते. याच कारणानें कित्येक कवींचीं यदृच्छया लिहिलेलीं पत्रें, त्यांच्या रोजनिशा, त्यांचे लिहून ठेवलेले स्वगत विचार किंवा आत्मचरित्र, सारांश त्यांच्या लेखणींतून निघालेले प्रत्येक वाक्य ललितवाङ्मय पदाप्रत पावतें. पण हा त्यांच्या प्रतिभेच्या प्रभाव आहे. त्याचा प्रकाश सर्वत्र पडतो. पण कांहीं पत्रें, चिटोरीं टिपणें वगैरे ललितवाङ्मय पदवीला पावलेलीं आहेत, म्हणून अशा प्रकारचें सर्वांचे लिहिणें ललितवाङ्मय होऊं शकतें, असें मात्र नव्हे. जुन्या सर्व कागदपत्रांना ललितवाङ्मय मानणारांची येथेंच चुकी होते. असो.

प्रत्येक देशांत प्रथमतः निर्माण होणारे ललित वाङ्मय प्रायः पद्यरूप असतें. कारण पद्य हें तालसुरावर म्हणतां येतें. अर्थात् तें संगीत कलेंत अन्तर्भूत होतें. म्हणूनच ललितवाङ्मय म्हणजे कविता, पद्य किंवा काव्य असा समज होतो. पण पद्य हें ललित वाङ्मयाचें आवश्यक अंग आहे असें नाहीं. नव्हें, देशाच्या व भाषेच्या प्रगती बरोबर गद्याचा प्रचार चालू होतो व कालें करून पद्यापेक्षां गद्याचा प्रसार जास्त होतो. तेव्हां ललित वाङ्मयाचें पद्य व गद्य असें वर्गीकरण करणें बरोबर नाहीं. कारण अमर कोशासारखें पद्य ललितवाङ्मय अगर काव्य या रूपाप्रत पावत नाहीं; किंवा शास्त्रीय ज्ञानाकरितां लिहिलेलें गद्यही काव्य या पदवीस पावत नाहीं. ललितवाङ्मयाचा आत्मा म्हणजे सौंदर्याविष्करण होय. मग ते आविष्करण पद्यरूपानें झालेलें असो कीं गद्यरूपानें झालेलें असो. या ललित वाङ्मयाचें सामान्यतः पांच वर्ग करतात. पहिला प्रकार कविता, दुसरा प्रकार नाटकें, तिसरा प्रकार कादंबऱ्या, चवथा प्रकार छोट्या गोष्टी व रूपकें आणि पांचवा प्रकार निबंध. मराठींतील निबंध शब्द मात्र संदिग्ध आहे. निबंध म्हणजे लहान आटोपशीर लेख. पण तो शास्त्रीयही असेल किंवा ललितवाङ्मयात्मक ही असेल. ललितवाङ्मयाच्या पांचव्या प्रकारांतून अर्थात् शास्त्रीय निबंध वगळले पाहिजेत.

प्रबोधनकार रा. ठाकरे यांचे 'स्वाध्याय संदेश' या नांवानें प्रसिद्ध होणारे निवडक निबंध ललितवाङ्मयाच्या पांचव्या प्रकारचे आहेत. हे निबंध एकंदर एकवीस बावीस आहेत. त्यापैकीं निमे अधिक ऐतिहासिक–महाराष्ट्रैतिहासिक आहेत. पण ते ऐतिहासिक सत्य सांगण्याच्या बुद्धीनें किंवा ऐतिहासिक सत्या-न्वेषण बुद्धीनें लिहिलेले नाहींत. कांहीं निबंध तात्विक विषयावर आहेत, पण ते तत्वान्वेषण बुद्धीनें लिहिलेले नाहींत. कांहीं निबंध क्षणिक तात्कालिक प्रसंगा-संबधीं आहेत, पण तेथेंही तात्कालिक वर्णनावर भर नाहीं. या सर्व निबंधांना एकत्र करणारें सूत्र म्हणजे ठाकरे यांच्या धार्मिक सामाजिक भावना होत. ते समाजाच्या प्रत्येक बाबी संबंधीं 'नवमतवादी' आहेत. त्यांना जुनें भिक्षुकशाहीचें बंड मोडावयाचें आहे; त्यांना जातिनिर्बंध शिथिल करावयाचे आहेत; त्यांना आचारविधींचें वर्चस्व नाहींसें करावयाचें आहे; त्यांना समाजाचें गतानुगतिकत्व घालवून टाकावयाचें आहे. नव्याजुन्याच्या कलहांत नव्याचा पक्ष स्वीकारून त्यांना समाजामध्यें नव्याची आवड उत्पन्न करावयाची आहे. सारांश रा. ठाकरे हे समाजाच्या सर्वांगीण सुधारणेचे भक्त आहेत व ही समाजसुधारणा–भक्तिरूपी भावना तरुणपिढींत उद्दीपित करण्याचें त्यांच्या निबंधांचें ध्येय आहे. त्यांचे हे सर्व लेख भावनाप्रधान आहेत. त्यांत जुन्या मतावर व जुन्या मताभिमान्यांवर मर्मभेदी कडक टीका आहे. त्यांत नव्या मतांचा जोराचा व जोरदार भाषेंत भाषेंत पुरस्कार केलेला आहे. त्यांत ऐतिहासिक प्रसंगांच्या अनुषंगानें देश-प्रीतीची ज्योत जनमनांत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांत अल्प-संतोषी निवृत्ति मार्गाचा निषेध करून, महत्वाकांक्षी प्रवृत्तिपरतेची दंवडी पिट-विली आहे. तात्पर्य, हल्लीं आपल्या समाजस्थितींत ज्या ज्या भावनांची व ज्या ज्या उच्च मनोवृत्तींची आपल्याला जरूर आहे, त्या त्या भावना व त्या त्या उच्च मनोवृत्ति तरुणतरुणींच्या अंतःकरणांत उद्भुत व्हाव्या, अशा धोरणानें रा. ठाकरे यांनीं आपल्या निबंधांची रचना केली आहे व ती रचना बरीच यशस्वी झाली आहे, यांत शका नाहीं.

प्रायः कवितेंत दृग्गोचर होणारे रूपक, उत्प्रेक्षा, अनुप्रास, श्लेष इत्यादि अर्थालंकार व शब्दालंकार गद्य वाङ्मयांत खच्चून भरण्याचा संप्रदाय कै. गड-कऱ्यांनीं घातला. विशेषतः अनुप्रासमय गद्य लिहिण्याची हातोटी गडकऱ्यांना उत्तम साधली होती. हा गद्यप्रकार चमत्कृतिजनक असल्यामुळें त्याची गोडी जनमनाला फार लागलेली दिसते. यामुळें या गेल्या दहा वर्षांत असलें गद्य

लिहिण्याकडे लेखकांचा फार ओढा दिसून येतो. गडकऱ्यांच्या या विशेषाचें जिकडे तिकडे अनुकरण होऊं लागलें आहे व ठाकरे यांनीं या निबंधांत असा प्रयत्न पुष्कळ ठिकाणीं केलेला आहे. पण या बावतींत लेखकाची अतिशयतेकडे प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. असें झालें असतां भाषापद्धतीला कृत्रिमपणा जास्त येतो व मग पुष्कळ ठिकाणीं अर्थहानि होते. अर्थहानि न होतां किंवा द्विरुक्तीचा दोष न येतां सहज अनुप्रास साधल्यास तो आनंददायी होतो ही गोष्ट खरी आहे, पण कृत्रिमता व पुनरुक्ति दोष व अर्थहानि हे दोष ललितवाङ्मयांत न येण्याची खबरदारी लेखकानें घेतली पाहिजे. रा. ठाकरे यांची भाषापद्धती ओजस्वी आहे, त्यांच्या भाषेचा ओघ अमोघ आहे; त्यांत चमत्कृतीही पुष्कळ आहे व वर निर्दिष्ट केलेले दोष न होऊ देण्याची खबरदारी रा. ठाकरे घेतील, तर त्यांचें लेख जास्त सरस व जास्त परिणामकारक होतील यांत शंका नाहीं. असे जास्त सरस व जास्त परिणामकारक वाङ्मयात्मक लेख रा. ठाकरे यांच्या लेखणींतून उतरोत व त्यांच्या स्वाध्यायसंदेशाचा ध्वनि सर्व महाराष्ट्रभर दुमदुमत राहो, अशी इच्छा करून ही घाईघाईनें लिहिलेली प्रस्तावना पुरी करतों.

विलिंग्डन कॉलेज,
सांगली
ता. १४ जानेवारी १९२३.

गोविंद चिमणाजी भाटे.

ग्रं. क्र. .......

# स्वाध्याय-संदेश

## -अनुक्रमणिका-


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कृष्णं वन्दे जगद्गुरुम् । | १ |
| २ | बरोबर २९३ वर्षांपूर्वी ! | ९ |
| ३ | बुद्धदेवाची कामगिरी. | १३ |
| ४ | शिवरायास आठवावें. | २० |
| ५ | प्रेस आक्टाची पूर्वपीठिका. | २८ |
| ६ | लोकसंग्रह आणि राजकारण. | ४४ |
| ७ | पावनखिंडीचा संदेश.... | ५३ |
| ८ | फोनोग्राफचें व्याख्यान. | ५७ |
| ९ | ऋग्वेदकाळचे हिंदु. | ६१ |
| १० | आई. | ६७ |
| ११ | उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत | ७१ |
| १२ | मुके गुरू. | ७५ |
| १३ | धन्य पार्वतीबाई धन्य. | ८१ |
| १४ | अटकेला फडकलेला भगवा झेंडा. | ८४ |
| १५ | उत्तिष्ठत जाग्रत ! उठा, जागे व्हा ! ! | ९१ |
| १६ | चिरंजीव कोण ? | ९५ |
| १७ | शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली. | ९८ |
| १८ | कल्पनाशक्ति. | १०५ |
| १९ | दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन केलेंच पाहिजे. | १०६ |
| २० | सर्वसमर्थ कोण ? | ११३ |
| २१ | सत्ता, सत्ताधीश व सत्ताधीन. | ११९ |
| २२ | नाना शंकरशेट. | १२३ |
| २३ | हिंदवी स्वराज्याचा खून. ( व्याख्यान ) | १२७ |

# गोविन्दाग्रज-ग्रंथमाला.

| | | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै. |
| सुमन १ लें. | गोविंदाग्रजांच्या ७ कविता | ०-६-० |
| ,, २ रें. | कवनगुच्छ (आधुनिक कविता) | १-८-० |
| ,, ३ रें. | छत्रपति ( पोवाडा-मनोहरकृत ) | ०-३-० |
| ,, ४ थें. | गीतोपायन (श्री. कृ. कोल्हटकर) | ०-६-० |
| ,, ५ वें. | स्वाध्याय-संदेश (के. सी. ठाकरे) | १-०-० |

---

## मालेचे कायम ग्राहक होण्याचे नियम.

१. एक रुपया प्रवेश फी भरून कोणासही मालेचें कायम-ग्राहक होतां येतें.

२. कायम-ग्राहकांस मालेंतून प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीनें देण्यांत येतील.

३. कायम-ग्राहकांस मालेंतून वेळोवेळीं प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें घ्यावीं लागतील.

# स्वाध्याय-संदेश

अथवा

प्रबोधनकार श्रीयुत ठाकरे

यांच्या

# निवडक निबंधांचा संग्रह.

दा. क्र. २२२८....



## कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।



आज गोकुळांत आनंदीआनंद चालू आहे. संसारचक्रांत रात्रंदिवस सुरू असलेल्या आधिव्याधींना दूर लोटून, एक दोन घटकाच कां होईना, आबालवृद्ध हिंदुधर्मी नरनारीजन **जय कृष्ण कृष्ण जय, जय कृष्ण कृष्ण जय** या पुण्य नामस्मरणांत तल्लीन झाले आहेत. आजचा आनंद निर्व्याज. सूर्योदयाबरोबर उमलणाऱ्या कमळाप्रमाणें शुद्ध, सात्विक आणि प्रत्येक मनाची कळी विकसित करणारा हा आनंद बिनतोड आहे. शेंकडों शतकांच्या पूर्वी भारतीय इतिहासाच्या पृष्ठाला भाग्यवान् करणारी ती श्रीकृष्णजयंती, जणुं काय अगदीं आजच पहिल्यांदा साजरी होत आहे, अशा कल्पनेचा भडक भाविक रंग आजच्या आनंदांत भरपूर मिसळल्या-

मुळें तर त्याची गोडी गोडपणांत अमृताशीं खात्रीनें स्पर्धा करील. आज कोठेंहि कान द्या, तेथून कृष्ण भगवंताच्या पुण्य नामसंकीर्तनाच्या मुरलीचा मधुर ध्वनि ऐकूं येईल. आज कोठेंहि दृष्टि फेंका, त्या पूर्णावतार परमात्म्याचा जयंत्युत्सव लहान मोठ्या प्रमाणावर साजरा होत असल्याचें डोळयांना दिसेल. आसेतुहिमाचल एकून एक हिंदू देवमंदिरांत 'गोविंद घ्या हो, गोपाळ घ्या हो' या विशुद्धतम प्रेमाच्या दहीकाल्याची आग्रहाची देवघेव अहमहमिकेनें चालू आहे. शेंकडों शतकांपूर्वी श्रीकृष्णानें केलेल्या–केल्या असें सांगितलेल्या–बालक्रीडांच्या नकला कोठें वठविल्या जात आहेत; तर कोठें दहीहंडी फोडून त्याखालीं लहान लहान मुलें 'गोविंदा गोविंदा' कल्होळांत अनुपमेय हर्षांच्या लहरींवर बेभान नाचत आहेत. रासक्रीडेची हुबेहूब नक्कल वठवायला गोपींची मोठी अडचण; पण, कांहीं पुरुषांनाच तात्पुरत्या गोपी मानून, त्यांच्या बरोबर दहा किंवा एकवीस पदरी गोफ टिपऱ्यांच्या ठेक्यावर विणण्यासाठीं कोठें कांहीं नर्तनकुशल बंधू आपल्या लवचिक आंगाच्या वळणदार घडीची कसरत दाखवून प्रेक्षकांना थक्क करीत आहेत; तर कोठें मल्लविद्याविशारद तरुण जवान स्वतःला श्रीकृष्णाचे खास संवगडी समजून, आडाखेबाज कुस्त्यांच्या पेंचांनीं आपापल्या आखाड्याचें नांव राखण्यासाठीं हमरीतुमरीच्या दंगलींत दंग झाले आहेत. ठिकठिकाणीं कृष्णजन्माच्या इतिहासाचें आख्यान लावून, त्यावर गानाभिनयकुशल हरिदास साग्रसंगीत कथेचें व्याख्यान करीत आहेत. आज प्रत्यक्ष आपल्या दृष्टीसमोर श्रीकृष्ण भगवंताचा जन्म झाला आहे, त्याला हरिदास आतां मंगलस्नान घालतील, काजळ तीट उटी लावतील, बाललेणें चढवतील, मग पाळण्यांत घालून त्याला झोंके देतील, या सर्व गोष्टी आतां आपण पाहून, त्या पाळण्याच्या झोंक्यावरोबरच आनंदाच्या डोल्हाऱ्यांत क्षणभर आपल्या आत्मारामालाहि 'जो जो जो जोरे' करण्याची महापर्वणी साधून घेऊं, म्हणून आबालवृद्ध स्त्रीपुरुष, हरिदासाच्या मुखगंगेतून स्रवणारा एकेक शब्द कानांच्या ओंजळींत झेलण्यासाठीं आतुरचित्त स्तब्ध बसले आहेत. उघडाउघड ही सारी नक्कल, शुद्ध नाटकांतली बनावट, कल्पनेलाहि थांग न लागणाऱ्या अशा प्राचीनतम इतिहासाची नुसती बतावणी. पण काय चमत्कार आहे पहा! या कृष्णजयंतीच्या प्रसंगीं तें हजारों वर्षांचें जाडजूड कालपटल भक्तांच्या भावनेचा उदय होतांच धुक्याप्रमाणें वितळून नष्ट होतें आणि वर्तमान मानवांच्या मनोवृत्तीचा दुव्वा कृष्णजन्माच्या आद्य दिवसाला बेछुट भिडून, दुनियेच्या जागत्याज्योत भावनेच्या मुर्वतीसाठीं, भूतकाळच वर्तमानकाळाचें लेणें

पांघरून दरसाल उभा ठाकतो ! एकूण भावनेचा पराक्रम विलक्षण खरा. पीतांबराचें गुंडाळें करून त्याचा बनविलेला बाळकृष्ण तो काय, पण त्यालाच पाळण्यांत घालून हरिदास झोंके घालूं लागले व मधुर संगीताच्या गायनांत 'बाळा जो जो रे' हें गीत गाऊन त्याला आळवूं लागले कीं देवळाच्या एका अंधेऱ्या अडचणीच्या जागेंत दाटी करून बसलेल्या आमच्या मातांची, आमच्या भगिनींची चित्तवृत्ति किती उचंबळून येते बरें ! स्त्रीजात म्हणजे मातृवात्सल्याचा जिवंत झरा. वयाच्या कमी अधिक प्रमाणानुसार हा झरा सूक्ष्म किंवा प्रौढ झालेला असतो. अर्थात् या वेळीं त्यांची मुखश्री प्रसन्नतेनें डंवरते. त्यांची काया पुत्रवात्सल्यानें रोमांचित होते. श्रीकृष्ण-भक्तीचा सारा ठेवा त्यांच्या डोळ्यांत एकवटतो व पाळण्याच्या प्रत्येक येरझारीबरोबर त्यांतला एकेक बिंदु त्यांच्या गालावर टिबकतो.

हा प्रकार शेंकडों वर्षें दरसाल नियमीत चालला आहे. वर्षांतून एक दिवस भक्तीच्या भावनेला कढ येतो व उत्सव-समाप्तीबरोबरच तो थंड होतो. सांप्रतची कृष्णजयंती शुद्ध कवायती आहे. त्यांत भावनावश अज्ञ जनतेला किंचित् काळ जरी उदात्त अशा जीवशिवाच्या साधर्म्याची चुणूक भासते, तरी मानवजातीच्या उत्क्रान्तीसाठीं व राष्ट्रधर्माच्या प्रगल्भतेसाठीं श्रीकृष्ण भगवंतानें धर्मवीर, राष्ट्रवीर आणि पुरुषोत्तम नरवीर अशा तीन निरनिराळ्या भूमिका स्वतःच्या चारित्र्यांत केंद्रीभूत करून धार्मिक, राजकीय आणि सामाजिक बाबतींत, अखिल मानव जातीचें-जगाचें-जगद्गुरुत्व केवढ्या अढळ यशस्वितेनें मिळविलें, याचा मात्र या उत्सवप्रसंगीं कोणी फारसा विचार करीत नाहीं. पुराणकारांनीं आपल्या काव्यमय मेंदूतून प्रसविलेल्या भागवतांतील श्रीकृष्णचरित्राच्या अतिशयोक्तिपूर्ण बाललीला व यौवनक्रीडा आमच्या पचनीं जशा लवकर पडतात, तशी त्या पुरुषोत्तमाची भारतांतर्गत इतिहाससिद्ध राष्ट्रसेवा किंवा त्या जगद्गुरूची गीता-प्रतिपादित प्रबोधनाची दिव्य कामगिरी आमच्या गळीं उतरण्याची मारामार पडते. या दिशेनें कोणी प्रयत्नच करीत नाहीं. आजकालचे हरिदास म्हणजे शुद्ध नर्मदेचे गोटे किंवा ठराविक परंपरेच्या मार्गांतले धोटे. मोटेच्या बैलांप्रमाणें पुढें मागें हेलपाटे घालण्यापलीकडच्या अक्कलेची आणि त्यांची पुरी फारकत. श्रीकृष्ण संवगड्यांबरोबर खोखोचा खेळ कसा खेळला, याचें साभिनय पोरकट प्रदर्शन करण्याऐवजीं त्या आडाखेबाज मुत्सद्यानें मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या राजकारणपटूंच्या स्वार्थी डांवपेंचावर आपल्या कुशाग्र

बुद्धिमत्तेची मात करून खो कसा घातला, हें या हरिदासांनीं कां सांगूं नये ? रासक्रीडेंतील किंवा जलक्रीडेंतील गोपिकांच्या नग्न विहाराच्या घाणेरड्या काल्पनिक गोष्टी रंगवून सांगतांना, स्वतःच्या मनोवृत्तीला बीभत्स विकारांच्या खातेऱ्यांत चुवकण्यापेक्षां, गीतेंतील भक्तियोगाच्या रहस्याचीं निरनिराळीं प्रमेयें हे रंगेल हरिदास जर श्रोत्यांच्या मनांवर बिंबविण्याचा यत्न करतील, तर कोणी त्यांच्या जिभेला डाग का देणार आहे ? उत्सवप्रसंगीं मुद्दाम जमलेल्या कांहीं खेळाडूंकडून दसपदरी गोफ विणण्याचा धांगडधिंगा करण्यापेक्षां, भगवंतानें आपल्या गीतेंत भक्ति, ज्ञान आणि कर्म या तीन योगांचा केलेला राष्ट्रोद्धारक संयोग श्रोत्यांना हरिदासानें नीट उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला, तर त्या टाळकुट्याला कोणी फांसावर का लटकविणार आहे ? हातांतल्या टाळानें किंवा टिपरीनें, छटाकभार दही आणि गाडगाभर पाणी भरलेली, दहीहंडी फोडून त्या खालीं मुलांना नाचविण्याचा नाचरा प्रकार बंद करून, त्या ऐवजीं कुकल्पनेची हंडी फोडून निश्चित तत्वनिर्णयाचा दुग्धवर्षाव श्रीकृष्णप्रभूनें साऱ्या पृथ्वीवर कसा पाडला, याची विवेकशुद्ध माहिती हरिदास आपल्या श्रोत्यांना सांगण्याचा प्रघात पाडतील, तर त्यांचें कोणी डोकें का फोडणार आहे ? श्रीकृष्णानें केल्या म्हणून सांगण्यांत येणाऱ्या कृतींच्या नकला करण्यांतच जयंत्युत्सवाचें सारसर्वस्व मानणाऱ्यांना भगवंताच्या भारतग्रथित अनेक पराक्रमांच्या नकला करण्याची छाती कां बरें होऊं नये ? भगवंतानें जगाच्या उद्धारार्थ गीता सांगितली, तशी दुसरी एखादी सवाई गीता सांगण्याचें मर्त्य मानवाचें तोंड नसलें तरी, भगवद्गीतेचें रहस्य आत्मोद्धारार्थ आचरणांत आणतांना आपले हातपाय खचित कोणी बांधणार नाहीं. नकला करूनच उत्सव साजरा करायचा, तर त्या नकला निदान अशा तरी कृत्यांच्या करा कीं जेणेंकरून आत्मोद्धारांतच जगदुद्धाराची गुरुकिल्ली सांपडेल.

आज आपल्यापुढें भागवतांतील व भारतांतील अशीं दोन परस्पर–विरुद्ध श्रीकृष्णाचीं चरित्रचित्रें आहेत. यांपैकीं पहिलें एकांगी व काल्पनिक आहे आणि दुसरें इतिहाससिद्ध असून विवेकबुद्धीला पटणारें आहे. भागवती कृष्णचरित्रांत भिक्षुकशाही मूर्खपणा खच्चून भरला असून, त्याच्या प्रभावाचा पाया अज्ञ जनांच्या अंधश्रद्धेवर उभारलेला आहे; तर भारतांतर्गत श्रीकृष्णचरित्रांत ऐतिहासिक सत्याचें उज्वल तेज अपरंपार झळकत असून, त्याची उभारणी विवेकमान्यतेच्या न्यायनिष्ठूर पायावर झालेली आहे. भागवत ही कादंबरी आहे व

भारत हा इतिहास आहे. कादंबऱ्या काल्पनिक अतएव असत्य असतात, इतिहास तपशील-शुद्ध म्हणून सत्य असतो. हा एवढा भेद जर आपण विचारांत घेतला तर बनावट चलनी नाण्याप्रमाणें व्यासाच्या नांवाखालीं दडपलेल्या बोपदेवकृत भागवत कादंबरींतील कृष्णचरित्राचा त्याग करून, कोणीही विवेकी सज्जन भारतांत उमटलेल्या जगद्गुरु कृष्णाच्या चारित्र्यावर आपली विवेकपूर्ण स्वाध्यायवृत्ति खिळविल्याविना खास राहणार नाहीं. भागवती कृष्णचरित्रानें जनतेच्या अंधश्रद्धाळू भावनाप्रधान वृत्तीचा भरपूर फायदा घेऊन, भारतवासियांना पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या खऱ्या चारित्र्याला सर्वस्वीं पारखें केलें आहे. या मुद्याकडे आतां किती दिवस श्रीकृष्णभक्त डोळेझांक करणार?

श्रीकृष्णाला पूर्णावतार मानतात. त्याला पुरुषोत्तम ( Superman ) म्हणतात. व्यासासारखे महर्षि त्याला **जगद्गुरु** असें संबोधून, **कृष्णं वन्दे जगद्गुरुम्** म्हणून प्रणाम ठोकतात. हिंदुस्थान स्वत्वपराङ्मुख झाला. स्वातंत्र्यांतून पारदर्शक गुलामगिरींत अवनत झाला. राजकीय अधःपाताच्या जोडीनें त्याच्या समाजघटनेच्या राईपेक्षांहि क्षुद्र अशा ठिकऱ्या उडाल्या. त्याच्या तत्त्वज्ञानाची स्वकीयांनीं हेळसांड केल्यामुळें, क्षुद्र वृत्तीच्या परकीयांनीं त्याच्या विपर्यासावर आपल्या विद्वत्तेची कंडु शमवून घेतली. इतकें झालें तरी पुरुषोत्तम श्रीकृष्णाचें जगद्गुरुत्व आजदिनतागायत एकजात विवेकी दुनियेनें मान्य करावें; त्याच्या भगवद्गीतेचीं पारायणें गेल्या महायुद्धप्रसंगीं फ्रान्सच्या समरभूमीवर अनेक इंग्रज, फ्रेंच, जर्मन आणि अमेरिकन लढवय्यांनीं करून, आपल्या चित्ताला प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त करून घ्यावा, आणि हजारों चिकित्सक पाश्चिमात्य विवेकवाद्यांनीं सर्व धर्मपंथांचा तुलनात्मक अभ्यास करून, अखेर आमूलाग्र गीतावादी बनावें; हा चमत्कार सर्व हिंदूंनीं विचार करण्यासारखा आहे. आजला जगद्गुरु श्रीकृष्णाची गीता जगांतील बहुतेक प्रगल्भ भाषांचें लेणें लेवून नऊखंड दुनियेच्या हृदयाला, गूढ तत्त्वरहस्याच्या निश्चित निर्णयानें, शांत करीत आहे. फ्रान्सांतले फ्रेंचजन आज फ्रेंच भाषेंत गीतेचें अध्ययन करीत आहेत. जर्मनींतले जर्मन आज श्रीकृष्णाच्या गीतामुरलीचे सनातन मंजुल ध्वनी जर्मन भाषेंत ऐकून आनंदानें डुलत आहेत. डॅन्टेच्या चिरंजीव काव्यवाणीनें सालंकृता झालेल्या इटालियन वाग्देवीलाहि, भगवद्गीतेनें आपल्या अनुपमेय तत्वज्ञानाचे पैंजण तोडे अर्पण करून, जीवशिवाच्या अभेद भावाचीं गाणीं गात नाचावयास लाविलें आहे. साऱ्या जगाला पुरून उरणाऱ्या इंग्रजी भाषेच्या द्वारें श्रीकृष्ण जगद्गुरूंचा गीता-संदेश

आज ‘ पृथिव्यां सर्वमानवा ’ ची खासगत जहागीर होऊन बसला आहे. या सर्व दिग्विजयाचें श्रेय जर कोणाला असेल तर तें ‘ जगद्गुरु ’ म्हणून मिरविणाऱ्या पुडीबहाद्दर मुंडितशीर्ष भिक्षुकाग्रणींना नसून, थिऑसफिकल सोसायटी व कृष्ण-भक्त मिसेस आनी बेझंट यांच्याकडेच तें बिनचूक जातें, हें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें प्रबोधनाचें कर्तव्य आहे.

जगद्गुरु श्रीकृष्णाच्या गीतारहस्याच्या बिनीच्या भगव्या जरतारी झेंड्यानें आज सर्व विवेकी दुनिया काबीज केली आहे. अल्पसंख्य विवेकी दुनिया हस्तगत करण्याचेंच कार्य मोठें कठीण. बहुसंख्य अविवेकी दुनियेचें पेंढार कितीहि अफाट पसरलेलें असलें, तरी सच्चा रणशूर शिपाई त्याची केव्हांहि क्षिति बाळगीत नाहीं. रानोमाळ भटकणाऱ्या शेंकडों क्षुद्र कोल्ह्यांकडे दुर्लक्ष करून मर्द शिकारी एका वाघासाठींच आपल्या तिरंदाजीचा रोख सांभाळून जंगल तुडवीत असतो. बाजारबुणग्यांची पर्वा बाजारबुणग्यांनीं करावी. जगज्जेता वीर आपल्या सामन्याच्या समतोल वीराला एकाच शरसंधानानें घायाळ करून चुटकीसरसा त्याच्या साम्राज्याचा अधिपति बनतो. श्रीकृष्णाच्या कर्मज्ञानभक्तिप्रधान गीतेनें याच धोरणानें आजहि सारीं दुनिया पादाक्रांत केली आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. बिनीच्या भगव्या जरतारी झेंड्यानें पुढचा मार्ग तर छान चोखाळून ठेवला आहे. आतां कृष्णानुयायी भारतीयांनीं एकच लगट करून त्या मार्गावर धडाडीची चाल केली, तर **कृष्णं वन्दे जगद्गुरुम्** या उच्चारासरसे श्रीकृष्ण भगवंताला प्रणिपात करण्यासाठीं अखिल मानव दुनियेचे हात भराभर वर व्हायला अवधि का लागणार आहे ?

जगांतील इतर धर्मपंथांचा पाया उपयुक्ततावादा ( Utility ) वर सजविलेला आहे. जनता निष्क्रीय झाली म्हणून एका महात्म्यानें कर्मयोगाचा संदेश दिला, पण ज्ञान व भक्तीकडे पाहिलें नाहीं. दुसऱ्या महात्म्यानें ज्ञानाचा संदेश जगाला सांगितला, पण भक्तीचा ओलावा आणि कर्मांचा कणखरपणा यांचा समन्वय केला नाहीं. तिसऱ्या महात्म्यानें भक्तीचा कर्णा फुंकून साऱ्या जगाला बेभान नाचावयास लाविलें, पण त्याचे कर्म व ज्ञान हे दोन डोळेच फोडून टाकले. याचा परिणाम असा होत गेला व अझूनहि होत आहे कीं जनता कधीं शुद्ध अध्यात्मवादी, कधीं कणखर अर्थवादी व धर्मलंड, कधीं केवळ वावदुक ज्ञानी परंतु शुष्कहृदयी, तर कधीं ‘हें खरें का तें खरें’ असल्या अनिश्चित संशय

वादांत गुरफटलेली, कधीं संन्यासी तर कधीं संसारी, कधीं विचारी तर कधीं विकारी. याचें कारण त्या त्या पंथप्रवर्तक महात्म्याचा ( युटिलिटेरियन ) उपयुक्ततावादी बाणा व धोरणाची एकांगी वाढ हें होय. परंतु श्रीकृष्णाचें गीतेंत प्रतिबिंबित झालेलें चारित्र्य, त्याच्या आचाराची व विचाराची परस्पर-संवादी एकतानता आणि मानवी जीवनाच्या उत्क्रान्तीच्या नानाविध पायऱ्या क्रमवार आंखून देण्याची त्याच्या तत्वज्ञानाची नानारंगी पण एकजिनसी धाटणी, नीट काळजीपूर्वक स्वाध्यायांत घेतली ह्मणजे, भक्तियोगाच्या ओलसर क्षेत्रांत, कर्मयोगाची दणकट लागवड करून, ज्ञानयोगाच्या सर्वस्पर्शी जीवनानें, मानवांच्या सर्वांगीण उत्क्रान्तीचा मळा चौफेर एकजात एकसारखा पिकविण्याची त्या भगवंताची योगकुशलता, आचरट अहंमन्यांशिवाय, वाटेल त्या विवेकी मुमुक्षूला संशयछिन्न केल्याशिवाय खास रहाणार नाहीं. श्रीकृष्णाचें चारित्र्य एकांगी नव्हे, अनेकांगी आहे. गीतेचें तत्वज्ञान संसाऱ्याला व संन्याशाला, अर्थवाद्याला व ज्ञान्याला, धार्मिकाला व राजकारणी पंडिताला, जाणत्याला व नेणत्याला, सर्वांना पद्धतशीर समभावानें उत्क्रांतीचा मार्ग बिनचूक दाखविणारें सनातन होकायंत्र आहे. श्रीकृष्णाला **पूर्णावतार** व **पुरुषोत्तम** ह्मणतात कां, याचें कोडें उलगडूं पहाणारांनीं प्रथम या गीता–होकायंत्राची यंत्ररचना उलगडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्रीकृष्णानें आपल्या भक्तांना सांगून ठेवलेला संदेश आज आपण कृष्णजयंतीच्या उत्सवकालीं विचारांत घेऊन आचारांत उमटविला पाहिजे. कृष्ण भगवंताच्या जगद्गुरुत्वाची आज जगाला जरूर आहे. चालू जगांतलीं सामाजिक धार्मिक राजकीय व आंतरांष्ट्रीय प्रमेयांची अनेक खटचाळ खेंकटीं सुव्यवस्थित उत्क्रांतीच्या मार्गावर आणण्यासाठीं श्रीकृष्ण सर्व अनुयायांना हांक मारून संदेश देत आहेतः—

**क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥**

हे धनुर्धारी पार्था, हा निष्क्रिय नामर्दपणा सोडून दे. छेः ! माझा भक्त ह्मणविणाऱ्याला हा नेभळेपणा मुळींच शोभत नाहीं. दे दूर झुगारून तो मनाचा कमजोरपणा आणि ऊठ दंड थोपटीत जिवंत मर्दाप्रमाणें. भारता, कसल्या भिकाऱ्या क्षुद्र कल्पनांचा तूं गुलाम बनला आहेस ! जा. यच्चयावत् जगाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन भिडेल इतक्या जोरानें माझ्या गीतेची भक्ति–ज्ञान–कर्म–प्रधान संदेशाची तुतारी फुंक. अभेदभावानें त्या माझ्या गीताज्ञानाचा साऱ्या

मानवी दुनियेवर मुसळधार पाऊस पाड आणि जातपात, वर्णभेद, देशभेद, राष्ट्रभेद इत्यादि सर्व भेदांचा कंस ठार मारून, सर्वांना

## गीतारहस्याचा जाहीरनामा

वाचून दाखीव. सर्व मानवजातींतील व्यक्तिमात्राला ठांसून सांग कीं बावा, तुझ्यांत पाप नाहीं, तुझ्यांत दुःख नाहीं, तूं हतबल नाहींस; तूं मर्द आहेस, तूं देवांचा देव—शक्तीचा खजिना आहेस, तो तूंच आहेस. ऊठ, जागा हो आणि गीतेच्या प्रकाशानें आत्मज्ञानाची ओळख करून घे. **क्लैब्यं मा स्म गमः पार्थ!**

प्रिय बंधुभगिनी वाचक जनहो, आज कृष्णजयंतीच्या मंगल कालीं हा दिव्य संदेश येतां जातां दिसेल अशा ठिकाणीं मोठ्या अक्षरांत लिहून ठेवा. त्याचें क्षणोक्षणीं चिंतन करा म्हणजे लवकरच असा योग येईल कीं याच कृणजयंतीच्या दिवशीं जगांत जेथें जेथें म्हणून मानव आहे, तेथून तेथून त्याच्या तोंडून हाच जयजयकार निघेल कीं:—

कृष्णं वन्दे जगद्गुरुम्.

[ प्रबोधन, १६–८–२२. ]

# बरोबर २९३ वर्षांपूर्वी !



येक या मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ।
तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आह्मांचि देखतां ॥
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्य दाखवीं ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजा माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥

अ ब ब ब ! तीनशें वर्षें होत आलीं आं ? आतां काय तीनशेंला अवघीं सातच वर्षें कमी ! केवढा हा अवाढव्य आणि विस्तृत कालावधि ! या लांबलचक कालावधीचा—एक लक्ष सात हजार चारसें दिवसांचा—चित्रपट आपल्या जिवंत स्मृतीच्या तिखट नजरेसमोर भरभर भरभर पुनश्च उघडून नाचविला, तर या भाग्यवान् महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनांतले नानाविध सुखदुःखांचे देखावे हृदयांतील विकारांना रटरट रटरट उकळी फोडून, आपल्या चिमुकल्या छातीचीं कपाटें खडाखड उघडून टाकल्याशिवाय रहात नाहींत ! लाखों दिवसांच्या अनंत श्रेणींनीं अपरपार रंगून निघालेला हा चित्रपट क्षणभर तसाच गुंडाळून ठेवा

आणि आपल्या हृदयस्थ आत्मारामाला विचारा कीं हे आत्मारामा, आमच्या महाराष्ट्राचा **राष्ट्रवीर**–आमच्या राष्ट्रीय भाग्याला उज्वल करणारा स्वातंत्र्य-सूर्य कधीं रे उगवला ? तर तो स्मृतीच्या मूकभाषेंत हेंच उत्तर चटकन् देईल कीं **आजच.** आज ? आज तारीख ९ मे सन १९२१ इसवी रोजीं ? आत्मारामा काय म्हणतोस हें ? इतिहासाचा चित्रपट तरी उघडून पहा. आजचा शक १५३९ नव्हे, प्रभवनाम संवत्सर नव्हे, अश्विनी नक्षत्र नव्हे, गुरुवारही नव्हे आणि ६ एप्रिल सन १६२७ तर नव्हेच नव्हे ! नाहीं म्हणायला वैशाख महिन्यांतली तिथि मात्र जुळते खरी. पण ती वार्षिक उत्सवाची तिथि होय. आमची चंचल स्मृति, ही पुण्य तिथि आणि आमची सद्यःस्थिति, हा त्रिवेणी संगम झाल्यामुळें महाराष्ट्रीयांच्या रोमारोमांत स्वाभिमानाचा कंप उत्पन्न करणारी स्फूर्ति तर तुझ्या तोंडून **आजच** असें वदवीत नाहीं ना ? कालमर्यादेच्या शतकांची गोष्ट राहूं दे, एका दशकाच्या तडाख्यांत मोठमोठ्या मी मी म्हणाऱ्या महापराक्रमी राष्ट्रांचे तीनतेरा झाले. त्यांच्या राष्ट्रवीरांच्या चारित्र्यांच्या, डोळ्याची पापणी लवते न लवते तोंच, चिंधड्या चिंधड्या उडाल्या. ज्या राष्ट्रगीतांच्या नुसत्या ध्रुपदाचा स्वर लष्करी वाद्यांतून प्रगट होतांच शेळपटाचाहि योद्धा बनून योध्यांच्या नसांतलें रक्त राष्ट्राभिमानानें तापून उसळ्या मारीत असे, तींच राष्ट्रगीतें आजला कालव्यतीत आणि मृत ठरून गेलीं. साऱ्या पृथ्वीच्या गोलाला आंवळ्याप्रमाणें स्वतःच्या मुठींत ठेवूं म्हणून मिलिटरीझमच्या गर्जना करणाऱ्या जर्मनीसारख्या उत्तान महत्त्वाकांक्षी राष्ट्राला आज प्राणान्ताचा घरघराट लागला आहे. हम करे सो कायदा असल्या दंडुकेशाहीच्या जोरावर साऱ्या रशियाच्या उरावर वरंवटा फिरविण्यांतच आपल्या ऐश्वर्याची परमावधि मानणारी झारशाही बोलबोलतां एखाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणें कवडी किंमतीच्या सोल्जरांच्या बंदुकांनाच बळी पडून आमूलाग्र धुळीस मिळाली. काळाचा झपाटा असा तीव्र वेगानें सुरू आहे कीं सूर्याभोंवतालच्या पृथ्वीच्या एकाच प्रदक्षिणाकालांत सांप्रत महासागरांचे पर्वत बनून पर्वतांचें पाणी पाणी होत आहे. इतका भयंकर स्थित्यंतराचा रामरगाडा सुरू असतांनाहि आमच्या परमपूज्य परमप्रिय **श्रीशिवछत्रपतीं**ची स्मृति पूर्वी जशी होती तशीच्यातशीच आजलाहि अक्षय जिवंत रहावी, या चमत्काराचें गूढ काय बरें असावें ? राजकीय दृष्ट्या महाराष्ट्र आजला जरी पतित आणि परावलंबी ठरलेला असला, तरी त्याचें अंतःकरण अजूनहि श्रीशिवमय असल्यामुळें तें पूर्ण स्वतंत्रच आहे. त्याच्या हृदयाच्या

अणुरेणूवर आद्य छत्रपतीची प्रतिमा अक्षय व खोलवर कोरली गेल्यामुळें, असल्या श्रीशिवमय झालेल्या महाराष्ट्राला जगांतलें कोणतें राष्ट्र जिंकूं शकेल ?

## महाराष्ट्र अजिंक्य आहे !

आमच्या शिवाजीचा महाराष्ट्र स्वतंत्र आहे. आमच्या तानाजीचा मावळा नेपोलियनांची खाण आहे. आमच्या बाजी प्रभूची पावनखिंड म्हणजे साऱ्या जगाला पावन करणारी स्वातंत्र्याची माता आहे. छत्रपति संभाजीचा हा महाराष्ट्र म्हणजे हिंदुधर्माचें जागतेजोग धर्मपीठ आहे. बा महाराष्ट्रा ! विचाऱ्या महाराष्ट्रा ! ! व्यक्त सृष्टीवर खिळलेली तुझी नजर जरा अव्यक्ताकडे वळीव. तुझ्या विचारी दृष्टीचा कोन सध्या बहिर्मुख आहे तो अंतर्मुख करून क्षणभर

## घूंगटका पट खोल रे !

म्हणजे यक्षिणीच्या कांडीप्रमाणें तुझी सध्यांची मृण्मयावस्था सुवर्णाची छडी बनून, महाराष्ट्राच्या सात्विक पराक्रमाचा दरारा साऱ्या जगाच्या छातीवर हां हां म्हणतां आपला धौशा गाजविल्याशिवाय खास राहणार नाहीं. आज महाराष्ट्राची दृष्टि बाहेरच्या व्यक्त सृष्टीवर खिळलेली असल्यामुळें त्याच्या राष्ट्रीय अंतःकरणाच्या संवेदनांची आणि त्याच्या मस्तकांतील विचार-यंत्राची ताटातूट झालेली आहे. हा हृदयमस्तकाचा संयोग म्हणजे पॉझिटिव निगेटिवचा संयोग होय. हृदयरूपी डायनामोमध्यें अमोघ विद्युत्शक्ति निर्माण झालेली आहे, पण निगेटिव पॉझिटिवचा सँयोग झाला नाहीं तर ठिणगी कशी पडणार ? शिवाजीच्या महाराष्ट्रानें आपल्या शिवमय हृदयाची तार मस्तकांतल्या विचारयंत्राशीं जोडून देण्याचा यत्न करण्यांतच त्याच्या राष्ट्रीय भाग्योदयाची खरी गुरुकिल्ली आहे, हेंच महाराष्ट्राला सक्रीय व सप्रमाण पटवून देण्यासाठीं १७ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकांत श्रीशिवछत्रपती महाराज या पुण्य-श्लोक

## राष्ट्रवीराचा जन्म झाला.

या पुण्यप्रभावशील जन्मदिवशीं महाराष्ट्राच्या खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय संस्कृतीचें बिनतोड जातकर्म निश्चित ठरलें गेलें. महाराष्ट्रीयांनीं आपलें हृदय मस्तकांत मेंदूच्या अगदीं शेजारीं आणून स्थापन केल्याशिवाय त्यांचा राष्ट्रीय भाग्योदय होणार नाहीं, हा संदेश घेऊनच आमच्या राष्ट्रवीर छत्रपतीची स्वारी महा-

राष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षितिजावर बरोबर २९३ वर्षांपूर्वी उदय पावली, आणि आपल्या अनुपमेय पराक्रमांनीं हा भूगोल त्यांनीं दणाणून सोडला. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा कोठें आहे व तो कोणत्या प्रयत्नांनीं उद्दीपित होऊन आपल्या मायदेशाचे पांग फेडण्यास शक्त होईल, हें अचूक उमगणारा धन्वंतरी जर कोणी गेल्या अनेक शतकांच्या विस्तीर्ण कालावधींत जन्मला असेल तर तो एकच—अगदीं 'अनामिकासार्थवती बभूव' करणारा एकच—भोंसले कुलदीपक राष्ट्रवीर श्रीशिवाजी हाच होय. राष्ट्राचें नायकत्व पत्करून काजव्या-प्रमाणें चटकन् चमकून पटकन् लुप्त होणारे किंवा तेरड्याप्रमाणें तीनच दिवसांत जन्मतांच मृत्यु पावणारे नामधारी राष्ट्रवीर आजवर अनेक झाले, रोजच्या रोज धब्यापासरी उत्पन्न होत आहेत व पुढेंहि होत राहतील; तथापि **राष्ट्रवीर** या शब्दांत ज्या उदात्त रमणीय भावनांचा समावेश होतो, त्या सर्व भावनांचें एकी-करण झालेला सकल गुणालंकृत असा असामान्य बुद्धिमत्तेचा पुतळा या भाग्य-वान् महाराष्ट्रभूच्या कुसव्यांत जर कोणी जन्मला असेल तर तो आमचा **प्यारा प्राण शिवबाच** होय. श्रीशिवजयंत्युत्सवाच्या निमित्तानें महाराष्ट्राचें हृदय फुरफुरूं लागलें. श्रीशिवाजीचा हा उत्सव घरोघरीं करा असा आदेश करण्याचें वास्तविक कांहींच कारण नाहीं. महाराष्ट्राच्या दिनचर्येचा असा एकहि क्षण नाहीं कीं ज्या क्षणीं अस्सल महाराष्ट्रीयांच्या श्वासोच्छ्वासांत शिवोऽहम् शिवोऽहम् असा ध्वनि निघत नाहीं. श्रीशिवाजीमहाराज हे लोकमान्य, महात्मा किंवा दे. भ. या शुद्ध लौकिकी भावनेच्याहि वरच्या कोटींतले आहेत. ते महात्मा होते किंवा नव्हते, ते देशभक्त होते किंवा नव्हते हा काथ्याकूट करणाऱ्यांना शिवा-जीची वास्तवीक योग्यताच समजली नाहीं, असें म्हणणें भाग पडतें. ते लोक-मान्य होते पण अर्वाचीन लोकमान्यांप्रमाणें शुद्ध लोकछंदानुवर्ती मुळींच नव्हते. ते गोब्राह्मण-प्रतिपालक होते परंतु ब्राह्मणांचा शिरजोरपणा मान्य करणारे नव्हते. श्रीशिवाजी महाराजांचीं चरित्रें आजवर बरींच झालीं; परंतु या अननुभूत राष्ट्रवीराच्या चारित्र्याचें मर्म महाराष्ट्रानें अद्यून पूर्णपणें जाणलेलें नाहीं. हें मर्म ज्या दिवशीं महाराष्ट्राला नीट उमगेल, त्या दिवशींच त्याचा भाग्योदय होईल. या मर्माची ओळख पटवून देणाऱ्या "राष्ट्रवीर" साप्ताहिक पत्राचा आज श्रीशिवरायाच्या जन्मदिवशींच जन्म होत आहे, याबद्दल त्याचें कोणीहि राष्ट्राभिमानी अभिनंदनच करील. या राष्ट्रवीराच्या पहिल्या अंकांत माझ्या सारख्या दुबळ्या सेवकाची वेडीवांकडी सेवा अवश्य रुजू झाली पाहिजे, असा

निकडीचा विद्युत्संदेश आल्यामुळें तात्कालिक भावनेचे हे अक्षरशः वेडेवांकडे विचार–व्यक्तीकरण राष्ट्रवीराच्या चरणीं अर्पण करून, सध्यां वाचकांची मी रजा घेतों. काय म्या पामरें बोलावीं उत्तरें, परि त्या शिवरायें बोलविलें ! ! !

[ राष्ट्रवीर, ९–५–२१ ]

# बुद्धदेवाची कामगिरी.

बरोबर २५११ वर्षे झालीं. वैशाख शुद्ध पौर्णिमेचा दिवस. हिन्दु राष्ट्राच्या



चरित्रांतला एक परम मंगल, स्फूर्तिदायक आणि अभिमानोत्तेजक दिवस होय. अडीच हजार वर्षांपूर्वी याच दिवशीं हिंदु राष्ट्राच्या सामाजिक धार्मिक नैतिक व राजकीय जीवनांत आत्मतेजाचें चैतन्य ओतून प्रबोधनाची अननुभूत चळवळ निर्माण करणारा महात्मा गौतम बुद्ध **बुद्धदेव** म्हणून जगद्रंगभूमीवर येऊन उभा ठाकला. या दिवशीं सर्व जगभर ठिकठिकाणीं बुद्धानुयायी बांधव बुद्धदेवाचें भजनपूजन करण्यासाठीं एकत्र होतात व त्यानें निर्माण केलेल्या विश्वव्यापी प्रबोधनाच्या दिव्य कामगिरीचें मुमुक्षु वृत्तीनें चिंतन करतात. वास्तवीक, **बुद्धदेव** आम्हां हिंदूंचा. हिन्दु धर्मांत मिशनरी चैतन्य ओतून त्याला साऱ्या जगाचा जगद्गुरु केलें बुद्धदेवांनीं. आज नाहीं नाहीं तरी जगाच्या पाठीवर पन्नास कोटींच्या वर बुद्धानुयायी भगिनी बांधव दररोज 'नमो बुद्धाय' म्हणून बुद्धदेवाला प्रणिपात करीत असतात. असें असतां, हिन्दुस्थानचा बुद्धदेव कीं बुद्धदेवाचा हिंदुस्थान, हा सोपा प्रश्न सुद्धां हिन्दू म्हणविणारांना कधिं सुचूं नये, हें कालमाहात्म्य होय. परंतु या कालमाहात्म्यावर विचारशक्तीची मात करून बुद्धदेवाच्या कामगिरीची कृतघ्न हिंदु-

स्थानाला आठवण देण्याचा उपक्रम यंदां मुंबईच्या कांहीं विचारी सज्जनांनीं ता. १०-५-२२ रोजीं बुद्धजयन्ती साजरी करून केला, याबद्दल प्रबोधन त्या सर्व सज्जनांच्या चरणीं साष्टांग प्रणिपात घालीत आहे.

गेल्या जयन्तीचा विशेष हा होता कीं बुद्धदेवाचें स्मरण करण्यासाठीं जमलेल्या मंडळींत अनेक पक्षांचे, अनेक मतांचे आणि अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधि एकाच भावनेनें एकत्र झाले होते. भेदांतच अभेद हें जें बुद्धदेवाच्या कामगिरीचें रहस्य तें या ठिकाणीं यदृच्छेनें प्रत्यक्ष व्यक्त झालेलें दिसलें. जपान राष्ट्राचे दरबारी वकीलसाहेब आपल्या पत्नीसह हजर होते. सारांश, पृथ्वीवरील निरनिराळीं राष्ट्रें एकजीव होण्याचा संभव जितका बुद्धदेवाच्या चरित्ररहस्यांत आहे, तितका श्रीकृष्णाच्या नाहीं आणि क्रिस्ताच्या तर नाहींच नाहीं, हें लक्षांत येईल. बुद्धदेवांनीं आपल्या कामगिरीचें क्षेत्र हिंदुस्थानापुरतेंच आकुंचित ठेविलें नाहीं. त्यांनीं सर्व भेदांचा पूर्ण संन्यास करून हिंदुस्थानाची कोंडी फोडली आणि

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ॥

या व्यापक धोरणानें त्यांनीं साऱ्या जगाला 'आपलें' केलें. प्रस्तुत जयंतीचा उपक्रम असाच दरसाल नियमित होईल आणि त्याबरोबरच बुद्धदेवाच्या संप्रदायाचा इतिहास अध्ययन करण्याची अभिरुची तरुणतरुणींत वळावत जाईल, तर हिंदूंच्या प्राणत्राणपरायण विविध चळवळींत लुप्त झालेलें मिशनरी चतन्य खात्रीनें पुनश्च थरारल्याविना रहाणार नाहीं.

सांप्रत हिंदुराष्ट्र पुनरुज्जीवनाच्या संक्रमणावस्थेंत आहे. त्याचें सामाजिक व धार्मिक जीवन सडलेलें असून, राजकीय बाबतीत तें गुलाम बनलेलें आहे. अनेक मतांतरांचा सर्वत्र गोंधळ माजल्यामुळें विवेकवादाचीं बीजें रुजविण्याचें कार्य कठीण होऊन बसलें आहे. अनेक शतकांच्या भिक्षुकशाही वर्चस्वामुळें सारी जनता अक्षरशत्रु राहिली आहे आणि त्यांच्या अज्ञानावर चरणाऱ्या भिक्षुकी पोळांनीं तिच्यांत धर्माच्या नांवावर मानसिक दास्याचें जहर फैलावून आपल्या वर्चस्वाची कडेकोट तटबंदी केलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सध्यां चालू असलेल्या नानाविध चळवळी एकपक्षी, एकांगी व एकाक्ष असल्यामुळें, मूढ जनतेच्या जागृतीनें उत्पन्न झालेला दास्यविरोधी ज्वालामुखी त्या चळवळींना ठिकठिकाणीं विरोधाच्या ज्वाळांनीं अडवून धरीत आहे. अशा प्रसंगीं हिन्दु राष्ट्राला बुद्ध-

देवाचें विस्मरण होतांच कामा नये. ज्या बुद्धदेवानें एक वेळ याच भरतखंडाला असल्याच परिस्थितींत तारलें व साऱ्या दुनियेचा सम्राट बनविलें, तो बुद्धदेवच आतां हिन्दु राष्ट्राच्या धुरेवर येऊन उभा राहिला पाहिजे.

बुद्धपूर्वकालीं हिन्दुराष्ट्राची जी स्थिति होती तींत आणि आतांच्या स्थितींत रूपभिन्नतेपेक्षां कसलाहि फरक नाहीं. भिक्षुकशाहीचें बंड आतांप्रमाणेंच त्या वेळीं फार शिरजोर झालें होतें. धर्माच्या नांवाखालीं वाटेल तसले अत्याचार करण्यास ब्राह्मण लोक पक्के निढांवलेले होते. क्षत्रिय वैश्यांचा तेजोभंग करून, त्यांना सर्व बाबतींत ब्राह्मणांचे गुलाम बनविण्याचें भिक्षुकी कारस्थान त्यावेळीं पूर्ण यशस्वी झालें होतें. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रांतच केवळ नव्हे, तर राजकीय क्षेत्रांतहि, ब्राह्मण आपल्या भूदेवत्वाच्या सबबीवर क्षत्रियांना खेंटराप्रमाणें लेखूं लागले होते. खुद्द क्षत्रिय वैश्यांची जेथें ही स्थिति, तेथें गरीब बिचाऱ्या शूद्रांची व अस्पृश्य जनांची काय बडदास्त ब्राह्मणांनीं ठेविली असेल, याची कल्पना आम्हीं करून दिलीच पाहिजे असें नव्हे. सर्वच बाबतींत भिक्षुकशाही शिरजोर झाल्यामुळें ब्राह्मणेतरांच्या नशिबाला शारिरीक व मानसिक गुलामगिरीपेक्षां दुसरें काय येणार ? ब्राह्मण ह्मणजे भूदेव, ब्राह्मण जात म्हणजे राष्ट्र, त्यांच्या बऱ्यावाईट स्वार्थी आत्मस्तोमाच्या चळवळी ह्मणजे राष्ट्रीय चळवळी, आणि ब्राह्मणेतर जनता, तिच्या आकांक्षा, तिचे हक्क इत्यादि प्रकार ह्मणजे ब्राह्मणांच्या पायांतलीं पायतणें, या वर्तमान भिक्षुकशाही कल्पनेचा राक्षसी धागा थेट बुद्धपूर्वकालीन इतिहासापर्यंत बिनतोड जाऊन भिडलेला आढळतो. धर्माच्या क्षेत्रांतल्या भिक्षुकी वर्चस्वाच्या कल्पना हुबेहूब मनुस्मृति टायपाच्या. मंत्रतंत्राचें बंड बेसुमार माजलेलें. सर्व जग देवाच्या स्वाधीन, देव मंत्रांच्या आधीन, मंत्र ब्राह्मणांच्या स्वाधीन, ह्मणून जेहत्ते ब्राह्मण हे भूदेव होत, ही जी मनुस्मृतीची भिक्षुकी घमेंड आजचेहि ब्राह्मण निःशंकपणें मारण्यास शरमत नाहींत, तिची अक्षरशः अंमलबजावणी त्या वेळीं ब्राह्मणेतरांवर ब्राह्मण गाजवीत असत. आतांप्रमाणेंच त्या काळीं ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रादि जाती जन्माच्या अपघातावरूनच ठरविण्यांत येत असत. खुद्द ब्राह्मणांची दिनचर्या पाहिली तरी मंत्रवेत्तेपणाची व मंत्ररक्षणार्थ लागणाऱ्या आत्मशुद्धीची जरी ते तोंडीं वल्गना पुष्कळ करीत, तरी त्यांचे आचारविचार आतांच्या नामधारी ब्राह्मणांइतकेच क्षुद्र व निकृष्ट असत. तथापि बहुजनसमाज आतां प्रमाणेंच निरक्षर मूढ व भोळसट असल्यामुळें, त्याची मनोवृत्ति अंधश्रद्धेची धूळ फेकून

आंधळी करणें तत्कालीन भूदेवांना फारसें कठीण गेलें नाहीं. उलट या अंध-श्रद्धेच्या जोरावर ब्राह्मणेतरांना मंत्रतंत्रांच्या यंत्रांत सफाई पिळून त्यांचीं चिपाडें करण्याची कामगिरी ब्राह्मण भूदेव दिवसाढवळ्या करीत असत.

मंत्रतंत्रांच्या जोडीला दुसरें एक शस्त्र ब्राह्मणांनीं हस्तगत करून ठेवलें होतें. तें म्हणजे दैवी शक्ति मिळविण्यासाठीं यज्ञयाग करणें हें होय. यज्ञयागानें देव संतुष्ट होतात व माणसांच्या दैवाच्या उलट्या कवट्या सुलट्या बसवितात ही आर्य लोकांची कल्पना वेदकाळापासूनची आहे. तिचा पोकळपणा हडसून खड-सून सिद्ध झाला असून, पुत्रासाठीं कामेष्टी यज्ञ करणारे भाव्ये आणि जर्मनीचा नायनाट होण्यासाठीं फणसवाडींत खंडोगणती तूप जाळणारे हरेश्वर महादेव पंडित, असले यज्ञयागप्रामाण्याचे भक्त अजूनसुद्धां वरेच आढळतात; मग तुळ-शीचीं हजार पानें सत्यनारायणाला वाहून, किंवा शेंदराच्या पट्टयानें धोंड्यांत उद्भवलेल्या म्हसोबाला कोंबड्या बकऱ्यांचा नैवेद्य दाखवून भरभराटीची फल-श्रुति मागणारे लोक कितीतरी असतील! असो, अनेक शतकांच्या प्रघातामुळें पशुहत्येचे निरनिराळे यज्ञ यथासांग करणें, ही एक त्यावेळीं मोठ्या कुशलतेची कला होऊन बसली होती व ती सफाईत वठविण्याची गुरुकिल्ली आपल्या हातींच ठेवण्यासाठीं ब्राह्मणांनीं दाखविलेली धूर्तता त्यांच्या लौकिकास शोभेशीच होती. हल्लीं जसें बारसें असो, बारावें असो, मुंज असो, लग्न असो, नाहींतर स्मशान-क्रिया असो, तेथें भट हा पाहिजेच, तसेंच त्या काळीं यज्ञ म्हटला कीं भटाची पायधरणी केल्याशिवाय गत्यंतरच नसे. मग हा भट नुसता कवाइत्या असला तरी त्याची आतां प्रमाणेंच कोणी खंत मानीत नसत. यज्ञांत कोणत्या पशूंची किती हत्या करावी, याज्ञिकानें सोमदारूचे किती बुधले फडशा पाडावे, कोणत्या यज्ञांत यजमानाकडून किती दक्षिणा हबकावी, इत्यादि मामले शुद्ध 'वेदोक्त' असल्यामुळें भट सांगेल ती पूर्व दिशा असा प्रकार सर्वत्र असे. मंत्रतंत्राप्रमाणेंच यज्ञयागांच्या बाबतींत तत्कालीन भिक्षुकशाहीचें वर्तन इतकें रानटी, राक्षसी व रुधिरप्रिय होतें कीं त्याचीं वर्णनें वाचून कसाईखान्यांतल्या खाटकांच्या हृद-यालासुद्धां द्रव आल्याविना राहणार नाहीं. मंत्रतंत्र, उपासतापास, यज्ञयाग इत्यादिकांत होणाऱ्या अत्याचारांनींच त्यांची विफलता बऱ्याच विवेकी लोकांना त्या वेळींसुद्धां पटली होती व ते त्याविरुद्ध निषेधाचा पुष्कळ जळफळाटहि करीत. परंतु भिक्षुकशाहीनें 'सार्वत्रिक' केलेल्या, कित्येक शतकांच्या प्रघातानें रुढिमान्य झालेल्या, बहुजनसमाजाच्या नित्य आचरणानें आंगवळणीं पडून

' लोकमान्य ' बनलेल्या धर्मकल्पना किंवा सामाजिक चालीरीती कितीहि बाष्कळ व निरर्थक वाटल्या तरी त्याविरुद्ध सक्रीय प्रतिकाराची चढाई करण्याचें धारिष्ट कोणासहि होईना. हल्लींसुद्धां विधवाकेशवपनासारखी घाणेरडी चाल अविचारी व अनीतीची आहे, हें पटलेलें असून सुद्धां, वेळ येतांच चांगले चांगले शहाणे-सुर्ते त्या रूढीला मान देतातच ना ? एखाद्या पातकाची नुसती जाणीव होऊन भागत नसतें, तर त्याला बेदम चोपून जिवंत गाडण्याइतका आत्मविश्वासाचा जोर निषेधकाच्या मनगटांत असावा लागतो. तथापि गुपचुप निषेधाची शक्ति अगदींच कांहीं वाया जात नाहीं. एकाद्या जुलमाविरुद्ध उघडउघड बंड झालेलें पुरवलें, कारण त्याचा मोक्ष तडकाफडकी लावतां तरी येतो; पण गुप्त असंतोष जर का जनतेच्या हृदयांत घर धरूं लागला, तर त्याच्या आकस्मिक स्फोटानें ब्रह्माण्डाचेहि राईराई एवढे तुकडे होतात. भिक्षुकशाहीनें धर्माला अट्टल दारु-बाज, मांसाहारी व अत्याचारी बनविल्यामुळें उत्पन्न झालेल्या गुप्त असंतोषाच्या स्फोटांतून बुद्धदेवाचा अवतार झाला आणि त्यानें आत्मसंशोधित नवमत-वादाच्या एकाच मुसंडीनें भिक्षुकशाहीचा मुर्दा पाडला.

नवमतवादाच्या इतिहासांत एक गोष्ट विशेष स्पष्ट आढळून येते कीं, जेव्हां जेव्हां जनतेला भिक्षुकशाही दास्यांतून मुक्त करण्याचे प्रसंग आले, तेव्हां तेव्हां क्षत्रिय वीरच पुढें सरसावलेले दिसतात. धर्मस्थापना घ्या, सामाजिक पुनर्घटना घ्या किंवा राजकीय स्वातंत्र्य घ्या, क्षत्रियांची उडी त्यांत पडल्याशिवाय तें कार्य यशस्वी झाल्याचा दाखला नाहीं. शिवाय ब्राह्मणांतील उत्तम पुरुषांचीं कार्यें आणि क्षत्रिव वीरांचीं कार्यें यांत एवढा भेद असतो कीं पहिला जात्याच संकु-चित मनोवृत्तीचा असल्यामुळें त्याच्या कार्याचा व्याप शंकराचार्यांच्या संप्रदाया-प्रमाणें गांवठाणाच्या कुंपणाइतकाच असतो आणि क्षत्रियाची मनोवृत्ती त्याच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणें मोकाट दिलदार असल्यामुळें त्याच्या कार्याची पकड महात्मा बुद्धदेवाप्रमाणें साऱ्या पृथ्वीला कंवटाळते. ब्राह्मणांचें वाचिवीर्यत्व आणि क्षत्रि-यांचे सव्यसाची धनुर्धारित्व इतिहासप्रसिद्ध आहे. धर्मस्थापना करावी क्षत्रियांनीं आणि तिचा विध्वंस करण्याचें पुण्य मात्र मिळवावें ब्राह्मणांनीं. क्षत्रियांनीं स्वराज्य कमवावें आणि ब्राह्मणांनीं तें गमवावें, हा अनुभव तर अगदीं काल परवांचा; मात्र परंपरा फार प्राचीन काळची.

गौतम बुद्धाच्या चरित्रांत असा एक विशेष आहे कीं त्याला जगाच्या इति-हासांत दुसरी तोड नाहीं. एकूणएक तत्ववेत्त्यांची प्रवृत्ति तत्त्वशोधनाकडे वळ-

विण्यास त्यांची आपत्ति कारण झालेली आढळते; पण गौतम बुद्ध राज्यवैभवाच्या उत्कृष्ट उत्कृष्ट सुखोपभोगांत गुलाबाच्या फुलाप्रमाणें झेलला जात असतां आजूबाजूला पसरलेल्या **जगाच्या दुःखानें विव्हळ झाला** आणि तत्वशोधनाकडे वळला. जगाच्या दुःखासाठीं स्वतःच्या सुखावर निखारे ठेवणारा देवाचा अवतार मानण्यापेक्षां प्रत्यक्ष देवच कां मानू नये ? राजपुत्र असतांना त्यानें स्वधर्माचें शक्य तेवढें शिक्षण भिक्षुकशाही विद्वानांपासून मिळविलेंच होतें. पुढें सर्वसंगपरित्याग केल्यानंतर त्यानें तत्कालीन पंडितांपाशीं तत्वज्ञान व योग यांचेंहि ज्ञान मिळविलें; परंतु त्याचें कांहीं समाधान झालें नाहीं व ज्या दुःस्थितीचें उच्चाटन करण्यासाठीं त्यानें एवढा आत्मयज्ञ केला, तें साधन तर त्याला हस्तगत होण्याची मुळींच आशा दिसेना ! अखेर पंडीतांच्या पोपटपंची परंपरेला आणि देह विनाकारण झिजवून आत्मज्ञानाची आशा लावणाऱ्या हटयोगाच्या हट्टाला त्यानें लाथाडून स्वतःच्या पायावर उभें राहण्याचा निश्चय केला. अर्थात् आत्मसामर्थ्याचा जोर उत्पन्न होतांच त्याला गयेस आत्मसाक्षात्काराचा अनुभव येऊन, त्याच्या नवमतवादाची योजना सिद्ध झाली व आत्मविश्वासाच्या बळावर या योजनेची मात्रा जगाच्या दुःखावर देण्याचा त्यानें कृतसंकल्प केला. बुद्धदेवाच्या संप्रदायाचीं तत्त्वें काय होतीं व त्यानें त्यांच्या जोरावर रुधिरप्रिय व दास्यप्रवर्तक भिक्षुकशाहीच्या कचाट्यांतून आर्यधर्माचा बचाव कसा केला, याची विस्तृत माहिती येथें देणें शक्य नाहीं. परंतु इतकें म्हटलें म्हणजे पुरे कीं भूतदयेच्या भांडवलावर आणि सुरुवातीला फक्त पांच अनुयायी मिळवून बुद्धदेवानें आपल्या नवमतवादाचा प्रसार एवढा जबरदस्त केला कीं वादविवादाची एकहि सरबत्ती न झाडतां, त्यानें थोड्या वर्षांतच भिक्षुकशाहीला चीं चीं करायला लावलें. त्यानें आपल्या संघाचे दरवाजे आब्राह्मणचाण्डाळांना मोकळे सोडून मानवजातीचा अभेदभावाचा एक विश्वव्यापक भ्रातृसंघ तयार केला. सर्वांना आत्मज्ञानाची मुबलक खैरात समसमान झाल्यामुळें श्रेष्ठकनिष्ठ, उच्चनीच, स्पृश्यास्पृश्य या भेदांना तात्काळ गति मिळाली व आर्यधर्माचें खरें विशुद्ध, लोकसंग्रही व उदात्त स्वरूप जगाच्या निदर्शनास आलें. बौद्धधर्म हा आजला जरी निराळा धर्मपंथ असा आपणांस भासतो तरी बुद्धदेवानें निराळा धर्म मुळींच काढला नाहीं. जुन्या धर्मावर चढलेलें कुविचारांचें कीट काढून टाकलें मात्र. म्हणजे बौद्धधर्म हा सुधारलेला हिन्दुधर्म होय. बुद्धदेवाच्या उदार क्षत्रियवृत्तीचें त्याच्या आत्यंतिक भूतदयेंत उत्तम मिश्रण झाल्यामुळें, त्याच्या संघाचीं तत्वें क्षत्रिय लोकांना तात्काळ

मानवलीं व ते भराभर त्याचे अनुयायी झाले. वैश्यांचाहि ह्याच प्रकार. बिचाऱ्या शूद्रांचा व अस्पृश्यांचा आनंद काय विचारावा ! त्यांना बुद्धदेव ईश्वरापेक्षांहि प्रिय वाटला. क्षत्रियादि त्रैवर्णिकच बुद्धाचे अनुयायी झाले असें नव्हे, तर धर्माच्या नांवाखालीं होणाऱ्या भिक्षुकशाहीच्या अत्याचारांस विटलेले आणि बुद्धाचा विवेकवाद विचारान्तीं पटलेले हजारों ब्राह्मणसुद्धां अखेर बुद्ध जगद्गुरूच्या संघांत सामील झाले. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे आर्यांचा धर्म फक्त आर्यांकरितां, इतरांकरितां नव्हे, ही जी संकुचितपणाची कोंडी भिक्षुकशाहीनें निर्माण केली होती, ती कोंडी फोडून पृथ्वीवर वाटेल त्या राष्ट्रांतला, वाटेल त्या संस्कृतीचा मनुष्य, त्याची इच्छा असेल तर, आपल्या संघांत बिनतक्रार समाविष्ट करून घेण्याचा मिशनरी उपक्रम प्रथम बुद्धदेवानें चालू केला आणि लोकसंग्रहाच्या या तत्त्वाच्या जोरावर पुढें त्याच्या एकनिष्ठ अनुयायांनीं सारी उपलब्ध दुनिया पादाक्रान्त केली.

बुद्धदेवाच्या चळवळीला धार्मिक बंड म्हणण्यापेक्षां सामाजिक बंड हेंच नांव अधिक शोभतें. त्यानें वेदप्रणीत धर्मतत्त्वांचा निषेध केला नाहीं, तर त्यांचा खरा अर्थ काय आहे तो जनतेला उघड करून दाखविला. यज्ञयागांचा खरा अर्थहि त्यानें शिकविला. स्वतः प्रबुद्ध राजपुरुष असल्यामुळें, बुद्धदेवाच्या उपदेशांत राजकारणाची दूरदृष्टि तर विशेष चमकत होती. बुद्धदेवाच्या नवमतवादी प्रचंड चळवळीनें भिक्षुकशाहीचें वर्चस्व सर्वस्वीं जमीनदोस्त झालें व त्यामुळें बुद्धदेवावर भिक्षुकशाही जळफळाट करूं लागली, हें खरें; परंतु ज्या वेदप्रणीत धर्माच्या प्रतिनिधित्वाची ऐट भिक्षुकशाही मारीत असे त्याच धर्माचें शुद्ध स्वरूप बुद्धदेवानें सर्वत्र प्रसृत केल्यामुळें ब्राह्मणांना आपली बाजू सावरतां सावरतां नकोसें झालें. बुद्धदेवानें वेदप्रणीत कल्पनांच्याच आधारावर आर्यसंघाची व्यापक धोरणावर पुनर्घटना केली आणि कालमानाला अनुसरून धर्माचें द्वार सर्वांना अभेदभावानें मुक्त सोडलें. शुद्ध आचारविचारांची महती धर्माप्रमाणें राजकारणाच्या क्षेत्रांत त्यानें विशेष प्रतिपादन केल्यामुळें राष्ट्राच्या जीवनांत अध्यात्माच्या जोडीनें अर्थवादहि थरथरला. तत्वज्ञानाच्या शुष्क अवडंबरापेक्षां त्याचा प्रत्यक्ष उपयोग राष्ट्राच्या चारित्र्यांत केल्यामुळें राष्ट्राच्या भाग्योदयाचा प्रवास भराभर होत गेला.

बुद्धदेव आमचे आहेत. त्यांचीं धर्मतत्त्वें आमचीं आहेत. कालविपर्यासामुळें आम्ही आजवर बुद्धदेवाला विसरलों होतों. आज त्यांची आम्हांला आठवण

झाली. हिन्दुस्थान बुद्धदेवांचा आहे, बुद्धदेव हिन्दुस्थानचे आहेत. ते हिन्दु राष्ट्राला कसे विसरतील ? आपल्या एकदेशियत्वाची कोंडी फोडून हिन्दुस्थान आशिया खंडांतील बुद्धानुयायी राष्ट्रांशीं सहकारिता करील, तर ' एशियन नेशन्स लीग ' सारखा प्रचंड पराक्रमी संघ निर्माण होऊन त्याच्या द्वारें बुद्धदेवांची मिशनरी चळवळ साऱ्या जगाला पुनश्च पादाक्रांत करून हिंदु धर्माला जगाचें जगद्गुरुपद प्राप्त व्हायला उशीर लागणार नाहीं. बुद्धदेवा, लवकर या.

[ प्रबोधन १–६–२२. ]

---

# शिवरायास आठवावें.

आज श्रीशिवरायाचा जन्मदिवस. आम्हां मराठ्यांचा अत्यंत मंगळ दिवस.



सायन निरयण पंचांगवादाच्या धुमश्चक्रींत हिंदूंचे सगळे सण जरी फाल्गुन पौर्णिमेच्या होळींत जळून खाक झाले तरी खुशाल होऊं द्या, पण आम्ही मानी मराठे हा श्रीशिवजयंतीचा सण आचंद्रार्क नष्ट होऊं देणार नाहीं. या सणांत आमच्या प्रेमाचा आत्मा आहे. या मंगल दिवसांत आमच्या भूतकालच्या वैभवाप्रमाणेंच भविष्यकालीन वैभवाचें मांगल्य बीजरूपानें धगधगत आहे. या पुण्य सणांत आमच्या कलम-समशेर-बहाद्दर वाडवडिलांची पुण्याई नंदादीपाप्रमाणें अखंड तेवत असून, तिच्याच कालभेदी शोधनप्रकाशाच्या ( सर्चलाइट ) अनुरोधानें आम्हांला भविष्यकालचें महा–राष्ट्र निर्माण करावयाचें आहे. या जयंतींत आमच्या उद्यांच्या दिग्विजयाचा गुप्त संदेश सांठविलेला आहे. आमच्या भाग्योदयाची किल्ली तेथेंच आहे आणि गुलामगिरींतून स्वातंत्र्यांत येण्याचा महारुद्राचा मंत्रहि तेथेंच आहे. म्हणूनच समर्थ आपल्या

समर्थ वाणींत सांगतात कीं, **शिवरायास आठवावें.** त्या पुण्यश्लोकाचें स्मरण करावें. स्मरण ? नुसत्या स्मरणानें काय होणार !

स्मरणानें काय होणार ? काय वाटेल तें होईल. होत्याचें नव्हतें होईल. स्मरणशक्ति ही एक अजब चीज आहे. मानवसृष्टीला परमेश्वरानें बहाल केलेली दिव्य देणगी आहे. हिच्याच जोरावर साधुसंतांनीं चिंतन करून परमेश्वराला बिनतोड हुडकून काढिलें. श्रीराम-कृष्ण-पांडवादिकांच्या पराक्रमाच्या स्मरणानेंच बालशिवाजीची मनोभूमिका तयार झाली. त्यांच्या आपत्तींच्या चिंतनानेंच तरुण शिवाजीचें हृदय तटबंदी बनलें. त्यांच्या नैतिक सत्वानें शिवाजीचे बाहू फुरफुरले आणि 'सत्यमेव जयते नानृतम्' या रहस्यानें त्याच्या भवानी समशेरीला पाणी चढून, तिनें महाराष्ट्राच्या गुलामगिरीवर ऐश्वर्याची मिजास मारणाऱ्या सुलतानशाहीला अखेर पाणी पाजलें.

स्मरणशक्तीचा पराक्रम अगाध आहे. राष्ट्राच्या इतिहासाची ही माता. काळाचें कलम आत्मतेजाच्या शाईत बुडवून मानवसृष्टीच्या हृदयफलकावर त्यांच्या भल्या बुऱ्या भवितव्यतेचें चित्र हीच देवता रेंखाटीत असते. गुलामगिरीच्या रौरव नरकांत किड्याप्रमाणें लोळण्यांतच जीवितसार्थक मानणाऱ्या माणसांना त्यांच्या पूर्वसंचिताचा दिव्य संदेश सांगून, स्वातंत्र्याच्या धवलगिरीला हां हां म्हणतां सर करण्याची स्फूर्ति व सामर्थ्य देणारी बिजली हीच. भर दरबारांत शिष्टजनांच्या डोळ्यांसमोर झालेल्या साध्वी द्रौपदीच्या विटंबनेचा सूड उगवल्याखेरीज त्रैलोक्याच्या साम्राज्य–सिंहासनाचाहि स्वीकार करूं नकोस, असला जळजळीत मंत्र पांडवांच्या कानांत फुंकून, त्यांच्या इभ्रतीच्या मर्दानी रक्ताला रटरटा रहाळया मारण्यास लावणारी चैतन्यशक्ति हीच. विजयनगरच्या हिंदु बादशाहीच्या खुनाचा सूड उगविण्यासाठीं दांताला दांत आणि लाथेला लाथ हाणून, हिन्दूंचे हिंदवी स्वराज्य स्थापन केल्याशिवाय राहूं नकोस; असा सत्याग्रही कानमंत्र शिवबालकाच्या कानांत फुंकणारी राष्ट्रदेवता हीच. प्रतिकारी परिस्थितीच्या बेफाम ज्वाळा आंगलट चाटूं लागतांच, 'हां शिवबा, घाबरूं नकोस. ही छिनाल माया आहे. राष्ट्राचें रक्त शोषून गलेलठ्ठ बनलेली ही शूर्पणखा आहे. श्रीरामचंद्राचा इतिहास स्मरण कर, आणि बेटा, हूं चढव भवानीचा पट्टा न् जा तिच्या छाताडावर चाल करून.' असा धीराचा इषारा ऐनवेळीं देणारी प्रतापगडची भवानी ती हीच. शहाजी राजांना अटकेंत ठेवून राजकारणाच्या व्यभिचारी अडाख्यांत शिवबाचें नाक दाबून तोंड उघडण्याचें कारस्थान रचणाऱ्या विजापूर

दरबारच्या मिंध्या शेंदाड मराठ्यांच्या पेचावर, स्वराज्यासाठीं कौटुंबिक माया-मोहाचा होम करून, उलट्या पेचाची मेख मारण्याची अक्कल शिवाजीला कोणीं शिकवली ? याच देवतेनें. हिन्दूंच्या प्राचीन वैभवाचा चित्रपट शिवाजीसारख्या आपल्या अनन्य भक्ताच्या डोळ्यांपुढें भराभर फिरवून, त्याच्या रोमरोमांत हिंदवी स्वराज्यवैभवाची कल्पना बिजलीप्रमाणें सणाणत कोणीं ठेविली ? हिनेंच. या राष्ट्रवीरानें जिजामाउलीच्या पुण्योदरांतून या लोकीं आपल्या आगमनाची पहिलीच कोऽहम्ची किंकाळी फोडतांच, शिवनेरीच्या शिवाईच्या बेहोष तांडव-नृत्याला प्राचीन इतिहासाच्या स्मरणदेवतेनेंच आपल्या कालिकानौबदीच्या दणदणाटाची साथ देऊन, 'हिन्दवी स्वराज्यकर्ता राष्ट्रवीर जन्माला आला. महाराष्ट्रा भिऊं नकोस. तुझा महात्मा अवतरला !' असा साऱ्या त्रिभुवनांत डंका पिटला.

अहाहा ! श्रीशिवजयंतीचा केवढा तो महोत्सव. राष्ट्रवैभवाचें केवढें विश्व-व्यापी विराट स्वरूप या दिवशीं शिवनेरीवर संकलित झालें होतें. स्मरणशक्ती-लाहि मोजदाद करतां त्रेधा उडाली, असे कितीतरी असंख्य नरनारीजन या दिवशीं शिवबालाचें दर्शन घेण्याकरितां शिवनेरीला जमले होते. नाना तऱ्हेच्या कितीतरी वाद्यवाजंत्र्यांनीं या दिवशीं सारी चौखंड पृथ्वी दणदणून सोडिली होती. बिचाऱ्या जिजामाउलीला प्रत्येक पाहुण्याच्या प्रणिपाताला प्रतिप्रणिपात करतां करतां नकोनकोसें झालें होतें आणि सवाष्णींनीं भरलेल्या मंगल आहेरांच्या ओट्या देतां घेतां बिचारीचा प्राण कंठीं आला होता. सारा शिवनेरी शिवभक्तांनीं नुसता गजबजून गेला होता. पण या बेट्या बखरकारांची जबानी पहा. यांचीं डोकीं व अंतःकरणें काय लांकडाचीं असतात कीं काय कोण जाणें ! म्हणे 'जिजाईला शहाजी राजांनीं एकटी टाकल्यामुळें ती शिवनेरीच्या आश्रयाला गेली. तेथें ती बाळंत होऊन तिला शिवाजी नांवाचा मुलगा झाला.' झाऽऽला यांचा इति-हास ! थुःत् लेकाच्यानों तुमच्या जिनगानीवर. ही काय बखर, इतिहास, का तुमचें डोंबल ? 'शिवाजी जन्माला आला' या उद्गारांत केवढी शक्ति भरलेली आहे, याची जाणीव या बखरकारांना कोठली असणार ! घडलेल्या गोष्टी शब्दांत मांडल्या कीं झालें यांचें काम. 'शिवाजी जन्माला आला' या उद्गारांत महा-राष्ट्राचें भाग्य आहे. नवजीवन देवतेचा आत्मा आहे. महाराष्ट्रधर्माचा जिवंत अग्नि आहे. या उच्चाराचीं पारायणें करतांच मूर्तिमंत शिवाजी महाराज आपल्या-पुढें दत्त म्हणून उभे ठाकतील. जुन्यापुराण्या गोष्टी जाऊं द्या; या विसाव्या

शतकांत, ब्रिटिश रियासतींत, स्वराज्याच्या उषःकाळीं, गुलामगिरीच्या आपत्तीचा जहरी प्याला कांठोकांठ भरला असतां, स्वातंत्र्याच्या तहानेनें महाराष्ट्राचा घसा कोरडा पडला असतां,

## शिवाजी जन्माला आला

या बातमीचा मंत्र सह्याद्रीपासून विंध्याद्रीपर्यंत गोफणीच्या गोट्याप्रमाणें भिंगरी-सरसा रोंरावत जाऊं द्या आणि पहा त्याचा काय परिणाम होतो तो ! बखर-कारांनो, खुद्द धारातीर्थीं मरण पावलेल्या योद्धयांच्या रक्तांत आपल्या बहाद्दर लेखण्या बुचकळून तुम्हीं जरी मोठमोठ्या महायुद्धांचे इतिहास खरडलेत, तरी 'शिवाजी' या नुसत्या नामोच्चारानें राष्ट्रांत जें शौर्यचैतन्य निर्माण होईल, त्याच्या कोट्यंशानें तुमच्या खरडेघाशीला तें साधणार नाहीं. 'शिवाजी जन्माला आला' हा मंत्रसंदेश महाराष्ट्राच्या, नव्हे, सबंध हिंदुस्थानाच्या, वातावरणांत घुमत घुमत जाऊं द्या—आतां, आज, या विसाव्या शतकांत, मॉंटफर्ड रिफॉर्म्सच्या युगांत, खादीकाळांत, गांधी महात्म्य हंगामांत—भिंगरीप्रमाणें गुं गुं करीत जाऊं द्या, असा चमत्कार होईल कीं, 'शिवाजी' या शिव मंत्रापुढें तुमच्या त्या रिफॉर्म्सचें धुकें वितळून जाईल; अत्याचार बरा कीं अनत्याचार बरा या वादाच्या किसण्या मसणाची वाट धरतील; खादी वापरून स्वराज्य मिळेल कीं गादीवर लोळतां लोळतां अवचित तें उरावर येऊन बसेल, याचा काथ्याकूट करणारे चातुर्मासे पंडित भेदरून कोना कोंपऱ्यांत छपतील. 'शिवाजी आला' ही शिववार्ता कानीं पडतांच आमच्या गोमाता कान टवकारून स्वागताचा हंबरा फोडीत, शिवाजी कोठून येतो हें पाहण्यासाठीं दाही दिशांकडे काबऱ्याबावऱ्या पाहूं लागतील. महाराष्ट्रांतल्या पडीत किल्ल्यांचे बुरूज आपल्या प्राणांचा प्राण पुन्हां येणार म्हणून आकाशाला भिडे इतकी आपली मान उंच करतील. ब्रिटीश रियासतीच्या सुधारलेल्या अमदानींत अन्नपाण्याला मोताद होऊन पाठीला पोट लागलेल्या शेतकऱ्यांच्या कच्च्याबच्च्यांतून तानाजी नेताजी येसाजी निर्माण होतील. भिक्षुकशाहीनें शूद्र ठरविलेल्या मराठ्यांचा क्षत्रिय बाणा भिक्षुकशाहीला नेस्तनाबूद करून साऱ्या हिंदुस्थानाला पुरून उरेल. राष्ट्रीय गुंडांच्या स्वार्थी खटपटींच्या उकिरड्याखालीं गाडलेल्या महाराष्ट्रधर्माचा स्फुलिंग पुनश्च धुमसूं लागेल. त्याच्या प्रज्वलित ज्वालांनीं नामधारी देशभक्तांच्या धांगड-धिंग्यांची राखरांगोळी होऊन, दांभिक राजकारणी धर्ममार्तंडांच्या शिर-

जोरपणाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील. शिवाजी आला, आतां महाराष्ट्रधर्माचा प्रतापसूर्य हिंदुस्थानावर पुनश्च प्रखर तळपूं लागणार, या नुसत्या कल्पनेनेंच आकाशांतल्या बापाच्या एकुलत्या एका पोरानें निर्माण केलेला 'कुरूस' बर्फाप्रमाणें वितळूं लागेल आणि तरवारीच्या जोरावर मोक्षप्राप्तीचा सौदा सवंग करणाऱ्या इस्लामाच्या चांदताऱ्याला अमावास्येची धडकी भरेल. या कविकल्पना नव्हत. ही इतिहासाची छातीठोक जबानी आहे. बखरकारांनों, 'शिवाजी आला' हा मंत्र बोलतांना किंवा लिहितांना त्याच्या परिणामाचा नीट विचार करीत जा. काय म्हणतां ? शिवजन्माच्या वेळीं शिवनेरीवर शिवजयंतीचा कांहींहि थाटमाट उडाला नाहीं ? तुम्हीं आंधळे आहांत. माता जिजाईचें सुवीणपण करायला खुद्द महाराष्ट्राची नियतिदेवता तेथें हजर होती. हातींपायीं सुटका होतांच बाळबाळंतिणीला पंचारती ओंवाळण्याचा मान पांडवपत्नी देवी द्रौपदीनें मिळविला. बाल शिवाजीचें नाळवार कापण्याचें पुण्यकर्म श्रीरामाच्या कौसल्या मातेनें केलें व मुलाच्या जिव्हेवर अमृताचे बिंदु घालण्याचें कार्य प्रत्यक्ष श्रीकृष्ण भगवंतानें केलें. पुत्रजन्माच्या घटकेला शहाजी राजे हजर नसल्यामुळें लौकिकी तोफांची सरबत्ती जरी झडली नाहीं, तरी महाराष्ट्राचा स्वातंत्र्यरवि शिवनेरीच्या क्षितिजावर उदयोन्मुख होतांच, सह्याद्रीच्या कोटयवधि कडेकपाटांनीं टाळ्यांचा एकच कडकडाट करून त्रिभुवनाच्या कानठळ्या बसवून टाकिल्या आणि त्या कडकडाटांतून उत्पन्न झालेल्या प्रभंजनानें साऱ्या महाराष्ट्राच्या अणुरेणूंत नवचैतन्याचा फुंकर घालून जिवंत करण्याची कामगिरी मोठ्या सोसाटयांत बजावली. जड सृष्टींत वावरणाऱ्या व जड सृष्टींतील उलाढालींचेंच निरूपण करणाऱ्या बखरकारांना, अचेतन घडामोडींच्या पडद्यामागें धमधमणाऱ्या चैतन्याची कल्पना होणार ती कशी ! !

शिवरायास आठवावें ! होय. आठवावें म्हणजे काय ? नुसतें नामस्मरण करावें ? शिव शिव शिव शिव किंवा शिवाजी शिवाजी म्हणून गोमुखींत हात घालून माळ ओढायची काय ? नव्हे, स्मरणाचा हा मार्ग खोटा आहे. ढोंगी आहे. माळेचे मणी ओढून आजपर्यंत एकहि प्राणी मोक्षाला समर्थ झाला नाहीं. शिवाजीचें स्मरण नीट पद्धतशीर झालें कीं स्वराज्य आपल्या मुठींत आलें, हीच त्याची साक्ष व तोच त्याचा दृष्टांत. शिवरायास कां आठवावें ? स्वराज्य पाहिजे असेल, स्वातंत्र्य हवें असेल, राष्ट्रीय इभ्रतीचें माहात्म्य पवित्र राखण्याची इच्छा असेल, तर शिवरायास आठवावें. परंतु समर्थांच्या या सूत्राबरोबरच दुसरें एक

सूत्र आहे. तें विसरून चालणार नाहीं. शिवरायास आठवावें. आणि पुढें काय ? **जीवित तृणवत् मानावें.** हां, येथें मात्र खरी ग्यानोबाची मेख आहे. शिवस्मरण फलदायी केव्हां होईल ? जेव्हां स्वराज्यासाठीं शिवभक्त आपल्या जीवितावरसुद्धां तुळशीपत्र ठेवण्यास सिद्ध होतील तेव्हां; एरवीं नाहीं. शिवाजीचे अभिमानी भक्त मुबलक सांपडतील. शिवाजीचें परमेश्वरवत् भजनपूजन करणारे भक्त हजारों आढळतील. शिवाजीच्या पुण्य नांवाचा उपमर्द करणाऱ्याचा कण्ठनाळ दातांनीं काडकन् फोडणारे जवानमर्द बरेच असतील. शिवाजी **जातीचा** मराठा ह्मणून आज सर्व जातमात्र मराठे शिवरायाच्या नामस्मरणानें बेहोष होऊन नाचूं लागतील. शिवरायाच्या हिन्दवी स्वराज्याच्या पायांत अनेक कायस्थ प्रभु नरनारींनीं आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या, म्हणून इतिहास वाचल्याची चुकती माकती पुण्याई कमाविलेले कांहीं कायस्थ ( ऐन वेळीं स्मरण शक्तीनें दगा दिला नाहींच तर ) क्षणमात्र वाडवडिलांचे गुण सांगून आपलें पढतमौर्ख्य व्यक्त करतील. परंतु आज घटकेला शिवरायाच्या हिन्दवी स्वराज्याच्या कल्पनेवरहुकूम स्वराज्य निर्माण करणारे कितीक तानाजी आणि नेताजी मराठा जातींतून पुढें येतात ? किती दादजी बाळजी आणि बाजी कायस्थांत उत्पन्न होतात ? प्रश्न सोपा आहे, उत्तर मात्र बिकट आहे. ज्या दोनच समाजांच्या रक्ताच्या सिमेंटावर शिवरायानें आपल्या हिन्दवी स्वराज्याची त्रिखंडव्यापी इमारत बोलबोलतां उठविली, ते कायस्थ मराठा समाज आज कोणत्या स्थितींत आहेत ? दोघेहि कर्मन्यायानें मानसिक दास्यांत अडकलेले आहेत. शिवपूर्वकालीं ते मुसलमानांच्या राजकीय गुलामगिरींत कुजत होते. ते निरनिराळ्या शाह्यांच्या सुलतानी नोकरीवर मिळणाऱ्या हाडकांवर बहोत खुष रहाणारे नोकरमाने कुत्ते होते. परंतु त्यांचें मन मेलेलें नव्हतें. ह्मणूनच शिवाजीचा स्वराज्यस्थापनेचा कर्णा कानीं पडतांच ते मधमाशांच्या झुंडीप्रमाणें भराभर धांवत आले. परंतु आजला हे दोनहि समाज मन मेल्यामुळें असून नसून सारखे झाले आहेत. पैकीं मराठा समाजाच्या खुरटलेल्या खोडाला नव्या मनूंतील मराठ्यांचीं पालवी फुटत तरी आहे; बाजीप्रभु देशपांड्याच्या कायस्थ समाजाची अवनति अझून पूर्ण झालेली नाहीं. ह्मणून तो जिवंत असूनहि मेल्याप्रमाणें थंडगार पडलेला आहे. आमचें रक्त जिवंत असतां, आमचें ओज शाबूत असतां, आम्हीं अवचित भिक्षुकशाहीच्या पायांतलीं पायतणें कां झालों ? आमच्या इतिहाससिद्ध स्वाभिमानाची, आमच्या स्वयंसिद्ध

माणुसकीची मुंडी कोणीं मुरगाळली ? याचा शोध मराठ्यांना लवकरच लागला. कायस्थांचें मुळीं डोकेंच ठिकाणावर नाहीं, तर त्यांना मुंडी मुरगाळल्याची दाद कोठली ? ते बिचारे आपल्याच पढतमूर्ख स्वानंद साम्राज्यांत गर्क आहेत. इंग्रजी नोकरशाही त्यांची देवता, हे तिचे भगत आणि भिक्षुकशाही त्यांना मोक्षाला बिनचूक ठेपी नेऊन पोंहचविणारी सॅल्वेशन एजन्सी ! खलास. यापुढें कशाला हव्यात त्यांना त्या स्वराज्याच्या उठाठेवी ? 'राजकीय' एवढा शब्द कानीं पड-तांच ज्या कायस्थ समाजांतील मोठमोठे वीर महावीर फेंफरें आल्याप्रमाणें करतात, त्या समाजाकडून महाराष्ट्रा, तुला कसली अपेक्षा ? शिवाजीसाठीं—महाराष्ट्रासाठीं—महाराष्ट्रधर्मासाठीं—दीनदुनियेसाठीं आपल्या देहाची पालखी कर-णारा, आपल्या रक्ताच्या पायघड्या घालणारा तो कायस्थ समाज रंगो बापूजी देशपांड्याच्या मृत्यूबरोबरच मेला. आज सेन्सस पटांत दिसणारा कायस्थ समाज, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, असल्या कमअस्सल कल्पनेच्या राजनिष्ठेत श्वानाचें जिणें जगवून दिवस कंठीत आहे. महाराष्ट्राच्या उद्धाराचें कार्य मराठ्यांनों ! आतां तुमच्या एकट्यावरच पडलें आहे. भिक्षुकशाहीच्या बंडाला जमीनदोस्त करून, श्रीशाहु छत्रपति करवीरकरांच्या छत्राखालीं नवयुगांतील शिवाजीचें हिंदवी स्वराज्य उभारण्याचें कार्य करण्याचें पुण्य मराठ्यांनो, आतां तुह्मींच मिळवा.

यासाठीं **शिवरायास आठवावें । जीवित तृणवत् मानावें**. दीनदुन-येचा कैवार घेण्याचें कार्य अत्यंत थोर पुण्यकार्य आहे. हें कार्य जिभेच्या नुसत्या टकळीनें होणार नाहीं. पोटांतल्या आंतड्यांना पीळ पडला पाहिजे. अलीकडच्या सभांत घुसलेला तो ठरावांचा नाटकीपणा प्रथम पेटवून उध्वस्त करा. ठराव करून स्वराज्य हस्तगत होत नसतें. शिवाजी महाराजांची शिकवण अशी नाहीं. स्वराज्यासाठीं प्रथम आत्मविश्वास कमवावा लागतो. 'आपण कोण ?' याची स्पष्ट कल्पना एकदां दीनदुनियेला करून द्या. तुम्हीं माणसें आहांत, तुमचे हक्क अमूक आहेत, या आत्मज्ञानाचा खेडोखेडीं शिवसंदेश जाऊं द्या. हा संदेश बहुजन-समाजाच्या रोमरोमांत भिनला पुरे कीं **शिवरायास आठवावें** या दीक्षेची त्यांना आठवण करण्याची जरूरच उरणार नाहीं. भिक्षुकशाहीच्या अमंगल वाममार्गी डावपेचांमुळें गेल्या १००।१५० वर्षांत सारें महाराष्ट्र आत्मस्वरूपाला पूर्ण पारखें झालें आहे. ही आत्मस्वरूपाची ओळख पटवून देणारे स्वार्थत्यागी स्वयंसेवक आतां क्षणाचाहि विलंब न लावतां उसाळ्या मारीत पुढें आले पाहिजेत.

भले कुळवंत ह्मणावें । तेंहीं वेगीं हजीर व्हावें ।
हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥

ही श्रीसमर्थांची हाक विसरूं नका. स्वराज्य म्हणजे काय याची खरी कल्पना जनतेस करून दिली पाहिजे.

आजची स्थिति फारच घोटाळयाची झालेली आहे. ढेंकणा चिलटांइतका देशभक्तांचा आणि पुढाऱ्यांचा सुळसुळाट उडाला आहे. नाना तऱ्हेच्या मिट्ठास स्वराज्य पुराणांनीं गरीब रयतेला गांजणारे भिक्षुकशाही ठग आज सर्वत्र पसरलेले आहेत. त्यांच्या कारस्थानापासून दीनदुनियेचें संरक्षण करणारे मराठे तरुण अहमहमिकेनें पुढें सरसावले पाहिजेत. या वेळीं एकमुखानें स्पष्ट जाहीर केलें पाहिजे कीं, ज्या पुण्याच्या भिक्षुकशाहीनें साताऱच्या छत्रपतीचें सिंहासन जाळलें, ज्यांच्या अघोर कर्मांनीं विलायतचा टोपीवाला आमच्या घरांत घुसला, ज्यांच्या स्वार्थी कारस्थानामुळें जनता अन्नास मोताद झाली, त्या भिक्षुकांच्या राष्ट्रीयपणावर आमचा मुळींच विश्वास नाहीं. ते आमचे पुढारी नव्हत, ते आमचे कोणी नव्हत. पुण्यास बळावलेली राष्ट्रीय भिक्षुकशाही ह्मणजे शिवाजीच्या महाराष्ट्राच्या पाठीवर बाजलेलें काळपुळीचें भयंकर करट आहे. पुण्याची राष्ट्रीय भिक्षुकशाही ह्मणजे महाराष्ट्राच्या जीवाग्रीं झोंबलेली मूळव्याध आहे. गरीब रयतेला सोंगाढोंगांनीं पिळून काढणाऱ्या भिक्षुकी जळवांचा तो पोळा आहे. यांच्या ढोंगाला बहुजन समाज बळी पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. समर्थ रामदासांना फितवेखोरांची फार चीड असे. ते जर आज असते तर हेंच म्हणाले असतेः—

बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ॥
कष्टें करोनि घसरावें । राष्ट्रीयांवरी ॥
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे हा योग ।
स्वराज्यसाधनाची लगबग । ऐसी असे ॥
याहून करावें विशेष । तरीच ह्मणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय लिहावें ? ॥

श्रीशिवछत्रपति महाराजकी जय ॥

[ राष्ट्रवीर, ३०—४—२२ ].

# प्रेस आक्टाची पूर्वपीठिका.

शिवाजीचें वाघनख, भवानी तलवार किंवा अलीकडील युद्धांतील हॉवित्झर



तोफ हीं शस्त्रें भयंकर प्राणघातक म्हणून जरी प्रसिद्ध असलीं, तथापि त्यांचें निरीक्षण करण्यांत एक प्रकारचें कौतुकहि वाटतें. गुरख्याच्या कुकरीचा भयंकर पराक्रम वर्तमानपत्रद्वारां ऐकूनसुद्धां, कुकरी कशी असते हें पहाण्याची जिज्ञासा होणें व ती कोणी दाखविली असतां तिच्या त्या प्राणघातक तीक्ष्ण पात्यावर सकौतुक दृष्टि खिळून राहणें, हें अगदीं स्वाभाविक आहे. उलट त्याच पात्यानें केलेल्या अमानुष अत्याचाराचा इतिहास खुद्द गुरखाच सांगत असतां, प्रेक्षकाचें अंतःकरण सहृदयतेनें निषेधाचे एकसारखे धक्के मारीत असतांनाही त्याच्या डोळ्यांतून त्या टीचभर पात्याच्या पराक्रमाबद्दल प्रशंसेचे अश्रु टपटपा गळल्या वांचून राहत नाहींत. ही गोष्ट प्रत्यक्ष हत्यारांची झाली. परंतु मानवी साम्राज्यांत बलाबलाच्या चढाओढीच्या ताजव्यांत जित व जेते यांचा जो एक प्रकारचा '**सी-सॉ**' चा खेळ सुरू असतो व ज्याला 'राजकारण' असें शर्करावगुंठित नांव देण्यांत येतें, त्या राजकारणाच्या समर्थनार्थ जेते लोक जित लोकांकरितां जे कित्येक शाब्दिक नियम ऊर्फ कायदे करून ठेवतात, त्यांनाही वेळीं तीक्ष्ण हत्यारांची उपमा देणें केव्हांही अयोग्य होणार नाहीं. ग्रीक, रोमन साम्राज्याच्या काळापासून तों आज तागायत भिन्नभिन्न राष्ट्रांच्या इतिहासांचें जर कोणी नुसतें वरवर निरीक्षण करील, तर त्यालासुद्धां असें आढळून येईल कीं, खरोखरीच्या हत्यारांनीं आजपर्यंत जितका रक्तपात व प्राणहानि झाली असेल, त्यापेक्षां अनंतपट रक्तपात व मानवी प्राण्यांचे खून ह्या शाब्दिक हत्यारांनीं केलेले आहेत.

प्राचीन काळच्या इतिहासाला **अंधाऱ्या युगाचा इतिहास** ह्मणून हासणाऱ्या अर्वाचीन सुधारकांना आपण मोठे झगझगीत प्रगतीच्या सूर्यप्रका-

शांत वावरणारे म्हणून जो मिथ्या अभिमान व पोकळ डौल वाटत आहे, त्याचें चरचरीत खंडण करायला प्रेस आक्टाइतकें दुसरें खंबीर शस्त्र तेंच. या शस्त्राचा प्राचीन रोमशाहीपासून तों आजतागायतपर्यंतचा इतिहास पाहिला, तर स्वातंत्र्याच्या बढाया मारणारे, प्रगमनशीलतेच्या टिऱ्या पिटणारे आणि सुधारणेच्या बाबतींत साऱ्या जगाचे जगद्गुरु म्हणवून दिमाख मिरविणारे पाश्चात्य युरोपियन लोक सध्यांच्या विसाव्या शतकांत अंधारांत आहेत कीं उजेडांत आहेत, हें तेव्हांच सिद्ध होतें.

मानवी विचारांच्या व्यक्तीकरणाच्या दरवाज्यावरच किंवा खुद्द ग्रंथकाराच्या मानेवरच पहारेकऱ्याची नेमणूक करण्याच्या पद्धतीला नाकडोळे मुरडणारे किंवा वेळीं हातवोटें चोळणारे प्रगमनशील अर्वाचीन शालशिष्ट, प्राचीन रोमीश प्रेस आक्टाचें दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दाखवितांना, खुद्द आपल्याच डोळ्यांतील मुसळ मात्र साफ विसरून जातात. प्राचीन काळच्या इतिहासाला शिव्या देणारे वीरमहावीर सध्यां आपल्या पायाखालीं काय जळत आहे, हें जर शुद्धीवर येऊन नीट पहाते, तर आजचा हा निबंध लिहिण्याचा आमच्यावरील प्रसंग खास टळला असता.

प्रेस **रिप्रेशन** किंवा छापखान्याची गळचेपी म्हणजेच मानवी विचार-व्यक्तीकरणाच्या गळयाला सरगांठ मारून लटकावलेली फांसाची दोरी. या संस्थेचा उगम कसा झाला, कोणीं केला वगैरे गोष्टींचा लागावा तितका स्पष्ट शोध अजून लागला नाहीं. परंतु ज्याप्रमाणें कामावरून कारागिराची परीक्षा सहज होतें, त्याप्रमाणें प्रस्तुत संस्थेची मुहूर्तमेढ ‘भीति’ व ‘खबरदारी’ या दोन नारळांच्या तोरणानें भूषित करून गाडली गेली असावी, यांत मुळींच संशय नाहीं. मात्र पुढें या संस्थेला दत्तक घेऊन, कन्येप्रमाणें तिचें कानकेस करण्याची पुण्याई रोमशाहींतील ‘इन्क्वीझिशन’ किंवा धर्मसमीक्षण सभेनें संपादन केली. येथपासून हिचा इतिहास बिनतोड सांपडतो.

पूर्वी भिक्षु ( मंक ) लोकांच्या मठांत हस्तलिखित ग्रंथांचा मोठा संग्रह असे. त्यांस **इन्फर्नो** ह्मणत असत. या इन्फर्नोमध्यें भिक्षु लोक कित्येक मना केलेले ग्रंथ दडपून ठेवीत असत आणि या ग्रंथसंग्रहाकडे ते स्वतःही कधीं ढुंकून पहात नसत. परंतु कित्येक मना केलेले ग्रंथ त्यांच्या मठांच्या तळघरांत दडपून ठेवलेले आहेत; हें संशय-पिशाच्च मात्र सर्वत्र बोकाळत असे. पुढें रोम आणि माद्रीद येथें ही पिशाचांची वावटळ इतकी जोरानें उपस्थित झाली कीं, ट्रेंट येथील

पोप चवथा **पायस** यानें आपला एक दरबार भरवून विक्लीफ, हुस्स आणि ल्यूथर यांचे ग्रंथ सांपडतील तेथें जप्त करण्याचा किंवा वेळीं त्यांच्या वाचकांसही मृत्यूच्या शिक्षेची धमकी घालण्याचा उपक्रम केला. याच दरबारांत मशारनिल्हे जगद्गुरु पोप महाराजांच्या चरणीं आक्षेपार्ह ग्रंथांचें एक मोठें थोरलें सूचीपत्र अर्पण करण्यांत आलें आणि जगद्गुरूंनीं प्रसाद ह्मणून 'ग्रंथांची तपासणी करण्याच्या नियमांचा मसुदा' आपल्या भक्तमंडळींच्या पदरांत अंमलबजावणीकरितां टाकला. अर्वाचीन प्रेस आक्टाचा जन्म अशा रीतीनें झालेला आहे. उपरिनिर्दिष्ट पोप महाराजांच्या मागें त्यांच्या दंडधारकांनीं हे नियम पुढें वाढवून बरेच कडक केले आणि खुद्द श्रींचेंच पाठबळ या बाबतींत पुष्कळ असल्यामुळें, अनुयायी भक्तमंडळींनाही आक्षेपार्ह ग्रंथांचें सूचीपत्रक यथास्थित लट्ठ फुगविण्यास बरीच उमेद आली. ग्रंथांचे चौकसगार लोक निवडण्यांत येऊन, त्याचें एक मंडळ बनविण्यांत आलें व त्यांना " Masters of the holy palace"–पवित्र मंदिराचे संरक्षक–ही उपाधि अर्पण करण्यांत आली. माद्रीद, लिस्बन, नेपल्स व कित्येक खेड्यापाड्यांतूनहि आणखी असे चौकसगार अधिकारी नेमण्यांत आले व त्यांना मानवी विचार-व्यक्तीकरणाच्या अभिव्याप्तीवर डोळयांत तेल घालून नजर राखण्याची सक्त ताकीद फर्माविण्यांत आली. आक्षेपार्ह ग्रंथांच्या या याद्यांना " Indexes" असें म्हणत असत आणि वाङ्मयाची अशा रीतीनें दडपेगिरी करणाऱ्या या दंडेली समितीला " The congregation of the Index" असें अजूनहि म्हणतात. या इंडेक्समध्येंही दोन भेद असत. नुसतें **इंडेक्स** म्हटलें म्हणजे जीं पुस्तकें उघडलीं असतांही येशूहत्येचें पातक लागतें, अशा मना केलेल्या पुस्तकांचें सूचीपत्र असें समजण्यांत येत असे; व **एक्सपर्गेटरी इंडेक्स** म्हणजे ज्या पुस्तकांचें शोधन होईपर्यंतच तीं आक्षेपार्ह मानलीं गेलीं आहेत, अशा पुस्तकांचें सूचीपत्र समजण्यांत येत असे. कोणत्याही भाषेंत, कोणत्याही विषयावरील लिहिलेलें पुस्तक असो, त्यांत जर एकादें प्रमेय किंवा असंदिग्ध वाक्य किंवा एखादा सुलट लिहिलेला असूनही पर्यायानें उलट अर्थ दर्शविणारा शब्द जर त्यांत असेल, तर तें पुस्तक ट्रेन्ट येथील वरिष्ठ पवित्र मंदिराच्या संरक्षक समितीनें आक्षेपार्ह म्हणून खुशाल इंडेक्स–जमा करावें; इतकेंच नव्हे तर, मनुष्य सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, राजा असो नाहीं तर शेतकरी असो, इटालियन, स्पानियर्ड किंवा नेदरलंडर असो, त्यानें ट्रेन्ट येथील समितीच्या विचार-संमतीचा टांकसाळी शिक्का

मारलेल्या पुस्तकांशिवाय कोणतेंही पुस्तक वाचूं नये, असा कडकडीत निर्बंध असे. या नियमाचें उल्लंघन करणारे लक्षावधि प्राणी केवळ या एकाच शस्त्राच्या तडाख्यानें ठार करण्यांत येत असत.

ज्या संतमंडळींनीं या इंडेक्सपत्रकाची रचना करण्याचें काम आपल्या आंगावर घेतलें होतें, त्यांचा असा समज होता कीं ज्याअर्थी निष्क्रीय आज्ञाधारकपणा हा मानवी स्वभावाचा एक धर्म आहे, त्या अर्थी आपल्या इंडेक्समध्यें जमा केलेल्या पुस्तकांच्या विरुद्ध कोणी विशेष प्रतिकार करणार नाहीं; उलट आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाला एकदा या इंडेक्सच्या यादींत घुसडून दिलें कीं त्यांचींही तोंडें तेव्हांच बंद होतील ! मानवी विचारांना अजिबात नष्ट करण्याचें किंवा निदान खच्ची करण्याचें जें सामर्थ्य प्रत्यक्ष विश्वभक्षी काळांत नाहीं, तें आपल्या इंडेक्स चोंपड्यांत आहे, असें समजणाऱ्या प्राचीन संतसमितींच्या आणि अर्वाचीन सेन्सारप्रभृतींच्या बुद्धिमांद्याला हंसावें कीं रडावें हें आम्हांला समजत नाहीं. प्रतिस्पर्धी पाखंडी (?) मंडळींच्या ग्रंथांची जों जों इंडेक्सपत्रकांत समाराधना होऊं लागली, तों तों त्यांनींही त्याच ग्रंथांचें पुनर्मुद्रण मोठ्या दक्षतेनें गुपचूप करून, त्यांत सणसणीत टीका व लांबलचक प्रस्तावना यांची पुस्ती जोडून, प्रसार करण्याचें कामही जारीनें चालू ठेवलें. ऑक्सफर्ड येथील डॉ० जेम्स या नांवाच्या एका पठ्ठ्यानें तर खुद्द इंडेक्स पत्रकाचीच एक नक्कल प्रत्येक ग्रंथापुढें आपली सणसणीत टीका लिहूनच प्रसिद्ध केली. म्हणजे ज्या उद्देशानें इंडेक्सची योजना करण्यांत आली, त्याच्या विरुद्ध उद्देशानेंच सर्व जनता तिचा उपयोग करूं लागली. कॅथॉलिक संतप्रभृतींनीं ज्या ग्रंथांस नाकें मुरडावीं, तींच पुस्तकें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं मुद्दाम आवडीनें घ्यावीं; इतकेंच नव्हे तर इंडेक्समध्यें समाविष्ट झालेल्या ग्रंथांशिवाय इतर ग्रंथांस मुळीं हातच लावायचा नाहीं असा त्यांनीं नियमच करून टाकला होता. पुढें इंडेक्सच्या एका भागांत, कायद्याचें उल्लंघन केल्यामुळें, ज्यांचीं डोकीं व पुस्तकें इंडेक्सजमा करण्यांत आलीं होतीं अशा ग्रंथकारांचें जेव्हां एक लिस्ट प्रसिद्ध झालें, तेव्हां त्याला हे प्रतिस्पर्धी लोक **लोकोत्तर बुद्धिमान् नरपुंगवांचें सूचीपत्रक** अशा नांवानें संबोधूं लागले.

या इंडेक्सपद्धतीचे परिणाम मोठे चमत्कारिक घडूं लागले. निरनिराळ्या देशांतल्या चौकसगारांचीं मतें एकाच बाबतींत अगदीं परस्परविरुद्ध पडूं लागलीं. **नेदर्लंड** येथील मुख्य चौकसगार अधिकारी विद्वान् **एरियस मॉन्टेनस**

( Arias Montanus ) हा ॲन्टवर्प येथील इंडेक्ससमितीचा चालक असतांनाही खुद्द त्याचेच ग्रंथ रोमन इंडेक्समध्यें जमा झालेले पहाण्याचा त्यास प्रसंग आला. नेपल्स येथील इंक्विझीटर ( चौकसगार ) तर स्पॅनिश इंडेक्सवर इतका खवळून गेला कीं ती इंडेक्स माद्रीदमध्यें छापली गेलीच नाहीं, अर्थात् रद्द समजावी, म्हणून हातपाय आपटूं लागला. साऱ्या जगानें आम्ही देऊं त्या मताच्या विरुद्ध न जातां त्यास मान डोलवावी, म्हणून सांगणारे व अधिकाराच्या जोरावर तसा हेका धरणारे हे महापंडित इंक्विझिटर लोक आतां परस्परांचींही मतें मान्य करीतनासे झाले ! त्यांच्यांतच एक यादवी युद्ध (Civil war) सुरू झालें आणि एक दुसऱ्याच्या बोकांडीं बसण्यासाठीं धडपडूं लागला. ग्रंथपरीक्षणाच्या बाबतींत एकानें दहा आक्षेपार्ह स्थळें दाखवावीं; दुसऱ्यानें तीस स्थळें दाखवून पहिल्यास मूर्खांत काढावें; आणि तिसऱ्यानें सबंध ग्रंथच्या ग्रंथ आक्षेपार्ह ठरवून, त्यास इंडेक्स जमा करण्याची शिफारस करावी व पहिल्या दोघांना बेअक्कल ठरवावे. अशी खुद्द चौकशीच्या न्यायाधिकाऱ्यांतच बेबंदशाही माजली. पुढें तर ते स्वतःच्या मतांबद्दल स्वतःच इतके साशंक होत गेले कीं, "आम्ही पुस्तकांतील दोष सुधारले आहेत व पुस्तक वाचण्यास कांहीं हरकत नाहीं असें म्हटलें तरी चालेल; तथापि आणखीही कांहीं दोष सांपडणार नाहींत असेंही नाहीं. म्हणून तशी सुधारणा होईपर्यंत थांबणें बरें !" असले डळमळीत अभिप्राय देऊं लागले. अर्थात् या मळमळीत अभिप्रायामुळें ग्रंथांची व ग्रंथकारांची व्यर्थ कुचंबणा होऊं लागली व एकदम इंडेक्सजमा करण्याची पद्धत बरी, कारण एक घाव दोन तुकडे होऊन ग्रंथकाराला रडायला तरी मोकळीक मिळत असे; पण या एक्सपर्गेटरी इंडेक्स पद्धतीनें होणारी धड ना जिवंत धड ना मृत्यु अशी स्थिति तरी नको, असा सर्वत्र निषेधाचा ध्वनि निघूं लागला.

हे चौकसागर लोक अजूनही "Purgers" म्हणजे "रेचके" किंवा "Castrators" म्हणजे "खच्ची करणारे" या संज्ञेनें संबोधिले जातात. **मिल्टन** तर त्यांना "Executioners of books"–ग्रंथांना फांसावर चढविणारे मांग असेंच जेथें तेथें म्हणतो. एक्सपर्गेटरी पद्धतीप्रमाणें ग्रंथांचा सपशेल खून न करितां, त्यांतील आक्षेपार्ह स्थळेंच काय तीं दुरुस्त करण्याचा जेव्हां हे अकटोविकटो पंडित उपक्रम करूं लागले, तेव्हां कित्येक महत्त्वाचे भाग अजिबात गाळणें, नवीन पॅरे मध्येंच घुसडणें, खुद्द ग्रंथकाराच्याही टाळक्यांत न येणाऱ्या व पुस्तकांतील मजकुराशींही व्यस्त प्रमाणांत विसंगत अस-

णाऱ्या कल्पना मध्येंच ढकलणें, इत्यादि शोचनीय प्रकार घडूं लागले. आक्षेपार्ह मजकूर गाळण्याचा अधिकार मिळाल्याबरोबरच आपण जणूं काय सर्वज्ञ महा-पंडित झालों, असा भ्रम झालेल्या सेन्सॉरच्या डोळ्याला नेहमींच्या प्रचारांतील साधे शब्द सुद्धां वाळूच्या कणाप्रमाणें कसे खुपतात, हें आमच्या हिंदुस्थानांतील प्रस्तुतच्या पिढीला अधिक विशद करून सांगण्याची जरूरी नाहीं. शिवाजी महाराजांनीं मराठी राज्य स्थापन केलें, या विधानापेक्षां त्यांनीं एखादें सेवा-सदन स्थापन केलें, असलीं विधानें केलेला महाराष्ट्राचा इतिहास सेन्सॉर तेव्हांच 'पास' करतो. त्यानें अफझुलखानाचा खून केला ही गोष्ट जातींजातींत वैमनस्य उत्पन्न करणारी असल्यामुळें, त्या ऐवजीं चिलटें डांस ठार मारणारी 'कटोल पावडर' तयार करण्याचा कारखाना त्यानें काढला, असा मजकूर ज्या पुस्तकांत असेल, तें मशारनिल्हे रेचक्या प्रभृतीच्या रेचकविधीपासून तेव्हांच मुक्त होतें. असो! इंडेक्सच्या अंमदानींत हे असले प्रकार इंक्विझीटर लोक मोठ-मोठ्या ग्रंथकारांच्या ग्रंथांत बेधडक घुसडून देऊन ते प्रसिद्ध करण्याची परवा-नगी देत असत. अर्थात् 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्' असला भयं-कर देखावा पाहून बिचारा ग्रंथकार—तो जर स्वमताभिमानी असेल तर, किंवा रेचकविधींतून आपला ग्रंथ शुद्ध होऊन बाहेर पडेपर्यंत जिवंत असेल तर,—तो ग्रंथ छापतो कशाला? म्हणजे नुसत्या इंडेक्स पद्धतीनें एकदम जमा करण्याच्या कायद्याची धार बोंथट करून, न्यायबुद्धीचा टेंभा मिरविण्यासाठीं, एक्सपर्गेटरी इंडेक्सची जी सवलत तत्कालिन पोप महाराजांच्या बगलबच्च्या रेचक्यांनी अंम-लांत आणली, ती अधिकच तापदायक होऊं लागली. परंतु एखाद्या ग्रंथकारानें आपल्या हातानें शुद्ध करून ठेवलेली ग्रंथाची प्रत त्याच्या 'उईल' प्रमाणेंच महत्त्वाची असल्यामुळें, जनतेचाही तिच्या शुद्धतेवर कायदेशीर हक्क असतो. अर्थात् रेचकविधींत त्यांतील मजकुराची रेचक्यानें केलेली खोडाखोड, गाळा-गाळ, दडपादडपी इत्यादि कायदेशीर कांटे, सराटे मूळ प्रतीवरून झाडून साफ-सूफ करून, अस्सल प्रतिबरहुकूम आवृत्ति काढणें, हें जनतेचें कर्तव्यकर्मच होऊन बसतें व तें तत्कालिन जनतेनें ग्रंथकारांच्या पश्चात् यथासांग बजाविण्यास मुळींच कसूर केली नाहीं.

**मिल्टन**नें म्हटलें आहे कीं, "या एक्सपर्गेटरी पद्धतीनें कित्येक उत्कृष्ट जुन्या ग्रंथकारांचीं आंतडीं इतक्या निष्ठुरपणानें सोलून टाकलीं कीं मृत मनुष्याच्या थडग्याचीही इतक्या निर्दयतेनें कोणी वाताहत करण्यास प्रवृत्त होणार नाहीं."

अर्थात् या पद्धतीनें ग्रंथकारांचें जीवन-रुधिरच शोषून टाकल्यामुळें त्यांचीं पार चिपाडें बनून ते भुतांप्रमाणें भेसूर बनल्यास आश्चर्य तें कसलें ? स्पेन व पोर्तुगाल देशांत एकेका ग्रंथाला पांचपांच सहासहा कोर्टांच्या फिल्टरांतून गाळून शुद्ध व्हावें लागत असे. कित्येक वेळां हा शोधनविधीचा काळ चाळीस वर्षांपर्यंत गेल्याचेही दाखले आहेत. लोकोत्तर बुद्धिमत्तेच्या ग्रंथकारांनीं तर त्या वेळीं या दुष्ट पद्धतीमुळें हैवतच खाल्ली होती. माद्रीद व लिस्बन येथील कित्येक ग्रंथकारांचे ग्रंथ बिचाऱ्या पित्याबरोबरच थडग्यांत गेले ! यावरून या स्वार्थी व राक्षसी इंडेक्स पद्धतीनें किंवा प्राचीन प्रेस आक्टानें ज्ञानाच्या बाबतींत साऱ्या जगाचें किती अनिर्वचनीय नुकसान केलें, याची वाचकांना बरीच कल्पना होईल, अशी आशा आहे. जोंपर्यंत केवळ चिमूटभर अशा बलवान् व्यक्तिसमुदायाच्या लहरीवर सत्यासत्याची पारख करण्याचा मक्ता अवलंबून आहे आणि केवळ विशिष्ट व्यक्तींच्या हातीं ज्ञानजलधीच्या दरवाजाच्या किल्ल्या देण्यांत येत आहेत, तोंपर्यंत सत्याचा टेंभा आणि ज्ञानाची घमेंड मारण्याचा हक्क या पृथ्वीतलावरल्या कोणाही मर्त्य मानवास असेल, हें सिद्धच होत नाहीं. मानवी सत्ताधारी कितीही बलवान् व त्रिभुवनजेते झाले, तरी सत्याचें स्वरूप अमुकच प्रकारचें असावें किंवा त्याचें निरूपण अमक्याच विवक्षित पद्धतीनें व्हावें, हें ठरविण्याचा हक्क त्यांना कसा काय पोंहचतो, हें समजत नाहीं.

**फारिया डिसोझा** या ग्रंथकारानें सतत २५ वर्षें आपल्या पाठीचा कणा मोडून 'The Commentaries on the Lusiad" हा ग्रंथ लिहिला, आणि त्याची समंजस पंडितवर्गानें मोठी वाहवाही केली; परंतु सत्तामदानें बेफाम झालेल्या इंक्विझिटर प्रभृतींच्या शिक्यामोर्तबाच्या महतोपुढें या नुसत्या विद्वान् पंडितांच्या अभिप्रायाला कोण भीक घालतो ? झालें; प्रस्तुत पुस्तकांत पाखंडी (heretical) मतांचें प्रतिपादन केलें आहे, अशा सबबीवर ग्रंथकाराला चौकशीच्या कोर्टांत खेंचण्यांत आलें. माद्रीद येथील अधिकाऱ्यांना पाखंडीपणाचा आरोप सिद्ध करतां येईना; म्हणून लिस्बनच्या कोर्टांत खटला वर्ग केला. लागलेंच सदहू पुस्तकाची विक्री बंद ठेवण्याचा हुकूमनामा सुटला. **लुसिअड** *

---

* लुसिअड हें एक कामिअन्स नामक कवीनें, हिंदुस्थानांतील पोर्तुगिझांची सत्ता, या विषयावर पोर्तुगीज भाषेंत लिहिलेलें महाकाव्य आहे. हें प्रथम १५७१ मध्यें प्रसिद्ध झालें.

काव्याचा कर्ता पाखंडी नव्हता, किंवा प्रस्तुतचा टीकाकारही पाखंडी नसून उलट कट्टा कॅथॉलिकी मताचा आहे, वगैरे सप्रमाण पुरावा देतां देतां बिचारा डिसोझा अगदीं मेटाकुटीस आला. सरतेशेवटीं त्याच्या पुस्तकाची इंडेक्सच्या काळमुखांतून एकदांची कशीबशी सुटका झाली. परंतु पुस्तकविक्रीच्या बंदीमुळें आणि खटल्याच्या खर्चामुळें सांपत्तिक बाबतींत त्याचा पाय जो खोल चिखलांत रुतला तो कायमचाच !

**नॅनी** नांवाच्या एका लेखकानें '**व्हेनिसचा इतिहास**' लिहिला होता. तो मात्र रेचकविधींतून निर्लेप बाहेर पडला. कारण त्यांत 'राजाविरुद्धच कांहींही नव्हतें'—Nothing aginst princes. यावर टीका करतांना **डिझरायलीनें** म्हटलें आहे कीं, "त्या वेळीं राजे लोक तरी धर्माचे अवतार असले पाहिजेत, किंवा इतिहासकार तरी बिलंद लफंगा असला पाहिजे."

जेव्हां इंडेक्स पत्रकांत जमा केलेल्या पुस्तकांचा नाश होण्याऐवजीं किंवा त्यांबद्दल लोकांत तिटकारा उत्पन्न होण्याऐवजीं, उलट लोक त्यांकडे कौतुकपूर्ण जिज्ञासेनें पाहूं लागले, तेव्हां सत्याभिमानी येशूच्या भक्तांनीं आक्षेपार्ह पुस्तकें जमा करून तीं सार्वजनिक चव्हाट्यांवर जाळून टाकण्याचा उपक्रम सुरू केला. या सत्राचा फायदा दोन्हीही पक्षांनीं यथास्थित करून घेतला. म्हणजे सत्ताधाऱ्यांना ग्रंथ जाळून टाकला म्हणून आनंद वाटत असे आणि भिकार लेखक कांहीं तरी लिहून आपला ग्रंथ एकदां होळींत पडला म्हणजे त्याचीं किंमत वाढली असें समजून हर्ष मानीत असत.

सरकारी खटल्यानें किंवा सरकारजमा झाल्यानें भिकार पुस्तकांची किंवा दरिद्री वर्तमानपत्रांची महती कशी वाढते आणि एरवीं कोनाकोंपऱ्याच्या सांदींत पडलेल्या व्यक्ति कशा बेगडी मान्यतेस पोहोंचतात, हें अलीकडच्या लोकांना तरी विशेष विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. ज्याप्रमाणें अलीकडे 'वर्तमानपत्राचे वर्गणीदार वाढविण्याचे खटले' प्रेस-आक्टामुळें होत असत व आहेतही, त्याचप्रमाणें पूर्वी वर सांगितलेल्या अग्निसत्राच्या धामधुमींत सुक्याबरोबर ओलें या न्यायानें कित्येक भिकार ग्रंथकारांनींही आपलीं पुस्तकें होळी-जमा करून ग्रंथकर्तृत्वाची मानमान्यता मिळविण्याची संधी फुकट जाऊं दिली नाहीं. "Erasmus's Colloquies" या पुस्तकाच्या प्रकाशकानें हरप्रयत्नानें तें होळी-जमा करण्याची खटपट करून, पुढें त्याचा खप चोवीस हजारांवर नेऊन रगड पैका मिळविला. यांत एक गोष्ट अगदीं स्पष्ट सिद्ध होते कीं,

पक्षांध बननेला मनुष्य—मग तो कोणत्याही पक्षाचा अगर मताचा असो—त्याच्या मानसिक वृत्तीचा मसाला एकाच दुकानांतला असतो. ग्रंथ जाळून टाकणाऱ्या दीर्घ शहाण्या रेचक्या अधिकाऱ्यांना 'ग्रंथ जाळणें म्हणजे त्यांतील मतांचें खंडण करणें नव्हे,' हें कळत नसे, किंवा तसें त्यांना सांगून पटत नसे; आणि 'रेचक-सत्रांत ग्रंथ पडून अग्नये स्वाहा होणें म्हणजेच ग्रंथकर्तृत्वाची अखेर साधणें नव्हे,' हें ग्रंथकारांच्या ध्यानीं येत नसे.

असा एक शोध लागतो कीं, इंग्लंडच्या आठव्या हेनरी राजाच्या कारकीर्दीत, **टॅन्स्टॉल** नांवाचे एक लंडनचे बिशप होते. ते फार फाजील 'मवाळ' वृत्तीचे होते. इतके कीं, त्यांच्या मवाळपणाबद्दल सारे लोक त्यांची टीकाही करीत. या वेळीं ग्रंथाऐवजीं खुद्द ग्रंथकारालाच जाळून टाकण्याचा एक बूट निघाला होता आणि हे मवाळ बिशप अर्थात् या बुटाच्या विरुद्ध होते. परंतु मनुष्य कितीही मवाळापेक्षां मवाळ असला, तरी त्याला स्वार्थ थोडाच सुटला आहे ? **टिन्डाल** नामक लेखकानें '**नवा करार**' या ख्रिस्ती धर्मग्रंथावर भाषांतरात्मक विवेचनाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. तो या बिशपाला नापसंत होता. अर्थात् त्याच्या प्रति जप्त करून या सार्वजनिक अग्निसत्रांत एकदा जाळून फस्त कराव्या, असें त्यांच्या मनानें घेतलें. सन १५२९ मध्यें सदहू बिशपसाहेब आपल्या दौऱ्यावर असतांना, टिन्डालच्या मतानुयायांनीं माहेरघर किंवा आश्रय-स्थान बनविलेल्या आन्टवर्प शहरीं आले असतांना हा त्यांचा दुराग्रह बळावला. या कामीं त्यानें एका इंग्रज व्यापाऱ्याची मदत घेतली व त्याला टिंडालच्या पुस्तकाच्या प्रति गोळा करण्यास सांगितलें. हा व्यापारी खुद्द टिंडालचाच एक गुप्त अनुयायी होता. त्यानें टिंडालला ही सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून टिंडालला अत्यानंद झाला. कारण पहिल्या आवृत्तींतल्या कित्येक चुका दुरुस्त करून नवी दुसरी आवृत्ति काढण्याचें त्याच्या मनांत फार होतें; परंतु पहिल्याच आवृत्तीच्या प्रति त्याच्या आंगावर पडून राहल्या होत्या. अर्थात् त्या व्यापाऱ्यामार्फत दामदुप्पट किंमतीला त्यानें आपल्या सर्व प्रति विकल्या आणि बिशपनेंही त्या पडेल त्या किंमतीस विकत घेतल्या. सर्व प्रति हातीं येतांच बिशपसाहेबानें त्या **चीपसाईड** येथें अग्न्यर्पण केल्या. या वेळीं या कृत्याचा "A burning of the word of God"—**ईश्वरी शब्दाची होळी** या संज्ञेनें लोक नुसता निषेधच करून स्वस्थ बसले नाहींत, तर दुसऱ्या आवृत्तीच्या प्रतीला पडेल ती किंमत देऊन विकत घेण्यास अत्युत्सुक झाले. टिंडा-

रुनें तावडतोब 'सुधारलेली दुसरी आवृत्ती' बाहेर काढली आणि तिच्या विक्रीचा जिकडे तिकडे मारे तोबा उडाला. एका टिंडालपंथीय पुस्तकविक्रयाला लंडनच्या लॉर्ड चॅन्सेलरनें खासगी मुलाखतींत विचारलें कीं, "तुमच्या पक्षाला इतका आश्रय व जोर आंटवर्पमध्यें कसा व कोणीं दिला, हें मला खासगी रीतीनें सांगशील काय ? मी तुझी माहिती कोठेंही फुटूं देणार नाहीं, किंवा तुमच्या पंथावर खटलाही करणार नाहीं." त्या पुस्तकविक्रयानें सांगितलें, "महाराज, हे सारे लंडनचे बिशप टॉनस्टॉलसाहेब यांचेच उपकार आहेत. त्यांनींच पहिल्या आवृत्तीच्या साऱ्या प्रति दामदुप्पट किंमतीला विकत घेऊन, आम्हाला ही दुसरी आवृत्ती काढण्याचा सुप्रसंग आणला." बिचाऱ्या बिशप साहेबाला हें उलटें "कॉम्प्लीमेंट" मिळालेलें ऐकून काय वाटलें असेल, त्याची आपण कल्पनाच करावी हें बरें !

**आठव्या हेन्री**चा काळ म्हणजे अनिश्चित मतांचा काळ होता. या वेळीं धर्मभीरु आणि पाखंडी या दोघांच्याही ग्रंथांना होळींत पडावें लागलें. **एडवर्ड**च्या अमदानींत कॅथॉलिक ग्रंथांवर संक्रांत बसली होती आणि **मेरी राणी**च्या वेळीं प्राटेस्टंट ग्रंथांचे पर्वत अग्नयेस्वाहा झाले. **एलिझाबेथ राणी**च्या कारकीर्दींत राजकीय चोपड्यांनीं सरपणाचें काम केलें, तर **पहिला जेम्स** आणि त्याच्या पुत्रांच्या शाहींत 'अब्रूनुकसानी करणारीं चोपडीं'च काय तीं होळींत पडलीं.

इटालियन डोक्यांतून प्रसवलेली आणि स्पॅनीश भिक्षूंच्या लहरीनें पोसलेली ही इंडेक्स-पद्धत अशा रीतीनें 'वाङ्मयाचें काळेंकुट्ट कालयुग' अस्तित्वांत आणण्यास कारणीभूत झाली. आस्ते आस्ते या कालयुगाची छाया युरोपांतील सर्व राष्ट्रांत पसरत पसरत, सरतेशेवटीं मतस्वातंत्र्य, वाक्स्वातंत्र्य, आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या बाबतींत धुरीणत्वाचा झेंडा फडकविणाऱ्या खुद्द इंग्लंडमध्येंसुद्धां ही महामारी घुसली. पुस्तकें जमा करणें, निदान तीं 'लायसेन्स'च्या गंधाक्षतांनीं मंडित झाल्यावर प्रसिद्ध करणें, या पद्धतीची माता जरी वरील इंक्विझिशनच होय, तरी इंग्लंडमधील रेचक्यांचा कटाक्ष प्रथम प्रथम धार्मिक ग्रंथांवरच विशेष असे. प्रस्तुत महामारीच्या दणक्याखालीं ब्रिटनदेश कितीक वर्षेपर्यंत तरी कण्हत कुंथत पडला होता आणि आपल्या ग्रंथांचे मोलवान अवयव सार्वजनिक रीतीनें छिन्नभिन्न करण्याच्या बेशरम प्रसंगामुळें हैबत खाऊन, कित्येक बुद्धिवंतांनीं आपल्याच ग्रंथांत निराशेमुळें 'वाङ्मयात्मक आत्महत्या' * करून घेतल्याचीं

*"Committing a literary suicide in their own manuscripts."
——*Isaac Disraeli.*

अनेक उदाहरणें आहेत. **विल्यम कॅम्डेन** (१५५१–१६२३) या विख्यात इतिहाससंशोधकाला 'एलिझाबेथ माहात्म्य' हा ग्रंथ संपूर्ण छापण्याची परवानगीच मिळेना. अधिकारी तर कांहीं कांहीं भाग अजिबात खची करून टाकण्याचा हेका धरून बसले. **कॅम्डेननें** ते सर्व आक्षेपित भाग **डी दाऊ** (De Thou) नामक फ्रेंच इतिहासकाराकडे रवाना केले. **कॅम्डेनच्या** पुस्तकाची पहिली आवृत्ति सन १६०५ त बाहेर पडल्यानंतर दोनच वर्षांनीं **डी दाऊनें** ते आक्षेपित भाग जसेच्या तसे बिनचूक छापून प्रसिद्ध केले. **लॉर्ड हर्बर्टनें** लिहिलेल्या **'आठव्या हेनरीचा इतिहास'** या पुस्तकालाही ही महामारी अशीच भोंवली! पण बिचाऱ्याचा इतिहास अखेरीस मूळ प्रतिबरहुकूम छापून निघाला नाहीं तो नाहींच. **लॉर्ड ब्रुक** यांच्या 'कवितासंग्रहां'त पहिल्या वीस पानांचा पत्ताच नाहीं. यांत धर्मविषयक कांहीं कविता होत्या आणि **आर्चबिशप लॉड** (Laud) यांच्या हुकमानें त्या रद्द करण्यांत आल्या होत्या. सर मॅथ्यू हेल (१६०९–१६७६) हे **क्रॉम्वेलच्या** पार्लमेंटाचे एक मेंबर होते व सन १६७१ त हे लॉर्ड चीफ जस्टिसही झाले होते. यांनीं कित्येक ऐतिहासिक पुराव्याचे लेख लिहून मोठा ग्रंथसंग्रह तयार केला होता. परंतु त्यांच्या कित्येक विद्वान् मित्रांच्या उत्कृष्ट ग्रंथांच्या बोकांडीं तपासणीची सांथ बसल्यामुळें आणि खुद्द तपासणीच्या पद्धतीच्या तत्त्वाविरुद्धच ते असल्यामुळें, हयातींत आपला एकही ग्रंथ त्यांनीं छापण्याचा उपक्रम केला नाहीं. इतकेंच नव्हे तर आपल्या मृत्यूनंतरही तो कोणी छापण्याच्या भरीस पडूं नये, अशी त्यांनीं अट घालून ठेवली होती. पुढें त्यांनीं आपलें सर्व हस्तलिखित बाड "Society of Lincoln's Inn" या संस्थेच्या ताब्यांत जपून ठेवण्याकरितांच स्वाधीन केलें.

छापखान्याची इभ्रत व स्वातंत्र्य यांवर इंग्लंडांतील कायद्यांनीं कधींही जुलूम केला नाहीं असा एक इंग्लंडचा लौकिक आहे. कोणतेंही पुस्तक छापण्याविरुद्ध असा एकही कायदा केलेला नाहीं; फक्त 'स्टार चेंबर'चा एक हुकूमनामा (Decree) मात्र आहे असें एकदां **सेल्डन** नामक प्रसिद्ध वकील बोलले होते. नाहीं म्हणावयाला कधींमधीं विवक्षित ग्रंथ आणि त्यांचे कर्ते यांच्याविरुद्ध जाहीरनामे फडकत असत व केव्हां केव्हां परदेशस्थ ग्रंथांना मनाईही करण्यांत येत असे. एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत छापखान्यांवर उघड उघड हल्ला करण्याऐवजीं त्यांवर आडून गोळ्या मारण्याचा उपक्रम बराच प्रचलित होता. बाईच

राज्याधिकारावरचा हक्क आणि राजाचा राजधर्म या दोन बाबतींत रोमन कॅथलिक पक्ष हा आधींच विरुद्ध असल्यामुळें, त्यांच्या चळवळींना भिऊनच एलिझाबेथला प्रेससंस्थेकडे डोळयांत तेल घालून पहात बसावें लागे. परदेशस्थ (Foreign) पुस्तकांना–" Books from any parts beyond the seas " –मज्जाव करण्यांत आला होता. त्या वेळीं प्रत्यक्ष छापखान्यावर जरी कोणत्याही प्रकारच्या बंधनकारक कायद्याची तलवार केंसाला लटकावून लोंबकळत ठेवलेली नव्हती, तरी ग्रंथकाराची मान मात्र सरकारच्या हातीं होती. शिवाय एलिझाबेथ राणीचें घ्राणेंद्रिय बरेंच तिखट असल्यामुळें तिला राजद्रोहाची घाण जिकडे तिकडे येत असे. आणि तिच्या राजद्रोहाच्या व्याख्येची मर्यादाही जवळ जवळ निरंत क्षितिजाप्रमाणें 'सर्वव्यापी' असे. तिनें राजद्रोहाच्या आरोपावरून एका ग्रंथकाराला व त्याच्या प्रकाशकाला त्यांचे उजवे हात तोडून टाकण्याची शिक्षा ठोठावली. हा ग्रंथकार म्हणजे लिंकन्स इन या संस्थेचा एक मेंबर **मि. जॉन स्टब्स** हा होय. वेस्टमिन्स्टर नजीकच्या बाजारपेठेंत हा हस्तछेदनविधि झाला. स्टब्सचा उजवा हात छाटल्याबरोबर त्यानें डाव्या हातानें आपली टोपी उचलली व मोठ्यानें " God save The Queen " असें ओरडला. सारे तमासगीर लोक आश्चर्यानें, भीतीनें आणि संतापानें स्तब्ध उभे होते. उपरिनिर्दिष्ट कॅम्डेन साहेबही या वेळीं हजर होते. स्टब्ससारख्या प्रतिष्ठित मनुष्याची अशी अवहेलना व छळ झालेला पाहून कोणाला संताप येणार नाहीं ? परंतु शिक्षा देणाऱ्या अधिकाऱ्यांनाही आपल्या न्याय्यत्वाच्या पुष्ट्यर्थ कांहीं तरी आधार दाखवून, असल्या संतापापासून निर्माण झालेल्या शिव्याशापांचे आम्ही भागीदार होऊं शकत नाहीं, हें सिद्ध करावें लागतें. त्याप्रमाणें एलिझाबेथनें " An act of Philip & Mary against the authors and publishers of seditious writings." या एका कोनाकोंपऱ्यांच्या सांदींत पडलेल्या कायद्याची ढाल पुढें केली. कित्येक नामांकित वकिलांनीं असें छातीठोक विधान केलें कीं हा कायदा केवळ 'हंगामी' होता आणि तो मेरी राणीच्या बरोबरच थडग्यांत गेलेला असल्यामुळें, त्याच्या आधारावर झालेली ही शिक्षा चुकीची व अन्यायाची होय. या प्रामाणिक वकिलांपैकीं एकाची रवानगी 'टॉवर'च्या अंधारकोठडींत झाली. दुसऱ्या एकाची कानउघडणी होऊन त्याला आपल्या जज्जगिरीच्या जागेवर पाणी सोडावें लागलें. असली तोंडदाबी नाइलाज म्हणून स्वतःच्या अर्थाकरितां जरी राज्यकर्त्यांना करावी लागते, तथापि ती त्यांच्या कृत्यांचें

सप्रमाण मंडन करूं शकत नाहीं, हें न समजण्याइतके ते केव्हांही दुधखुळे नसतात. कोणी तरी एखादा हस्तक मिळवून त्याच्या मार्फत हा मंडनविधि उरकून घेण्याचा आज कक दिवसांचा परिपाठच आहेसा दिसतो. त्याप्रमाणें या प्रसंगीं एक लॉर्ड चीफ जस्टिस पुढें आले–'आले' म्हणा किंवा 'केले' म्हणा–त्यांनीं :असें प्रत्युत्तर दिलें कीं "राणी मेरी ही 'राजा' होती आणि ज्या अर्थी कोणत्याही राजानें केलेला कायदा–तो त्यानेंच रद्द न केला तर–सदैव अस्तित्वांत राहूं शकतो, कारण इंग्लंडचा राजा कधींही मरत नाहीं, (The king of England never dies!) त्या अर्थी स्टब्स व त्याचे साथीदार यांना झालेली हस्तछेदनाची शिक्षा ही न्याय्य व कायदेशीरच आहे."

**एलिझाबेथनें** एकदां एक ग्रंथ सर फ्रान्सीस बेकन यांजवळ परीक्षणार्थ दिला असतांना, त्यानें हुजूरच्या तडाख्यांतून त्या ग्रंथाचा बचाव फार मोठ्या युक्तीनें केला. राणीनें त्यास विचारलें, "या पुस्तकांत कोठें राजद्रोह आढळतो काय?"

**बेकनः**—राजद्रोह? यांत मला तर सारी चोराचोरी व दडपादडपी मात्र दिसत आहे. काय सांगूं राणीसरकार, या पठ्ठ्यानें टसिटस आणि सॅलस्टपासून तों आजपर्यंतच्या नामांकित ग्रंथकारांच्या ग्रंथांतील उत्कृष्ट भाग चोरून या पुस्तकांत कोंबले आहेत.

अशा युक्तिवादानें बेकननें तो ग्रंथ राजद्रोहाच्या संशयाच्या कचाट्यांतून वांचविला. **आर. हॉलिनशेड** हा एक दांडगा इतिहासकार होता. यानें इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड या देशांचें मोठे इतिहास लिहिले होते. पण करतो काय बिचारा! एलिझाबेथ राणीच्या दणक्याचें भूत रात्रंदिवस त्याच्या डोळ्यांपुढून हालेचना. शेवटीं छाटाछाटी, कापाकापी करून–खच्ची स्थितींतच कां होईना!–एकदांच्या त्या 'हिस्टऱ्या' त्यानें प्रसिद्ध केल्या.

**गाईल्स फ्लेचर** या नांवाचे एक इंग्रज गृहस्थ रशियांत शिष्टाई करण्यास वकील या नात्यानें गेले होते. ते तिकडून 'स-मस्तक' जिवंत परत आल्यावर, तिकडील अनेक जुलमी कृत्यांचा परिस्फोट करण्याच्या उद्देशानें, "The Russian Commonwealth" या नांवाचा एक ग्रंथ त्यांनीं लिहिला. ही गोष्ट लंडनांतल्या रशियन व्यापाऱ्यांस कळतांच, झांकलेली सवा लाखाची मूठ आतां उघडी होणार, या भीतीनें त्यांनीं एलिझाबेथकडे बऱ्याच सह्यांचा एक जंगी अर्ज सादर केला, आणि तें पुस्तक गर्भांतल्या गर्भांत ठार मारविलें.

एलिझाबेथची कारकीर्द ही अशी होती. आतां उलट तिसऱ्या विल्यम राजाची कारकीर्द पहा. छापखान्याला निर्भेळ पूर्ण स्वातंत्र्य असें याच्याच कारकीर्दींत मिळालें. 'ग्रंथकार व त्याचा ग्रंथ यांमध्यें राजाची नुसती सांवलीसुद्धां पडत नसे' असें तत्कालीन इतिहासकारांनीं स्वातंत्र्याचें वर्णन केलें आहे. याच अमदानींत अशी एक गोष्ट घडून आली कीं, **लॉर्ड मोलस्वर्थ** नामक एक इंग्रज वकील डेनमार्कच्या दरबारांत होते. त्यांनीं " Account of Denmark "–डेनमार्कची कांहीं माहिती–या आपल्या पुस्तकांत खुद्द डेन्मार्कनृपतीबद्दल कांहीं वरचढपणाचा मजकूर लिहिला. तेव्हां इंग्लंडांतील डॅनिश वकिलानें ही गोष्ट खुद्द विल्यम राजाच्या कानावर घालून म्हटलें, " महाराज, हीच गोष्ट आमच्या एकाद्या डॅनिश मनुष्यानें जर आपल्याबद्दल केली असती, तर इंग्लंडच्या नृपतीची नुसती सूचनात्मक तक्रार येतांच, त्या मनुष्याची मान तत्काळ फांसावर लटकली गेली असती." यावर त्या स्वातंत्र्यप्रिय स्वतंत्र लोकांच्या नृपतीनें शांतपणानें उत्तर दिलें,"वकीलसाहेब, गोष्ट वाईट खरी. पण आपण म्हणतां तसें मात्र मला करतां यावयाचें नाहीं. आपली मर्जी असेल तर आपण जें काय म्हणतां तें सर्व मी त्यास स्पष्ट कळवितों आणि आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत ही तक्रार जोडण्याची त्याला विनंतीही करतों." **एलिझाबेथ** आणि **तिसरा विल्यम** यांच्या कारकीर्दींत पुरतें शतकाचेंही अंतर नव्हतें, परंतु दोन दंडधारकांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनांत केवढें महदंतर ?

**पहिले जेम्स राजे** जेव्हां सिंहासनाधिष्ठित झाले, तेव्हां प्रत्येक ग्रंथकारानें आपला ग्रंथ त्यांतील आक्षेपार्ह भागाची शुद्धि, तपासणी किंवा सुधारणा करून घेण्याकरितां सरकारकडे पाठविलाच पाहिजे, व असें न करणारास कडक शिक्षा ठोठावण्यांत येईल, असा निर्बंध करण्यांत आला. **जॉन नॉक्स** ( John Knox )–ज्याला **मिल्टननें** 'राज्य-सुधारक' ( The Reformer of a Kingdom) असें म्हटलें; फार काय पण ज्याच्या थडग्यावरसुद्धां "There lies he who never feared the face of man" असें वाक्य खोदलें गेलें,–त्या स्फूर्तिदायक लेखकाच्या ग्रंथांतील मजकुराच्या तंगड्याही याच महापुरुषाच्या राजवटींत कापल्या गेल्या. याबद्दल मिल्टननेंच म्हटलें आहे कीं, "रेचक्या परीक्षकांच्या हलगर्जीपणाच्या परंतु बुद्धिपुरःसर केलेल्या हिरवटपणामुळें अथवा काल्पनीक भीतीमुळें, प्रस्तुत ग्रंथकाराच्या ग्रंथांची जी छाटाछाटी करण्यांत आली, त्यामुळें भावी पिढ्या सदरहू लोकोत्तर मनुष्याच्या बुद्धिमत्तेचा स्वाद घेण्यास कायमच्या मुकल्या."

'लायसेन्सर्स ऑफ धी प्रेस'–किंवा छापखान्यावरचे अधिकारी–ही संस्था विशेषतः पहिल्या चार्लस राजाच्या अमदानींत व्यवस्थित अशी स्थापन झाली. म्हणजे या राजश्रीनें छापखाना-संस्थेच्या नरड्यावर सदोदित बुटाची टांच ठेवणाऱ्या संस्थेला चांगलें व्यवस्थित असं कायदेशीर रूप दिलें. अर्थात् जेव्हां खुद्द नृपतींनेंच 'लोकरंजना'चें आपलें कर्तव्य झुगारून 'आत्मरंजना'कडेच विशेष लक्ष दिलें, तेव्हां राजनिष्ठेचा सफेदा फांसून 'नृपतिरंजन' करणाऱ्या 'खास सरकारी आश्रयाखालील' प्रकाशक लोकांचा एक वर्ग निर्माण झाला. राजाची व राजकक्षेतील भाग्यवान् अधिकाऱ्यांची मर्जी प्रसन्न करून घेण्याकरितां त्यांना रुचेल व पचेल असलीं कायदेशीर व शुद्ध गाळीव मजकुरांचीं पुस्तकें प्रसिद्ध करून, या प्रकाशकवर्गानें आपल्या पोळीवर तूप ओतून घेण्याची संधी वांया दवडली नाहीं.

याच वेळीं छापखान्याच्या या विवक्षित गळचेपीमुळें, पार्लमेंटांतील प्रेसबिटेरियन पक्षाला छापखान्याचे दरवाजे अगदींच बंद झालेले होते. त्यांच्या मतांना बाहेर पडण्याची मुळींच संधी मिळत नसे व उलट प्रतिपक्ष्यांच्या टीकांचा मारा त्यांना निमूटपणें मूग गिळून सहन करावा लागे. तेव्हां मानवी विचार-व्यक्तिकरणावर असलेलें लायसेन्सरचें हें भूत अजिबात नष्ट व्हावें, छापखाना राजकीय दडपणापासून मुक्त व्हावा, वगैरे चळवळ त्यांनीं पार्लमेंटांत मोठ्या आवेशानें व जोरानें सुरू केली. या वेळीं प्रेसबिटेरियन पक्ष म्हणजे मानवी स्वातंत्र्याकरितां धडपडणारा एक ईश्वरी अवतारच उत्पन्न झाला कीं काय, असा सर्वांचा समज झाला. परंतु हा समज नुसता 'समजच' होता, हें लवकरच सर्वांच्या प्रत्ययास आलें. कारण पार्लमेंटांतील राजकारणाच्या 'सीसॉ'च्या खेळांत या पक्षाचें पारडें वर होतांच, त्याला स्वाधिकार-संरक्षणाची इतकी कडकडीत जाणीव उत्पन्न झाली कीं, त्याच्या पूर्वीच्या अधिकारसंपन्न प्रतिपक्षांनीं छापखान्याच्या गळ्याला जी नुसती दोरी अडकवून ठेवली होती, तिच्या ऐवजीं या ढोंगी स्वातंत्र्यसंरक्षकांनीं कडक तात अडकवून तिचा घट्ट फांसही ओढून ठेवला ! मानवी प्राण्यांचा राजकीय इतिहास म्हणतात तो हा असला असतो ! !

इंग्रज लोक ज्याची महाकवींत प्रामुख्यानें गणना करतात, त्या **मिल्टन** कवीचेही प्रेसआक्टानें कांहीं थोडेथोडके वाभाडे काढले नाहींत. राजसत्तात्मक व प्रजासत्तात्मक अशा दोनही प्रकारच्या राज्यव्यवस्थेनें बिचाऱ्या मिल्टनास सुखें सोडलें नाहीं. त्यानें आपल्या एका इतिहासांत सॅक्सन भिक्षु लोकांच्या

धर्मभोळेपणाबद्दल, गर्वाबद्दल आणि लुच्चेगिरीबद्दल कांहीं सणसणीत टीका केली होती. ती राजकीय दुसरा चार्लस राजा व बिशप लोक यांच्याविरुद्ध आहे असे ग्रंथ-रेचक्यास वाटल्यामुळें, रेचकविधींत तेवढा मजकूर साफ गाळण्यांत आला. मिल्टन ज्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा मोठा भक्त होता, त्या पद्धतीच्या अमदानींतही त्याला असलाच त्रास झाल्याशिवाय राहिला नाहीं. " History of long Parliament and Assembly of Divines" या त्याच्या पुस्तकांतील कित्येक भाग सन १६७० त आक्षेपार्ह ठरवून वगळण्यांत आले होते. परंतु पुढें सन १६८१ मध्यें किंचित् मनु बदलला म्हणून म्हणा, किंवा दृष्टिकोन बदलला म्हणून म्हणा तेच आक्षेपित भाग स्वतंत्र प्रसिद्ध केल्यावर सर्वांनीं मिटक्या मारीत वाचले. पॅरडाईज लॉस्ट काव्याच्या पहिल्या पुस्तकांत मिल्टननें सॅटनचा उदयोन्मुख सूर्याशीं जो उदात्त दृष्टांत दिलेला आहे, तो देखील अप्रत्यक्ष रीतीनें राजद्रोहप्रचारक ठरवून अजिबात गाळण्याची घोरपड त्या महाकाव्याच्या बोकांडीं बसली होती; परंतु ती थोडक्यांत निभावली.

वरील माहितीवरून "वाङ्मयात्मक जुलूम" आजपर्यंत कसा काय होत आला आहे आणि लोकोत्तर बुद्धिमंतांच्या शुद्ध ज्ञानास्वादाला जग कसकसें मुकत गेलें, हें कळून आलेंच असेल. त्याचप्रमाणें या जुलमाची आपल्या क्षेत्राबद्दलची दृष्टि किती आकुंचित आहे आणि त्याच्या समर्थनार्थ जे जे उपाय आजपर्यंत योजण्यांत आले, ते ते उलट त्या जुलमी पद्धतीच्याच उरावर कसे बसले, हेंहि समजलेंच असेल. आतां, फक्त प्राचीन 'लायसेन्सर' [ किंवा जे अलीकडे 'सेन्सॉर' या उपाधीनें ओळखले जातात, ] यांच्या हातून ग्रंथपरीक्षणाच्या कामांत ज्या मूर्खपणाच्या हास्यास्पद अशा गोष्टी घडल्या, त्यांचेंच दिग्दर्शन करावयाचें राहिलें आहे. परंतु शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें, या बाबतींत विशेष कांहीं लिहिलेंच पाहिजे असें नाहीं. लायसेन्सरच्या अधिकारावर नेमलेले लोक किती अजागळ आणि सर्वसामान्य अकलेच्या बाबतींतहि पोकळ असतात, याचें विवेचन मिल्टननें आपल्या " The liberty of unlicensed printing " या लेखांत केलेंच आहे.

असो. सध्यां हिंदुस्थानांत प्रेस-आक्टाची जी अंमलबजावणी चालू आहे, तिच्या पद्धतींत आणि प्राचीन लायसेनसिंग किंवा इंक्विझिशन पद्धतींत विशेष काय फरक किंवा सुधारणा आहेत, हें सांगणें जरा धाडसाचें होईल. म्हणून इंग्रजी राष्ट्राचा अत्यंत आवडता इतिहासकार व तत्त्ववेत्ता **डेव्हिड ह्यूम**

( David Hume, 1711-1776 ) याच्या एका इषाऱ्यानेंच आमच्या निबंधाचें भरतवाक्य करून हा लेख आटोपतों. तो इषारा हाच कीं:—

"The liberty of Britain is gone for ever, when such attempts shall succeed."

चित्रमय जगत्, एप्रील १९१८.

---

# लोकसंग्रह आणि राजकारण.

मतामतांचा गलबला सर्वत्र माजून कोणी पुसेना कोणाला अशी स्थिति झालेली असली, तरी देशांतील विविध चळवळींच्या नाडीवर हात ठेवतांच, कोणीही झाला तरी हेंच सांगेल कीं हिन्दुस्थानांत एक अद्भुत नवचैतन्याचें वातावरण उत्पन्न झालें आहे खरें. अग्नि ज्याप्रमाणें छपवितां येत नाहीं, त्याप्रमाणें नवचैतन्याचा स्फुलिंगहि झांकतां झांकला जात नाहीं. आजचें भारतीय प्रबोधन अक्षरशः न भूतो न भविष्यति असेंच आहे. त्यांत चालू घटकेला असावा तितका संघटितपणा व एकसूत्रता जरी नसली, तरी राष्ट्रजीवनाच्या बॉयलरमध्यें चैतन्याची वाफ सणसणाट करूं लागली आहे, ही गोष्ट कांहीं असामान्य नव्हे. येईल, असाहि एक असामान्य सूत्रधार-ड्रायव्हर-येईल कीं तो आमच्या राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाची मेलगाडी संघटीतपणाच्या सांखळया जुळवून, एकसूत्री रेलवरून बेछुट दामटीत नेईल. भारतवासी साऱ्या जगाचे हमाल आहेत कीं, **न तु एव आर्यस्य दासभावः** (आर्यजन कधिंहि कोणाचे गुलाम होणार नाहींत) हें आमच्या आर्यचाणक्याचें सूत्र अक्षरशः खरें आहे, हें साऱ्या उपलब्ध जगाला ठासून सांगण्याचा सोन्याचा दिवस फार दूर नाहीं. सांप्रत भिन्न भिन्न मतवादी राष्ट्रसेवकांचें भिन्न भिन्न क्षेत्रांत 'कुदळकाम' ( spade work ) चालू आहे. भविष्य काळीं साऱ्या जगाला थक्क करून सोडणाऱ्या भारतवैभवाच्या ताजमहालाचा पाया भरण्याचें आज काम सुरू आहे. हा पाया पक्का करण्यासाठीं अनेक राष्ट्रसेवकांच्या त्यांत आहुति पडल्या, पडत आहेत व पडतील. ताजमहालाच्या भिंतीवर नक्षीचे किंवा घुमटावरील कळसाचे दगड होण्याऐवजीं स्मृतींच्या तीक्ष्ण दृष्टिकटाक्षाला चकवून आणि इतिहासाच्या चित्रगुप्ती रोजनिशीला चुकवून, ताजमहालाच्या पायांत आत्मयज्ञ करणाऱ्या अज्ञात खडबडीत

दगडधोंड्यांची पुण्याई फार श्रेष्ठ दर्जाची असते, हें विसरून चालणार नाहीं. सर्वस्वनाशाच्या सिमेंटांत आत्मकर्तबगारीचा कणखर पथ्थर राष्ट्रकार्यांच्या पायांत निष्काम बुद्धीनें, स्मृतीची पर्वा न करतां, कोणाच्या बऱ्यावाईट सर्टिफिकिटाची दिक्कत न बाळगितां, शुद्ध कर्तव्यनिष्ठेनें झुगारून देण्यांतच कर्मयोगाची खरीखुरी सफलता असते. राष्ट्रोन्नतीच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत मतमतांतराचें दाट धुकें पसरलें असतांहि, प्रामाणिक भावनेनें कार्य करणाऱ्या सर्व हिंदी कर्मयोग्यांना ही एका दुर्बळ लेखकाची लेखणी शतशः प्रणाम करून उद्दिष्ट मुद्याच्या विवेचनाकडे वळत आहे.

लोकसंग्रह म्हणजे राष्ट्र–विराटपुरुषाचें हृदय. या पुरुषाच्या देहांत सर्व प्रकारच्या चैतन्याचें रुधिराभिसरण हेंच हृदय करीत असतें. लोकसंग्रहाला राष्ट्राच्या आत्म्याची उपमा दिली तरी चालेल. हिंदुस्थान–राष्ट्राची लोकसंग्रही प्रवृत्ति जोंपर्यंत धडधडत होती, तोंपर्यंतच त्याच्या हातून विशेष पराक्रम झाला. हें धडधडणें बंद पडतांच त्याच्या नाड्या आंखडल्या, त्याचें वैभव फिकें पडलें, जीवनचेतना लुप्त झाली आणि तो प्रेतवत् बनला. धर्मानें लोकसंग्रहाची शक्ति वाढवावी आणि त्या शक्तीनें अखेर उपलब्ध जगाच्या राजकारणावर कुरघोडीची मात करावी, ही आर्यपरंपरा आहे. लोकसंग्रहाचें राजकारणाशीं जरी निकटचें नातें असलें, तरी धर्माचा लोकसंग्रहाशीं जिव्हाळ्याचा रक्तसंबंध आहे. आर्यपरंपरा म्हणजे लोकसंग्रह आणि लोकसंग्रह म्हणजेच आर्यपरंपरा, अशी इतिहासाची बिनतोड जबानी आहे. या परंपरेची निशाणी प्रत्येक हिंदुमात्राच्या गळ्यांत असूनहि, लोकसंग्रहाची कल्पना आमच्या गळीं नीटशी उतरू नये, हा प्रचलित अवनति-अवदसेचा झपाटा होय. या निशाणींत नुसती लोकसंग्रही प्रवृत्तीच आहे असें नव्हे, तर राष्ट्रोद्धारार्थ अवश्यक लागणाऱ्या ‘ कॉलनायझिंग स्पिरिट ’ वसाहतीच्या धाडसाचा मंत्रहि आहे. पण लक्षांत कोण घेतो ? कोणत्याहि कारणामुळें असो, आर्यजन बर्फमय उत्तर ध्रुवाचा प्रदेश सोडून दक्षिणेकडे वसाहत करण्यास निघाले खरे. पण जन्मभूमीचें प्रेम कांहीं और असतें. या प्रेमाची खूण आपल्या जवळ कांहीं असावी म्हणून त्या वेळीं दिसणाऱ्या मृगशीर्ष नक्षत्राच्या आकारानुरूप ( एक वर्तुळ व त्यांतून निघणारा बाणाकृति दण्ड ) आपल्या प्रवाशी पेशाला साजेल असें एक स्मृतिचिन्ह त्यांनीं बनविलें. एक कमरपट्टा व हातांत एक दण्ड. ज्याच्या कमरेला पट्टा व हातांत दण्ड असेल तो आर्य, मग तो कोठूनहि आलेला असो, त्याला आपला भाऊ मानून आर्य-

संघांत सामील करून घ्यायचा. या धोरणानें आर्यजनांनीं आपला आर्यसंघ अवाढव्य वाढविला आणि वसाहती–धाडसाच्या जोरावर ते अखिल जगाचे शास्ते झाले. या कमरपट्टयाचेंच रूपांतर अखेर जानव्यांत झालें आहे. आर्यलोक जात्याच व्यवहारकुशल असल्यामुळें त्यांनीं हें कमरेचें जानवें खांद्यावर लटकविलें आहे, तरी आमचे दुसरे आर्यबंधु पारशी यांची कस्ती अजून त्यांच्या कमरेशीं मस्ती करीतच आहे. जानवें म्हणजे भटांच्या गुलामगिरीचें दावें नसून आर्यपरंपरेच्या 'मिशनरी स्पिरिट'चें लोकसंग्रही बाण्याचें आणि वसाहती धाडसाचें अवशिष्ट डेमोक्रॅटिक चिन्ह आहे. 'भटा, तुझें वर्म काय ? सुताचें जानवें.' या सूत्रांतलें सूत पिंजण्याचें काम रिकामटेंकड्या संशोधकांनीं खुशाल करावें. परंतु जानव्याच्या इतिहासांत भट मिळावयाचा नाहीं किंवा श्रेष्ठकनिष्ठपणा सांपडावयाचा नाहीं. ज्याच्या गळ्यांत जानवें तो आर्यवंशज हिंदु, त्यांत कोणी वरिष्ठ नाहीं कनिष्ठ नाहीं. सर्वांचा दर्जा सारखा. सर्व हिंदुधर्माचे मिशनरी. लोकसंग्रह करून राजकारणाच्या लढाया मारणारे क्षत्रिय आणि व्यापारउदीमाचें लोण उपलब्ध जगाच्या कोनाकोपऱ्यांत नेऊन भिडविणार धाडसी वैश्य. जानव्याचा हा प्रभाव हिन्दुजन जर नीट ध्यानांत घेतील, तर रात्रंदिवस हृदयावर रुळणाऱ्या या क्षुल्लक स्मृतिचिन्हाचा ' मिशनरी ' बाण्याचा संदेश ते अतःपर फुका दवडणार नाहींत. जानव्याची गांठ ही कधींपासून ' ब्रह्मगांठ ' बनली कोण जाणे, पण ती **तत्त्वनिष्ठेची गांठ** आहे, एवढें मात्र खचित. लोकसंग्रही मिशनरी बाण्याची ही तत्त्वनिष्ठेची गांठ प्रत्येक उपनीत हिन्दु वटूस नीट समजावून देणारी पुरोहिताची परंपरा मागेंच मेल्यामुळें, लोकसंग्रहाऐवजीं केशवान्मा नाराणान्माची खडबडाटी कवायत अजागळाप्रमाणें हिंदु तरुणांच्या गळ्याला चिकटलेली आहे.

हिंदूंच्या प्राचीन वसाहतींचा इतिहास अझून मराठींत कोणी लिहिल्याचें ऐकिवांत नाहीं. परंतु त्याचें उपलब्ध साहित्य पाहिलें कीं आमच्या आर्यपूर्वजांची मिशनरी धडाडी किती जबरदस्त आणि चिकाटीची होती, याची बरीच कल्पना होते. त्यांचा धर्म आतांप्रमाणें एकलकोंड्या, क्षुद्रमनाचा, भेदाळु, तुसडा, तोंडपुज्या, भिक्षुकी आणि घरांतल्या घरांत घरचींच माणसें जाळणारा नव्हता. कट्टा मिशनरी धर्म होता. त्याला अटकेची अटक नव्हती. हल्लींच्या हिंदूंना हाताच्या मुठींत आंवळा धरतां येत नाहीं, पण त्यांच्या आर्य बापजाद्यांनीं पृथ्वीचा सारा गोल चिमटींत धरला होता. गौतम बुद्धाच्या मिशनरींनीं नुसते आशिया युरप-


खंडच नव्हे, तर पाताळ लोकच्या अमेरिकेच्या मस्तकावर आर्यधर्मांचें झेंडे फडकवून, तेथें आपल्या वसाहतींचें ठाणें ठोकलें होतें. त्या वेळीं हा सिंधुदेश ( हिंदुदेश ) म्हणजे धर्माचे माहेरघर, आत्मज्ञानाची गंगा आणि विद्वत्तेची खास पेठ असा सर्वत्र लौकीक या मिशनरी चळवळीनेंच प्रस्थापित केला होता. प्लेटो लायकरगस सारखे ग्रीक लोक तत्त्वज्ञानाचा श्रीगणेशा येथूनच शिकून गेलें. जीझस क्रैस्ट यानें आत्मज्ञानाची बाराखडी येथेंच धूळपाटीवर घोकली. त्यावेळीं काशी म्हणजे जगाची विलायत. झोरास्टर येथेंच बुद्ध झाला. ज्याला शिकणें विद्या खाशी, त्यानें उठून गांठावी काशी, हा काशीचा त्या वेळचा लौकिक. आतां आमचें गार्‍हें पहावें तर अगदींच न्यारें! ज्याला व्हायचें असेल **कैलासवाशी, त्यानें चटकन् गांठावी काशी. पूर्वी** ज्ञानसंपन्न होण्यासाठीं **परदेशाचे लोक** काशीला येत; **हल्लीं** हिंदु जन मरायला काशीला जातात ! उन्नति व अवनति यांत केवढा हा भेद ! !

हिंदु जेव्हां या लोकसंग्रही बाण्याला पारखे झाले, तेव्हांच त्यांच्या सर्वांगीण गुलामगिरीचा पाया घातला गेला; तेव्हांच त्यांच्यांत आपपरभेद उत्पन्न झाला; तेव्हांच त्यांच्या मर्मावर इस्लामी चांदताऱ्याचा वज्रप्रहार पडला आणि पाठोपाठ क्रिस्ती पारध्यांचीं जाळीं त्यांच्या हातापायांत अडकलीं. हिंदु धर्माचा ‘प्रोझिलिटायझिंग बाणा’ ( येईल त्याला, सांपडेल त्याला, वाटेल त्याला हिंदुधर्माची दीक्षा देऊन हिंदु संघांत घेणें ) जर शिथिल न पडता, हिंदु धर्म म्हणजे भिक्षुक मर्कटांच्या हातचा लोण्याचा गोळा न बनता आणि स्मृतिपुराणादि भिक्षुकशाही ग्रंथांतील द्वैती भावनांना हिंदुसमाज अनाडो बोकडाप्रमाणें बळी न पडता, तर इस्लामी चांदताऱ्याची नागवी समशेर खैबर घाटांतल्या घाटांत बोथट पडली असती आणि आकाशांतल्या बापाच्या लेकांचीं जहाजें आरबी समुद्रांत उलथींपालथीं झालीं असतीं. असती आणि नसतीं ! आम्हालाच आली अहंपणाची मस्ती, इतक्यांत परक्यांनीं जिंकली कुस्ती, पण आतां तरी सोडूं या कुंभकर्णाची सुस्ती ! !

हिंदुजनांनीं लोकसंग्रहाचें तेरावें घातलें तर घातलें, पण निदान संघसंरक्षणाची तरी काळजी घ्यावी ? तेंहि नाहीं. परकीय मिशनरी जाळ्यांत कोणी गेलाच तर ‘जा मर, काळें तोंड कर’ असला उद्दामपणा. त्याला परत जवळ घेण्याची बोली नाहीं. या उर्मटपणाचा परिणाम असा झाला कीं ११ व्या शतकापर्यंत ज्या हिंदुस्थानांत मुसलमान औषधाला मिळण्याची पंचाईत, तेथेंच आज एक दोन नव्हे

तर सहा कोट मुसलमान उत्पन्न झाले. हे काय आकाशांतून पडले कीं इराण तुर्कस्थानांतून त्यांचीं पार्सलें भरून आलीं ? खुद्द इराण आरबस्थान व तुर्कस्थान या इस्लामी राष्ट्रांत मुसलमान फक्त अडीच तीन कोटी आणि हिंदुस्थानांत सहा कोटी ? अर्थात् हे सहा कोट जीव आमच्याच हाडारक्तामांसाचे पूर्वी हिंदूच होते. आमच्या अधार्मिक उद्दामपणामुळें ते आज आम्हांपासून धर्माच्या विरळ पडद्यामुळें विभक्त पडले आहेत व लोकसंग्रहदृष्ट्या केलेली ही चूक राजकारणाच्या क्षेत्रांत आज आम्हांला पदोपदीं नुसती अडवीतच नाहीं, तर रडवीत आहे. मुसलमानी धर्माची डिमॉक्रसी आणि हिंदु धर्माची प्रीस्टॉक्रसी यांचा विस्तृत तुलनात्मक इतिहास **हिंदु धर्माचें दिव्य** या पुस्तकद्वारें आम्ही सन १९१९ सालीच हिंदु बांधवांपुढें मांडलेला असल्यामुळें, त्याचा पुनरुच्चार येथें करीत नाहीं व करणें शक्यहि नाहीं. तथापि एक गोष्ट सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हिंदुजनांनी 'जा' म्हणून धिकारलेल्या बाट्यांनींच हिंदु राष्ट्राचा गळा विशेष कापला आहे, ही एकच गोष्ट जर हिंदुजन नीट विचारात घेतील तर लोकसंग्रह आणि पतितपरावर्तन या बद्दल कसला वादच रहाणार नाहीं. मलिक काफूर, मलिक खुस्रू, मकबुलखान, मुजफरखान, सुलतान शिकंदर लोदी, निजाम उल्मुल्क बहिरी, अहंमद निजामशहा, फतेउल्ला इमादशहा, महाबतखान, इत्यादि बडीबडी ठळक मंडळी हिंदु धर्मातूनच मुसलमान धर्मात गेलेली; पण त्यांनींच हिंदु धर्माला चारी मुंड्या चीत करण्याच्या कामीं केवढाले अत्याचार केले व राजकारणांतहि हिंदूंना किती नामोहरम केलें त्याचा इतिहास पहा. पुरुषांप्रमाणें बाटलेल्या अनेक स्त्रियांनींही हाच धडा गिरविल्याचें आढळून येईल. हिंदुस्थानांतील मुसलमानी सत्तेचा इतिहास म्हणजे लोकसंग्रहाच्या जोरावर राजकारणी लढाया मारून. हिंदूंना नेस्तनाबूद करणाऱ्या मिशनरी बाट्याचा यशस्वी इतिहासच म्हटला पाहिजे.

आतां हें चित्र पहा. 'क्रिश्चन पेट्रिअट' नामक हिंदी वर्तमानपत्राचें हें मुखचित्र




आहे. याचा अर्थ काय ? वाचक हो, नीट निरखून पहा. या चित्राचा अर्थ, क्रिश्चन पेट्रिअट पत्राची महत्त्वाकांक्षा, अशी आहे कीं 'काय वाटेल तें होवो, आम्ही सर्व हिंदुस्थान क्रिस्तीस्थान करूं.'

A day will come when the last Hindu is baptised

( असा एक दिवस येईल कीं त्या वेळीं अगदीं शेवटचा शिलकी हिंदु आम्ही क्रिस्ती करूं. ) अशी तर क्रिस्ती मिशनऱ्यांनीं पैज मारलेली आहे. हिंदी क्रिस्ती संस्थांच्या नानाविध चळवळींसाठीं दरसाल अमेरिका इंग्लंड येथून कोट्यवधि रुपयांचे फण्ड बिनचूक येत असतात. एवढी ही संपत्तीची उधळपट्टी करणारे इंग्लिश व अमेरिकन लोक असे काय मोठे कर्णांचे अवतार लागून राहिले आहेत कीं 'फक्त खऱ्या धर्माचें ज्ञान' देण्यासाठीं त्यांनीं मोठमोठ्या चळवळी येथें चालवाव्या! खऱ्या धर्माचें ज्ञान न मिळतां, हिंदुस्थानांतले लोक स्वर्गाला जाण्याऐवजीं नरकांत गेले, तर या बेट्यांना थोडेंच सुतक येणार आहे? क्रिस्ताचा जन्म होण्यापूर्वी आणि हे क्रिस्ती कर्ण आपले काळे पांढरे झगे घेऊन इकडे येण्यापूर्वीं अनंत कोटी आर्य 'खऱ्या धर्मज्ञानाच्या' तुंब्याशिवाय वैतरणी नदींत बुडून मेलेच कीं नाहीं? तसेच त्यांचे आधुनिक वंशजहि येथें मरून पुन्हां 'वन्समोअर' वैतरणींत बुडून मरतील; त्याची यातायात या क्रिस्ती गोमागणेशांना कोणीं सांगितली? पण हिंदुस्थान क्रिस्तीस्थान करण्यासाठीं त्यांच्या जिवाची कोण आटापिटी चाललेली असते ती पहा. आणि आम्हां हिंदुजनांची ही स्थिति पहा. इतक्या कोट्यवधि डॉलर पौंडांचें केवळ धर्मासाठीं शेण करण्याइतके इंग्लिश अमेरिकन लोक आजच गाढव बनले काय? खचित नाहीं. यांत धर्मप्रसाराच्या दाट कवचाखालीं राजकारणी गूढ डावपेंच आहेत. हिंदुलोकांना स्वर्गप्राप्तीचा सुलभ मार्ग दाखवून, वरती वाटखर्चीसाठीं पॉकेट मनी पाव बिस्कुटें देण्यासाठीं कांहीं ही क्रिस्तसेना येथें आलेली नाहीं खास. परंतु अझून आम्हांला त्यांच्या मयचेष्टेचा पुरा थांग लागलासा दिसत नाहीं. हिंदुस्थानांत क्रिस्ती चळवळ करणारे क्रिस्ताचे लाल पाहिले तर सारे बाटे हिंदुच. येथेंहि पुन्हां इतिहासाची पुनरावृत्ति पाहून घ्या. तुमच्याच हातून तुमच्याच थोबाडांत भडकवायची! परदेशी–परधर्मी माणूस पत्करतो, पण स्वदेशी–परधर्मी पत्करत नाहीं. हिंदु राष्ट्राचा घात सर्वतोपरी याच बाट्यांनीं विशेष केला आहे, विशेष केला आहे, विशेष केला आहे, असें किती वेळां लिहावें? सारांश, परधर्मांत जाणारा प्रत्येक इसम म्हणजे तेवढी आमच्या हितशत्रूंच्या सैन्याची



भरती, नवीन कट्टया शत्रूची उत्पत्ति, आणि तितकीच आमच्या संघाची अधोगती, एवढें तत्व जर सर्व हिंदूंच्या गळीं उतरलें, तर पतितपरावर्तन करायचें त्याला हिंदु मिशनरी सोसायटीचा विधि घ्यावा, डॉ. मुंज्यांचा देवलोक्त विधि घ्यावा कीं कुर्तकोटींना आणखी एखादा नवीन तर्कटी विधि शोधून काढण्यास सांगावा, असले ऐदी बाष्कळ व निरुपयोगी दिवाणखानी वाद घालणारांना शरमच वाटेल.

धर्मद्वारा लोकसंग्रह आणि लोकसंग्रहाद्वारा राजकारण, या त्रिदळी तत्वाचें महत्व उमजून, हिंदूंच्या संघशक्तीचा परधर्मप्रवेशानें होणारा ऱ्हास, उत्तरेच्या बाजूनें, थोपवून धरण्याचें राष्ट्रकार्य **महर्षि दयानंद सरस्वती** यांनीं केलें; आणि दक्षिणेकडे बोकाळलेल्या विधर्मी क्रिस्त्यांच्या थैथयाटाला तोंडबेडी चढविण्याचें पुण्यकार्य **चिरंजीव आद्य हिंदुमिशनरी गजानन भास्कर वैद्य** यांनीं केलें. स्वामी दयानंदांच्या आर्यसमाजाची कामगिरी अद्भुतरम्य आहे. त्यांच्या लोकसंग्रही कामगिरीचे परिणाम इतके सर्वस्पर्शी व परिणामकारक झाले कीं आर्यसमाजावर क्रिस्ती मिशनऱ्यांनीं अनेक संकटांच्या घोरपडी आणल्या व त्याच्या बदलौकिकाचा (१) खोटानाटा डंका सर्वत्र पिटून, त्याला अनेक वेळां सरकारच्या क्रुद्ध अवकृपेच्या प्राणघातक दिव्यांतून कित्येक वर्षे जीवनयात्रा कंठण्यास भाग पाडलें. पण धन्य ते आर्यसमाजाचे अनुयायी, त्यांनीं या भयंकर दिव्यांत आपली जान दिली पण समाजाची मान दिली नाहीं. वाचकांनीं विशेष माहितीसाठीं लाला लजपतरायनीं लिहिलेलें 'आर्यसमाज' हें इंग्रजी पुस्तक मुद्दाम एकवार वाचावें,



**गजानन भास्कर वैद्य.**

अशी शिफारस आहे. एकट्या लाला लजपतरायांनीं आठ हजार लोकांना आर्य-संघांत समाविष्ट करून घेतलेलें आहे. कै. वैद्यांची हिंदु मिशनरी सोसायटी अजून बाल्यावस्थेंत आहे. तथापि तिच्या पांच वर्षांच्या कामगिरीनें महाराष्ट्रांत मिशनरी तत्त्वाची बरीच जागृति झाली आहे व अजमासें शंभर जीवांना हिंदु-धर्माची दीक्षा देऊन हिंदुसंघाची सेवा बजावलेली आहे. कै. वैद्यांची कामगिरी पाहूं इच्छिणारांनीं **हिंदु मिशनरी** साप्ताहिकाच्या फायलीच वाचलेल्या बऱ्या. त्यांनीं लिहिलेल्या १९४ अंकांत हिंदु मिशनरीविषयक सर्व सिद्धांतांचें स्पष्ट निरूपण करून ठेवलेलें आहे. वैद्यांची लेखनशैली त्यांच्या प्रेमळ भाषणशैलीप्रमाणेंच अत्यंत बाळबोध आहे. त्यांचीं सामाजिक सुधारणेचीं मतें प्रत्येक तरुण-तरुणीनें अवश्य स्वाध्यायांत आणावीं, अशी कळकळीची प्रार्थना आहे. हिंदुमिशनरी सोसायटी फक्त **कार्याकरितांच कार्य करणारी संस्था** आहे. तिच्यापाशीं फंडहि फारसा नाहीं. वैद्यांना फंडाचा फार तिटकारा असे. ते म्हणत "हें धर्माचें कार्य. वाटेल त्यानें वाटेल तेव्हां वाटेल तेथें करावें. त्याला फंड कशाला? नको आम्हांला तें विष." या सोसायटीची स्थापना शुद्ध मतस्वातंत्र्यावर झालेली असल्यामुळें काषायवस्त्रधारी नामधारी जगद्गुरु (?) आणि धाबळ्या शालजोड्या पांघरणारे अ-धर्ममार्तंड भिक्षुक यांच्या इभ्रतीचा चरफडाट होत असतो. अधिकारी व अनधिकारी या भेदाचाच वैद्यांनीं नायनाट केला आणि 'हा अधिकार आम्हांला देवानें दिला' असा खडखडीत जबाब ऐदी आक्षेपकांच्या मुस्कटावर झुगारून, त्यांनीं छातिठोकपणें कार्याची प्रत्यक्ष सुरुवात केली व आपल्या हयातीच्या अखेरच्या ३॥ वर्षांत त्यांनीं हिंदु मिशनरी कार्याचा डंका केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर थेट अमेरिकेपर्यंत गाजविला. संस्थेच्या स्थापनेच्या दिवशींच मुंबईच्या एका उत्तुंग सत्ताधीशानें विलायतेला तार ठोकली कीं 'आज ही संस्था सूक्ष्म रूपांत आहे, अनपकारी ( Innocent ) आहे, पण हिच्या कार्याचे परिणाम कालवशात् दूरदूरवर भिडणारे (Far-reaching) आहेत.'

हिं. मि. सो. ला म्हणण्यासारखें स्वकीयपरकीय विरोधाचें तोंड लागलेलें नाहीं. वैद्यांनीं अनेक आक्षेपकांच्या आक्षेपांचें चुरचुरीत खंडन केलेलें आहे. परंतु त्या नुसत्या वादक्षेत्रांतल्या कवायति चकमकी. आर्यसमाजाप्रमाणें या संस्थेला तापल्या तव्यावर अजून उभें रहावयाचें आहे. उकळत्या तेलांत तळून घ्यावयाचें आहे आणि विरोधाच्या निखाऱ्यांवर तिचे पापड अजून भाजले जावयाचे आहेत. ही दिव्याची देणगी देण्याचा अग्रमान वाटे क्षित्री, क्रुद्ध भिक्षुक,

अनुमानित हिंदु पुढारी, पैशाप्रसरी झालेले शंकराचार्य किंवा मावाप सरकार यांपैकीं कोण घेतो, हें भविष्यकाळ सांगेल. तथापि भिक्षुकशाहीच्या खडावा चाटून पन्नास हजारी फंडावर उभा राहूं पाहणारा डॉ. मुंज्यांच्या कुर्तकोटी चळवळीचा बोलघेवडा मुंजोबा हा अग्रमान मिळवील, असें दिसत आहे. हा मुंजोबा भिक्षुकशाही छत्राखालीं नाचूं पहात असल्यामुळें, या चळवळीचा आरडाओरडा पर्वतीवरच्या नगाऱ्याप्रमाणें कांहीं काळ दाही दिशा धुंद करील, यांत संशय नाहीं. पण त्यामुळें निरपेक्ष बुद्धीनें कार्य करणाऱ्या संन्याशी हिं. मि. सो. ची लोकसंग्रही ध्वजा जोरानें फडफडली तरी कडकडणार नाहीं खास. 'हें कार्य देवाचें आहे. देव वाट दाखवील तसे जाऊं, अनुभव घेऊं आणि मुकाट्यानें कार्य करीत राहूं' हे वैद्यांचे उद्गार त्यांच्या संस्थेच्या कौन्सिल बोर्डानें सतत नजरेपुढें ठेवलेले आहेत.

हिंदी राजकारणाच्या जहाजाच्या बुडाशीं अनंत भोंकें पडलीं आहेत. जहाजावर कप्तान कमांडर लास्करांची बरीच धामधूम उडाली आहे. तथापि हीं भोंकें लोकसंग्रहाच्या कॉंक्रीट सिमेंटानीं बुजविण्याचा यत्न न करतां, जहाज जर तसेंच हांकारण्याचा बेमुर्वतपणा कोणी करील, तर मोठा घात होण्याचा संभव आहे, हें आमच्यासारख्या राजकारणाभिज्ञ लेखकानें सांगावें असें नाहीं. लोकसंग्रहांत ज्या ज्या बाबींचा समावेश होतो, त्या बाबी त्या राष्ट्रधुरीणांच्या नुसत्या ओठांवर न नाचतां पोटांत उतरून प्रत्यक्ष कृतींत त्यांचा परिपाक होईल, तोच निदान आम्ही स्वराज्याचा उषःकाल मानूं; एरवीं कदापि नव्हे. लोकसंग्रह हा राजकारणाचा आत्मा आहे, हें पटल्यावर अस्पृश्योद्धार, जातिभेदनिरास, धार्मिक समान दर्जा, इत्यादि गोष्टी प्रत्यक्ष राजकारणी उलाढालीपेक्षां किती महत्वाच्या आहेत, हें निराळें सांगणें नलगे.

**होवो जगाचा गुरु आर्यधर्म।**
**देवा जगीं वाढवि हिंदुधर्म ॥ १ ॥**

[ लोकमान्य मासिक धुळें. ]

# पावनखिंडीचा सन्देश.

महाराष्ट्राचा इतिहास–१७ व्या शतकांतला मराठ्यांचा इतिहास म्हणजे जगांतला एक अद्वितीय चमत्कारच होय. या चमत्काराच्या पोटीं मराठ्यांच्या पराक्रमांनीं महाराष्ट्रांतल्या अणुरेणूंत त्याच्या भाग्योदयाचा दिव्य संदेश सांठवून ठेविला आहे. महाराष्ट्राचा सह्याद्री, त्याचीं तीं नवरसांत न्हाऊन निघालेलीं खिंडारें व दऱ्याखोऱ्या, काळाशीं टक्कर देऊन ताठ छातीनें अझून उभे असलेले ते रायगड प्रतापगडादि किल्ले, शिवरायाचें पुण्य स्मरणगान गुणगुणणाऱ्या त्या कृष्णा वेण्यादि नद्या आणि देशाच्या भाग्योदयार्थ शिवाजीच्या इमानी मावळ्यांनीं आपल्या जिवाची तमा न बाळगतां शुद्ध कर्तव्य-निष्ठेनें धडाधड उड्या कशा घेतल्या, हें आजही प्रत्यक्ष कृतीनें दाखविणारे ते खंडाळा घाटांतले प्रचंड धबधबे, महत्त्वाकांक्षी तरूणतरुणींना, पाताळयंत्री राजकारणपटूंना, कर्मयोगी समाजसुधारकांना, किंवा उदारमनस्क धर्ममार्तंडांना, सर्वांना सवसारखा स्फूर्तीचा संदेश द्यायला आजही सिद्ध आहेत. जन्माला येऊन आपल्या मायदेशाच्या इतिहासांत आपलें नांव–एखाद्या कोपऱ्यांतच कां होईना–'एक कर्तबगार मनुष्य' म्हणून कोरलें जावें, देवानें दिलेल्या आत्मबलाचा आपण आत्मोद्धाराच्या द्वारेंच जगदुद्धारासाठीं अगदीं कसोशीचा शिकस्त प्रयत्न करावा, आणि आपल्या इवल्याशा साडेतीन हात देहांत साऱ्या जगाला चकित करणारे काय काय पराक्रम भरले आहेत त्यांचा पूर्ण विकास करावा, अशा ताज्या टवटवीत स्फूर्तीनें भरारलेल्या हृदयाचा कोणीही तरुण कोठेंहि पाहील, तर दगड धोंड्यांतूनही त्याला उत्तेजनाचे संदेश ऐकूं येतील, तुफानी वाऱ्यांचे झोत 'शाबास वीरा' म्हणून त्याची पाठ थोपटतील आणि कडकडाट करणाऱ्या आकाशगामी विद्युल्लता त्याच्या मार्गांत आड येणाऱ्या अडचणींचा चक्काचूर करतील. असल्या तरुणाला पावन-



खिंडीचा संदेश खात्रीनें ऐकूं आलाच पाहिजे. छातीचा कोट करून, कर्तव्याच्या निश्चित रोखानें पुढें सरसावणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला पावनखिंडीचा संदेश उत्साहवर्धक होईल, अशा भावनेनें ' किर्लोस्कर खबर ' च्या मुखानें तो व्यक्त करीत आहे.

पावनखिंड आणि बाजी प्रभु देशपांडे हीं दोन नांवें एकमेकांत इतकीं समरस झालेलीं आहेत, कीं पावनखिंड ह्मणजे बाजीप्रभु आणि बाजीप्रभु ह्मणजे पावनखिंड असे पर्यायशब्द आज रूढ होऊन बसले आहेत. बाजीप्रभूंनीं पावनखिंडीला पावन केली, पावनखिंडीनें बाजीप्रभूंचा उज्वल पराक्रम उज्वलतम केला, आणि या दोघांच्या संयुक्त स्मृतींत शिवशाहीच्या अनुपम पराक्रमाचा दिव्यात्मा केंद्रीभूत होऊन बसला. या आत्म्याचा संदेश काय आहे, हें एकदां स्पष्ट पटलें कीं शिवशाहीच्या अभ्युदयाचीच केवळ नव्हे, तर महाराष्ट्राच्या भावी अभ्युदयाचीही किल्ली आपल्याला हस्तगत झाली असें समजावें. महाराष्ट्राचा अभ्युदय महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तिमात्राच्या पूर्ण विकासानेंच झाला व पुढें होणार आहे, हें निराळें सांगावयास नकोच !

बाजीप्रभू देशपांडे यांनीं पावनखिंडीच्या तोंडाशीं आपल्या मूठभर मावळयांच्या साहाय्यानें विजापूरच्या प्रचंड इस्लाम सेनेचा धुव्वा कसा उडविला, शिवरायाला पाठीशीं घालून, खिंडीच्या तोंडावर निधड्या छातीनें तो कित्येक तास कसा लढला, आणि अखेर धारातीर्थीं आत्मसमर्पण करून शिवाजीची बाजी त्यानें कशी राखली, वगैरे हृदयभेदी परंतु स्फूर्तिजनक इतिहास आज अडीचशें वर्षें आबाल वृद्धांच्या मनोवृत्तींना करुणरसानें रडवीत आहे, कर्तव्यनिष्ठेनें डुलवीत आहे आणि उत्तान वीररसानें फुलवीत आहे. या ऐतिहासिक प्रसंगांत अनेक उज्वल रंग संमिश्र झालेले आहेत. अनेक जन अनेक दृष्टीनें त्यांतल्या अनेक रंगांचा भडकपणा वर्णन करतात. राजकारणाभ्यासी जनांना त्यांतून राष्ट्रप्रेमाचा संदेश घ्यावासा वाटतो. मुत्सद्यांना त्यांतली बाजीप्रभूची समयसूचकताच तेवढी आवडते. लढवय्यांना जात्याच उग्ररसाचें प्रेम विशेष असल्यामुळें, बाजीप्रभूच्या शरीरांतून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्यांत, तरवारीचें वारांवर वार चालले असतांना त्यांच्या चकमकींतून निर्माण होणाऱ्या ठिणग्यांत, आणि मावळयांच्या गोफणीनें बेफाम रोंरावणाऱ्या प्रभंजनांतच त्यांना स्फूर्तीचे जिवंत झरे दिसतात. कोणी बाजीच्या शिवनिष्ठेची स्तुति करतो, कोणी त्याच्या राजनिष्ठेची महती गातो, कोणी त्याच्या शौर्याचीं कवनें

गातो, तर कोणी त्याच्या आत्मयज्ञावर कृतज्ञतेचा अश्रुवर्षाव करून, नानाविध विकारांनीं तुडुंब भरलेल्या आपल्या हृदयाचा पाट फोडतो. असे हे नाना प्रकार आहेत. अर्थात् आज दीपावलीच्या नवीन युगांतरांत स्वावलंबनाच्या जोरावर आत्मोद्धाराचा किल्ला सर करण्यास सज्ज झालेल्या वीर वीरांगनांना—

**किर्लोस्कर खबरच्या अनुयायांना**

पावनखिंडीचा संदेश काय असावा? शिवरायाच्या घोडदळांनीं तुडविलेल्या दख्खनच्या मैदानावरचा वाटेल तो दगड धोंडा गोटा उचलून त्याला कानांशीं धरा, म्हणजे तो तुम्हाला हाच संदेश देईल, हाच मंत्रोपदेश करील आणि हीच हितगुजाची गोष्ट सांगेल कीं बाबांनों, **तुम्हांला शिवबाप्रमाणें राष्ट्रोद्धार करायचा असेल, तर आधीं आत्मोद्धार करण्याची लगबग करा; आणि आत्मोद्धाराचा योग साधा. आपलें कर्तव्य–मग तें बरें असो वाईट असो, आवडीचें असो नावडीचें असो, स्वतः पत्करलेलें असो वा दुसऱ्यानें सांगितलेलें असो–तें अक्कलहुशारीनें, राजी-खुषीनें, मोठ्या कुशलतेनें सफाईनें पार पाडा.** यालाच योग असें म्हणतात. हातीं येणारें काम उत्तम रीतीनें तडीस नेण्यांतच महत्त्वाकांक्षी तरुणाच्या जीवनयशाचें आद्यबीज असतें. पुष्कळ मंडळी अशी आढळतात कीं ते एखादें काम करतील, पण निष्काळजीपणानें त्यांत एकच असा दोष ठेवतील कीं तेवढा त्या सर्व कामाची माती करायला पुरेसा होतो. कामें थातरमातर किंवा कशीं तरी ओरबाडून करण्याची खोड एकदां जडली कीं जडली. दारूड्याची दारू सुटेल, पण ती सुटत नाहीं. शिवाजीच्या एकाही मावळ्यांत ही खोड नव्हती. त्याला वाटेल तें काम सांगा. टेहळणीचें काम असो, वकिलातीचें काम असो, एखाद्या बहुरुप्याचें असो, कीं कड्यावरून उडी घेण्याचें असो. काम जरूरीचें आहे, तें **मला** सांगितलें आहे आणि तें मीं **केलेंच** पाहिजे, कारण **योगः कर्मसु कौशलम्.** एवढ्या जाणिवेनें शिवाजीचा प्रत्येक भक्त आपापलें नियुक्त काम इतक्या मनोभावानें आणि सफाईनें करीत असे कीं तें काम तडीस जाईल किंवा नाहीं याची शिवरायाला तिळमात्र काळजी उरत नसे. बाजीप्रभूनें शिवरायाला म्हटलें:—

**झडकरि आपण महाराज, या खिंडींतुनि जावें.**
**अपार शत्रूसेना ग्रासिल, क्षण न येथ रहावें.**
**मीं धरतों हें नाक दाबुनी पावनखिंडीचें.**

**तोंवर जावें खुशाल घेउनि सैन्य मावळ्यांचे.**
**ठेवा निवडक कांहि मावळे माझ्या पाठीशीं.**
**उभा राहतो असा इथें मी ठोकुनि छातीशीं.**

आणि शिवाजीनेंहि त्यास प्रत्युत्तर दिलें कीं,—

**ठोकिन तोफा पांच पोंचतां रांगण किल्याशीं.**

एवढ्या नुसत्या शब्दसंकेतावर पावनखिंडीचा इतिहास किती उज्वल रंगांत रंगून निघाला वरें ! यवनांना पुढें येऊं देणार नाहीं, ह्मणजे नाहीं; नेलों तरी नाहीं—नव्हे,

**शिवरायाची तोफ जोंवरी पडे न मम कानीं.**
**तोंवरी आला काळ तरी त्या ठेचिन लाथांनीं.**

केवढी ही कार्यकुशलता आणि कार्यनिष्ठेतून सहजसिद्ध निर्माण होणाऱ्या आत्मविश्वासाची तडफ ! पांच तास तुंबळ युद्ध झालें. चार पांचशें मावळ्यांतून अवघे पन्नास साठ उरले. स्वतःच्या शरीरावर मर्मस्थानीं बारा प्राणघातक जखमा लागून देह रक्तांत न्हाऊन निघाला. ‘ इतक्या वेळांत शिवाजी राजे रांगण्याला पोंहचले असतील, नाहीं का येईना तोफ ऐकूं, चला जाऊं खिंड मोकळी करून. आतां लढायचें तरी किती ?’ असें एकाच्याही मनांत आलें नाहीं. कारण ते सर्व **योगः कर्मसु कौशलम्** मंत्राचे शागीर्द होते. ते शिवाजीचे भक्त होते. या भक्तांची कार्यकुशलता इतकी विलक्षण असे कीं पुरंदर लढवितांना मुरार बाजीचें—

**शीर उडालें तरी धड लढत होतें.**

तीच अवस्था बाजी प्रभूची आणि त्याच्या इमानी मावळ्यांची. शिववा राजांची पांच तोफांची सलामी ऐकूं आल्याशिवाय पाऊल मागें घ्यायचें ? छेः ! मरण आलें तरी जे मरणारे नव्हत, ते काय जखमांची पर्वा ठेवणार ? अखेर तोफांचा दणदणाट उडाला आणि कार्यकुशल बाजी धारातीर्थी शांत झाला. बाजीप्रभूचें प्रेत शिवचरणाजवळ नेतांच—

**बळी दिला तूं तुझ्या जिवाचा केवळ मजसाठीं**
**राष्ट्रोन्नतिची जणूं बसविली कोणशिला मोठी.**

या त्या राष्ट्रवीराच्या तोंडून निघालेल्या उद्गारांत **योगः कर्मसु कौशलम्** या बीजमंत्राचाच अखेर ध्वनि निघाला. निघणारच. आत्मोद्धार असो वा राष्ट्रोद्धार असो, त्याच्या प्राणप्रतिष्ठेचा पाया याच मंत्रावर उभारलेला असतो.

अमेरिकेंत गुलाम नीग्रो समाजाची उन्नति करणारे कर्मवीर **बूकर टी. वॉशिंग्टन** यांचें चरित्र पहा. अजून कोणी वाचलें नसल्यास मुद्दाम वाचा.

**योगः कर्मसु कौशलम्** मंत्रानेंच त्यांचा व त्यांच्या अफाट नीग्रो समाजाचा अवघ्या पाव शतकांत न भूतो न भविष्यति उद्धार झाला. बूकरला प्रथम एका शाळेंत खोली झाडण्याचें काम मिळालें. ' कुशलतेनें काम करण्यांतच खरा योग आहे व मीं आज हें झाडूचें काम असें उत्तम करून दाखवितों कीं माझ्या धनिणीनें माझी तारीफच केली पाहिजे.' असा बूकरनें निश्चय केला. ' काम झालें का ? ' प्रश्नाला ' होय ' असें उत्तर मिळतांच, त्या चाणाक्ष सेक्रेटरी बाईनें आपला पांढरा फेकै हातरुमाल किंचित ओला करून त्याचें एक टोंक दिवाणखान्यांतल्या मेजावर घांसून पाहिलें, तों रुमालाला कसलाही डाग पडला नाहीं. बुकरनें एखाद्या सांगकाम्याप्रमाणें दिवाणखान्याला नुसती झाडू मारून स्वस्थ न बसतां, तेथली यच्चयावत् चीजवस्त पुसून स्वच्छ साफसूफ केली होती. बुकरला तेथें नोकरी मिळाली व येथेंच त्याच्या लोकविश्रुत आत्मोद्धाराच्या इतिहासाचा पाया बसला. सारांश, **योगः कर्मसु कौशलम्** हाच पावनखिंडींत उमटलेला श्रीकृष्ण भगवंताचा दिव्य संदेश, दिवाळींतल्या मिष्टमिष्ट पक्वान्नांबरोबरच जर खबरच्या वाचकवृंदाच्या गळीं उतरून, त्याचा प्रत्यक्ष कृतींत परिपाक उमटेल, तर प्रस्तुत छोटेखानी लेखानें त्यांना ओवाळलेल्या आरतीची—

**भाऊबिजेची ओवाळणी**

या लेखणीला भरपूर मिळाली, असें ती मानील.

[ किर्लोस्कर खबर, दिवाळी अंक, ऑक्टोबर १९२२. ]

# फोनोग्राफचें व्याख्यान.

( एका गुप्तसंचारी खास बातमीदाराकडून. )

[ स्पष्टवक्त्या पाटलाची झोंपडी. ]

मु. निस्पृहनगर, ता. सणसणीत,
जि. टिकापूर,
ता. माहे सन ( स्मरत नाहीं. )

रात्रीची वेळ. ९।१० चा सुमार. गेल्या बुधवारचा दिवस. गांवांत नाटकाची सांथ आल्यामुळें लोकांच्या झुंडीच्या झुंडी थियेटराकडे घाईघाईनें चालल्या होत्या. पुरुषांच्या घोळक्यांतच बायकाही आपापलीं मुलें कशींबशीं सांवरीत, 'चला बाई, पाय उचला. जागा मिळणार नाहीं. ठमाबाईचे न् माझें आटोपलेंच

होतें काम, पण चिमावाईचें सदान् कदा असेंच रेंगाळणें' वगैरे कुरबुर करीत धडपडत चालल्या होत्या. कित्येक फ्रीपासवाले 'नाट्यकलेचे खरे रसिक आम्ही' अशा घमेंडींत खिशांतील पास हातांत घट्ट धरून झुकत झुकत चालले होते. कित्येकजण 'वाः ! त्याची माझी केवढी ओळख ! ओसाडपूरला तो न् मी ६ वर्षें एकत्र होतों. आतां तो मनेजर झाला. बोलावलेय त्यांनींच. दरवाजावर या ह्मणजे सोडीन म्हणाला' इत्यादि चलबिचल विकारांत धांवत होते. कित्येक आचारीपाणके कंपूचे मेंबर रात्रीं झकपक ड्रेस करून पिटचें ८४ चें टिकीट काढण्यासाठीं फक्त १ पैसा कमी आहे ह्मणून आपल्या सवर्गीय स्नेह्यांची मनधरणी करीत डोक्यांवरील राजापुरी फेंटा सांवरीत चालले होते.

आमची स्वारीहि त्यावेळीं कुठें कांहीं तरी नवीन बातमी मिळेल या आशेनें कर्णरंध्रटेलिफोन साफसूफ करून नेत्रदुर्बिणींच्या कांचा स्वच्छ पुसून कॉफीचा एक गरम कप् झोंकून नुकतीच बाहेर पडली होती. नाटकाला जावें, भजनाला बसावें कीं टँवटँव तारेवर चालणाऱ्या लावण्या ऐकायाला जावें, असा विचार करीत करीत सभ्यकुटाळक्लबाच्या इमारतीशीं आलों. तों बातमी समजली कीं स्पष्टवक्ते पाटलाला आज पुत्र झाल्यामुळें त्यानें आज एक आनंदप्रदर्शक सभा भरविण्याचें धाडस केलें आहे; इतकेंच नव्हे तर दांतखिळीच्या कायद्याला सपशेल धाब्यावर बसविण्यासाठीं त्या सभेंत कोणा मनुष्याचें व्याख्यान न होतां एका फोनोग्राफचें व्याख्यान होणार आहे. ही विचित्र बातमी ऐकतांच आमची स्वारी टेलिफोनच्या नळ्यांचें विंडल सांवरीत सांवरीत थेट पाटलाच्या झोंपडींतल्या गाईच्या गोठ्यांत कडब्याच्या राशीवर विराजमान झाली. तेथें अनेक विभूती गोळा झाल्या होत्या. त्यांचीं नावें मी टिपून घेणार तोंच अध्यक्षस्थानीं विराजमान झालेल्या श्रीमती मेणवत्तीबाईच्या बाजूला उभें राहून फोनोग्राफनें आपलें भाषण सुरू केलें. वक्ते ह्मणाले:—

अध्यक्षादिक सभ्यगृहस्थहो ! भगिनीहो ! अहो, प्रेक्षकजनहो ! आपण सर्व माझें भाषण ऐकण्याकरितां मोठ्या उत्सुकतेनें या ठिकाणीं आलांत याबद्दल मी आपले फार फार आभार मानतों. वास्तविक पहातां, व्याख्यानें किंवा वक्तृत्वकला आजपर्यंत मानवी प्राण्यांचो जन्मदत्त वतनी जहागीर होती. परंतु दांतखिळीचा नवीन उपयुक्त कायदा अंमलांत आल्यामुळें मानवी प्राण्यांच्या जिव्हेला कांहीं काळपर्यंत पूर्ण विश्रांती मिळालेली पाहून जसा त्यांना आनंद होत असेल, त्याचप्रमाणें मनुष्यांचीं सर्व कामें करण्याची संधी आम्हां यंत्रा-

दिकांना मिळाली याबद्दल मी त्या परमेश्वराचें अभिनंदन करतों. मी कोण आहे? हें आपल्याला सांगायला पाहिजेच असें नाहीं. कारण अध्यक्षबाई सुप्रसिद्ध श्रीमती मेणबत्तीबाई यांनीं आपल्या स्वयंभू तेजानें तें आधींच सांगितलें आहे.

माझा जन्म १९ व्या शतकांत झाला. प्रो० एडीसन यांच्या हस्तें माझें बालसंगोपन फारच उत्तम प्रकारें होऊन, मोठा होतांच मी त्यांचा निरोप घेऊन पृथ्वीवरील अनेक देश पहात फिरतां फिरतां या पाटलांच्या झोंपडींत आज आलों. जगांतील सर्व प्रकारच्या भाषा मला जरी मोठ्या सफाईनें बोलतां येतात तरी पण मी मनुष्य नव्हें. ( शिंगाडा दाखवून ) हा पहा माझा लांबलचक घसा नि हें माझें विशाळ तोंड! पहा, मला दांत नाहींत. श्रोते हो, तुम्हांला दांत आहेत. परंतु ईश्वरनिर्मित वनस्पतिजन्य, खनिज किंवा प्राणिज पदार्थांपैकीं कोणी तुमच्या दांताच्या तडाक्यांत सांपडला तर त्यांस तुम्ही चिरडून फस्त करायला बिलकूल सोडीत नाहींत. बंधुभगिनींनो मला तसले घातकी दांत बिलकूल नाहींत. परंतु तुम्हांला जसे तोंडाच्या आंत कांहीं अदृश्य व गुप्त दांत आहेत तसे मलाहि कांहीं गुप्त दांत आहेत. त्या दातांचा उपयोग तुम्ही आपल्या शत्रूंचीं व शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं हाडें कडकडा फोडण्याकरितां करतां, तसा मात्र मी करीत नसून माझ्या पोटांतील दातांचा एका सत्कार्यीं उपयोग करण्यांत येतो. माझें भाषण जसें पाहिजे तसें स्पष्ट उमटत नाहीं, कारण माझ्या तोंडांत दांत नाहींत. परंतु दंताडवाडी ओस पडलेल्या बोळक्या थेरड्याप्रमाणें मी बोबडे बोलणारा नाहीं.

या माझ्या लांबलचक घशाच्या बुडाशीं मला एक लहानशी जिभली आहे. तुमच्याप्रमाणें मला लांब जीभ नाहीं. तुमची जीभ मात्र खरी पराक्रमी बुवा! तुमच्यांत जे राजे आहेत किंवा सर्वसमर्थ म्हणून जे गणले जातात त्यांच्याच जिभेची कां गोष्ट घ्याना? ती एकाद्याला क्षणांत राव करील तर क्षणांत रंक करून एका शब्दोच्चारानें वाटेल त्याला फांसावर चढवील. मी स्पष्टच बोलतों, राग धरूं नका कीं तुमच्या या लांबलांब जिभा प्राचीन वसलेल्या अफाट वैभवी शहराला एका मिनिटांतच जाळूनपोळून खाक करण्यास समर्थ आहेत. तशी माझी जीभ नाहीं. इतकेंच नव्हे तर घरचें खाऊन दुसऱ्यांच्या टवाळक्या करीत दारोदार लांब लांब गप्पा झोडीत फिरणाऱ्या तुमच्या मानवी छिनाल जिभेप्रमाणें माझी जीभ नाहीं. [ सुशिक्षित 'शेम शेम' ओरडतात, अशिक्षित 'शेग शेग' ओरडतात आणि बाकीचे 'पुंडलीक वरदा' गर्जना करतात. ]

मला कान मुळींच नाहींत. तेव्हां निंदास्तुतीमुळें उत्पन्न होणारा राग किंवा लोभ यांचें मला वारेंहि नाहीं. माझ्या तोंडांत जें कांहीं पडेल तें उमटविणें

इतकेंच माझें कर्तव्य आहे. त्याअर्थी दुसऱ्याच्या सुखदुःखानें आपलें मस्तक उगीच न तापविणाऱ्या सूज्ञ पंडिताप्रमाणेंच मी सुखी व संतुष्ट असतो.

जंटलमेन् ॲन्ड् लेडीज् ! मी तुमचा फार वेळ घेत नाहीं. परंतु ज्याअर्थी ज्ञान द्वारें वक्तृत्वकलेच्या प्रसृत करण्याचें काम मानवी प्राण्यांपासून मानवी सत्ताधाऱ्यांनीं हिसकावून घेऊन आम्हा यंत्रवर्गाकडे सोंपविलें आहे, त्याअर्थी तें काम बजावणें माझें कर्तव्य आहे. असो. मी आतां मूळ विषयाकडे वळतों. मला तुमच्या अंतःकरणाप्रमाणें कठोर अंतःकरण नाहीं. कारण "तुम्ही आपलीं अंतः-करणें कठीण बनवूं नका" या ईश्वरोपदेशाच्या अनुमानानें मी आपल्या हृदयाची मृदुता ठेवली आहे. माझें हृदय फार नाजुक असून तें वितळणाऱ्या मेणाइतकें मृदु आहे. त्यावर घडविलेला गोष्टींचा ठसा फार त्वरित व स्पष्ट उमटतो. मानवी प्राण्यांच्या हृदयाची कठोरता दिवसेंदिवस चढत्या कळेवर असलेली पाहून मला फार खेद होतो. [ एक श्रोता 'अरेरे' म्हणून बेशुद्ध पडतो. ]

तुम्हाला आवडेल ती भाषा मी वाटेल त्या वेळीं बोलूं शकेन. मी गाणेंहि गातों. तुमच्या हजारों जिभांपासून निघालेले असंख्य ध्वनी मी एका जिभेनें स्पष्ट उमटवीन. माझी लहर लागेल तेव्हां मी विनोदी बनतों, वाटेल तेव्हां हांसतों किंवा आतां झोडतों आहें तशीं लेक्चरेंहि झोडतों. ( टाळ्या व हंशा.)

आवाज उमटविण्याचें मी यंत्र आहें, म्हणूनच माझ्या बापानें माझें नांव 'फोनोग्राफ' असें ठेविलें आहे. श्रोतेहो ! तुम्ही देखील सर्व यंत्रेंच आहांत. ईश्व-राचे शब्द तुमच्या अंतःकरण प्लेटींवर उमटविण्याकरितांच धार्मिक ग्रंथांतून ग्रथित करून ठेविले आहेत. त्यांचा ठसा नीट उमटून दाखवा. माझें काम मनपसंद करून दाखविण्यासाठीं मी स्वतःला माझ्या धन्याच्या ताब्यांत, त्यानें मला नित्य स्वच्छ व पवित्र ठेवावें म्हणून जसें पूर्णपणें वाहून घेतलें आहे, त्याचप्रमाणें तुम्हीं जर आपल्या स्वतःला स्वर्गीय परमेशधन्याला वाहून घेतलेंत तर स्वर्ग-प्राप्ती कांहीं दूर नाहीं. हेंच सत्य तत्त्व होय.

यानंतर टाळ्यांचा कडकडाट उडाल्यामुळें पुढचें भाषण मला ऐकूं आलें नाहीं. पण पुढें पहातों तों वक्तेच खालीं बसले. आतां पुढील प्रकार लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण टाळ्यांच्या कडकडाटाबरोबरच आमच्या कडब्यांच्या गंजींत उंदरांचा धडपडाट उडाला. त्यासरसें आम्ही तेथून गृहाप्रत गमन करते झालों. इत्यलम् !

त्रिताल कालंगडा.

[ कोल्हापूर, प्रगति, १९०९. ]

# ऋग्वेद काळचे हिन्दु.

हिंदी आर्यांच्या प्राचीन इतिहासाचा शोध करण्याच्या कामीं आजपर्यंत अनेक पौर्वात्य व पाश्चात्य विद्वान संशोधकांचे एकनिष्ठ प्रयत्न खर्ची पडलेले आहेत. या इतिहासाची कालभूमिका मानवी स्मृतीच्या कक्षेच्या पलीकडे आणि कल्पनाशक्तीच्याहि क्षितिजापलीकडे असल्यामुळें, तिचें निर्णयात्मक स्वरूप निश्चित करण्याचें काम जरी गणिताच्या दृष्टीनें यथातथ्य ठरवितां येणें कठीण असलें, तरी तत्कालीन आमच्या त्या पूज्य पूर्वजांच्या मनोवृत्तीचें बिंब ज्या ऋग्वेद नामक ग्रंथामध्यें चित्रित झालें आहे, त्यावरून त्यांची सामाजिक राजकीय व धार्मिक चारित्र्याची ओळख आम्हांस बिनचूक होते. या ऋग्वेदकालीन इतिहासाची कालगणना अजमासें क्रि. श. पूर्वी २००० ते १४०० अशी ठरविण्यांत आलेली आहे. अर्थात् ज्या विद्वान, धाडसी व द्रष्ट्या हिंदी आर्यांनीं ऋग्वेदासारखा अत्राढव्य ग्रंथ निर्माण केला; भाषालंकार, काव्यकौशल्य, स्फूर्तीची अत्युच्च भरारी, हृदयाच्या तळमळीचें आणि प्रसन्नतेचें प्रासादिक काव्यमय वाणींत होणारें अस्खलित पर्यवसान इत्यादि अनेक रंगांनीं भरपूर रंगलेला ऋग्वेद रचला; आणि जगांतील कोणत्याहि काळच्या कोणत्याहि वाङ्मयावर आपली विद्वत्तेची छाप कायमची ठेवून दिली, त्यांच्या त्या परिणतावस्थेचा काळ याच्याहि पूर्वी अनेक शतकें नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें कोणालाहि कबूल करणें प्राप्त आहे. उदाहरणार्थ, इंग्रजांची आणि आमची पहिली मुलाखत १५ व्या शतकाच्या सुरवातीस झाली आणि त्यांच्या अचाट युक्तिसामर्थ्याची पहिली सलामी त्याच वेळेस झडली; ह्मणजे इंग्रजांच्या इतिहासाची सुरवात १५ व्याच शतकांत झाली असें ह्मणणें केव्हांहि सयुक्तिक दिसणार नाहीं. ज्या अर्थी इंग्रज लोक मोठ्या धाडसानें सप्तसमुद्रांचें उल्लंघन करून निवळ हातांतल्या तागडीच्या जोरावर पूर्वेकडील प्रदेश काबीज करण्यासाठीं या आर्यभूमीच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले, त्या अर्थी देश काबीज करण्याची कला शिकण्यांत त्यांच्या तागड्यांनीं त्यापूर्वी कांहीं शतकें चांगलाच अभ्यास केलेला असला पाहिजे खास ! तागड्यांची ही परिणती चांगली प्रगल्भ झाल्यावरच त्यांनीं आपल्या तंगड्यांची हालचाल केली, हें उघड आहे. हिंदी आर्यांबद्दल आपल्याला हेंच अनुमान केल्याशिवाय ऋग्वेदांत स्पष्ट नमूद असलेल्या त्यांच्या विविध पराक्रमाचा उलगडा आपणांस होणार नाहीं.

ऋग्वेद हा आमच्या आर्यपूर्वजांचा ज्ञानकोश आहे. त्यांचा तो विस्तृत इतिहास आहे. त्यांच्या शारिरीक, मानसिक, व बौद्धिक अचाट पराक्रमाचा तो फोटोग्राफ आहे. आमच्या हिंदुधर्माचा उगम याच ऋग्वेद–हिमालयांत झाला. सनातन हिंदुधर्माचें माहेर घर ऋग्वेद आहे. ह्या आमच्या आर्यपितरांचें मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या बर्फमय प्रदेशांतलें असो किंवा कॉकेशस पर्वताजवळच्या गोबीच्या अरण्यांतलें असो, ऋग्वेदाच्या काळीं ते पंजाबचे जेते होते; सिंधुनद आणि तिच्या पंचनद्यांच्या शाखांतल्या प्रदेशाचे मालक व वसाहतवाले होते, ही गोष्ट उपलब्ध इतिहासानें हुडसून खडसून सिद्ध केली आहे. आमच्या धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय इतिहासाची सुरुवात अर्थात् आम्हीं येथपासूनच गणली आहे. ऋग्वेदाची रचना करणारे हिंदी आर्य लढाऊ होते. त्यांच्यांत एका प्रकारची नवजीवन शक्ति अपरंपार रसरसत होती आणि तिच्याच जोरावर ते उपलब्ध पृथ्वी पादाक्रांत करण्याच्या महत्त्वाकांक्षेनें उसळत उसळत पंजाबापर्यंत येऊन ठेपलें होते. स्वतःचें श्रेष्ठत्व, विशेष अधिकाराची लालसा, ते अधिकार जतन करून आणखी वृद्धिंगत करण्याची महत्त्वाकांक्षा, उद्योगप्रियतेची दांडगी आवड, उत्तमोत्तम सुखोपभोग भोगणारे हरीचे लाल साऱ्या जगांत एकटे काय ते आम्हीं आणि आम्हींच काय ते सत्ताधारी व इतर सारे आमचे दास इत्यादि ज्या उत्कट मनोभावना जेते लोकांच्या ठिकाणीं स्वाभाविक व अनिवार्यच असतात, त्या त्या सर्वांचा या हिंदी आर्यांत पूर्ण मिलाफ झालेला आढळून येतो. ऋग्वेदांतील ऋचांत त्यांच्या चारित्र्याचा जो विश्वसनीय व मुद्देसूद फोटोग्राफ उमटला आहे, त्यावरून त्यांचा दणधाकट जोम, त्यांची शास्त्रीय बाण्याची तडफ, त्यांचा स्वाभिमानाचा कणखरपणा आणि लाथ मारूं तेथें पाणी काढूं असली आत्मविश्वासाच्या अत्युच्च भरारीची ईर्षा जितकी दृग्गोचार होते, तितकाच त्यांचा मनाचा मोकळेपणा, वृत्तीचा उदारपणा, हृदयाचा प्रेमळपणा आणि रहाणीचा साधेपणाहि तितक्याच ठळकपणानें नजरेस पडतो. ऋग्वेद काळानंतरच्या आर्यांत जी एक प्रकारची संन्यासी एकलकोंडी आणि सहनशील प्रवृत्ति आपल्याला दिसून येते, तिचा या हिंदी आर्यांत किंचितहि मागमूस लागत नाहीं. उलट पक्षीं धन्यधान्य, शेतीवाडी, घरदार गुरें इत्यादि सांसारिक वैभवप्राप्तीच्या बाबतींत ते अत्यंत महत्त्वाकांक्षी असत आणि येथल्या मूळ रहिवाश्यांना युद्धांत हतवीर्य करून त्यांच्या वसतिप्रदेशांवर झेंडे फडकविण्याच्या बाबतींत त्यांनीं श्रमाची किंवा प्राणाची तमा बाळगली नाहीं.

मूळच्या रहिवाश्यांना भयंकर युद्धांत जिंकून त्यांना आपले दास करतांना आणि नवीन नवीन प्रदेश काबीज करून आपल्या वसाहतीचें क्षेत्र वृद्धिंगत करतांना हिंदी आर्यांची जेवढी करडी तडफ होती, तेवढीच निसर्गदेवतेचें निरीक्षण व अर्चन करण्यांतली त्यांच्या हृदयाची मृदुलताहि विलक्षण होती.

ऋग्वेदांत हिंदी आर्यांचें निसर्गावलोकन व निसर्गपूजनप्रेम जितकें अत्युत्कट दिसून येतें, तितकेंच त्यानंतरच्या काळांतील कोणत्याहि देशांतील महाकवींच्या काव्यांत आढळून येत नाहीं. निसर्गांतला उज्वल, हृदयस्पर्शी, चित्तोन्मादक असा कोणताहि देखावा त्यांच्या दृष्टीस पडतांच त्यांच्या स्वाभाविक काव्यस्फूर्तीला अचानक भरती येऊन त्यांच्या काव्यमय मनोवृत्तीचे तुषार आपोआप उमाळयासरसे उसळून प्रेमळ ऋचांच्या रूपानें बाहेर कसकसे पडत, हें प्रत्यक्ष पहाणें जरी आपल्या शक्यतेच्या क्षेत्रांत नाहीं, तरी ऋग्वेदाच्या पारायणांवरून त्या प्रासादिक उमाळयांशीं आपणाला क्षणभर तरी तादात्म्याचा परमानंद अनुभवतां येणें शक्य आहे. निसर्गाच्या असल्याच उज्वल प्रदर्शनावर त्यांची एवढी भक्ति जडलेली होती, कीं याच प्रदर्शनाची, याच देखाव्यांची आणि याच निसर्गदेवतांची प्रार्थना करण्यांत त्यांना स्वानंदसाम्राज्याचें सर्वस्व प्राप्त होत असे.

ऋग्वेदकाळानंतरच्या हिंदुलोकांनीं जरी तेहतीस कोटी देवदेवतांचीं खेंकटीं आपल्या कल्पनापूर्ण मेंदूंतून निर्माण करून हिंदुधर्मियांच्या बोकांडीं बसविलीं, तरी हिंदुधर्मनदाचा उगम सिंधुनदाच्या उगमाप्रमाणेंच शुद्ध, सोप्या आणि ओजस्वी अशा एका निसर्गपूजनातूंनच निर्माण झालेला आहे, ही गोष्ट वाचकांनीं मुद्दाम ध्यानांत ठेवावी. ऋग्वेदकाळचे हिंदी आर्य निसर्गाचे पूजक होते. निसर्ग हाच त्यांचा देव. त्याच देवाची त्यांनीं मनोभावानें प्रार्थना केली. सर्व सृष्टी हाच त्यांचा पारमेश्वरी अनादि धर्मग्रंथ आणि सृष्टीचें कौतुकपूर्ण अवलोकन व सृष्टिलीलेच्या निरनिराळया नाचरंगांचें प्रासादिक उमाळयानें काव्यपूर्ण वाणींत वर्णन करणें हींच त्यांचीं पारायणें. त्यांना "यापरता धर्म ठावुका नान्य" अशी वास्तवीक स्थिति होती. अनेक देवदेवतांच्या, भूतांखेतांच्या, भटाभिक्षुकांच्या, धाकट्या मोठ्या बायांच्या किंवा शनो मंगळाच्या पूजांनीं लिडबिडलेल्या सांप्रतच्या हिंदुधर्माचा उगम इतक्या शुद्धतम स्वरूपांत झालेला आहे. सृष्टि किंवा निसर्ग हाच 'एक देव' आहे, त्याची एकल्याचीच प्रार्थना करणें हा आम्हां मानवांचा उचित धर्म आहे, त्याच्याच कृपाप्रसादानें आम्हां हिंदी आर्य वीरांना सारी दुनिया पादाक्रांत करून तिचें स्वामित्व पटकावयाचें आहे, ही

एकच भावना त्यांच्या मनांत वागत होती. मानवी चित्ताला आश्चर्यचकित करून सोडणारे निसर्गाचे अद्भुत देखावे हेच प्रथम त्यांच्या चित्ताची प्रवृत्ति त्या अगम्य विश्वविधात्याची जाणीव ओळखण्याकडे खेंचतात आणि सृष्ट्य-वलोकनांत व निसर्गरहस्याच्या गायनांतच चित्तवृत्ति रंगली म्हणजे आपो-आप त्या निसर्गकर्त्याच्या कर्तबगारीची ओळख मानवी मनोवृत्तीला हळू हळू पटूं लागते. या नियमाप्रमाणें हिंदीआर्यांचा वाङ्मयेतिहास जरी पाहिला तरी त्यांत सुद्धां ते याच पायरीपायरीनें ईश्वराच्या एकमेकाद्वितीयम्च्या सिद्धांतापर्यंत बिनचूक कसे आले, हें नीट कळून येईल.

पंजाबांत उतरलेल्या हिंदीआर्यांची मुख्य चळवळ म्हटली म्हणजे एका मागून एक प्रदेश जिंकून आपल्या कायमच्या वसाहतीकरतां काबीज करून घेण्याची होती. हें काम दिसतें तितकें सोपें नव्हतें. येथील मूळचे रहिवाशी—ज्यांना 'काळे' अबॉरिजिनीज असें नांव अलिकडच्या इतिहासकारांनीं दिलेलें आहे व ज्यांना ऋग्वेदांत आर्यांनीं 'दस्यू' अशी संज्ञा दिलेली आहे ते—कांहीं लेचे पेचे नव्हते. त्यांची आर्यांइतकी शस्त्रास्त्रांची सुधारणा झालेली नव्हती, तथापि युद्धाच्या बाबतींत त्यांनीं आर्यांशीं मोठे छातीठोक सामने दिले, यांत कांहीं संशय नाहीं. शारिरीक आणि बौद्धिक बाबतींत वरचढ असलेल्या गोऱ्या आर्यांच्या पुढें हे काळे दस्यू जरी क्रमशः हतवीर्य होत गेले, तरी सुद्धां जमिनीच्या इंच इंच तुकड्याकरितां त्यांनीं आर्यवीरांचें खंडोगणती बळी घेतल्याशिवाय माघार खाल्ली नाहीं. या दस्यूंना हांकून देऊन त्यांच्या जन्मभूमीचें स्वामीत्व पटकाविण्यासाठीं आर्यांना एक दोन नव्हे तर सतत सहाशें वर्षें झगडावें लागलें.

यावरून इतकें निर्विवाद सिद्ध होतें कीं, हिंदी आर्य—यांचे इतर गुण कांहीहि असले तरी—मोठे कसलेले आणि पट्टीचें लढाऊ लोक होते.' बरें, इतकेंहि असून त्यांची ऋग्वेदांतली तात्विक काव्यपूर्ण ऋचारचनाशक्ति गिरीगुहरांतल्या एकांत खबदडांत बसून सतत चिंतनमग्न राहणाऱ्या एखाद्या तत्ववेत्यालाहि कुंठित करण्यासारखी होती. वेदपठण—वेदरचना नव्हे!—नुसतें वेदपठण हें ब्राह्मणांचें आद्यकर्तव्य असल्यामुळें राजानें त्यांना कांहींहि इतर काम सांगू नये; उलट त्यांच्या वेदपठणास व्यत्यय येऊं नये म्हणून राजानें व सर्व प्रजाजनांनीं या पोपटांच्या पोटपाण्याची यथास्थित व्यवस्था लावून ठेवण्याचा आग्रह धरणाऱ्या मनु याज्ञवल्क्यासारख्या अर्वाचीन स्मृति-कारांच्या लक्षांत हा मुद्दा कसा आला नाहीं कोण जाणे कीं पोपटभट नुसतें

पाठांतर करतात त्याच वेदांची ज्या आर्यांनीं प्रत्यक्ष रचना, पाठीमागें संसाराचा व्याप व तोंडापुढें लढाईचा अखंड ताप असतांना केली, ज्यांना ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या तोंडांतून किंवा त्याच्या कमलासनाच्या पांकळ्यांतून आपोआप गळतात कीं स्वयंभू निर्माण होतात, असल्या अचकट विचकट कादंबऱ्यांची कल्पनाहि नव्हती आणि युद्ध करतो तेव्हां क्षत्रियत्वाचें लेबल टाळक्यावर लावून करतो व ऋचा रचतो तेव्हां ब्राह्मण्याचा पट्टा कपाळावर फरफटवतो याची दखल नव्हती, त्या वेदप्रणीत्या हिंदी आर्यांपेक्षां हे पोपटपंची पाठांतरे भट कितीतरी बुद्धीहीन. त्यांच्या पोटापाण्याबद्दल आपण राजाला आणि प्रजेला एवढे बजावून सांगण्यांत काय शतकृत्य करीत आहोंत ? पण हे स्मृतिकारच मुळीं पडले ब्राम्हणी स्तोमाच्या अंमदानींतले, त्यांना एवढा सारासार विचार किंवा न्यायाची समता कोठून असणार ?

ऋग्वेदकालांत वर्णभेद किंवा जातिभेद होता काय ? असल्यास त्याचीं कारणें काय ? या प्रश्नांचा थोडा खुलासा केला पाहिजे. हिंदी आर्यांनीं एतद्देशीय काळ्या दस्यूंना हद्दपार करून हिंदुस्थानचा उत्तर प्रदेश सतत ६०० वर्षें युद्ध करून काबीज केला आणि पुढें थोड्याच शतकांनीं आपल्या आर्यसंस्कृतीचा प्रकाश साऱ्या हिंदी द्वीपकल्पावर पाडला. ज्यांनीं ऋग्वेदासारखा अत्यंत संस्कृतीपूर्ण ग्रंथ निर्माण केला, त्यांच्या बौद्धिक परिणतेची आपण कल्पनाच केलेली बरी. आर्यांची सुधारणा ही साऱ्या जगांतील प्राचीन अर्वाचीन सुधारणांचा पाया होय. अर्थात् समाज सुसंघटित व सुव्यवस्थित चालण्याकरितां चार प्रकारचे व्यवसाय प्राविण्यानें करणारे लोक समाजांत अवश्य पाहिजेत, या गोष्टीची त्यांना जाणीव झाली असली पाहिजे खास. त्यांना नवीन नवीन प्रदेश जिंकावयाचे होते, तेव्हां युद्धकलेचें प्राविण्य त्यांच्यांत निसर्गतःच होतें. परंतु नुसती युद्धकलेची प्रविणता बौद्धिक शक्तीवांचून व्यर्थ, म्हणून त्यांना बौद्धिक सामर्थ्यहि तितक्याच प्रमाणांत परिणत करावें लागलें. बरें, नुसती युद्धकला आणि बुद्धिमत्ता या दोनच भांडवलावर समाजाचा संसार चालणें शक्य नव्हतें. शेतीवाडी करून गुरांढोरांच्या सहाय्यानें जमिनींतून पीक काढणाऱ्या आणि व्यापार करून सांपत्तिक श्रेष्ठता वाढविणाऱ्या व्यापारी कुशलतेचीहि जाणीव त्यांना होतीच. आणि सरतेशेवटीं युद्धशक्ति, बौद्धिकशक्ति आणि व्यापारशक्ति यांत गुंतलेल्या लोकांना शारिरीक बलानें मदत करणाऱ्या लोकांचीहि समाजाच्या हितासाठीं आवश्यकता होतीच. अर्थात् त्यांच्या समा-

जांत युद्धकलाभिज्ञ ( militarist ) ज्ञानी, ( intellectuals ), व्यापारी ( merchants ) आणि मजूर ( labourers) असे चारी प्रकारचे व्यवसाय 'एकसमयावच्छेदें' करणारे लोक होते. परंतु हे चार प्रकारचे व्यवसाय चार निरनिराळ्या जातीचे लोक करीत होते असें मात्र मुळींच नाहीं. ऋग्वेदकाळीं जाती मुळींच नव्हत्या. हिंदी आर्यांच्या समाजांत कसल्याहि प्रकारचा भेद किंवा भिन्नता मुळीच नव्हती. मात्र समाजाच्या संसाराला अत्यावश्यक असे जे वर सांगितलेले चार प्रकारचे व्यवसाय त्यांत ज्यांची ज्यांची प्रगति असे ते ते लोक एकेक दोनदोन तीनतीन प्रकारचे व्यवसाय सामुदायिक हिताच्या दृष्टीनें बजाविण्यास वाटेल तेव्हां पुढें होत असत. युद्धाचें शिंग फुंकलेलें ऐकूं येतांच जो हिंदी आर्य आपला भाला बर्ची किंवा तरवार तीरकमटा हातीं घेऊन समरभूमीवर मोठ्या आवेशानें धाऊन जात असे, तोच हिंदी आर्य लढाईचा मामला आटोपतांच आपल्या घरच्या मुलांबाळांची गुरांढोरांची शेतवाडीची स्वतःच व्यवस्था पहात असे. संपत्ति वृद्धिंगत करण्यासाठीं व्यापाराचा ताजवाहि हातीं घेत असे. आणि या सांसारिक दलामलीपासून किंचित् शांतता मिळतांच निसर्गदेवतेच्या अद्भुतरम्य देखाव्यानें तल्लीन होऊन तिच्या स्तुतिपर ऋचांची रचना करण्यांतहि स्वतःच रममाण होत असे. ऋग्वेदकाळीं देवांच्या मूर्ति नव्हत्या तेव्हां देवळें तरी कोठून असणार ? मूर्ती नव्हत्या, देवळें नव्हतीं आणि भटहि नव्हते. प्रत्येक हिंदी आर्य कुटुंबांतला यजमान हा आपल्या कौटुंबिक स्वराज्याचा नेता होता. तो नित्य नियमानें आपल्या घरीं होमाग्नि प्रज्वलित करीत असे. सोमरसाची त्यांत आहुती देऊन आपल्या कुटुंबाची, आरोग्याची, शेतीवाडीची, गुरांढोरांची संपत्तीची भरभराट व्हावी, या हेतूनें तो निसर्गदेवतेची प्रार्थना करीत असे. त्या वेळीं एकादशन्या सांगणारे किंवा पिंड देऊन स्वर्गाला बिनचूक रवानगी करण्याचा व्यापार करणारे पोपटपंची भट अस्तित्वांत नव्हते. भट आणि भट्ट हे दोन्हीहि व्यवसाय एकच हिंदी आर्य स्वतः करीत असे. हिंदी आर्य योद्धे हेच त्या काळीं आर्यवसाहतवाल्यांचे पुढारी होते, आणि युद्धाप्रमाणेंच धार्मिक बाबतींत सुद्धां समाजाचे अग्रणी तेच होते. क्षत्रिय, ब्राम्हण, वैश्य किंवा शूद्र हीं नावें सुद्धां त्या काळीं सांप्रतच्या अर्थानें रूढ नव्हतीं किंवा अशा प्रकारचे चार भेद अथवा संघ आपल्या समाजांत निर्माण करावे ही कुकल्पनाहि ऋग्वेदकालीन आर्यांना शिवली नाहीं.

**स्वयंसेवक मासिक, फोंडा गोंवा.** डिसेंबर १९२१.

# आई.

जग हें जितकें चमत्कारिक आहे, तितकेंच तें चमत्कारपूर्ण आहे. विधात्यानें



निर्माण केलेलें विश्व हाच मुळीं कल्पनातीत असा एक चमत्कार आहे आणि विश्वविधात्याच्या कर-णीवर ताण करून दाखविण्यासाठीं मनुष्यांनीं सुद्धां या नानारत्ना वसुंधरेला 'अहं ब्रह्मास्मि' या प्रत्यक्ष जाणिवेनें नाना आश्चर्याणि वसुंधरा बनविण्याची शिकस्त चालविली आहे. कल्पनेच्या समुद्र मंथनांतून निर्माण केलेलीं अनंत चमत्कारिक रत्नें माणसांनीं वसुं-धरेच्या या अजब अजायबखान्यांत व्यवस्थित मांडून ठेविलीं आहेत. तीं पाहिलीं कीं आपलें हृदय कौतुकानें भरून येतें. मनोवृत्ति विस्मयानें चकित होते आणि स्तुतीचा निदान एक तरी गोड उद्गार निघावा म्हणून जिव्हा योग्य शब्दयोजनेसाठीं वळवळते, पण 'वाहवा' एवढ्या उद्गारावरच वाक्शक्तीची मजल खुंटल्यामुळें अखेर हळहळते. आग्र्याचा ताज-महाल, मिसर देशांतले पिरामिड, स्वच्छंद वातावरणाला हुकमी संदेशवाहक बनवि-णारा मार्कोनिग्राम किंवा बिनतारी टेलीफोन, दूरस्थ किंवा कालवश झालेल्या माण-सांचीं भाषणें व आल्हादकारक गाणीं वाटेल तेव्हां वाटेल तेथें प्रगट करणारा फोनो-ग्राफ, इत्यादि अनेक मनुष्यनिर्मित चमत्कारांची शाब्दिक संभावना करितांना, हृद-यांत उचंबळणाऱ्या कुतूहल–लहरींचा थैथयाट व्यक्त करतांना, माणसाची वाक्शक्ति 'वाहवा' या एकाच शब्दोच्चाराच्या उंबरठ्यावर कुंठीत होते. निसर्गनिर्मित चम-त्कारांविषयींहि हाच प्रकार. उदाहरणार्थ आपण उषःकालचा चमत्कार कवीच्या काव्यमय चष्म्यांतून पहाण्याचा यत्न करूं. एका विशेष चैतन्याच्या अवर्णनीय सुगंधानें ज्याचे अणुरेणू परिमळयुक्त झाले आहेत, असा प्रभातीचा प्रबोधक वातावरणाचा जलधी मंदमंद वायूच्या रहाळ्या मारीत आहे. सृष्टिदेवता त्यांत

जलविहार करीत आहे. इतक्यांत 'भगवान् सविता आले कीं काय ?' हें पाहण्यासाठीं तिनें आपला दुसरा टवटवीत चेहरा जलपृष्ठावर काढतांच दंवकण तिच्या मस्तकावर मौक्तिकांचा सडा पाडीत आहेत. जलविहारामुळें भिजून चिंब झालेला सृष्टीचा केशकलाप पिळून स्वच्छ पुसण्यासाठीं किरमिजी अरुणाचें रेशमी फर्द उषादासीनें झटकन् पुढें करून, दाही दिशा उजळणाऱ्या तेजाचा सुगंधी विश्वंभर धूप सर्वत्र प्रसृत केला आहे. धूपाच्या घमघमाटांत मग्न असतांच, भगवान् सूर्यनारायण आपला एकच हात पुढें करून सृष्टीच्या निटिलावर सुवर्ण कुंकुमाचा रेखीव टिळा रेखीत आहे. बोलबोलतां साऱ्या विश्वाची नजर चुकवून देवीनें भरजरी सहस्ररश्मी पैठणी परिधान केली आहे. अंगावर दिसतो न दिसतो असा विरळ धुक्याचा शालू पांघरला आहे. अवघ्या तीन पावलांत साऱ्या त्रिभुवनाचा आक्रम करीन, या विजयाकांक्षेनें फुरफुरलेलें आपलें लालबुंद मुखबिंब भगवानजीनें क्षितिजपटलाच्या वर काढतांच, उत्फुल्ल सुमनदलांच्या द्वारें सृष्टी दिव्य स्मितहास्य करीत आहे. आंगावर पांघरलेला धुक्याचा शालू अलगज उडवून आलिंगनासाठीं सवित्यानें पसरलेले विश्वस्पर्शी विशाळ बाहू पाहून, चंडोलादि गायकगण 'आस्ते कदम'च्या ललकाऱ्या तारस्वरांत भिरकावीत आहेत आणि या अतिप्रसंगाचा बोभाटा साऱ्या विश्वांत दुमदुमल्यामुळें सृष्टिदेवता विनयाच्या सात्विक मुरडणीनें लाजली आहे. हा सर्व हृदयस्पर्शी चमत्कारिक देखावा पाहून मानवांच्या वाक्शक्तीनें मुग्धतेच्या आड लपून आपल्या अंतस्थ कुतूहलाचें व्यक्तीकरण पाणी भरल्या डोळ्यांनीं करण्यापलीकडे अधिक काय करावें बरें ?

मुळीं विश्वविधाताच जर गूढ व अकल्पनीय, तर त्याची विश्वरंगभूमीवर उधळलेली नाना आश्चर्याणि वसुंधरा तितकीच गूढ व अवर्णनीय कां असूं नये ? पण या वसुंधरेच्या चमत्कार-खाणीचाहि गर्व परिहार करणारा एक अद्वितीय चमत्कार आहे. चमत्कार वाटतो तो हाच कीं या चमत्काराचा व प्रत्येक भूतजाताचा अत्यंत निकटचा संबंध असूनसुद्धां त्या चमत्काराचा चमत्कार आम्हांला भासूं नये, हें किती चमत्कारीक ? खरोखर मानवी दुनिया बुद्धिमत्तेच्या चौकसपणाचा कितीहि डौल मिरवो, ती फारच चमत्कारिक खरी. साता समुद्रापलीकडचें दिसतें, पण हाताजवळचें भासतसुद्धां नाहीं. याचें कारण हेंच कीं अतिपरिचयामुळें या विश्वोत्तर चमत्कारांची अवज्ञा होणें हा मानवी सृष्टीच्या स्वभावधर्म-स्मृतींत गुन्हा मानलेला नाहीं. आग्र्याच्या लोकांना ताजमहालाच्या लोकोत्तरपणापेक्षां मुशाफरांपासून मिळणाऱ्या कवडी दमडी भिकेचे महत्त्व फार वाटतें.

पंढरपूरच्या बडव्यांना किंवा काशीच्या पंड्यांना विठोबाचें किंवा विरूपाक्षाचें महत्व लवमात्र वाटत नाहीं. त्यांची सारी महत्वाकांक्षा यात्रेकरूंच्या गांठोड्या-भोंवतीं आशाळभूत पिशाच्चाप्रमाणें वावरत असते. गंगानदीच्या पावित्र्याच्या महिम्यानें हृदयांत भाविक भावनेचे मळे पिकलेले लोक गांवोंगांवहून धांव घेत काशीला जातात, पण तेच काशीचे लोक त्याच गंगेचा उपयोग नियमीत प्रातर्विधीसाठीं करतात. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन होवो वा न होवो, पण भारत काळापासून इतिहासप्रसिद्ध असलेला स्यमंतक–कोहीनूर मणि काळानें डोळे मिट-ण्यापूर्वी निदान एकवार डोळे भरून पहावा, म्हणून आम्हां भारतवासियांची तृष्णा केवढी दांडगी ! पण आमच्या पंचम जॉर्ज बादशाहांना हातांतल्या वॉकिंग स्टिक इतकेंच त्याचें महत्व वाटत असावें; याचें कारण अतिपरिचय. या प्रचंड विश्व-विस्ताराला प्रकाशित करणाऱ्या तेजोनिधि भास्कराला सुद्धां 'घटकाभर हो बाजूला' असें सांगणारे अशोक प्रतापसिंह ज्ञानेश्वर तुकाराम शिवाजी काय थोडे-थोडके पुरुषोत्तम सूर्य आपल्यांत चमकून गेले ? पण आपलेपणाच्या अतिपरि-चयामुळें त्यांच्या महत्वाचे लोकोत्तर चमत्कार त्या वेळीं आपल्या विचारांना शिवलेहि नाहींत.

आई हा एक असा चमत्कार आहे कीं त्याच्या निकट परिचयामुळें त्यांतील गूढ प्रेमाच्या रहस्याचें महत्व आम्हांला वास्तविक समजलें तरी उमजत नाहीं, उमगलें तरी सांपडत नाहीं व भासलें तरी व्यक्त करतां येत नाहीं. आई हे दोन स्वर, हीं दोन अक्षरें, हा एक सुटसुटीत शब्द सोपा दिसतो खरा, पण या दोन अक्ष-रांच्या इवल्याशा जागेंत सारें विश्व सामावलेलें आहे. या शब्दांत एक विलक्षण जादू आहे. विश्वाच्या आदि अंताची माया या दोन अक्षरी शब्दांतच संकलित झाली आहे. आम्ही माणसें जसजशीं शहाणीं होत आहोंत तसतशी आमची व एका विशिष्ट गोष्टीची फारकत होत चालली आहे. ती गोष्ट म्हटली म्हणजे, एकवाक्यता. चार शहाणीं डोकीं एका ठिकाणीं जमलीं आणि त्यांचें एका गोष्टीविषयीं चटकन् एकजिनशीं एकमत झालें; ही बाबसुद्धां आतां अघटित चम-त्कारांत मोडूं पाहात आहे. परंतु आई ही अशी एक चमत्कारिक बाब आहे, कीं तिच्याविषयीं राष्ट्रभेद, देशभेद, संस्कृतिभेद, व्यक्तिभेद, वर्णभेद, इत्यादि सर्व भेदांचा समूळ छेद होऊन, आई या एकाच शब्दोच्चारानें सर्व मानवी दुनिया—नव्हे अवघें भूतजात—झटदिशीं प्रेमाच्या एकतान स्थितींत एकमतानें विलीन होतें. आईचें प्रेम जात्याच मुळीं अत्यंत मुग्ध असतें. तें सर्वांना भासत

असलें, तरी दिसत नाहीं. परमेश्वरानें स्त्रीजातीला बहाल केलेल्या अलौकिक स्निग्धतेच्या सत्वगुणाचा अर्क आईच्या प्रेमांत आत्म्याप्रमाणें रसरसत असतो. आईचें प्रेम आईलाच ठावें, इतरांना–विशेषतः पुरुषांना त्या प्रेमाची खरी कल्पना येणें शक्य नाहीं. त्या दिव्य प्रेमाचें किंचित् उतराई होण्यासाठीं बुद्धिमान् पुरुषांनीं आपल्या निवडक वाक्पुष्पांची आईसाठीं जरी शय्या तयार केली, किंवा मानवी विकारांचे इतर सर्व तिखट रस घटकाभर दूर झुगारून देऊन सात्विकपणाच्या मृदुल एकतानतेनें आपल्या लेखणीला आईच्या प्रेमाचें शब्दचित्र काढण्यासाठीं कितीहि नाचविलें, तरी बुद्धिमत्तेची रसाळ ओजस्वी शाई प्यालेलें तें कलम, आई एवढा एकच शब्द लिहून त्याच्यापुढें नकळत पडलेल्या पूर्णविरामांत आपल्या कुंठित मतीचा पूर्ण विराम स्पष्ट व्यक्त करतें. ईश्वरी प्रसादाची सनद पटकावून, कृष्ण भगवंताच्या मुरलीप्रमाणें, साऱ्या जगताला मोहिनी घालणारे महाकवि कितीक होऊन गेले. त्यांनीं चंद्रसूर्याला कल्पनेच्या भरारींत हातावोटांवर नाचविलें. मेरुपर्वताचा घुसळखांब करून शेषाच्या दोरीनें अखिल महासागरांचें मंथन केलें. आकाशांतील तारकांना अलगज उचलून, काव्यांतील नायिकेच्या डोळ्यांत बसविलें. या महाकवींनीं कोठें पर्वतांना व्याख्यानें द्यावयास लाविलीं, नद्यांना गाणीं गावयास भाग पाडलें, गगन-संचारी मेघांना प्रणयपत्रिकांच्या चिटोऱ्यांची नेआण करणारे दूत बनविलें, तर कोठें स्वयंसंचारी वातावरणाला आकाशवाणीचे जलशे नाचविणारे तमासगीर बनविले. परंतु आजपर्यंत आईला काव्याचा विषय केला असतां 'आई थोर तुझे उपकार' या उद्गारापलीकडे आपल्या निष्णात कल्पनेची भरारी मारण्याचें एकाहि महाकवीला साधलें नाहीं. याचें कारण हेंच कीं, आई व आईचें प्रेम या दोन गोष्टी अत्यंत गूढ व मुग्ध असल्यामुळें नुसत्या विचक्षण मानवी कल्पनेला त्यांचें सांगोपांग आकलन होणें शक्य नसतें. अशा वास्तविक स्थितींत प्रस्तुत लेखकाच्या दुबळ्या लेखणीनेंहि 'आई थोर तुझे उपकार' या सूत्रानें आईला, आपल्या भारत जननीला आणि त्या दयानिधि जगन्माउलीला, कृतज्ञतेनें तुडुंब भरलेल्या हृदयाला कसेंबसें सांवरून, साष्टांग प्रणिपात घालण्यापलीकडे अधिक काय करणें शक्य आहे ?

**जननीजन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि ॥**

**॥ वन्दे मातरम् ॥**

[ प्रबोधन, १-९-२२. ]

# उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत-

उठा, जागे व्हा आणि भगवंतानें दिलेले वर नीट समजून घ्या. औपनिषदिक सुवर्णयुगकाळीं ज्या दिव्य मंत्रानें भरतखण्डाला जगाचा जगद्गुरु बनविलें, तोच मथळयावरील दिव्य औपनिषदिक मंत्र आज आमच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनांत चैतन्य ओतण्यासाठीं पुनश्च आसेतुहिमाचल वातावरणांत संचार करूं लागला आहे. नव स्वातंत्र्ययुग आतां लवकरच उगवणार म्हणून जिकडे तिकडे पुनर्घटनेची एकच गडबड उडून राहिली आहे. संघशक्तीची जाणीव सर्वत्र बेसुमार थराऊं लागली आहे. भगवंतानें आपल्याला कोणकोणते वर दिलेले आहेत, आपले जन्मसिद्ध अधिकार व हक्क कायकाय आहेत आणि ते हक्क आपण कां व कसे गमावून बसलों, याचीं कोडीं सोडविण्यांत प्रत्येकजण चूर होऊन गेला आहे. एकीकडे उन्नत देशबांधव परकीय दास्याचे पाश तोडून टाकण्याची शिकस्त करीत आहेत, तर दुसरीकडे याच उन्नत देशबांधवांनीं उन्मत्तपणानें चिरकालीन दास्यांत डांबून टाकलेले अवनत देशबांधव त्यांच्या सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या शृंखळा खडाखड उखडून भगवंतानीं आपणांस कोणते वर दिलेले आहेत, याचें मोठ्या धिटाईनें संशोधन करूं लागले आहेत. आज घटकेस देशांत जी चळवळ सुरू आहेत तिचें किंचित् बारकाईनें पृथक्करण केलें तर असें आढळून येतें कीं सर्वत्र जरी राष्ट्रकार्य राष्ट्रकार्य असा एकच ध्वनि निघत आहे, तरी महाराष्ट्रांतील प्रत्येक समाज आपापल्या विवक्षित जातिसंघाच्या हिताचें संरक्षण करण्यासाठीं मोठ्या खबरदारीनें, शिस्तीनें व नेटानें अहोरात्र प्रयत्न करीत आहे; आणि खऱ्या राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हे प्रयत्न खरोखर प्रशंसनीय होत. कारण, 'प्रत्येकजण जर आत्मसुधारणा करण्याची शिकस्त



करील, तर राष्ट्रसुधारणा चुटकीसरशी होईल,' हें **स्माईल्सचें** तत्व यांत प्रधान आहे. मात्र अशा प्रकारचे प्रयत्न करीत असतांना स्वतःच्या घरच्या मुलींच्या मंगळागौरी व मुलांच्या मुंजी या 'राष्ट्रीय' मंगळागौरी व 'राष्ट्रीय' मुंजी असें भासविण्याचा जो मोह कित्येक पुढारलेल्या समाजांत अनावर झालेला आहे, तो मात्र चिळस आणणारा आहे. जात ही धार्मिक किंवा धर्ममान्य संस्था नव्हे. राष्ट्राचें सामाजिक जीवन सुसंघटित चालावें म्हणून एका काळीं यदृच्छेनें निर्माण झालेली ती सामाजिक संघसंस्था आहे. ब्राह्मण क्षत्रिय वैश्यादि हक्कांचे सनदपट्टे जन्मसिद्ध नसून गुणकर्मसिद्ध असल्यामुळें, जन्मतः किंवा जातितः ब्राह्मण्याची व क्षत्रियत्वाची कोरडी प्रौढी मिरविणें म्हणजे भगवंताचा उघड उघड द्रोह होय. हा भगवद्रोह करणाऱ्यांना भगवंताचे वर कधींही प्राप्त होणार नाहींत. आपण जातितः कोठच्याहि संघाचे घटकावयव असलों तरी व्यक्तिशः गुणकर्मप्रवृत्तीनें कोण आहोंत, हें सिद्ध करून दाखविण्याचा व त्याप्रमाणें प्रत्यक्ष वर्तन करण्याचा 'सेल्फ डिटरमिनेशन'चा–आत्मनिर्णयाचा हक्क, भगवंताचा वर, प्रत्येक व्यक्तिमात्रास आहे. हा नवयुगाचा मंत्र धिक्कारणाऱ्यांची मात्र यापुढें धडगत दिसत नाहीं. व्यक्तिशः आत्मोन्नति साधण्याला जसा कोठेंच अटकाव नाहीं, तसा जातिशः समाजोन्नति करणें म्हणजे स्वराज्यद्रोह अथवा राष्ट्रद्रोह करणें असें बाष्कळ विधान करण्यांतहि मोठा शहाणपणा नाहीं. या दृष्टीनें महाराष्ट्रांतल्या असंख्य जातिसंघांनीं स्वतंत्रपणें उन्नतीचा मार्ग चोखाळण्यास कंबरा बांधल्यास, तें एक अभिनंदनीय राष्ट्रकार्यच होय. तंबोऱ्याच्या चार तारा निरनिराळ्या वाजविल्या तर पंचम षड्ज जोड द खर्ज असे निरनिराळे ध्वनि देतात खऱ्या, परंतु त्यांचा एकसमयावच्छेदें झणत्कार केल्यास साऱ्या विश्वाला मोहनी घालणारें मधुर संगीत त्यांतून निर्माण होतें. जातिसंघांच्या वरपांगी व एकांगी भिन्नत्वामुळें गांगरून जाऊन या संघांचाच तिरस्कार करणाऱ्यांनीं वरील तंबोऱ्याची उपमा नीट विचारांत घ्यावी. मात्र, असें होणें शक्य आहे, नव्हे, बऱ्याच जातिसंघांच्या बाबतींत तें खरेंहि आहे, कीं कित्येक तारा मोठ्या नाठाळ आढळतात, कित्येक बदसूर असतात, कित्येक गंजलेल्या असतात आणि कित्येक अहंमन्यतेच्या पिळांनीं पिळवटल्यामुळें अगदीं तुटावयासहि झालेल्या असतात. अशा प्रसंगीं संघहितेच्छु राष्ट्रधुरीणांचें कर्तव्य जितकें स्पष्ट आहे, तितकेंच तें उघड आहे. आपल्या विशिष्ट संघाच्या हृदयाची तार जर बदसूर बनली असेल तर तिच्या कानाच्या खुंट्या मोठ्या कुशलतेनें पिरगाळून तिला एकतानता येण्याइतका नाजुक तणावा दिला

पाहिजे. ती जर जीर्णमताच्या वाळवीमुळें गंजलेली असेल तर स्नेहपूर्ण विचारांचा तिजवर हात फिरवून नवमताच्या पॉलीश पेपरनें तो गंज घासून टाकला पाहिजे. ती जर अहंमन्यतेच्या ताठ्यानें ताठर बनली असेल, तिला गुंडाळीं पडलीं असतील, तर मोठ्या कुशलतेनें ती गुंतागुंत एक तर सोडविली पाहिजे, नाहींतर ती जुनाट कुजकी तार अजीबात तोडून तिच्याऐवजीं नवीन बसविली पाहिजे, म्हणजे छातिठोकपणानें आपल्या जातिसंघाची नव्या धोरणावर पुनर्घटना केली पाहिजे.

चैतन्य, मग तें सामाजिक असो वा धार्मिक असो किंवा राजकीय असो, तेथें भक्तजनांना साह्य करायला 'गरुडावरि बैसोन माझा कैवारी' येतोच येतो. देव भावाचा भुकेला असेल; परंतु चैतन्यावर—लोकजागृतीवर—चळवळीवर त्याचा कृपाकटाक्ष, भावाच्या जोरावर देव मिळविणाऱ्या भक्तांच्या हांकेला ओ देण्याच्या पूर्वींच पडतो. म्हणूनच समर्थ म्हणतात कीं 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील त्याचें। परि आधीं भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥' सध्यांचा काळच असा आहे कीं या चालू हंगामांत जो निजून राहील, तो कायमचाच निजून राहील. त्याच्या अवनतीला मृत्यु नाहीं व पुनर्जन्महि नाहीं. या राष्ट्रोद्धाराच्या उषःकालीं जे जे समाज अस्तन्या मागें सरसावून आत्मोद्धाराच्या आखाड्यांत उतरतील तेवढे सारे क्षत्रिय वीर म्हणून भावी नवयुगांत जगद्वंद्य होतील. जे मानापमानाचें गांठोडें उराशीं बाळगून अहंमन्यतेच्या कोपऱ्यांत घुंगट मारून पडतील, ते सारे शूद्र ठरतील. प्रचलित काळाचा झपाटाच इतका जबरदस्त आहे कीं त्या झपाट्याच्या सोसाट्याबरोबर चालण्याची जे जे समाज हिंमत धरतील, त्यांचाच तेवढा टिकाव लागणार आहे, बाकीच्यांचें कालचक्राच्या घरटांत वस्त्रगाळ पीठ पडल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. या दृष्टीनें आमच्या सर्व महाराष्ट्रीय बांधवांच्या आत्मोन्नतीच्या आणि आत्मोद्धाराच्या ज्या चळवळी यदृच्छेनें चालू झालेल्या आहेत, त्याबद्दल प्रत्येक व्यापक विचारी त्यांचें सकौतुक अभिनंदनच करील.

श्रीमद्रामकृष्ण परमहंस यांच्या **सुलभवेदान्त**नामक ग्रंथांत एक मनोवेधक चुटका दिलेला आहे. आकाशांत अंतराळीं होमा नांवाचे कांहीं पक्षी रहातात. ते कधींहि पृथ्वीतलावर येत नाहींत. त्यांचा सर्व प्रकारचा आयुष्कम व संसार वरच्यावर अंतराळींच चाललेला असतो. ते आपलीं अंडीं सुद्धां वर हवेंतच घालतात. अर्थात् अंडीं घातल्याबरोबर तीं पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळें भराभर खालीं


कोसळूं लागतात. या कोसळण्याच्या सोंसाटयांतच तीं खडाखड फुटून त्यांतून निघालेलीं होमा पक्ष्यांचीं पिलें सुद्धां गुरुत्वाकर्षणामुळें पृथ्वीकडे खेंचलीं जातात. परंतु इतक्यांत त्या पिलांचें आत्मज्ञान जागृत होऊन, 'अरे! आम्ही होमा पक्ष्यांचीं पिलें; इकडे खालीं पृथ्वीकडे कां अवनत होत चाललों?' या नुसत्या विचाराच्या जोरावरच तीं चटकन् आपले पंख उभारून पुनश्च उंच अंतराळांत उड्डाण करून जातात. या छोटया चुटक्यांत अध्यात्मदृष्टया कांहीं रहस्य असलें, तरी यांत अवनत व्यक्ति, समाज वा राष्ट्र यांच्या पुनर्घटनेची खरी गुरुकिल्ली आहे, यांत संशय नाहीं. अवनतीच्या कल्पनेनें निराशामग्न झालेल्या व्यक्तीनें वा समाजानें होमा पक्ष्यांच्या पिलांचा हा आत्मज्ञान-प्रबोधनाचा मंत्र अक्षयीं चिंतनांत ठेविल्यास त्यांचें उन्नतींत इतक्या चमत्कारीक रीतीनें पर्यवसान होईल कीं त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटूं लागेल! नुसत्या अवनतीच्या कल्पनेनें जेवढी अवनति होते, तेवढी आजुबाजूच्या परिस्थितीनेंहि होत नाहीं, असा मानसशास्त्रवेत्त्यांचा ठाम अभिप्राय आहे. म्हणूनच "कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं। ही संतमंडळी सुखी असो" हें भरतवाक्य आमच्या भजनी मंडळींच्या तोंडीं चिरंजीव होऊन बसलें आहे. कल्पनाशक्ति ही जितकी विधायक आहे तितकीच ती विघातकहि आहे. विधायक असतांना ती देवतेप्रमाणें उन्नतीचे पडदे भराभर मोकळे करून आपल्या भक्ताला नंदनवनाच्या ऐश्वर्याचें सौख्य देते आणि तीच एकदां विघातक बनली म्हणजे वाळवीप्रमाणें भक्ताच्या मनोवृत्तीला आंतून पोंखरून वाटेल त्या परिस्थितीच्या कुविचारांच्या धक्क्यांनीं त्याला पुरा खिळखिळा करून सोडते. अशा या विघातक स्थितींत व्यक्तीनें, समाजानें किंवा राष्ट्रानें होमा पक्ष्यांच्या पिलांप्रमाणें उपरतीची जर उचल केली नाहीं, तर मात्र त्या व्यक्तीचें, समाजाचें किंवा राष्ट्राचें मरण फार दूर नाहीं हें खास समजावें.

[ प्रबोधन १६-१०-२१ ]

---

# मुके गुरू.

दयाळू व न्यायी म्हणून ज्यांची कीर्ति आज साऱ्या भूगोलावर जरी नसली तरी आसेतुहिमाचल भरतखंडांत नारोशंकरच्या घांटेप्रमाणें ठणाणत आहे, त्या आमच्या इंग्रज सरकारच्या प्रतिनिधींवर व उपप्रतिनिधींवर आजकाल त्यांच्या स्वैर वर्तनाबद्दल आणि बेसुमार अरेरावी गाजविण्याबद्दल बहुतेक वृत्तपत्रांतून कडक टीका येत आहेत. वास्तविक पाहातां या टीकांचा तोफखाना लॉर्ड कर्झन् साहेब व्हाईसराय यांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या अंकापासून झडूं लागला हें आबालवृद्धांस माहीत आहे.



परंतु प्रस्तुतचा लेखक लॉर्ड कर्झननें आमच्या देशावर जो एक महदुपकार करून ठेविला आहे, त्याचें सविस्तर वर्णन करून लॉर्ड बहादुरास एक मसालेदार थँक्स् देणार आहे, हें वाचून कित्येक हुरळ्या व नकली जहालांस मिरच्या झोंबल्याशिवाय खास रहाणार नाहींत अशी त्यास खात्री आहे.

वंगभंगासारखें अजरामर व सदैव चालतें बोलतें स्मारक हिंदुस्थानांत स्थापन करून सर्व भारतवासियांचा शेवटचा निरोप घेऊन ज्या वेळेस आमचे लॉर्ड कर्झन साहेब आपल्या मातृभूमीप्रत गमन करिते झाले, त्यावेळीं त्यांनीं जुन्या इमारतींची डागडुजी करून त्यांना नीट व्यवस्थेंत ठेवण्याचा एक हुकूमनामा काढला व तो अंमलांत आलेला प्रत्यक्ष पाहिला. यापूर्वी जुन्या इमारती, राजवाडे, स्तंभ, तट इत्यादि प्राचीन स्मृतिदर्शकांना कायम ठेवावें कीं त्यांना आपल्या अधिकाराच्या कुदळीखोऱ्यांनीं पार खणून काढून जमीनदोस्त करावें हा एक चर्चेचा प्रश्न होता. परंतु शुक्लेंदूच्या धवल किरणांत आपल्या आंगचें मूर्तिमंत तेज प्रतिबिंबित करून शहाजहान बादशहाचें वैभव आजदिनतागायत चिरस्मरणीय ठेवणारा आणि यमुनानदीच्या निर्मल जलोदधींत आपल्या प्रतिबिंबाला पूर्ण बिंब-

वून मनःपूत जलक्रीडेनें प्रेक्षकांना तल्लीन करणारा ताजमहाल वकील मध्यंतरीं पडल्यामुळें मशारनिल्हे लॉर्ड साहेबांच्या मनोदेवतेनें वरील जीर्णोद्धाराचा हुकूम फर्मावला. हा चमत्कार कसा कां घडून येईना, परंतु कर्झन साहेबानीं आम्हां भारतवासियांवर हा एक महदुपकार करून राष्ट्रीय शिक्षणाचा एक मार्ग खुला करून ठेविला खरा.

सांप्रत सुरू असलेली स्वदेशी चळवळ, मग तिला लॉर्ड मिंटोसाहेबाची 'प्रामाणिक' स्वदेशी चळवळ म्हणा, किंवा खरी राष्ट्रीय चळवळ म्हणा, ती अस्तित्वांत आल्यापासून राष्ट्राच्या कल्याणार्थ जे जे यत्न राष्ट्रांतील लोकांकडून करण्यांत येत आहेत, ते ते सर्व आमच्या राज्यकर्त्यांच्या अधिकारपूर्ण डोळ्यांना उलटे दिसत असून, त्यांचा विपर्यास आपलें कंटकमय जाळें सर्व हिंदुस्थान देशभर पसरून त्यांत अनेक प्राणी धरीत आहे व कित्येक सांपडले जात आहेत. अशा प्रसंगीं हिंदी लोकांनीं राजनिष्ठा प्रदर्शित करण्याचे कितीहि विविध मार्ग शोधून काढले तरी ते आमच्यावरील अधिकारी मंडळास अर्थातच विपरीत भासायचे. हा काळाचा महिमा होय. हिंदी लोकांची बडबड बंद करण्यासाठीं सरकारला दांतखिळीचा कायदा काढणें भाग पडलें. हा कायदा सजीव बोलक्यांकरितां झाला, तथापि निर्जीव बोलक्यांकरितां सरकारकडून मात्र उत्तेजन दिलें जात आहे, याबद्दल सर्वांनीं आमच्या दयाळू मायबाप सरकारचें अभिनंदन करणें त्यांचें कर्तव्यकर्म आहे. सभाबंदीचा कायदा फार झालें तर हवेंत श्वासोच्छ्वास करणाऱ्या मानवी प्राण्यांचीं संमेलनें पोलीसच्या दंडुक्यांनीं हाणून पार पिटाळून लावील; परंतु प्राचीन इमारतरूपी मुक्या गुरुमालिकांचीं संमेलनें व त्यांत होणारीं व्याख्यानें बंद करण्याच्या कामीं तो कायदा काय उपयोगी ? एज्युकेशन बिल फार झालें तर सांप्रतचा शिक्षणाचा ओघ आकुंचित करून विद्यार्थ्यांची शिक्षणपद्धति साचेबंद पवित्र करील; परंतु आमच्या पूर्वजांनीं बांधून ठेवलेले स्तंभ, मनोरे, राजवाडे, मशिदीरूपी मुके गुरू आपल्या सणसणीत व स्पष्ट वक्तृत्वाच्या ओघांत देत असलेलें खऱ्या राष्ट्रीयत्वाचें शिक्षण नियमित करण्याच्या कामीं तें बिल फोलच ठरणार. तेव्हां अनेक ध्येयांपैकीं इतर गोष्टी जरी क्षणभर बाजूला ठेवल्या तरी राष्ट्रीय शिक्षण हें ध्येय साध्य करण्यासाठीं वरील गुरूंचा आपल्याला जितका उत्तम उपयोग होईल तितका दुसरा कशाचाहि होणार नाहीं. आम्हांला राष्ट्रीय विश्वविद्यालयें स्थापन करण्यासाठीं नवीन फंड उभारण्यास नको किंवा 'अध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत' अशी जाहिरातहि राष्ट्रमतांत प्रसिद्ध करण्याची

जरूर नाहीं. कारण आमच्या पूर्वजांनीं आमच्याकरितां खरीं व निर्मळ राष्ट्रीय शिक्षणाचीं विश्वविद्यालयें यापूर्वींच स्थापन करून ठेवलीं आहेत. या विश्वविद्यालयांचे नियम फार कठीण नसून अगदीं सोपे आहेत. यांत विद्यार्थ्यांस सर्व प्रकारचें शिक्षण फुकट दिलें जातें. हीं विद्यालयें कोठें कोठें आहेत याचा स्थलावकाशाप्रमाणें विचार करूं. परंतु तेथील गुरुमंडळ मात्र मुके असल्यामुळें त्यांपासून शिक्षण मिळविण्याचीं हातोटी प्रत्येक विद्यार्थ्यानें आधीं साधून घेतली पाहिजे.

ज्ञानाच्या घुसळखांबाला ज्यांनीं इतिहासपठणाची रवी बांधून सदसद्विवेकबुद्धीच्या हंड्यांत आपलें हृदय घुसळून घुसळून लोण्यापेक्षांहि मृदु बनविलें असेल, असा एकादा विद्यार्थी, भरदरबारांत निजामाला हजाम म्हणावयास न भिणाऱ्या बाजीराव पेशव्यानीं वसविलेल्या पुण्यभूमींत–पुणें येथें–आला असतां त्याच्या मनाची तेथें काय स्थिति होते पहा. पुण्यास पाऊल ठेवतांच "ज्या राघू भरारीनें पेशवाईच्या पराक्रमाचे झेंडे अटकेस लावले त्याच भटवंशजाची ही राजधानी काय ? सर्व महाराष्ट्राचा कलिजा युवराज विश्वास पानपतीं नष्ट झाल्यावर "भाऊ विश्वास" करीत प्राण सोडणाऱ्या नानासाहेबाची मृत्युभूमी पर्वती ती हीच काय ? द्वापार युगांतल्या कृष्णाच्या रंगपंचमीवर सरशी करणाऱ्या सवाई माधवरावांच्या रंगपंचमीच्या रंगाचा सडा याच पुण्यभूमीवर पसरला होता काय ? इ. इ." अनेक विचार–तरंगांत गुंगून तो शनवार वाड्याच्या दिल्ली दरवाजासमोर येतो. तो अजस्र तट, ते धिप्पाड व भव्य बुरूज, तो अफाट दिल्लीदरवाजा पहातांच त्याची तंद्री क्षणमात्र उतरून तो शुद्धीवर येतो आणि त्या तटाविषयीं विचार करूं लागतो. अर्थात् त्या विचाराशीं त्याचें तादात्म्य झाल्यावर तो शनवार वाड्याभोंवतालचा तट त्याला स्फुंदतांना दृष्टीस पडला तर त्यांत नवल कोणतें ? सांप्रत शनवारचा वाडा * तर अस्तित्वांत नाहींच पण त्याचा शिल्लक

* शनवार वाड्याची स्थापना कशी झाली याबद्दल एक आख्यायिका आहे. श्रीमंत बाजीराव पेशवे एकदां त्या वाड्याच्या मैदानावरून जात असतां तेथें त्यांना एक ससा एका कुत्र्याची पारध करीत असतांना दृष्टीस पडला. त्यावरून 'आपल्या वाड्याला हीच जागा पसंत' असें श्रीमंतांनीं ठरवून त्या ठिकाणीं शनवारचा टोलेजंग वाडा बांधला. परंतु प्रस्तुतच्या देशपरिस्थितीचा सूक्ष्मदृष्टीनें विचार केला असतां कुत्र्यांच्या मागें ससेच लागलेले दिसत आहेत.

राहिलेला तट रसिक विद्यार्थ्यांच्या मनांत विविध विचारक्रांति करून त्याला कांहीं काळपर्यंत पेशवाईंतच नेऊन बसवितो. विचारक्रांतीची पायरीवर पायरी चढतां चढतां व तादात्म्याची कमान चढत्या प्रमाणावर वांकतां वांकतां तटाचा प्रेक्षक आपलें भान विसरतो. त्याला त्यावेळीं निराळीच सृष्टि त्याच्या डोळ्यांला दिसूं लागते.

**पहा हें पहा द्वार 'दिल्ली' सुनामें । जरीच्या निशाणाविना तें रिकामें ॥**

असा दिल्लीदरवाजा आपलें पूर्व वैभव आठवून रडत असतांना दृष्टीस पडतो. बरोबरच आहे.

**अहा जेथुनी स्वारि थाटांत जाई । तिथें झोंपती भ्याड सारे शिपाई ॥**

ज्या दरवाजांतून खर्ड्याच्या समरांगणावर निजामाची खोड मोडून त्याला भगव्याझेंड्याचा प्रताप दाखविण्यासाठीं वसईच्या मोहऱ्याचा गुंडा पुत्र भाऊ साहेब रणवाद्यांच्या गंभीर व कर्कश ध्वनींत व नौबदी चौघड्याच्या दुडुम् दुडुम् दणक्यांत, जरीपटक्याचा हत्ती पुढें चालवीत, याच दिल्लीदरवाजाचा विजयप्राप्तीचा आशीर्वाद घेत घेत, आपली सर्व महाराष्ट्रीय सेना, आपल्या सेनापतित्वाखालीं घेऊन गेला; ज्या याच दिल्लीदरवाजांतून 'हरहर महादेव'ची गर्जना करणारे मराठे वीर, रथी, महारथी सर्व भरतखंडाच्या विश्वासाला आपल्या तळहातावर नाचवीत झेलीत दिल्लीच्या तक्तावर हिंदुस्थानचा बादशहा म्हणून स्थापन करण्याकरितां 'मारूं किंवा मरूं परंतु भरतभूमीचा हा सौभाग्यतिलक चिरविजयी करूं' अशी कृतांतवत् गर्जना करीत गेले; ज्या याच दिल्लीदरवाजांतून महादजी शिंदे सखाराम बापू, हरिपंत फडके, बापू गोखले, निळकंठराव पागे इत्यादि नरशार्दूल आपआपल्या चोपदारांच्या व हलकाऱ्यांच्या 'निगा रक्खो' ललकाऱ्यांत श्रीमंतांना मुजरा करण्याकरितां दरबारांत जात असत, तोच हा दिल्लीदरवाजा आज शुष्क व उजाड झालेला पाहून कोणत्या अस्सल बीज महाराष्ट्रीयाचे विचार गत वैभवाची व प्रस्तुत स्थितीची तुलना करण्यांत गुंतणार नाहींत ? कोणत्या कवीची काव्यस्फूर्तिः—

**जिथें मेजवान्यावरी मेजवान्या । नरेशें दिल्या 'पाहिजे तेंहि न्या न्या' ॥**
**अशी कर्ण दात्यावरी ताण झाली । तिथें मृत्यु अन्नामुळें धाड घाली ॥**

अशी एकादी कविता प्रसविल्याशिवाय राहिल ? महाराष्ट्रीय वैभवाची टोलेजंग इमारत हां हां म्हणतां एका निमिषार्धांत यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें जिथच्या तिथें नष्ट होऊन तिच्या जागीं निकृष्ट दारिद्र्याच्या धुळीचे प्रचंड पर्वत

येऊन कसे पडले, याबद्दल आश्चर्यचकित होऊन तटस्थ उभा राहिलेला तट; आजा पणजांनीं रक्ताचें पाणी पाणी करून, समरांगणांतल्या जखमाची क्षिती न बाळगितां, रक्ताच्या पुरांत प्रेतांवरून घोडे उडवून आणि धारातीर्थांत आपल्या पोटच्या गोळयांना बळी देऊन सर्व महाराष्ट्रीयांची अब्रु राखण्याकरितां स्वकष्टानें मिळविलेला जरतारी भगवा झेंडा त्याच आजा पणजाच्या कृतघ्न नातवांनीं आपल्या हातांनीं उपटून फेंकून दिला, म्हणून आपल्या दुर्दैवाबद्दल खंती करीत झुरत बसणारे ते बुरूज; छत्रपति शिवाजी महाराजांच्या व श्रीरामदासाच्या पुण्य प्रतापावर ब्राह्मणपदपाच्छाईच्या नरवीरानें उभारलेल्या शनिवार राजमहालाची रक्षा पाहून डोळयांतून टिपें गाळणारे ते अनेक दरवाजे, प्रेक्षकाच्या मनाची काय बरें स्थिती करतात? राजनिष्ठेचे मूर्तिमंत पुतळे, स्वामिभक्तिसाठीं स्वप्राणाची आहुती देणारे वीर, मुत्सद्दीपणांत गाजलेले फडणीस, स्वतेजानें प्रभूची कीर्ती उज्वल करणारे गोखले, ज्यांना पहावयाचे असतील त्यांनीं या पुण्यभूमीची यात्रा एकवार करावी. तेथल्या रहिवाशांना या तीर्थांची तर क्षितीच नसते. तथापि नाशिकचे लोक काशीच्या गंगेसाठीं धडपडतात आणि काशीचे रहिवाशी नाशिकच्या गंगेंत बुचकळी मारायला धांवत येतात.

जुन्या इमारतींविषयीं ख्यात असलेली प्राचीन मोंगलाईची राजधानी विजापूर हें एक राष्ट्रीय शिक्षणाच्या विश्वविद्यालयाचें आद्यपीठ आहे. तेथील मुके गुरू पुण्यभूमीप्रमाणें वैभवाचें व वीरश्रीचें शिक्षण तर देतातच, परंतु कलाकौशल्याची चमक जशी त्यांच्या व्याख्यानांत असते तशी इतरत्र दिसणें शक्य नाहीं. मुलुखमैदान नांवाची पंचधातूची आकाळविकाळ तोफ पाहतांच कलाकुसरीबद्दल घमेंड मारणारे यांत्रिक शोधांचे जनक इंग्रज, जर्मन व अमेरिकन तोंडांत बोट घालून चकभूल झाले. ही तोफ एकदांच कायती उडविली. तेव्हां रंजूक लावणारा तर मेलाच, परंतु गोळा जो उडाला तो २४ मैलांवर जाऊन पडला. तोफेच्या दणक्यानें १२ कोसांतील प्राण्यांचे गर्भपात झाले खरे, परंतु तिच्या 'मुलुखमैदान' नांवानें पृथ्वीवरील सर्व खंडांतल्या यच्चयावत् यांत्रिक शोधकांच्या उरांत कायमची धडकी भरविली आहे. इब्राहीम रोझा मशिदीच्या सभा मंडपांत असलेली एका दगडाची खोदीव झुलती सांखळी पाहिला असतां त्यापुढें राजाबाई टॉवरचें कलाकौशल्य फिकेंच पडतें. बोळघुमटांतील स्वयंभू टेलोफोन, सातवेळां उठणारा प्रतिध्वनी, उपल्या बुरुजावर चढविलेली प्रचंड तोफ इत्यादि गोष्टी शिक्षण घेण्यासारख्या आहेत. अशा रीतीनें सर्व हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं

किती तरी स्थळें आहेत. त्यांचें वर्णन स्थलसंकोचासाठीं जेथच्या तेथें ठेवणें भाग आहे.असल्या मुक्या गुरुमालिकांची नीट तरतूद ठेवण्याबद्दल आमचें सरकार फार झटतें याबद्दल आम्हीं त्यांचे सदैव ऋणी आहोंत.

मावळांतील तोरणचा किल्ला आपली निशाणाची मोडकी काठी दाखवून मराठी राज्याची स्थापना प्रथम येथें झाली हें दाखवील. कोल्हापुरांतील दवाखान्याच्या कंपौंडासाठीं खालीं तोंड करून गाडलेल्या असंख्य तोफा कोल्हापूरची गादी स्थापन करणाऱ्या श्री० ताराबाईच्या वेळच्या सर्व ऐतिहासिक कथा अझून सांगतात. कर्नाटकांतील बेलवाडीचा भुईकोट किल्ला सावित्रीबाई ठाणेदारणीचें शौर्य, पतिभक्ति व स्वामीनिष्ठा मूर्तिमंत नजरेस आणून दाखवितो. पावन खिंडींत प्रभु बाजी देशपांड्याची उत्कट स्वामिभक्ति तेथल्या प्रत्येक मृत्तिकेच्या कणाकणांत रसरसलेली दिसेल. सिंहगडावरील अर्धचंद्राकृतीच्या हिरव्या निशाणाला जमीनदोस्त करून त्या ठिकाणीं भगवा झेंडा उभारतां उभारतां धारातीर्थांत पतन पावणारा नरसिंह तानाजी मराठेशाहीची स्थापना करण्यास शिववानें किती अश्रांत श्रम केले हें सांगण्यास अझूनहि बोलेल. आणि पानपतच्या भारतीयुद्धांत पतन पावलेल्या विश्वास भाऊच्या मरणाबद्दल सूड उगविण्यासाठीं युद्धावेशांत डोळे लालबुंद करून, ज्यानें घोड्यावर कसलेला जीन तीन दिवसांत अटकेला भिडविला आणि पळून जाणाऱ्या अहमदशहा अबदल्लीच्या छातीवर बसून कटयारीनें कंठ कापला व त्याच्या रुधिराच्या आकंठ प्राशनानें सूडाची भरपाई करून घेतली त्या राघू भरारीचा पराक्रम अटकेच्या किल्ल्याच्या चिऱ्यांचिऱ्यांतून अझून आरशाप्रमाणें स्पष्ट दिसेल.

[ वन्दे जिनवरम्. सन १९०८ ]

# धन्य पार्वतीबाई धन्य.

**नारियोंकु निंदो नहीं नारी नरकी खान।**
**जिस खानिसे पैदा हुवे राम कृष्ण हनुमान ॥**

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' या सूत्राचा अवमान ज्या घटके-पासून भरतपुत्रांनीं करण्यास सुरवात केली त्या घटकेलाच त्यांच्या राष्ट्रीय वैभवाची माती झाली. आतां ज्या क्षणापासून पश्चात्तापित भारत स्त्रीवर्गाच्या उन्नतीचा प्रश्न हातीं घेईल त्या क्षणींच त्यानें उद्यांच्या साम्राज्याचा पाया ठोकला असें समजावें. 'अबलोन्नति' हा संधि कोणत्या शहाण्यानें केला असेल तो असो, स्त्रियांना 'अबला' म्हणण्यांतच सत्याचा खून पाडण्याचें दुष्ट कृत्य आपण करीत आहोंत, याची त्या शहाण्याला दाद नसावी असें वाटतें. स्त्रिया अबला असतात कीं सबला असतात हें इतिहास शिकवील. परंतु स्त्रियांना अबला करून मग त्यांच्या उन्नतीबद्दल गुजराथी रडगाणें गाण्यांत मोठासा सबळ पुरुषार्थ साधेल असें मुळींच नाहीं. उलट त्यांना अबला म्हणणें व त्यांच्या उन्नती-करितां प्रयत्न करण्याची शेखी मिरविणें यांत, आणि एखाद्या जेत्यानें जित राष्ट्राला हतबल करून नंतर स्वराज्याच्या हप्तेबंदी खुराकावर त्याला सज्ञान, सशक्त व स्वावलंबनी करणें यांत विशेष फरक तो काय ? स्त्रीवर्गाचा औपनिषदिक व भारतकालीन इतिहास पाहिला तर त्यांची कर्तबगारी सर्वशक्तिपूर्ण व मर्दपणाचा टेंभा मिरविणाऱ्या पुरुषांपेक्षांहि सामर्थ्यवान् असल्याचें डोळसाला स्पष्ट दिसेल. परंतु त्यांचा अवमान करण्याची अवदसा ज्या वेळीं पराभूत पुरुष वर्गाला आठवली त्याच वेळीं त्यांना अबला ही संज्ञा लावण्याचें मुर्दाड धाडस जन्माला आलें. तें कांहींहि असो, स्त्रियांच्या उन्नतीचा प्रश्न आतां राष्ट्रीय चळवळींतील एक अत्यंत महत्वाचा भाग होऊन राहिला आहे ही मोठ्या आनंदाची, त्याचप्रमाणें अभिमानाची गोष्ट आहे. गेल्या अर्धशतकांत प. वा. डॉ. आनंदीबाई जोशी या विदुषीपासून तों तहत् विद्यमान श्री. सरोजिनी नायडू पर्यंतच्या सबला भगिनींनीं आपल्या उदात्त चारित्र्यानें अकल्प्य धाडसानें व कौतुकास्पद बुद्धिसामर्थ्यानें असें सप्रमाण पटवून दिलें आहे कीं औपनिषदिक इतिहासाची

पुनरावृत्ति या भरतखंडांत लवकरच होणार. जुन्या इतिहासांत रजपूत स्त्रियांच्या धाडसी पराक्रमाच्या अनंत गोष्टी आपण वाचतों. जोहारासारख्या अमानुष यज्ञांत त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा आत्मयज्ञ केल्याचीं उदाहरणें वाचून व ऐकून आपल्या हृदयांत खेदमिश्रित कुतूहलाच्या उर्मी उठतात. परंतु सात समुद्र उल्लंघन करून बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर अहंमन्य पाश्चात्यांच्या छावण्या भराभर काबीज करून, हिन्दु संस्कृतीचा, हिन्दु तत्वज्ञानाचा व हिन्दुधर्माचा झेंडा त्यांच्या नाकावर टिच्चून उभारून मायदेशाची वर्णनीय कामगिरी करणाऱ्या डॉ. आनंदीबाई, श्री. सरोजिनीबाई, या विदुषींप्रमाणेंच भारतीय इतिहासाला आमच्या भगिनी पार्वतीबाई जर आठवल्या नाहींत तर तो इतिहास कशाचा ? श्री. पार्वतीबाई या कांहीं वर्षांपूर्वीं प्रो. कर्व्यांच्या इंडियन उइमेन्स युनिवर्सिटी तर्फे पाश्चात्य देशांतील लोकमत जागृत करण्यासाठीं अमेरिकेला गेल्या होत्या, त्या नुकत्याच तिकडे व युरोपांत दिग्विजय मिळवून स्वदेशीं परत आल्या आहेत. पार्वतीबाईंचा पूर्व इतिहास आणि आतां अमेरिका, इंग्लंड, पारीस सारख्या ठिकाणीं त्यांनीं स्वतःच्या कर्तबगारीवर मिळविलेल्या दिग्विजयाचा इतिहास जो कोणी लक्षपूर्वक तुलना करून पाहील, तो देखील आमच्याप्रमाणेंच स्त्रियांना अबला मानणाऱ्या शहाण्याचे कान उपटायला कमी करणार नाहीं. हिन्दी स्त्रियांच्या वतीनें केवळ स्वावलंबनाच्या जोरावर पार्वतीबाईसारख्या 'यःकश्चित्' दिसणाऱ्या एका हिंदु विधवेनें अमेरिकेला जाण्याचें धाडस करावें, ठिकठिकाणीं अनेक व्याख्यानें देऊन तिकडील लोकमत जागृतीच्या कामधेनूपासून फंड गोळा करून इकडे युनिव्हर्सिटीकडे पाठवावा आणि हिंदी स्त्रियांच्या उन्नतीकडे अमेरिकन, इंग्लिश, फ्रेंच राष्ट्रांचें लक्ष वेधावें, ही असामान्य कामगिरी बजावणारी स्त्री व शिवछत्रपतीची माता जिजाबाई किंवा राघोबा दादाच्या हातांत कांकणें भरणारी अहल्याबाई यांत आम्हांला तरी कांहीं भेद दिसत नाहीं. कार्याचें स्वरूप भिन्न असलें तरी त्याच्या महत्वाचा कस केव्हांहि एकजिनसीच असतो. पार्वतीबाई अमेरिकेला गेल्या तेव्हां त्यांना प्रो. धर्मानंद कोसंबी यांची न्यूयॉर्क पर्यंत सोबत लाभली. परंतु तेथें त्यांनीं पार्वतीबाईला सोडल्या दिवसापासून त्यांची वार्ता इकडे कांहींच नव्हती. मध्यंतरीं आम्ही आमचे परममित्र प्रो० चिपळूणकर यांच्या पाशीं त्यांची विचारपूस केली, तेव्हां त्यांच्याकडूनहि कांहीं कळेना. ते म्हणाले How could we trace a drop in that unfathomable ocean of America–त्या अमेरिकेच्या महासागरांत या थेंबाचा पत्ता आपणांस कसा लागणार ? परंतु

धन्य आमचा प्यारा हिंदुस्थान ! त्याची कर्तबगार कन्या असे हजारों महासागर रोंरावत तिच्यावर कोसळले म्हणून तो थोडीच बुडणार आहे ! हिंदुस्थानची संस्कृती कच्च्या कुंभाराची कच्ची माती नव्हे ! हिंदु तत्त्वज्ञान उपऱ्या भुसाऱ्याच्या वखारींतलें भुसाचें पोतें नव्हे. हिंदु धर्म हा गुलामांचा धर्म नव्हे. विष्णुगुप्त चाणक्याचें सूत्र पहा. चाणक्य ठणकावून साऱ्या जगाला सांगतो कीं ' न तु एव आर्यस्य दासभावः ' आर्यजन कधींहि कोणाचे गुलाम होणार नाहींत. मग ही आमची पोलादी निश्चयाची आर्यकन्याच अमेरिकेच्या पचनीं पडणार कशी ? आर्य या शब्दांतच साम्राज्यजेतृत्व रसरसत आहे. आर्यजननीच्या अभिमानी लेकरांनीं आपला आत्मघातकी संकुचित बाणा दूर झुगारून देऊन, धार्मिक सामाजिक व राजकीय गुलामगिरीचे पाश तडातड तोडून किंचित् सीमोल्लंघन करण्याची तडफ दाखवावी कीं दिग्विजयश्रीनें माळ घातलीच म्हणून समजावें. दिग्विजय हा हिंदुस्थानचा कर्मसिद्ध हक्क आहे; म्हणूनच गेल्या तीन हजार वर्षांच्या अवधींत शेंकडों भिन्न भिन्न संस्कृत्या जगतीतलावर जन्मून कालवशात मृत्यु पावल्या; पण हिंदु संस्कृती अजूनहि काळाला टक्कर देऊन ताठ आहे तशीच उभी आहे. निराशावाद्यांनीं या प्रमेयावर किंचित् डोकें खाजवावें अशी प्रबोधनाची प्रार्थना आहे.

[ प्रबोधन, १६-१०-२१ ]

# अटकेला फडकलेला भगवा झेंडा.

" Cease to consul, the time for
action call;
"War, horrid war, approaches
to your walls"
POPE, Iliad, book II. 1. 967



* भगवा झेंडा ! या नांवांत एक काळीं मोठा करडा वचक भरलेला होता. याच शब्दांत पूर्वी एक प्रकारचा अभिमान चमकत होता. याच शब्दोच्चारानें १७ वें व १८ वें शतक जगाच्या इतिहासांत गाजलेलें गेलेलें आहे. एक 'भगवा झेंडा' उद्गार तोंडांतून बाहेर पडतांच मनांत नानाप्रकारच्या कल्पनांचें काहूर उठून दृष्टीसमोर अद्वितीय नरनारींच्या अनंत मूर्ति मूर्तिमंत उभ्या राहतात. इतिहास ग्रंथांतून असा एक काळ ग्रथित केलेला आढळतो कीं, त्या काळीं भगवा झेंडा हें नांव ऐकतांच कितीतरी देशचे राजेराजवाडे एकसहा थरथरा कांपत असत. हाच तो भगवा जरीपटका कीं, ज्याच्या गंभीर नांवाच्या गर्जना कानीं पडतांच मराठे वीर आपसांतील सर्व द्वैतांना तिलांजुली देऊन, आपल्या

---

* A song for our banner? The watchword recall which gave the Republic her station: "United we stand-Divided we fall!" It made and preserved us a nation! The union of lakes, the union of land, the union of states, none can sever the union of hearts—the union of hands. And the Flag of our union for ever!

हें वर्णन सार्थ आहे ! *G. P. Morris.*—

हातांत आपलीं शिरें घेऊन, 'हरहर महादेव'ची प्रतिगर्जना करीत झेंड्याच्या हत्तीला गराडा देऊन उभे रहात असत. याच भगव्या झेंड्यानें एके समयीं महाराष्ट्र वीरांच्या अंगांतील अंगरख्यांचे बंद तटातट तोडले. याच जरीपटक्यानें तत्कालीन अनेक नरश्वानांना श्वानवृत्तीपासून परावृत्त करून त्यांना खऱ्या राष्ट्र-सेवेची चटक दाखविली. आणि याच महाराष्ट्रीय निशाणानें पुणें, सातारा इत्यादि शहरांना राजधानीचें पूर्ण वैभव दाखवून त्यांना इंद्रपुरीची बरोबरी करावयास पात्र केलें. गोवध करण्यास सोकावलेल्या इराणी दुराणी म्लेंच्छांच्या हृदयांत कायमची धडकी भरवून, देवळांच्या ठिकाणीं शुभ्र मशिदींचें घुमट उभारणाऱ्या तत्कालीन विधर्माभिमानी महमदीयांना आपल्या उज्वल पराक्र-माच्या तेजानें दिपवून टाकणारा जरतारी झेंडा हाच. सनातन धर्मोच्छेदाच्या काळ्याकुट्ट रात्रीचा गडद अंधकार नाहींसा करणारा तेजस्वी सूर्य हाच.

या भगव्या झेंड्यानें तीन शतकांतल्या सर्व गोष्टी स्वतः प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. श्रीरामदास स्वामींच्या समर्थ छत्राखालीं झालेल्या महाराष्ट्र-धर्माची प्राण प्रतिष्ठा व शिवाजीनें स्वराज्यस्थापनेच्या केलेल्या उपक्रमाचा उषःकाल; छत्रपति शाहू सातारकर, बाजीराव पेशवे, यांच्या कारकीर्दींतील राज्य-वैभवाची प्रभात; नानासाहेब व माधवराव पेशव्यांच्या वेळची मध्यान्ह; मध्यंतरींच लागलेलीं पानपत युद्ध व नारायणराव पेशव्याचा खून इत्यादि खग्रास सूर्यग्रहणें; सवाई माधवराव पेशव्यांनीं शनवार वाड्यांत तिसऱ्या मजल्यावरून आत्महत्येकरितां खालीं कारंजावर उडी टाकून केलेला वैभव-रवीचा अन्त, अर्थात् सायंकाळ; आणि रावबाजीची पळापळीची, लाडवांच्या युद्धांची, आणि शेवटीं पेशवाईला राम राम ठोकून ब्रह्मावर्ती पेन्शन खात बसण्याची अंधारी रात्र; इत्यादि विविधकाळवैचित्र्य त्यानें स्वतः अनुभविलें आहे. याशिवाय त्यानें अनेक महत्वाच्या गोष्टी पाहिल्या त्या इतिहासवाचकांस अवग-तच आहेत.

भगवद्भक्त महासाधु तुकारामाची अभंग वाणी त्यानें भीवरेच्या तिरीं हरि-नामाच्या कल्होळासह ऐकिली. रामदासी मनाचे श्लोक जनांच्या काळजाला भिडून 'मराठा तितुका मेळवावा !' असल्या राष्ट्रकल्पनांच्या धर्मतत्वांचा प्रचंड झंजा-वात आसेतुहिमाचल भराऱ्या मारतांना पाहिला. लाखों श्रोतृसमूहापुढें रामजोशी आपल्या प्रासादिक लावण्या मोठ्या रंगांत येऊन हावभाव नृत्य करून म्हणतांना,

त्याच्या डफाची खणखणीत थाप ऐकून त्यानें मोठ्या आनंदानें कित्येक वेळां मान तुकावली. आनंदफंदीच्या लावण्या, गोंधळी शाहिरांचे पोवाडे, पेशव्यांच्या दरबारीं गणेश महालांत सुरू असतांना; मराठे वीरांच्या 'हरहर महादेव' च्या आरोळ्यांनीं गजबजलेला तो वीरश्रीचा रंग आमच्या भगव्या झेंड्यानें दिल्ली दरवाजावर मोठ्या डौलानें डुलत राहून ऐकला. तुळजापुरच्या भवानी देवीला जात्यांत घालून भरडणाऱ्या अफजुलखानाची—भटाऱ्याच्या पोरार्ची—आंतडीं शिवाजीनें बाहेर काढतेवेळचा तो भयंकर देखावा यानें पाहिला. पावन खिंडीत तोफेचा गोळा लागून गतप्राण झालेल्या बाजी देशपांडे सरदाराच्या पाठोपाठ युद्धास भिडलेल्या मावळे गड्यांनीं भिर्र भिर्र फेंकलेल्या दग-डांचा आवाज व गोफणींचा गुं गुं ध्वनि रोंरावत असतांना त्यानें ऐकिला. संभा-जीचा खून, शाहू महाराजांच्या 'झिम्या' कुत्र्याची स्वामिभक्ति; बाजीराव पेशव्याची मराठमंडळ ( Maratha Confederacy ) स्थापन करून सर्व जातींना अद्वैतभावानें वागविण्याची थोर बुद्धि, नानासाहेबांच्या कारकीर्दींत सुरू झालेला द्वैतभाव; माधवराव पेशव्यानीं शिंदे, होळकर, नागपूरकर भोंसले इत्यादि शिरजोर झालेल्या सुभेदारांवर ठेवलेला करडा वचक; सुमेरसिंगाच्या तलवारीला बळी पडलेल्या नारायणराव पेशव्याच्या रक्ताचा सडा, इत्यादि अनेक गोष्टी या जरीपटक्यानें प्रत्यक्ष पाहिल्या. धी ईस्ट इंडिया कुंफणी सरकारचें पेशव्यांच्या दर-बारांतले वकील मालीट साहेब यांनीं, पेशवाई साम्राज्यावर आपल्या शाबरी मंत्राचा पगडा चांगलाच बसला आहे, अशा घमेंडींत अचाट बुद्धि चालवून मुंब-ईहून दररोज पुण्यास बिस्कुटांनीं भरून येणाऱ्या तीन मेण्यांपैकीं एकांत दोन जंबुरे ( तोफा ) छपवून आणण्याचा जो उपक्रम केला आणि नाना फडणविसानें एकदम हुकूम सोडून तोच मेणा खोपवलीच्या घाटावर जप्त करून पाडला असतां, साहेब बहादुरांची नानांच्या समोर जी तिरपीट उडाली तीहि यानें पाहिली.

अशा रीतीनें सुमारें दोनअडीचशें वर्षें महाराष्ट्र राज्यवैभवाचें सौख्य भोगून शेवटीं आपआपसांतल्या द्वैताची घरांतल्या घरांत आग भडकल्यामुळें, काळाची वक्रदृष्टी त्यावर फिरतांच, या थोर भगव्या झेंड्याला दिल्ली दरवाजाच्या अत्युच्च शिखरावरून निमूटपणें खालीं उतरावें लागलें. त्याच दिवशीं राज्यलक्ष्मीच्या कृपादृष्टींतून सर्व हिंदी राष्ट्रहि उतरलें. जरीपटका जो खालीं उतरला तो रसात-ळालाच गेला. रावबाजीप्रमाणें तो पेन्शन खात बसला नाहीं. आतां हा भगवा झेंडा अटकेला कसा फडकला याची थोडी हकीकत सांगून आटोपतें घेऊं.

सोनपत पानपतची लढाई बहुतेक आटोपलीच. दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहोरा हरपल्या आणि रुपये खुर्दा किती हरवला याची गणतीच नाहीं, अशी हृदयद्रावक बातमी श्रीमंत नानासाहेब पेशव्यांस अहमदनगरास एका व्यापाऱ्याच्या जासुदाकडून कळली. त्याच दिवशीं श्रीमंताच्या छावणींत मकर संक्रांतीच्या भोगीच्या सणाची मोठी गडबड चालली होती. राजस्त्रिया, सरदारपत्न्या, दासी, सगळ्यांची अभ्यंग स्नानाची तयारी चालली होती. कित्येकजणी न्हाऊन आंग पुशीत होत्या, कित्येक न्हात होत्या, कित्येक एकमेकींच्या थट्टा करण्यांत, आंगावर अत्तर गुलाबपाणी फेंकण्यांत आणि कित्येकजणी पानपतास गेलेल्या योध्यांच्या व विश्वासराव, भाऊसाहेब, लक्ष्मीबाई, पार्वतीबाई यांच्या आठवणी काढून 'ते सगळे युद्धांत विजयी होऊन त्यांच्या छावणीचा तळ जर इतक्यांतच नगरास येऊन दाखल झाला तर काय मौज होईल' वगैरे गोष्टी बोलत हांसत खेळत होत्या. इकडे नानासाहेब पेशवे आपल्या सर्व सरदारांना एकत्र जमवून भाऊच्या मदतीला सैन्य घेऊन जायचें, ते कोणकोणच्या टप्प्यांनीं न्यायचें, इत्यादि युद्धविषयक गोष्टींच्या खलबतांत गुंतले होते. दुसरीकडे श्रीमंतांची अर्धांगी श्रीमती गोपिकाबाई या अभ्यंग स्नानास बसल्या आहेत, म्हणून मंगलदर्शक वाद्यें वाजताहेत व तोफांची धडेबाजी सुरू आहे. या समारंभाच्या आदल्या रात्रीं या श्रीमंत दांपत्याला अशुभसूचक वाईट स्वप्न पडलें असल्यामुळें, त्या दोघांचीं मनें मात्र अगदीं उदास होऊन त्यांच्या ध्यानींमनीं विश्वास, भाऊ, लक्ष्मी, पार्वती या जोडप्यांवाचून दुसरा कोणताच विषय घोळत नव्हता आणि त्यांच्या दृष्टीसमोर त्यांच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याच मूर्ती दिसत नव्हत्या. इतक्यांत त्या नगरच्या व्यापाऱ्यानें वरील संदेशाची चिट्ठी एका हलकाऱ्याबरोबर पेशव्यांकडे पाठविली. चिट्ठी दाखल होतांच सर्वांना असें वाटूं लागलें कीं, त्यांत माहिमेचा जय झाला असें शुभ वर्तमान लिहिलेलें खास असेल. हिंदुस्थानांतून बातमी घेऊन हलकारा आला, ही बातमी हां हां ह्मणतां बायकांत पसरली. आतां मोहिमेचा विजय ऐकायला मिळेल, ह्मणून जो तो उत्सुक होऊन आपापसांत कुजबुजूं लागला. परंतु त्या बिचाऱ्यांना पुढें ओढवलेल्या संक्रांतीच्या भोगीची–नव्हे भोगाची–काय कल्पना? चिट्ठी वाचतांच नानासाहेब पेशवे एकदम काळे ठिक्कर पडले, त्यांचा ऊर भरून त्यांना चक्कर आली आणि मोठ्यानें 'भाऊ, विश्वास, गेला हो गेला!' अशी आरोळी मारून बेशुद्ध पडले. गोपिकाबाईचें स्नान होऊन त्या रुप्याच्या चौरंगावर उभ्या राहून आपले ओले केंस पुशीत

होत्या. इतक्यांत वरील आरोळी त्यांच्या कानीं पडली. 'भाऊ विश्वास' हे शब्द त्यांच्या कानांत रसरसलेल्या शिशाप्रमाणें जाऊन अंतःकरणांत जबरदस्त धक्का बसला आणि ती 'माझ्या विश्वासा' अशी किंकाळी फोडून धाडकन् उभ्यानेंच खाली पडली.

झालें! या श्रीमंत दांपत्याला सावध करण्यांत आणि त्यांना धीर देण्यांत जिकडे तिकडे एकच गडबड धांदल सुरू झाली. पण त्यांचा शोक कशानें आंवरणार? त्याच स्थितींत सर्व छावणी परत पुण्यास आली. पुण्यास दाखल होतांच सर्व शहर व सर्व महाराष्ट्र देश महाशोकांत निमग्न झाला. कां होऊं नये? पानपतीं महाराष्ट्राची तीन लाख बांगडी फुटलेली! सर्वत्र उदासीनता पसरली. परंतु संकट प्राप्त झालें असतां नुसतें रडणें, हातबोटें चोळणें किंवा निषेध प्रदर्शित करणें या आधुनिक रीती आतांप्रमाणें त्यावेळीं अस्तित्वांत नव्हत्या. त्यावेळीं तरवारीचें साम्राज्य होतें. प्रजा निःशस्त्र झाली नव्हती. तिच्या डोळयाला सनदशाहीचा चष्मा लागला नव्हता. महाराष्ट्राची रास सांप्रत मेष आहे—ह्मणजे तें मेषपात्र आहे. त्यावेळीं महाराष्ट्रावर सिंह राशीचा पगडा पूर्ण असल्यामुळें राजा व प्रजा नेहमीं सिंहवत् तेजस्वी व पराक्रमी असत. त्याच नरसिंह समूहांतून वरील संकटाची वार्ता ऐकतांच राघु भरारी हा एक खवळलेला सिंह दांतओठ खात शत्रूचें नरडें फोडण्याच्या त्वेषानें खाडकन् समशेर परजीत बाहेर पडला. रणवाद्यांच्या शिंगांचा ध्वनी व दुंदुभीचा दुह्रम् दुह्रम् आवाज ऐकतांच हां हां ह्मणतां हजारों मराठे वीर आपापल्या समशेरा बाहेर खेंचून घोडे पिटाळीत जरीपटक्याच्या भोंवतीं जमा झाले. विश्वास व भाऊच्या मरणाबद्दल रघुनाथराव गिलच्यावर स्वारी करून त्याचीं हाडें कडकडा फोडण्यासाठीं उदईक निघणार, ही बातमी सर्व पुणें शहरांत पसरली. वृद्ध त्याला आशीर्वाद देऊं लागले. तरणे बांड जवान गडी मोहिमेच्या फौजेंत सामील झाले. उदयीक गारपीराहून कूच करण्यासाठीं शनवारवाड्यांतून 'गिलच्या ह्मणजे बिशाद काय? एका ठोंशासरसा जमीनदोस्त करीन' अशी गर्जना करीत खवळून बाहेर पडणाऱ्या राघुभरारीला मंगलदायक पंचारती ओवाळण्याकरितां सर्व स्त्रिया पंचारत्यांचें साहित्य सिद्ध करूं लागल्या; आणि आमचा भगवा झेंडा तर कधींच—आदल्या दिवशींच—गारपीरावर जाऊन उत्तरेकडे आपलें तोंड फिरवून भावी युद्धांतील वीरश्रीचा पुतळा आणि विजयदेवतेचा तिलक राघोबा कूच करण्याचें शिंग केव्हां फुंकतो याची वाट पहात उभा राहिला.

श्रीमंत नानासाहेब आणि श्रीमती गोपिकाबाई पुत्रशोकानें ग्रस्त होऊन गेल्या होत्या. रात्रीं नाना साहेबांचा निरोप घेण्याकरितां राघोबाची स्वारी त्यांच्या महालांत गेली. आधींच विश्वासासारखा अभिमन्युवत् मोहरापुत्र, भाऊ-साहेबासारखा कर्णवत् योद्धा चुलतभाऊ, काळमुखीं पडले असतां, त्याच काळाच्या मुखांत प्रत्यक्ष पाठच्या भावाला जाण्याची परवानगी देण्याचें काम नानासाहेबास किती जाचक झालें असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. नानासाहेबाच्या तोंडांतून एक अक्षर निघेना. त्यांनीं कसाबसा निरोप दिला. राघोबानेंही त्याच निरोपाला शिरसावंद्य मानून 'मारीन पन्नग मी फोडिन शेषटाळू भूगोल हा उल-थितां मज नाहिं वेळू' अशा अर्थाचें वीरश्रीपूर्ण भाषण करून त्यांचा निरोप घेतला. नंतर 'विश्वास-विश्वास' करीत पुत्रशोकानें झुरणीस लागलेल्या गोपिका-बाईंची समजूत घालण्याकरितां रघुनाथराव गेले. रघुनाथरावाला पहातांच गोपिकाबाई स्फुंदत डोळे पुशीत पुशीत उभ्या राहूं लागल्या.

राघोबा०—वहिनी, उभें रहाण्याचें कारण नाहीं. मी आपल्या मुलासारखा. बसा खालीं. हें पहा, मला आतां बोलायलाच वेळ नाहीं. आतां अवघी घटका उरली. गारपिरावर मंडळी वाट पहात असतील.

गोपिका०—म्हणजे ?

राघोबा०—विश्वास व भाऊ यांच्या मृत्यूबद्दल सूड उगविण्याकरितां उत्तरे-कडचें समरांगण माझी वाट पहात आहे. मला आपला आशीर्वाद असावा. झाल्या गोष्टी होऊन गेल्या. पण ज्या गिलचानें आमच्या महाराष्ट्राचा आधारस्तंभ विश्वास आणि श्रीमंतांचा पाठिंबा रणशूर भाऊ यांचा घात केला, त्या अहमद-शहाचा कंठ चरचर चिरून त्याच्या रक्तानें विश्वास-भाऊंना ओंजळीओंजळीनें अर्घ्य देणार आणि अपुऱ्या इच्छेनें मरण पावलेले त्यांचे आत्मे शांत करणार, तेव्हांच हा रघुनाथ फिरून आपल्याला तोंड दाखवील. हा वाघ जिवंत अस-तांना ते लांडगे गिलचे माझ्या कच्याबच्यांची कत्तल करतात काय ? माझ्यांत बाबांच्या वीरश्रीचें जर कांहीं पाणी असेल, तर त्यांच्या पायांच्या पुण्याईनें आणि तुह्मां दोघांच्या आशीर्वादानें त्या गिलच्याला लाथेच्या ठोकरीसरसा जमीन-दोस्त करीन. येतों मी आतां. छत्रपती शिवाजी महाराज सर्व समर्थ आहेत.

गोपिका:—पण—

परंतु 'पण' ऐकायला तेथें कोण होतें ? राघोबा एकदम तडफीसरसे बाहे-रच पडले. या वेळीं पहांटेचा चौघडा झडूं लागला होता. रघुनाथराव बाहेर

पडले, ते दिल्ली दरवाजाशीं तयार असलेल्या घोड्यावर चढले. घोड्याचा लगाम एकदां खेंचून त्यांनीं आपल्या कुलदैवतांचें, छत्रपतीचें आणि पेशव्यांच्या गादीचें चिंतन करून एकवार वर मान करून दिल्ली दरवाजावर फडकत असलेल्या भगव्या झेंड्याला आणि जरीपटक्याला समशेर वांकवून मुजरा केला आणि एकदम "छत्रपती शिवाजी महाराजकी जय !" "हर हर महादेव" ची प्रचंड गर्जना करून आपलें लष्कर घेऊन एकदम गारपीरावर दाखल झाले. तेथें येतांच तावडतोब कूच करण्याचा नगारा झाला आणि सर्व सैन्य वायूच्या वेगानें उत्तरेकडे चालतें झालें.

मजल दरमजल करीत स्वारी जयपुरला दाखल झाली. तेथल्या राजापासून खंडणी वसूल करून अहमदशहाचा तलास करीत स्वारी पुढें चालती झाली. अहमदशहाला पानपत युद्धांत जरी विजय मिळाला होता, तरी पण त्याचें नुकसानही तसेंच भयंकर झालें होतें. पोटचे प्रत्यक्ष दोन मुलगे व एक जांवई लढाईंत पडले; लाखों शिपायांची कत्तल उडाली आणि कल्पनातीत संपत्तीचाहि चुराडा झाला. जेमतेम बेतापुरतें सैन्य घेऊन तो स्वदेशीं चालला होता. इतक्यांत त्याला भरारीची भरारी आली असें वर्तमान कळलें मात्र, तोंच तो खचला. रागारागानें दाढी तोडीत तो म्हणाला "या इलाही ! अब क्या करूं ? इस सैतानके हातसे मेरेकू कौन बचावेगा ? भरारी, वो शैतान भरारी, बेशक मेरी जान लियेबगर नहि छोडेगा" त्याची स्वारी सिंधूनदी आणि काबूल नदी यांच्या संगमावरच्या अटकेपर्यंत जाऊन पोंचली, अशी बातमी राघोबाला मिळतांच त्यानें एकदम जरीपटक्याचा हत्ती त्या दिशेकडे फिरविण्याचा हुकूम फर्मावला. टांकोटांक भरारीची वायूगतीची भरारी अहमदशहाच्या सैन्याला जाऊन भिडली ! सैन्य दृष्टीस पडतांच राघोबानें मोठी आरोळी मारून भयंकर गर्जना केली—"हरामखोरा, अहमद्या उभा रहा. सिंहाला सतावून घरीं जिवंत पळतोस काय ?" गर्जना कानीं पडतांच शहाचा प्राण निम्मे गेलाच. हल्ला सुरू झाला. तलवारीवर तलवारी खणखणूं लागून त्यांतून विस्तवाच्या ठिणग्या पडूं लागल्या. प्रेतांचे ढिगावर ढीग पडूं लागले. राघोबाची स्वारी उसाळी सरशी शहाच्या तंबूंत घुसली. त्याला त्वेषानें तंगडी धरून कोचावरून खालीं ओढून तो शस्त्र सांवरतो न सांवरतो तोंच छातीवर एक लाथ मारून भरारीची स्वारी त्याच्या उरावर बसली. "सर्व अपराधांचें एकवार स्मरण कर" म्हणून त्याला दरडावून सांगून स्वारी लालबुंद डोळे करून त्याच्याकडे पाहूं लागली. प्रत्यक्ष

कृतांत काळाच्याहि डोळ्यांत इतकी तेजस्विता व क्रूरता वसत नसेल, असें त्यावेळीं शहास वाटलें. तो अगदीं अर्धमेला होऊन गेला. राघोबाचे ते डोळे सूडाचा मूर्तिमंत अग्नीच ओकत होते. 'अहमदशहा ! हा पहा राघू भरारी तुझ्या अपराधाबद्दल तुझा सूड घ्यावयाला तुझ्या नरड्यावर बसला आहे. दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, विश्वासराव, भाऊसाहेब यांच्या मृत्यूबद्दलचा सूड आज तुझ्या नरड्यांतील रक्त घटघट पिऊन मी शांत करतों पहा.' असें म्हणून शहाच्या कंठावर कट्यार फिरविली. रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या. राघोबानें एकदम त्याच्या नरड्याला आपलें तोंड लाऊन रक्त पिण्यासाठीं आपला आ पसरला, तोंच पाठीमागें असलेल्या रणजितसिंग नांवाच्या रजपूत सरदारानें त्यांना आंवरून धरलें. शहाच्या सर्व सैन्याचा फडशा उडाला आणि अशा रीतीनें **मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेला फडकला.**

[ मुबइ, राष्ट्रमत, १९.०७. ]

---

# उत्तिष्ठत, जाग्रत ! उठा, जागे व्हा ! !

अमृताची रुची, स्वर्गांतलें सौख्य, कामधेनूचें रत्नभांडार आणि कल्पवृक्षाचा



इच्छाफलदायी पराक्रम यांच्या कल्पना अनेक पुराणकारांनीं वर्णिल्या, पण त्यांची प्रत्यक्ष प्रचिती मात्र कोणीहि, खुद्द पुराणकारांनीं सुद्धां, घेतल्याचा दाखला नाहीं. मानवी जीवनाच्या ओघावर नुसती ओझरती नजर टाकली तरी त्यांत आशेपेक्षां निराशेची शेवाळच जास्त माजलेली. मनुष्यानें सुखाकरितां, शांतीकरितां, समृद्धीकरितां धडपडत रहावें आणि या तीनहि स्थिति निराशेच्या शेवाळीखालीं गुपचुप दडूनच रहाव्या, असला विचित्र अनुभव नसणारा माणूस म्हणजे प्रदर्शनासाठीं पेंढा भरून ठेवण्यालायक चीजच समजली पाहिजे. व्यवसाय कसलाहि असो, त्यांत निराशेचीं ढगारें तेलंगी भिक्षुकांप्रमाणें न

बोलवतां आपण होऊन मागणीच्या दसपट पुरवठ्यानें दत्त म्हणून नेहमींच उभीं असतात. अशा प्रसंगीं शिरोभागीं दिलेल्या चित्राप्रमाणें चैतन्य देवता एकाकीं आपल्याजवळ येऊन उभी रहावी, तिनें गोड उत्तेजक वाणीनें 'गड्या उमेदवार तरुणा!' अशी ह्यांक मारून, आशेच्या किरणांचा मूळ सांठाच आपल्याला बिनचूक दाखवून द्यावा आणि गलितधैर्य बनलेल्या आपल्या हृदयांत उत्साहाचा फुंकर घालून त्याला तात्काळ हिंमतवान् बनवावें, असला योगायोग कधिं काळीं कोणाला लाभलाच तर त्याची गोडी अमृताला लाजवील, स्वर्गाला खिजवील, कामधेनूला थिजवील आणि कल्पवृक्षाला आपल्या संपन्नतेनें नखशिखान्त भिजवील. आशेचा एक किरण, उपदेशाचा अनुभवसिद्ध एक वळसा आणि कर्तव्यबुद्धीला जागृत करणाऱ्या प्रबोधनशक्तीचा एकच फुंकर, या तीन गोष्टींचा अभाव महत्वाकांक्षी तरुणांच्या साऱ्या हिमतीला असून नसून सारखी करतो. नुसतें आत्म्याचें अस्तित्व एकटें कांहीं करूं शकत नाहीं. त्याला पंचतत्वाच्या देहाचें आवरण द्या कीं तात्काळ तो नर किंवा नारीपणानें नारायणपदाचा आक्रम करण्यास सिद्ध होतो. तद्वतच नुसत्या महत्वाकांक्षेची वाफ कितीहि भरपूर असली तरी वरील तीन तत्वांचें कवच जर तिला लाभलें नाहीं, तर ती वाफ वारेमाफ खर्च होऊन फुकटच जाईल. तरुण तरुणींच्या महत्वाकांक्षांची वाफ अशा रीतीनें फुकट जाऊं देणें हें राष्ट्रहितदृष्ट्याहि फार घातक आहे, हें विचारवंतांस सांगणें नलगे.

विचारांची उत्क्रान्ति होण्यासाठीं श्रवण मनन निदिध्यास असा त्रिदळी मंत्र आमच्या आर्यपूर्वजांनीं आम्हांस वंशपरंपरा बहाल केलेला आहे. पैकीं उपनयनोत्तर गुरुसंनिध शिक्षणाची पद्धत हद्दपार झाल्यामुळें श्रवणाची जागा वाचनानें पटकविली आहे आणि गुरुजनांनाहि मुमुक्षु छात्रांसाठीं ग्रंथद्वारां आपल्या जिव्हा हजारों मैलपर्यंत लांबविणें भाग पडलें आहे. सध्यां गुरूंची जागा ग्रंथांनीं पटकविली आहे आणि विचारक्रान्तीच्या मंदीराच्या पायऱ्यांचा अनुक्रम ( १ ) वाचन ( २ ) मनन आणि ( ३ ) निदिध्यास असा लागलेला आहे. अर्थात् ग्रंथकर्तृत्वाचें सामर्थ्य हातीं असणारांवर केवढी जबाबदारी असते आणि निराशेच्या जंगलांत वाट चुकलेल्या उमेदवार तरुणांना त्यांच्यापासून कोणत्या प्रकाशाची अपेक्षा असते, हें वाचकांनीं ताडलेंच असेल. शेजाऱ्यापाजाऱ्याच्या आप्तेष्टांच्या किंवा सनदी उपदेशकांच्या अनुशासनावर सर्वस्वी विसंबून न रहातां, केवळ स्वावलंबनाच्या जोरावर आत्मोद्धार करूं इच्छिणाऱ्या तरुणांना उत्तेजक वाङ्मयाची फार तीक्ष्ण जाणीव भासत असते. कर्तव्याचीं पावलें अशीं टाकूं कीं तशीं टाकूं, निरा-

शेच्या गर्द धुक्यांत निष्कारण कोणाशीं टक्कर लागूं नये म्हणून माझ्या हिमतीचा हापटबार येथेंच वाजवूं कीं पुढें कोठें तरी वाजवूं आणि मी तुडवीत आहें ती पाऊलवाट संतमहंतांची आहे कीं चोरलुटारूंची आहे, अशी संशय-कंटक-माला हरदिन हरघडी त्याच्या पुढें गुहेंत दडलेल्या वाघाप्रमाणें गुर्र गुर्र करून भेडसावीत असते. अशा वेळीं प्रत्येक स्वावलंबी तरुण उत्तेजक वाङ्मयासाठीं तान्हेलेला असतो व त्याच्या प्रगतीच्या मार्गावर उत्तेजनाचें व उत्साहाचें एकच किरण फेंकणारा चार ओळींचा चिठोरा जरी त्याला हस्तगत झाला तरी त्याची महति त्याला चतुर्वेदांपेक्षां अधिक वाटते. फार काय पण जीं सूत्रें आपण नेहमीं वाचतों व भाषणप्रसंगीं सहजगत्या बोलून जातों, अशा एकेका सूत्राच्या निव्वळ मनन-निदिध्यासानें शेंकडों नर नारायण बनल्याचीं उदाहरणें पाहूं इच्छिणारांनीं 'नोटेबल्स ऑफ ग्रेट ब्रिटन' हा सचित्र ग्रंथ आढळल्यास पहावा.

आपल्याकडे उत्तेजक सूत्रांचा जरी तुटवडा नसला तरी तींच सूत्रें चटकदार पेहरावांत सुटसुटीत आख्यानांच्या द्वारें मांडणाऱ्या स्फूर्तिदायक वाङ्मयाचा यत्न मात्र मुळींच कोणी केलेला दिसत नाहीं. यावर आक्षेपक रामायण महाभारताकडे बोट दाखवितील; पण त्यांना आम्ही एवढेंच सांगूं कीं बुडणारा माणूस 'पोहण्याची कला' या उपयुक्त पुस्तकाच्या दर्शनानें किंवा स्मरणानें वांचत नाहीं. त्याला तात्कालिक सक्रीय मदतीची अपेक्षा असते. निराशेच्या जंगलांत वाट चुकून हतबुद्ध झालेल्या तरुणाला तात्कालिक उत्तेजनाची आवश्यकता असते, रामायण महाभारताचीं पारायणें करण्याची मुळींच नसते. त्यांतून या दोन ग्रंथांवर दैवीपणाच्या शेंदराचीं पुटें दाट चढविल्यामुळें प्रत्यक्ष संसारांत वावरणारा इसम तात्कालिक स्फूर्तीच्या कणासाठीं या ग्रंथांच्या असंख्य दालनांतून भटक्या मारण्यास केव्हांहि संकोचच बाळगिणार. हे ग्रंथ सहसा प्रत्येक बऱ्यावाईट स्थितीच्या माणसाला स्वाध्यायार्थ सुलभ नसतात; आणि ज्या प्रकारच्या वाङ्मयाबद्दल आमचा विशेष कटाक्ष आहे, तें वाङ्मय रामायण किंवा महाभारतांत मुळींच नाहीं. तानाजी पडल्यानंतरचा शेलारमामाचा आवेश निराशामग्न तरुणाला कार्यक्षम बनविण्यास जितका उपयोगी पडतो, तितका रामायणांतला तसलाच एखादा प्रसंग मुळींच पडत नाहीं.

आमच्याकडे निर्माण होणारें कोणतेंहि वाङ्मय घ्या, त्यांत स्माईल्सनें लिहिलेल्या ड्यूटी, थ्रिफ्ट इ. प्रकारचें वाङ्मय मुळींच दिसत नाहीं. बरें, ज्यांनीं असल्या कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें केलीं, त्यांना तीं मुळींच साधलीं नाहींत. सारीं

येथून तेथून निर्जीव पोंचट व रुक्ष ! उदाहरणार्थ दाभोळकर सीरीजचे ग्रंथ पहा. स्वावलंबी तरुणांना असलें वाङ्मय पाहिजे कीं त्यांतली एखादीच मथळ्याची ओळ वाचतांच त्यांच्या गूढ व सुप्त कर्तबगारीनें टाणकन् उसाळी मारली पाहिजे. हें वाङ्मय भीक मागणाऱ्या साक्षर भिकाऱ्यापासून किंवा मजुरदारांपासून तों उपलब्ध सर्व पदव्या पटकावून बसलेल्या बृहस्पतीपर्यंत सर्वांना सवसारखें स्फूर्ति-प्रेरक व योग्य मार्गदर्शक असलें पाहिजे. याला 'उत्तेजक वाङ्मय'हें नांव असलें तरी त्याच्या उत्तेजनाचा परिणाम माथेफिरूपणा निर्माण करण्यांत होत नसतो. हल्लीं कित्येक वर्तमानपत्रांत व मासिकांत ' उत्तेजक ' म्हणून जें वाङ्मय प्रसिद्ध होत असतें, तें विचारापेक्षां विकारांना खळबळविण्याचेंच कार्य करितें व त्यापासून तरुणजनांत कर्तबगारीची खरी प्रेरणा उत्पन्न न होतां भरवसाट माथेफिरूपणाच जास्त वाढतो. अर्थात् या वाङ्मयाला ' उत्तेजक वाङ्मय' न म्हणतां **माथेफिरू वाङ्मय** असेंच म्हटलें पाहिजे. विकार कितीहि क्षुब्ध झाले तरी त्यांच्या उसळीची लाट तात्पुरती असते; पण तेच विचार जर पद्धतशीर मार्गानें परिणत होत गेले तर मनुष्याच्या जीवनांत विलक्षण क्रान्ति घडून, त्याच्या कर्तबगारीचे रंग एकामागून एक उमलूं लागतात. आजपर्यंत प्रसिद्धीस आलेले कर्तबगार लोक विकारी वाङ्मयापेक्षां विचारी वाङ्मयानेंच जगाला दिलेले आहेत. अशा प्रकारचें वाङ्मय इंग्लंडमध्यें प्रथमतःच सुरू करण्याचें पुण्यकार्य **पीटर कीरी** नामक गृहस्थानें केलें व आमच्या महाराष्ट्रांत तें 'किर्लोस्कर खबर'च्या द्वारें **किर्लोस्कर शंकरराव** यांनीं केलें आहे. पीटर कीरी हे स्वावलंबनानें अत्यंत हीनावस्थेंतून उन्नतावस्थेंत गेलेले कर्मवीर होते. ते हमाली करतां करतां इंग्लंडचे जस्टिस ऑफ पीस झाले. त्यांनीं आपल्या कर्मयोगाचा गुरुमंत्र(१)Secret of Success (२)Get on or Get out (३) Success after Failure आणि (४) Do it now या चार सुबोध ग्रंथांत नमूद करून ठेवलेला आहे. हे चार मथळेच इतके मार्गदर्शक आहेत कीं पुस्तक न वाचतांहि हतबुद्ध तरुणाला कार्यक्षम व उत्साही बनविण्यास समर्थ आहेत. आत्मनिरूपणाबद्दल वाचकांची क्षमा मागून एवढेंच सांगतों कीं पीटर कीरीच्या 'गेट ऑन् ऑर गेट आऊट' या पुस्तकाच्या नुसत्या दर्शनानें प्रस्तुत लेखकाच्या चारित्र्यांत एका भयंकर प्रसंगीं विलक्षण क्रान्ति घडून आली. तो प्रसंग असा होता कीं धरलें तर चावतें व सोडलें तर पाठी लागतें. अशा वेळीं Get on or Get out ही सूचना किती सहाय्यक झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. पीटर कीरीच्या ग्रंथांनीं लक्षावधि

बहकलेलें तरुण उन्नतीच्या मार्गाला लागल्याची साक्ष खुद्द लंडन टाईम्सनें दिली आहे. आह्मी स्वानुभवानें आमच्या सर्व वाचकांना सांगतों कीं काय वाटेल तें करून—तुह्माला इंग्रजी भाषा येत असेल तर–पीटर कीरीचे वरील ग्रंथ वाचल्या-शिवाय मुळींच राहूं नका. तुमच्या जीवनावर दैवी प्रकाश पडेल. निराशेनें खचलेली तुमची छाती तट्ट फुगून फुरफुरूं लागेल. 'माथेफिरू' वाङ्म-याची तुम्हाला वाध होणार नाहीं आणि तुमचें ध्येय साध्य करण्यासाठीं तुमच्या कर्तबगारीचें योग्य प्रमाणांत अनिर्वचनीय प्रबोधन होईल. ही कामधेनु ताईताची जाहिरात नव्हे, हा कळकळीचा प्रेमळ संदेश आहे.

[ प्रबोधन, १–७–२२ ]

# चिरंजीव कोण ?

स्थावरजंगम जगताला निश्चयानें बिनमुर्वत गिळून फस्त करणाऱ्या काळाला सर्वभक्षक म्हणतात, तें अक्षरशः खरें आहे. अनंत मन्वंतरांची चटणी तोंडीं लावून शेंकडों युगानुयुगांना आपल्या विश्वव्यापी उदरांत रिचविणाऱ्या काळापुढें कोणत्याहि सत्तेची मात्रा लवमात्र चालत नाहीं; म्हणूनच 'कालाय तस्मै नमः' असा एकजात सर्व तत्ववेत्त्यांनीं काळास प्रणिपात ठोकलेला आहे. काळाचा जबडा जसा सर्वव्यापी आहे, तशी त्याची जिव्हा व दाढा या बेगुमान आहेत. त्यांना कोणत्याहि गोष्टीच्या प्रचंडत्वाची किंवा क्षुद्रत्वाची मुळींच क्षिति वाटत नाहीं किंवा रुची अरुचीची पर्वा भासत नाहीं. मोठमोठीं विस्तृत साम्राज्यें घशाखालीं लोटतांना काय, किंवा एखाद्या अज्ञात खेड्याचें उच्चाटन करतांना काय; एखादा जगज्जेता शिकंदर किंवा अशोक दाढेखालीं काडकन् फोडतांना काय, किंवा मातीमोल लांबलचक आयुष्याला कंटाळून निर्जन वनांत मरणाऱ्या भणंग भिकाऱ्याला झटपट गिळतांना काय; मर्यादित बुद्धिमत्तेच्या जोरावर सृष्टींतील गूढ आद्यतत्वांचा शोध लावून सृष्टिविधात्या परमेश्वरावर बेछुट मात करणाऱ्या ज्ञानेश्वराला बोल बोलतां अल्पवयांत कोवळ्या काकडीप्रमाणें गट्ट करतांना काय, किंवा 'देवा माझे डोळे मिटव रे लवकर' अशी रात्रंदिवस याचना करीत अज्ञान व दारिद्र्यांत खितपत पडलेल्या शतायुषी प्राण्यावर 'देवाज्ञे'चा उपकार करतांना काय; काळाला योग्यायोग्यतेची किंवा बऱ्यावाईटाची चाडच नसते. काळाची

झांपसुद्धां इतकी जबरदस्त कीं हजारों वर्षें वैभवपूर्ण साम्राज्यसत्ता गाजविलेल्या जगद्व्यापी राष्ट्रांची स्मृतिसुद्धां त्यानें आज अक्षरशः नामशेष केलेली आहे. केवढें प्रचंड तें रोमन साम्राज्य, किती विशाळ ती ग्रीक संस्कृति, चंद्रगुप्त मौर्य सम्राटाचा केवढा तो दरारा, अशोकाच्या धर्मसंवर्धनाची कसली ती त्रिखंड-व्यापी मिशनरी चळवळ, माधवारण्यांनीं स्थापन केलेल्या विजयनगरचा काय तो त्रिभुवन-निनादित बोलबाला, मुष्क हिन्याच्या अत्तराप्रमाणें साऱ्या युरोप आशियाभर दणाणणारी दिल्लीच्या मोंगल बादशाहीची केवढी ती ऐश्वर्याची लकाकी; पण आजला त्यांच्या नाममात्र स्मृतीशिवाय विशेष काय उरलें आहे बरें? सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणें या दृश्य सृष्टींत हे निरनिराळे चित्ताकर्षक देखावे निर्माण करण्याची ज्या काळाला लहर आली, त्या काळाच्या उदरसागरांतच त्या देखाव्यांच्या लहरी अखेर विलीन झाल्या!

काळाचा दांत कितीहि तीक्ष्ण असला आणि त्याचा दंश कितीहि स्मृतिविध्वंसक असला तरी त्याच्या तीक्ष्ण दंशाला दाद न देतां त्याच्या नांगीला बोथट करण्यांत महशूर असें एक तत्व या मर्त्यलोकांत आहेच आहे. मर्त्य मानवांना अमर करण्यांत, त्यांना चिरंजीव बनविण्यांत, याच तत्वानें प्रत्यक्ष काळाशीं त्रिकालाबाधित झगडा चालवून त्यावर आपल्या पराक्रमाचा बिनतोड शह ठेवून दिला आहे. या तत्वानें मृत्युलोकच्या इतिहासाला जिवंत ठेविलें आहे. काळाच्या अक्राळविक्राळ दाढा या तत्वाचें पीठ करण्यास धजावतांच खुद्द त्यांचेंच पीठ पडण्याचा प्रसंग काळाच्या पूर्ण अनुभवाचा असल्यामुळें, या तत्त्वाच्या वाटेस सहसा जाण्याच्या भानगडींत तो पडत नाहीं. मृत्युलोकींच्या अनंत कटुतम आधीव्याधींच्या जहरांतसुद्धां अखेर अमृताचा स्वाद निर्माण करणारा मसाला याच तत्त्वाचा असतो. मानवी सत्ताधाऱ्यांच्या जुलमी अत्याचारांस बळी पडलेल्या देवभक्तांच्या किंवा देशभक्तांच्या रक्ताच्या थेंबागणित अनंत देवभक्त व देशभक्त निर्माण करणारें तत्व तें हेंच. या तत्वाच्या उपासकांचे देह जरी सृष्टिक्रमानुसार नष्ट होतात, तरी त्यांच्या तत्वोपासनेचा अग्नि विझविण्याचें कार्य खुद्द सर्वविध्वंसक काळालाहि आजपर्यंत शक्य झालें नाहीं. हा अग्नि विझत तर नाहींच, पण धांवत्या काळाच्या सोंसाट्यानें उलट अधिकाधिक चेतविला मात्र जातो. असें हें अजिंक्य तत्व तरी कोणतें? आणि या तत्वाचे उपासक ते कोण? या मर्त्य जगांतलें अमर्त्य तत्व म्हटलें म्हणजे **सत्य** हें होय आणि या तत्वाच्या उपासकांना **सत्यशोधक** असें म्हणतात.

सत्य सर्वव्यापी आहे. मानवजातीच्या उत्क्रांतीला सहायभूत अशा सर्व क्षेत्रांचा इतिहास सत्यशोधकांनीं आपल्या निष्काम कर्तव्यानेंच आजपर्यंत रंगवून, आपण **चिरंजीव** आहोंत असे खुद्द सर्वभक्षक काळाच्या तोंडून वदवून घेतलें. सत्यशोधकांचा इतिहास अत्यंत विस्तृत आहे. किंबहुना असेंच म्हणणें अधिक श्रेयस्कर होईल कीं जगाच्या प्रगतीचा इतिहास हाच सत्यशोधकांचा इतिहास होय. विद्वज्जनांनीं देवाला अनेकवचनीं नटविला तरी तो एकवचनी 'एकच देव' आहे, हें सत्यशोधन उपनिषत् ग्रंथद्वारें जाहीर करणाऱ्या जनकादि सत्यशोधकांपासून तों विद्यमान सत्याग्रही महात्मा गांधीजीपर्यंत ही सत्यशोधकांची ऐतिहासिक परंपरा अखंड चालूच आहे. मूलतः सत्य तत्वच विनमुर्वंत असल्यामुळें त्याच्या उपासकांच्या चारित्र्यांत आग्रहीपणाची ताठर प्रवृत्ति विशेष आढळल्यास कांहीं नवल नाहीं. या आग्रही प्रवृत्तीमुळें सर्व सत्यशोधकांचा, सामान्य जनतेच्या अंधश्रद्धेच्या जोरावर, सत्ताधाऱ्यांकडून अनन्वित छळ, उपहास व कित्येक वेळां प्राणहानीहि झाल्याचें इतिहासांत नमूद आहे. सत्यशोधकांचा सत्याचा संदेश त्यांच्या समकालीन जनतेला सर्वस्वी रुचल्याचें व पचल्याचें उदाहरण दुर्मिळ आहे. आमच्या प्राचीन इतिहासावर पुराणांचा कचरा सांवडल्यामुळें त्याच्या खऱ्या स्वरूपाचा थांग लागणें जरी दुरापास्त झालें आहे, तरी युरपमध्यें सत्यशोधकांच्या छळाचा इतिहास अझून स्वच्छ राहिलेला आहे. तिकडील जनतेनें सत्यशोधक येशूला क्रॉसवर टांगून ठार मारलें. ब्रूनोला भर चव्हाट्यावर उभा जाळला. कोणाचे डोळे काढले, कोणाचे कडेलोट केले, कोणाला उपासमारीनें मारले, वगैरे अगणित अमानुष अत्याचार केले. निरनिराळ्या क्षेत्रांतील सत्यशोधकांची अशा रीतीनें प्राणहत्या झाली, तरी त्यांच्या सत्यतत्वाची हानी मुळींच न होतां, वाऱ्याच्या सोसाट्यानें विस्तवाची क्षुल्लक ठिणगी जशी बोलबोलतां भयंकर प्रळयाग्नींत रूपांतर पावते, तशी त्यांच्या मिशनची तीव्रता त्यांच्या प्राणहानीनें किंवा उपहासानें दिवसेंदिवस अधिकाधिक तिखट होत जाते. सत्यशोधकाचा वाणा सतीच्या वाणाप्रमाणें आहे. सत्याची कसोटी म्हणजे सत्यशोधकाच्या जीवाचें दिव्य होय. त्याला सत्यापुढें प्राणाची तमा लवमात्र नसते. लोकमान्यतेची त्याला पर्वा नसते. त्याच्या बाजारांत निंदास्तुतीची किंमत एकच ठरते. त्याची दृष्टी उच्च सत्याच्या केंद्रावर खिळलेली असल्यामुळें, पायाखालीं वावरणाऱ्या 'खालमुंड्या मुलुखधुंड्या' जनतेच्या लौकिकी आचार विचारांच्या धसळामुसळीकडे सत्यशोधकाचें लक्षच रहात नाहीं; किंवा

आपल्या सत्याग्रहामुळें एखाद्या सत्ताधाऱ्याच्या नाकाडावर आपला पाय पडत आहे, एकाद्या धर्ममार्तंडाच्या छाताडावर आपल्या सत्यशोधनाची धोंड पडून त्याचा जीव कासावीस होत आहे, किंवा आगापीछा न पहातां निवळ हुल्लड करण्यांतच जीवितसाफल्य मानणाऱ्या अंधश्रद्धाळू जनतेच्या झुकत्या लहरीवर स्पष्टोक्तीचा पाय तिरपा पडल्यामुळें त्यांत आपला पूर्ण कपाळमोक्ष होणार आहे, याची क्षिति सत्यशोधक महात्म्यांस मुळींच नसते. देह जावो अथवा राहो पांडुरंगीं माझा भावो. पांडुरंग सत्याचा असतो. त्या सत्यासाठीं जीवितसर्वस्वावर पाणी सोडणारा सत्यशोधक **चिरंजीव** कां म्हणूं नये ?

[ प्रबोधन १६-३-२२. ]

---

# शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली.

सृष्टीच्या जन्मापासून तिनें अनंत वेळां अरुणोदयाचा मंगल सोहळा आपल्या



डोळ्यांनीं पाहिला. ज्या एकजिनसी प्रेमसूत्रांत परमेश्वरानें सारी स्थावर जंगम दुनिया निगडित केलेली आहे, त्या प्रेमसूत्राशीं आपल्या निष्कलंक मृदुल हृदयाची तार एकतान करून, अनेक महाकवींनीं आपल्या ओजस्वी प्रेमोद्गारांचे अर्घ्य अरुणोदयकाळीं स्वयंप्रकाशी तेजोनिधीला अर्पण करून, खुलत्या मनोवृत्तीला चालत्या बोलत्या काव्यांत प्रतिबिंबित केलें. मानवी अंतःकरण हें जात्याच काव्यमय असतें. अशा कोट्यवधि अंतःकरणांच्या काव्यप्रवृत्तीला स्फूर्तीचें सहाय नसल्यामुळें त्यांना अरुणोदयाचा सोहळा जरी दृश्य शब्दचित्रांत व्यक्त करवला नाहीं, तरी सौंदर्यबहारानें प्रफुल्लित झालेल्या मुग्ध तरुणींच्या मुग्ध भावनांप्रमाणें त्यांनीं आपल्या हृदयांना डोळ्यांत केंद्रीभूत

करून आनंदाश्रूच्या एकच टिपक्यानें अरुणाचें स्वागत केलें. अरुणोदयाचा हा मंगल सोहळा सृष्टीच्या अंतापर्यंत असाच चालणार. दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस, या सनातन क्रमानुसार राष्ट्राच्या चरित्रांत स्वातंत्र्यामागून गुलामगिरी व गुलामगिरीच्या पाठोपाठच स्वातंत्र्य, हा भरतीओहटीचा क्रम अखंड चालू असलेला स्पष्ट दिसतो. ज्या अरुणानें एक दिवस हिन्दूंच्या विजयनगर साम्राज्याची धडाडलेली होळी पाहिली, त्याच अरुणाला पुढें एक दिवस त्याच हिन्दुसाम्राज्याचा जरीपटका उजळ माथ्यानें रायगडावर फडफडतांना पाहून त्याला अदबीनें मुजरा करावा लागला. हिन्दु धर्माच्या ज्वलज्जहाल अभिमानाच्या पायीं शरीरावयवांचे राईराईएवढे तुकडे होऊन, रट रट उकळणाऱ्या क्षत्रिय रक्ताच्या पुरांत अस्ताव्यस्त पडलेलें शंभूछत्रपतीचें प्रेत ज्या अरुणानें आरक्त डोळ्यांनीं पाहिलें, त्याच अरुणाला मानी मराठ्यांच्या राजकारणी कर्तबगारीचे व दिल्लीपतीच्या पहारेबंद अंतःपुरांत घुसून स्वप्नसृष्टींत सुद्धां त्याच्या काळजाचें पाणीपाणी करणाऱ्या भाल्याच्या तिखट पात्याच्या पराक्रमाचें इंद्रतुल्य प्रदर्शन जिंजीच्या किल्ल्यावर एकवटलेलें दिसलें. कडव्या इस्लाम सत्तेच्या धांगडधिंग्याला छातिठोक पायबंद चढवून रायगडची राजलक्ष्मी सातारच्या अजिंक्यताऱ्यावर स्थापन करणाऱ्या शाहुछत्रपतीचा राज्यारोहणसोहळा पाहून ज्या अरुणानें समुद्रवलयांकित वसुंधरेवर आनंदाच्या सुवर्णाश्रूंचा सडा घातला, त्याच अरुणाला छत्रपतीच्या सत्तासूर्याला पेशवाईचें खग्रास ग्रहण लागलेलें पाहून, सारी दुनिया दुःखाश्रूंच्या मुसळधार वर्षावानें धायधाय रडत बसलेली पहाण्याचा कुप्रसंग आला. हिन्दुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाच्या ज्या अव्यक्त परंतु प्रत्यक्ष भासमान चैतन्यानें प्रचंड सह्याद्रीचे उंचउंच कडे व दरीखोरीं गदगदा हालवून, मावळच्या रखरखीत धुळीच्या कणाकणांतून काळाचे काळ असे कर्दनकाळ मावळे निर्माण केले; ज्या चैतन्याच्या हिंमतीवर तानाजीनें सिंहगडाच्या नरडीचा घोंट घेतला; ज्या चैतन्याच्या वावटळींत सुरतपाक सुरतेचा नखरा उतरून सारा गुजराथ प्रांत महाराष्ट्राचा दर्यालगत देवडीवरचा हुजऱ्या बनला; ज्या चैतन्यानें राष्ट्रांतल्या व्यक्तिमात्राला गुणकर्माच्या पुण्यांशानुसार उदयास आणून, जन्मसिद्ध श्रेष्ठकनिष्ठ भावनेचा गागाभट्टा समक्ष मुरदा पाडला व जातिभेद-राक्षसाच्या रक्ताचा टिळा श्रीशिवछत्रपतीच्या कपाळीं रेंखून हिन्दुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाचा संदेश जाहीर करणाऱ्या तोफांच्या सरबत्तीचा दणदणाट जगाच्या कोनाकोंपऱ्यांत नेऊन भिडविला; त्याच तेजःपुंज उदार क्षात्र चैतन्याला पेशव्यांच्या

संकुचित स्वार्थी अशा ब्राह्मणी संस्कृतीचें खग्रास ग्रहण लागतांच, हिन्दूंच्या राष्ट्रीय महत्वाकांक्षेचें कपाळ पानपतास फुटलें. इतर अनेक गुणकर्मजन्य राष्ट्रशक्तींचा समूळ उच्छेद करून, शुद्ध भिक्षुकी वर्चस्वाची एकमुखी सत्ता राष्ट्राच्या बोकांडीं बसली असतां त्या राष्ट्राच्या सर्व संस्कृतीचा अल्पावकाशांत निःपात कसा होतो, याचीं ठळक ठळक उदाहरणें जगांतल्या मुख्यमुख्य राष्ट्रांच्या इतिहासांत कितीहि असलीं, तरी भिक्षुकी सत्तेच्या एकमुखी वर्चस्वानें झालेलें पानपताच्या अधःपाताइतकें चिळस आणणारें उदाहरण पूर्वी कधीं झालें नाहीं व पुढें कधींहि न होवो ! पेशव्यांच्या भिक्षुकी सत्तेनें महाराष्ट्राच्या शिवशाहीला पानपतास तोफेच्या तोंडीं देऊन तिच्या राईराई एवढया ठिकऱ्या ठिकऱ्या केल्यानंतर, महाराष्ट्राच्या राजकीय धार्मिक व सामाजिक जीवनांत अनेक भिक्षुकी उत्सवमूर्तींनीं आपल्या गुणकर्मसिद्ध अत्याचारी प्रवृत्तीची रग जिरवून घेतली. या अत्याचारांचा इतिहास इतका अलीकडचा आहे, व त्याची परंपरा चालविणारे इतके अभिमानी सांप्रदायिक आज घटकेला सुद्धां आमच्या उघड्या डोळ्यांसमोर बेशिस्त नाचत आहेत कीं हा दुष्ट ऐतिहासिक चित्रपट स्मृतिआड करूं म्हटलें तरी होत नाहीं. श्रीशाहुछत्रपतीच्या छत्राखालीं एकवटलेल्या मऱ्हाटेशाहीच्या वैभवकाळापासून तों पापस्मरण चिंतामणी सांगलीकर, बाळा नातू प्रभृति नरपशूंनीं छत्रपति प्रतापसिंहाची व त्याच्या बरोबरच शिव छत्रपतीच्या छत्रचामरासिंहासनाची होळी करीपर्यंतच्या बीभत्स भेसूर व मनोवृत्ति प्रक्षुब्ध करणाऱ्या लांबलचक ऐतिहासिक चित्रपटाचे निरनिराळे देखावे ज्या अरुणानें पाहिले, त्याच अरुणाला येत्या १९ नवंबरच्या दिवशीं

**शिवराया प्रणिपात कराया ब्रिटानिया आली**

हा नवयुगांतला कल्पनातीत मंगल सोहळा पाहण्याचा कपिलाषष्ठीचा योग लाभणार आहे. हा योग अरुणाला लाभूं नये; या योगाचें प्रदर्शन निमकहराम पेशव्यांच्या पुण्यांतील शनिवार वाड्याच्या छाताडावर भरलें जाऊं नये; ज्या कृतघ्न नोकरांनीं आपल्या धन्याचा विश्वासघात करून हिन्दुपदपातशाहीचा खून केला, त्यांच्या वाड्याच्या नाकासमोर, गेल्या महायुद्धांत धारातीर्थी पतन पावलेल्या मराठे वीरांचें स्मारक व श्रीशिव छत्रपतीचा भव्य स्मारक पुतळा उभारण्यासाठीं कृतज्ञ बुद्धीनें येणाऱ्या ब्रिटानियेच्या प्रतिनिधीला या सोहळ्याचें पुण्य लाभूं नये, ह्मणून या स्मारकामुळें भिक्षुकशाहीवर बहुजनसमाजरूपी लोकशाहीची होणारी मात गर्भांतल्या गर्भांत मारण्याची चळवळ नाना फडणीसांच्या सांप्रदायिकांनीं

सुरू केली आहे. प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातून होणाऱ्या स्मारकाच्या या प्राणप्रतिष्ठेमुळें भिक्षुकशाही सांप्रदायिकांनीं भोळया भावळ्या अज्ञ जनतेवर पांघरून ठेविलेल्या मोहजालप्रतिष्ठेचा प्राण जाणार आहे. जें काम शेंकडों उलट सुलट कवट्यांच्या इतिहासकारांच्या हातून घडलें नाहीं, तें काम प्रिन्स ऑफ वेल्सच्या हातून आज काळच घडवून आणीत आहे. खरें म्हटलें तर हा प्रसंगच असा आहे कीं या महायोगांत महाराष्ट्रांतल्या सर्व भेदांनीं मज्जन स्नान करून अभेद व्हावें. सर्व पंथांनीं या प्रयागांत द्वैताला मूठमाती देऊन अद्वैत व्हावें. ब्राह्मण ब्राह्मणेतरांनीं श्रीशिवरायाची शपथ घेऊन खुल्या दिलानें महाराष्ट्रीय म्हणून राष्ट्रसेवेसाठीं एकमेकांत समरस व्हावें. ब्राह्मणांनीं निरिच्छ भावनेनें क्षत्रियांना 'या बसा' म्हणावें. क्षत्रियांनीं त्यांना वंदन करून त्यांचा मान राखावा. दोघांनीं मिळून वैश्यजनांचा सत्कार करावा आणि सर्वत्रांनीं शूद्र अस्पृश्य बांधवांची जाहीर क्षमा मागून कृत पातकांना पश्चात्तापित आनंदाश्रूच्या धबधब्याखालीं पार बुडवून टाकावें. अशी ही अमृतसिद्धीची पर्वणी वारंवार येत नसते. या पर्वणीला लाथाडण्याइतका अमृतद्वेष्ट्या राष्ट्रद्रोह्यांचा मुर्दाडपणा जरी उतास जात असला, तरी खऱ्या राष्ट्रहितेच्छूंनीं या मुर्दाडांचा कान वेळींच पिळण्याची खबरदारी घेणें अवश्य आहे. आम्ही करूं तेंच राष्ट्रकार्य, बोलूं तीच राष्ट्रवाणी आणि सांगूं तोच राष्ट्रोद्धारक मंत्र, अशा धाटणीच्या चळवळी म्हणजे लोकशाहीच्या तत्वाची नागडी उघडी विटंबना होय. या अनिष्ट परंपरेचा अभिमान जोंपर्यंत हरघडी डोकें वर काढीत आहे तोंपर्यंत महाराष्ट्राला भाग्याचे दिवस लाभणें शक्य दिसत नाहीं. आजला जे असंख्य भेद व पंथ महाराष्ट्रांत एकमेकांच्या उरावर बसून त्याच्या खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय जीवनाचे धिंडवडे काढीत आहेत, त्या सर्वांना या उर्मट परंपरेचेंच खत पडत आहे. महाराष्ट्राच्या वैभवाची चाड असणाऱ्या सर्व भगिनी बांधवांनीं, अतःपर आत्मवंचन न करितां, या स्वराज्यद्रोही पेशवाई परंपरेचा कांटा उचकून झुगारण्याचें नैतिक धैर्य अवश्य दाखविलें पाहिजे.

श्रीशिवाजी महाराज नवमतवादी नवयुगाचे सूत्रधार, मृत झालेल्या राष्ट्राला जिवंत करणारे धन्वंतरी आणि आत्मतेजानें दगडधोंड्यांना सुद्धां चैतन्याचे कल्पतरू बनविणारे जादुगार होऊन गेले. अर्थात् त्यांच्या नवमतवादी पराक्रमाच्या बरोबरच त्यांच्या चारित्र्याचा विपर्यास करणारा जीर्णमतवाद हातांत काजळीचें काळें मडकें घेऊन लपत छपत त्यांच्या मागोमाग पाठलाग करीतच होता. हेतूंचा विपर्यास, कर्तबगारीची बीभत्स हेटाळणी व वृद्धिंगत होणाऱ्या

वैभवाची निंदा, या गोष्टी नवमतवाद्यांचीं प्रियकर लेणीं होत. शिवाजी महाराजांवर या लेण्यांचा वर्षाव करण्याच्या कामीं मुसलमान व इंग्रज बखरकारांच्या जोडीनेंच महाराष्ट्रांतल्या जीर्णमतवाद्यांनीं आपल्या मत्सरी बुद्धीला असूयेच्या सताड मैदानावर बेफाम नाचविण्यास मुळींच कमी केलें नाहीं. खाफीखानानें शिवाजीच्या चरित्राचा 'काफीर शैतान नरकांत गेला' या शेऱ्यानें समाचार घेतला, इंग्रज बखरकारांनीं त्याला 'डोंगरांतला उंदीर, खुनशी व विश्वास घातकी' ठरविलें, मोक्षदात्या भिक्षुकशाहीनें त्याला 'शूद्र' वर्गांत ढकलून दिलें आणि जे मराठे बांधव आज श्रीशिवभक्तीनें उचंबळून जाऊन त्याच्या स्मारकाचा पाया ब्रिटिश शहाजाद्याच्या हातून परवां बसविणार, त्यांच्या समशेरबहाद्दर वाडवडिलांनीं राज्यारोहणाच्या आदल्या दिवसापर्यंत शिवाजीच्या वाढत्या वैभवाला आपली संमति सुद्धां दिली नाहीं. या सर्व गोष्टींची आठवण झाली म्हणजे स्वकीय परकीयांच्या विरोधांना बिलकुल न जुमानतां, केवळ आत्मसामर्थ्याच्या जोरावर सह्याद्रीच्या धुरोळ्यांतून हिंदुपदपातशाहीची टोलेजंग सृष्टि निर्माण करणाऱ्या आद्यछत्रपतीच्या चारित्र्याचें कौतुक करावें तितकें थोडेंच असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

शिवाजीच्या चरित्राचा व चारित्र्याचा आजपर्यंत जितका गर्हणीय विपर्यास व मानखंडना झालेली आहे, तितका विपर्यास व मानखंडना जगांतील कोणत्याहि स्वराज्यसंस्थापकाची झालेली नाहीं. इंग्लंड राष्ट्र हें स्वतःस स्वातंत्र्याचें भोक्तें म्हणवितें. पृथ्वीतलावर स्वातंत्र्य भोगणारे व इतरांना स्वातंत्र्य देणारे हरीचे लाल काय ते आम्हीच, अशी यांची गर्वोक्ति ऐकून ऐकून आमचे कान अगदीं किटून गेले आहेत. ब्रिटन लोक कधींहि गुलाम होणार नाहींत, अशी या ब्रिटिश केसरीची गुरकावणी इंग्रजी प्रायमराच्या चोपड्यापासून तों पार्लमेंटांतील ब्ल्यू बुकापर्यंत सर्व लहान थोर ग्रन्थांतून आजपर्यंत मनमुराद ऐकू येत असते. परंतु स्वातंत्र्याच्या लंब्याचवड्या वल्गना करणाऱ्या ब्रिटिश केसरीचा गेल्या दोनशें वर्षांतला स्वातंत्र्य-संसार इतिहासाच्या दुर्बिणींतून पाहिला, तर पारतंत्र्यांतून कर्तबगारीच्या व आत्मसामर्थ्याच्या जोरावर स्वातंत्र्य मिळविणाऱ्या प्रत्येक मर्द वीराची त्यानें आपल्या तीक्ष्ण नखाच्या पंजाचे फटकारे मारमारून अत्यंत निर्दयपणानें विटंबना केल्याचे दाखले त्या संसाराच्या चवाठ्यावर अनेक दिसतात. ज्या जोन ऑफ आर्कच्या पुतळ्यासमोर 'ला मार्सेलीस'चें फ्रेंच राष्ट्रगीत ब्रिटिश वाद्यांतून वाजवून, ब्रिटिश सिंहाच्या छाव्यांनीं तिचा जयजयकार करण्यासाठीं

आपापल्या टोप्या काढून तिला मुजरा करण्याचा वार्षिक संप्रदाय सुरू केला आहे, त्या जोन ऑफ आर्क वीरांगनेचे ब्रिटिश सिंहानें कसकसे धिंडवडे काढले, या गोष्टी बदललेल्या दृष्टिकोनाला आज जरी दिसूं शकल्या नाहींत, तरी इतिहासाचा चष्मा चढविल्यास त्या धिंडवड्यांचा बीभत्सपणा वाटेल त्या आंधळ्याच्या खास प्रचितीस येईल. शेंदाड बोरबोन राजांच्या लाथांबुक्यांखालीं धुळीस मिळालेल्या फ्रेंच राष्ट्रांत आत्मसामर्थ्यांच्या चैतन्याची फुंक मारून त्याला खडबडून जिवंत करणाऱ्या नरेंद्र नेपोलियनाची विल्हेवाट याच स्वातंत्र्यप्रिय ब्रिटिश केसरीनें कशी लाविली, त्याचा इतिहास फ्रेंचराष्ट्र आज जरी विसरलें असलें, तरी ब्रिटिश सिंहाच्या त्या अधम कर्मांची आठवण इतिहास मात्र कदापि विसरणार नाहीं. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. सारांश ब्रिटिश सिंहाच्या तोंडून एखाद्या राष्ट्राच्या स्वातंत्र्योपासक नरेन्द्राला शाबासकी मिळण्याचें भाग्य सशाच्या शिंगप्राप्तीइतकेंच सोपें आहे, असें विधान करण्यास साहित्याचा तुटवडा मुळींच पडणार नाहीं. दृष्टिकोन बदलल्यामुळें असो, परिस्थितीची लाट उसळल्यामुळें असो किंवा काळाच्या करणीचा प्रभाव असो, ज्या ब्रिटन देशाच्या बखरकारांनीं शिवाजीची आपापल्या बखरींतून मनसोक्त निंदा केली, ज्या ब्रिटिश मुत्सद्यांना चोर, लुटारू, दगलबाज याशिवाय शिवाजीला दुसरें विशेषणच लावायला आढळलें नाहीं आणि पेशवाई मुशींतून निर्माण झालेल्या अनेक नराधमांच्या चिथावणीचा फायदा घेऊन ज्या ब्रिटिश लोकांनीं शिवाजीच्या शेवटल्या वंशजांचे एखाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणें हालहाल करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं, त्याच ब्रिटिश राष्ट्राच्या प्रतिनिधीच्या हातून, त्याच स्वातंत्र्यभूमीच्या उद्यांच्या नरेशाच्या हातून, त्याच शिवछत्रपतीच्या स्मारकाचा पाया बसविण्याचा परवां होणारा मंगल प्रसंग म्हणजे महाराष्ट्राच्या राष्ट्रीय जीवनांत घडून येणारा कल्पनातीत चमत्कार होय. प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हातून बसविला जाणारा शिवाजीस्मारकाचा पाया हा महाराष्ट्राच्या नवचैतन्याच्या इभ्रतीचा ब्रिटानियेकडून होणारा अद्भुत सन्मान होय. राज्यारोहणप्रसंगीं इंग्रजांच्या प्रतिनिधीनें रायगडावर स्वतः जाऊन सिंहासनाधिष्ठित शिवरायाला अदबीनें अर्पण केलेल्या रत्नजडित आंगठीचें तेज परवांपासून खरें खुरें चमकूं लागेल. स्वतःच्या प्राणापेक्षांहि प्यार असलेल्या आपल्या शिवबाचा होणारा हा सन्मान पाहण्यासाठीं सर्व ज्ञात अज्ञात मावळ्यांचे आत्मे शहाजाद्यांच्या भोंवतीं गराडा घालून उभे राहतील. स्वराज्याची आणभाक करणारा दादजी नरस

प्रभू आनंदातिशयाचे हुंदक्यांवर हुंदके देत स्मारकाच्या कोनशिळेला घट्ट मिठी मारून बसेल. सय्यद बांडयाला तमंचाच्या एकाच फटकाऱ्यानें गारद करणार जिवा महाल्या, सिंहगडाची नरडी रगडणारा तानाजी, उदयभानूचा कोथळ फोडणारा शेलार मामा, पावन खिंडीला पावन करणारा बाजी, स्वामिभक्तीपुढें ऐहिक वैभवाला कःपदार्थ मानणारा बाळाजी, कर्नाटकापासून कुलाब्याच्या दांडीपर्यंत भीमथडी घोडेस्वारांचा हुतूतू घालणारा नेताजी, पुरंदरच्या सौभाग्यासाठीं दिल्लीरखानाची बाजी न पत्करतां स्वदेहाचे राई राईएवढे तुकडे करून घेणारा रणगाजी मुरारी, समुद्रावर इतस्ततः भटकणाऱ्या दर्यावर्दींची जंजिऱ्याच्या नाक्यावर नाक दावून रग जिरविणारा दर्यासारंग मायनाक, आपल्या पतित मनोवृत्तीला राष्ट्राभिमानाची वांकण देऊन चाकणच्या किल्ल्यावर प्रसिद्धीस आलेला फिरंगोजी नरसाळा, हे सारे महाराष्ट्र देवीचे प्यारे वीर महावीर या स्मारक समारंभाच्या वेळीं त्रैलोक्यांत होणाऱ्या शिवछत्रपतीच्या अभिनव जयजयकाराचा गजर करण्यासाठीं सूक्ष्म देहानें परवां पुण्यास हजर राहतील. ब्रिटानियेकडून श्रीशिवछत्रपतीचा होणारा हा अपूर्व सन्मान म्हणजे हिन्दुपदपातशाहीच्या पुनरुज्जीवनाचा उषःकाल होय. नवयुगाच्या नवचैतन्याचा हा अरुणोदय आहे. या अरुणाची प्रभा महायुद्धांत पतन पावलेल्या महाराष्ट्रीय वीरांच्या रक्तानें लालभडक रंगून निघालेली आहे. या अरुणोदय काळीं महाराष्ट्रांतील सर्व पंथभेदांनीं आपापल्या द्वैतभावनांना तिलांजली देऊन, मागील इतिहासावर पडदा सोडावा; मागले अपराध उदार मनानें विसरून जावे आणि नवयुगांतला महाराष्ट्राचा इतिहास पूर्वापेक्षांहि भडक रंगांत रंगविण्याची सर्वांनीं एकदिलानें शिकस्त करावी, असें या श्रीशिवस्मारकाचें महात्म्य आहे. त्याचा तरुण महाराष्ट्रानें अवश्य विचार करावा.

[ प्रबोधन १६-११-२१ ]

# कल्पनाशक्ति.

नेपोलिअन बोनापार्टचें एक वचन आहे कीं 'या जगाचें नियंत्रण **कल्पना** करीत असते.' सर जोशुआ रेनॉल्डस ह्मणत असे कीं "सर्व कला मर्यादित आहेत; पण या जगांत अनियंत्रित, मोकाट सुटलेली व त्रिभुवनांत वाटेल तेथें बिनधोक जाणारी येणारी जर एखादी चीज असेल, तर ती **कल्पनाच** होय." मानवांचे सर्व बरे वाईट व्यवहार, त्यांच्या सर्व चळवळी, उलाढाली, युद्धें या कल्पनाशक्तीच्या स्प्रिंगवरच आपापल्या हालचाली करीत असतात. ही स्प्रिंग आकुंचित झाली तर कलुषाकबजीच्या मताप्रमाणें करंगळीच्या आंगठींत हिरकणी-प्रमाणें बसवितां येते; तोच तिनें आपला व्याप वाढविण्याचें मनांत जर का आणलें, तर साऱ्या विश्वाला गिळून तिची वृद्धीची भूक कायमच्या कायम रहाते. सुखाचा सुकाळ करण्यासाठीं मनुष्य आपल्या कल्पनेला शक्य तितका आत्यंतिक तणावा देऊन वाढवीत असतो. आपलें काव्य अजरामर व्हावें; इतर कवींच्या कल्पना-भांडारापेक्षां माझ्या काव्यांतली कल्पना-चातुर्याचीं रत्नें विशेष मोल-वान व झगझगित ठरावीं आणि माझ्या कल्पनेच्याइतकी उंच भरारी या जगांत कोणालाहि मारतां येऊं नये, यासाठीं कविजन आपल्या कल्पकतेला वावडीप्रमाणें अंतराळांत उंचउंच भिरकावीत असतात. राजकारणाचे डावपेंच लढविण्यासाठीं मुत्सद्दी जन आपल्या कल्पनाचातुर्याचा एक धागा शक्य तितका खोल पाताळांत गाडतात, तों दुसरा धागा साऱ्या जगाचीहि दृष्टि चकेल इतका उंच झुगारून देतात. ज्या मर्यादित बुद्धिमत्तेच्या रवीनें कल्पनेच्या अफाट व अगाध सागराचें मंथन करून मानवांनीं खुद्द परमेश्वराची लांबीरुंदी उंची मापण्यास कमी केलें नाहीं, त्याच कल्पना-मंथनांतून आज बीनतारी संदेशयंत्राचें रत्न त्यांनीं पैदा केलें आहे आणि पृथ्वीच्या पार अंतराळांत असणाऱ्या शनिमंडळादि ग्रहांवरील रहिवाश्यांशीं, रोटीबेटी व्यवहार शक्य नसला तरी निदान, संदेशव्यवहार कर-ण्याची उमेद बाळगिली आहे. सारांश, हृदयाशीं संतत धडधडणाऱ्या आत्मा-रामाच्या चैतन्यशक्तीच्या पाटाला पाट लाऊन बसणाऱ्या कल्पनाशक्तीनें आम्हा मानवांची सारी धडपड अव्याहत धडधडत ठेविली आहे. कल्पनेच्या मंत्राचा संदेश आला कीं आम्हीं आमच्या मनाच्या स्वराज्यांत हव्या त्या बातबेताचे गगनचुंबीत मनोरे भराभर रचतांना आपल्या ताकदीकडे पहात नाहीं, बुद्धीच्या


मर्यादितपणाची कुंपण आड आली तरी त्याची पर्वा करीत नाहीं, आणि विशेष आश्चर्याची व हास्यास्पद गोष्ट ह्मणजे आमचें आयुष्य क्षणभंगुर आहे, ही गोष्ट आह्मी पार विसरून जातों. कल्पनाशक्ति स्वतंत्र, तर मनुष्य पडला सर्वस्वीं परतंत्र. कल्पना चिरंजीव आणि विश्वव्यापी, तर आह्मी मर्त्य आणि मर्यादित. बसल्या जागीं कल्पनेच्या जोरावर आम्हीं पाताळनिवासी अमेरिकनांना आश्चर्यानें थक्क करूं. कल्पनेच्या सहाय्यानें फिरत्या पृथ्वीला तागडींत तोलून, चंद्राच्या क्षयवृद्धीचीं गणितें बोलबोलतां फटाफट सोडवूं. पण कल्पना शक्तीच्या धाग्याइतका आम्हां मानवांच्या आयुष्याचा धागा दणकट टिकाऊ व चिरंजीव नसल्यामुळें, आमच्या जिवाचा दिवा विझला रे विझला कीं कल्पनेच्या भांडवलावर चाललेल्या मनोरथाच्या व्यापाराचें दिवाळें चुटकीसरसें वाजतें. बातबेताचे किल्ले धडाधड कोसळतात. महत्वाकांक्षेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतात. पसरलेल्या व्यापांचे प्राण काळवंडूं लागतात आणि कोठच्या कोठें या मर्त्य मानवाची संगत धरून अखेर मी खाड्यांत पडलें, म्हणून पश्चात्तापाच्या झटक्यानें झीट येऊन कोसळणाऱ्या कल्पनाशक्तीच्या दणक्यानें सारें जग हादरूं लागतें.

[ प्रबोधन. १६-५-२२ ]

---

# दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन केलेंच पाहिजे.

विश्वाचा हा प्रचंड विस्तार आणि त्यांतील प्रत्येक गोष्टीचा नियमबद्ध जीवनक्रम



पाहिला तर आपल्या हेंच प्रत्ययाला येतें कीं तेजोनिधी सूर्यबिंबापासून तों थेट जमिनीवर सरपटणाऱ्या कृमिकीटकापर्यंत सर्वांची गति मर्यादित झालेली आहे. सूर्याभोंवतीं पद्धतशीर नियमानें प्रदक्षिणा घालणाऱ्या पृथ्वि शनि मंगळादि ग्रहांचें भ्रमणच पहा. अकल्प्य काळापासून आजपर्यंत अगदीं काटेकोर नियमानें त्यांच्या प्रदक्षिणेचा प्रवास यंत्राबरहुकूम बिनहरकत चालला आहे.

मानवी जीवनक्रमांतहि जननमरणादि क्रिया अशाच ताळेबंद यांत्रिक पद्धतीनें मर्यादित झालेल्या आहेत. जिकडे पहाल तिकडे मर्यादा व सीमा यांचीं दाट कांटेरीं कुंपणें पडलेलीं! चंद्राची क्षयवृद्धि किंवा रातपाळी दिवसपाळी चुकत नाहीं. सूर्यानें कधीं हक्काची रजा मागितली नाहीं किंवा एक दिवसाची 'कॅज्युअल लीव्ह' त्याला मिळत नाहीं. विश्वयंत्राच्या अमुक चक्राची अमुक अमुक फेऱ्यांची प्रदक्षिणा झाली कीं पठाणी किंवा काश्मिरी औरतां प्रमाणें सूर्याला बुरखा घेतला पाहिजे, किंवा चंद्रानें काळी घोंगडी पांघरली पाहिजे, असा वटहुकूम निघाल्यावर सूर्याला किंवा चंद्राला अखिल विश्वांत अपिलाचें कोर्ट लाभत नाहीं. प्राणी जन्माला आला कीं तो यथाकाळीं मेलाच पाहिजे; त्याला सुटकेची सवलत नाहीं. सारांश, विश्वांतल्या यच्चावत् गोष्टी ठरावीक सांचाच्या जीवनक्रमांत जाम जखडल्या गेल्या आहेत. कोठें कोणी तसूभर सीमोल्लंघन करूं म्हणेल तर होणेंच नाहीं. विश्वनिर्मित्या चैतन्यशक्तीचा दरारा असा मोठा करडा आहे.

विश्वाचें परिभ्रमण जर एकाद्या गिरणीप्रमाणें सांचांतल्या सांच्यांत सीमाबद्ध झालें आहे आणि आपली पृथ्वीहि त्या भ्रमणांत गतिबद्ध झालेली आहे, तर तिला नानारत्ना वसुंधरा कोणी बनविली? दिवसेंदिवस पृथिवीतलावर असंख्य लोकोत्तर चमत्कारांची जी कल्पनातीत उत्क्रांति होत आली आहे; मानवांनींच शोधून काढलेल्या नवरसांचा मानवी जीवनांत जो नवरंगी परिपाक उतरला आहे आणि सृष्टीविधात्याच्या सृष्टीला बिनतोड तोंड देणारी दुसरी सृष्टी निर्माण करण्यांत मानवांच्या महत्वाकांक्षेच्या ज्या अनंत धडपडी आज मानवी दुनियेच्या चैतन्याला हाताबोटांवर नाचवीत आहेत, त्याला कारण कोण?

कालची दुनिया आज नव्हे, आजची दुनिया उद्यां नव्हे. कालची कल्पना आज शिळी ठरते, आजच्या कल्पनेला उद्यांची उत्क्रांत कल्पना चारी मुंड्या चीत करते. आंगाला रंग फासून ढोरांचीं कातडीं पांघरण्यांतच जीवितसौख्याची परमावधि मानणारीं कालचीं राष्ट्रें, आज साऱ्या जगाला पाटलूण नेकटायचे धडे देणारीं आणि साऱ्या वसुंधरेच्या ज्ञात अज्ञात संपत्तीचे खरे भोक्ते काय ते आम्ही, अशा वल्गना करणारीं राष्ट्रें बनतात; तर ऐहिक वैभवाच्या धवलगिरीवर जाऊन आत्मानात्म विचारांची बिकट त्रांगडीं चुटकीसरशीं सोडवून दाखविणारीं प्राचीन राष्ट्रें साऱ्या जगाचे हुकमी हमाल बनतात. ज्यांच्या नाकाचा दांडासुद्धां धड उमटलेला नाहीं, किंवा ज्यांच्या शरीराची उंची चार सांडेचार फुटांवर गेलेली नाहीं असले बुटबैंगण फेंपटे जपानी, लांबटांग्या

व लांबनाक्या रशियाचें नाक कापतात; तर इकडे शरीरावयवांच्या पूर्ण वाढींत जगाला हार न जाणाऱ्या हिंदूंच्या घरांत त्याच फेंफस्या जपानी विप्रांच्या आगपेटीच्या चकमक-मंत्राशिवाय चूल पेटत नाहीं कीं दिवा लागत नाहीं. ऋग्वेदयुगांत पंचमहाभूतांचें केवढें बंड ! त्या बेट्यांनीं प्रत्यक्ष परमेश्वराचें सिंहासन पादाक्रांत केलें होतें आणि आपल्या भयंकर स्वरूपांनीं चळचळां कांपावयास लावलेल्या मानवी दुनियेला आपल्या पायाची धूळ चाटावयास लावलें होतें. पण आज ? आज काय प्रकार आहे ? आज तीच पंचमहाभूतें मानवांच्या हातचे हंटरचे तडाखे खात, निमूटपणें वाटेल तें काम करण्यासाठीं गुलामांपेक्षां गुलाम होऊन बसलीं आहेत. जो पूर्वी देव म्हणून दुनियेच्या उरावर बसला होता, तोच आज राजमहालापासून शौचकूपापर्यंत त्याच दुनियेचें वाटेल तें काम करणारा हांजीहांजीखोर दास बनला आहे. ज्या गोष्टी पूर्वी अशक्य कोटींत मोडत होत्या आणि शक्य कोटींत मोडल्याच तर अद्भुत चमत्काराची ओढणी घेत असत, त्याच गोष्टी आजच्या शास्त्रीय युगांत पोरांटोरांचीं खेळणीं होऊन बसल्या आहेत. हा सर्व चमत्कार कशाचा ? मानवी दुनियेच्या एकंदर हालचालींचें निरीक्षण केलें तर असें स्पष्ट दिसून येतें कीं आपल्या शक्तियुक्तीची शिकस्त करून परमेश्वराचें नारायणपद पटकवण्याचा नरांनीं स्पष्टस्पष्ट चंग बांधला आहे. परमेश्वराविरुद्ध मानवांनीं उघड उघड बंडाचें शिंग फुंकलें आहे. विश्वनियामक सीमांचें उल्लंघन करून सृष्टिविषयक प्रचलित कल्पनांच्या रूढींचे तट जमिनदोस्त करण्याचा हा निश्चयी हल्ला आहे. वातावरणाच्या थरांची लांबी रुंदी उंची मोजली, गुरुत्वाकर्षणाचा कायदा कोठवर अंमलांत आहे त्याची पहाणी केली, दुर्बिणीच्या डोळ्यांतून शनि मंगळादि ग्रहांना नेत्रकटाक्षाची मुकी सलामी दिली. येथें मानवी यत्नांच्या झटापटींना सीमेची अटक होते न होते तोंच मार्कोनीच्या बिनतारी यंत्रानें आकाश पाताळाला चिमटींत धरून पृथ्वीच्या गोलाची दामटी केली आणि वातावरण गुरुत्वाकर्षणादींच्या सीमांची अटक लाथाडून मंगळावरील रहिवाश्यांशीं प्रत्यक्ष संभाषणाच्या योगाची सिद्धि साधण्यासाठीं कंबर कसली. निसर्गाच्याहि नरड्यावर पाय देऊन नरांनीं नारायणपद मिळविण्याचा हा जो खटाटोप चालविला आहे, प्रत्यक्ष मानवसमाजांत उत्क्रांतीचे आणि उपक्रांतीचे भरती ओहटीचे जे ट्रान्सफर सीन प्रत्यहीं आपल्या दृष्टीला पडत आहेत आणि शास्त्रीय शोधांनीं विश्वाच्या ठरावीक सीमा उल्लंघून प्रत्यक्ष ईश्वराचेंहि सिंहासन डळमळविण्याचा जो यशस्वी बंडाचा हल्ला चढविलो

आहे, त्याच्या मुळांशीं असें कोणतें चैतन्य आहे, कोणती शक्ति आहे, कोणचा पराक्रम आहे ? जें सीमोल्लंघनाचें धाडस सूर्य करूं शकला नाहीं, चंद्राची छाती झाली नाहीं, विक्रम राजाच्या हातीं तेल्याचा घाणा देणाऱ्या शनि तेल्याचें तोंड नाहीं, किंवा महाक्रूर ह्मणून गाजलेल्या मंगळग्रहाची माय व्याली नाहीं, तेंच धाडस माणूस करतो, तें कशाच्या जोरावर ?

## बुद्धिमत्तेच्या जोरावर.

बुद्धिमत्तेच्या प्रचंड शक्तीचा विचार केला तर असेंच ह्मणावें लागतें कीं मनुष्याला ही शक्ति देण्यांत ईश्वरानें मोठीच चूक केली. ईश्वरानें आपल्या निःश्वासानें सृष्टि निर्माण केली असेल, पण बुद्धिमत्तेचें कवच ल्यालेला मनुष्य सहज फुंकारानें त्याच्या अस्तित्वाचें सिंहासन यथाकाळीं पादाक्रांत केल्याशिवाय खास राहणार नाहीं. बुद्धिमत्तेची प्रचंड शक्ति मनुष्यांत जन्मतःच असल्यामुळें, सीमोल्लंघन हा त्याचा जन्मसिद्ध हक्कच होऊन बसला आहे. याच्याहि पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं सीमा—मग त्या कशाच्याहि असोत, त्यांचें दास्य जो मान्य करील तो मनुष्यच नव्हे. अटकेला अटकला, सीमेवर कुंठीत झाला, निर्बंधांत जखडून पडला, प्रामाण्यांचा गुलाम झाला आणि रूढीच्या उकिरड्यांतला किडा बनला कीं मानवाचा मानवपणा ठार झाला असें खुशाल समजावें. मनुष्य आणि दास्य परस्परविरोधी आहेत. स्वातंत्र्य हा मानवजातीचा प्राण आहे.

दिग्विजयी म्हणून इतिहासांत गाजलेल्या कोणत्याही स्त्रीपुरुषाचें चरित्र पहा, त्यांत त्यांनीं रूढ कल्पनांच्या सीमांचें उल्लंघन केल्याचेंच आपल्याला दिसून येईल. हें सीमोल्लंघन करतांना त्यांनीं राजकीय सत्तेच्या स्वार्थी निर्बंधांची पर्वा ठेविली नाहीं. 'ईश्वरप्रणित' 'धर्ममान्य' 'स्मृति पुराणोक्त' इत्यादि मूर्खपणाच्या ग्रंथप्रामाण्यांचा दिमाख चालूं दिला नाहीं किंवा येनकेनप्रकारेण राजमान्यतेस वा लोकमान्यतेस चढलेल्या महानुभावांच्या 'हीरो वर्शिप' (महात्मेगिरी) च्या मिंधेपणाचे ते शरमिंदे बनले नाहींत. कल्पनेच्या बंदुकींत ठांसलेला बुद्धिमत्तेचा बार उडवितांना, निश्चित तत्वावर रोंखलेलें त्यांचें निशाण अणुमात्र कंप पावलें नाहीं. कोलंबसाच्या वेळीं क्रिस्ती धर्ममार्तंडांचें पृथ्वी विषयक ज्ञान अकटोविकटो होतें. 'देव ह्मणाला उजेड होवो आणि उजेड झाला.' अशा रीतीनें सहा दिवस जग उत्पन्न करण्याची दगदग करून सातव्या दिवशीं 'प्रभु निजला,' या दिव्य धर्मज्ञानप्रणेत्या पाद्रीभटांना पृथ्वी त्रिकोनी आहे, चौकोनी आहे कीं वाटोळी आहे याची मुळींच दाद नव्हती. कोलंबस ज्या वेळीं महा-

सागरोल्लंघनाला सिद्ध झाला, तेव्हां हे रावरंकाच्या 'आत्म्याचे तारक' त्याला गयावया करून म्हणाले " अरे बाबा, हें कसलें मूर्खपणाचें धाडस तूं आरंभलें आहेस. समुद्राच्या अगदीं कडेवर गेलास तर नरकाच्या दरींत तुझा, तुझ्या गलबताचा आणि परिवाराचा कडेलोट कीं रे होईल !" परंतु बुद्धीच्या जोरावर रूढ कल्पनांचें धिटाईनें सीमोल्लंघन करण्यास सज्ज झालेल्या त्या नवमतवाद्याला ही बायबलोक्त वाष्कळ गुलामगिरी काय होय? त्यानें कोणाच्याहि निंदास्तुतीची पर्वा न करतां धडाडीनें आपलीं गलबतें हांकारलीं आणि अमेरिकेचा शोध लावून 'पृथ्वी वाटोळी आहे, क्रिस्ती भटांच्या कल्पनेप्रमाणें सपाट नाहीं' हें प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध केलें. सामाजिक क्षेत्र घ्या, धार्मिक घ्या किंवा राजकीय घ्या, त्यांत आजपर्यंत जी उत्क्रान्ति घडून आलेली आहे, ती धूर्त मुत्सद्यांच्या राजकीय सवलतींनीं किंवा स्वराज्याच्या हप्त्यांनीं नव्हे, जगद्गुरू किंवा पोपासारख्या गुलालगोट्यांच्या श्रुतिस्मृतिपुराणोक्तानें नव्हे, वाचीवीर्य पुराणिकांच्या तोंडपाटिलकीमुळें नव्हे, तर स्वतंत्र नवमतवाद्यांच्या महत्वाकांक्षेच्या धडाडीनेंच होय. गौतम बुद्ध, शिकंदर, चंद्रगुप्त मौर्य, अशोक, गॅलिलिओ, न्यूटन, मार्टिन लूथर, सावनारोला, शहाजी राजे, छत्रपति शिवाजी, इत्यादि अनेक पुरुषोत्तमांचीं चरित्रें याच तत्वाचीं द्योतक आहेत.

दिग्विजयाची आकांक्षा नखशिखांत फुरफुरल्याशिवाय सीमोल्लंघनाची बुद्धीच होत नाहीं. जोपर्यंत ही आकांक्षा हिन्दुजनांत फुरफुरत होती, तोंपर्यंतच ते स्वातंत्र्याचे भोक्ते व प्रणेते राहिले. जेव्हां दिग्विजयाची आकांक्षा थंड पडली, तेव्हांपासूनच हिंदूंच्या अधोगतीला सुरवात झाली. सीमोल्लंघनाचा संन्यास करून ते व्यक्ति ग्रंथ व रूढिप्रामाण्यांच्या कच्छपीं लागले आणि अखेर निर्भेळ गुलामगिरीचे जहागीरदार बनले. स्वातंत्र्य किंवा दास्य यांचा गुणधर्मच असा आहे कीं तीं भलत्या नापीक क्षेत्रांत आपण होऊन कधीं जात नाहींत. पण जरा कोठें बुद्धिभ्रंशाच्या उमटलेल्या टांचेच्या खळग्यांत कुकल्पनेचें घाणेरडें पाणी सांचलें कीं गुलामगिरीनें तेथें आपलें बीज पेरलेंच म्हणून समजावें. 'हिंदुमुसलमानकी जय' म्हणून दुटप्पी लुब्रे लोक कितीहि शंख करोत, हिंदुस्थानच्या प्रगतील मुसलमानांच्या ऐक्याची अवश्यकता कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत असो वा नसो, हिन्दु साम्राज्य, हिन्दु संस्कृति, हिन्दुस्थान म्हणून कांहीं चीज आहे कीं नाहीं ? मुसलमान तरी आले कोठून ? हिन्दूंच्या धार्मिक अधःपातांतूनच मुसलमानांची पैदास झाली ना? त्यांतूनच आज क्रिस्त्यांची वीण निपजत आहे.

आणि आहे हीच नामर्द स्थिति कायम असेपर्यंत आणखी काय काय चिजा पैदा होतील कोणीं सांगावें ? अर्थात् हिन्दूंना पुनरुज्जीवनाची जर कांहीं जाणीव उत्पन्न झाली असेल तर त्यांनीं 'हिन्दु आणि मुसलमान' असलीं पोरखेळणीं साफ लाथाडून देऊन दिग्विजयाच्या निश्चयानें सीमोल्लंघनाचीच तयारी केली पाहिजे. देवळें जाळणें, मूर्ति फोडणें, बायका भ्रष्ट करणें आणि गाई कापणें वगैरे महंमद गझनवी अत्याचार आज १९२२ सालांतहि हिंदूंच्या नाकाडावर टिच्चून होत असतां, 'अरे यार मेरा भाई' म्हणून हिंदूंनींच मुसलमानांच्या दाढया कुरवाळणें, या स्थितीला बेशरमपणापेक्षां दुसरा निराळा शब्द शब्द-कोशांत कदाचित् असेल. मुसलमानांप्रमाणें आजला पारशी, क्रिस्ती, यहुदी आपापले समाजसंघ बळकट बनवीत आहेत. धोतरवाला तात्या म्हणजे त्यांच्या थट्टेचा परसांतला सवंग विषय. वाटेल त्या गुंडानें उठावें, बंदुका झाडाव्या, हिंदु स्त्रियांचा उपमर्द करावा, वाटेल तें करावें; पण हिंदुजनांकडे पहावें, तों स्थितप्रज्ञ स्थिति. परवां परेळच्या बाजूला गणेशोत्सवाच्या पंधरवडयांतच पाळीव कुतरडयांच्या क्षुल्लक भांडणावरून एका पारशी सज्जनानें आपली बंदूक झाडून खुशाल १०–१५ गरीब गिरणीकामगारांना जखमी केल्याचें समजतें. १६ नंबरच्या दंग्यांत अकरमाशा युरेजियन व अग्निहोत्री पारशी गुंडांनीं पिस्तुलांच्या बेगुमान फैरी झाडल्याचें प्रसिद्धच आहे. त्यांनीं अनंत अनिर्वचनीय अत्याचार केले. पण स्थितप्रज्ञ हिंदुजन तोंडांतून ब्र काढतील तर ब्रह्माचीच शपथ ! याला गांधीभक्त आत्म्याचा विजय सत्याचा विकास वगैरे काय वाटेल तीं नांवें देवोत; असला विजय आणि विकास शामळू गुजराथेला लखलाभ असो. शिवाजीच्या महाराष्ट्रांत असल्या प्रकाराला भ्याडपणा, नामर्दपणा किंवा शेंदाडपणा हींच नांवें देण्यांत आलीं, येतात व येतील. सारांश, हिन्दुस्थानांतला इतर हिंदु समाज वगळून, प्रत्यक्ष माहितीनें, खुद्द महाराष्ट्रापुरतेंच बोललें तर महाराष्ट्रीय हिंदु समाजाची आजची स्थिति केविलवाणी झाली आहे. फक्त कींवच करायला कोणी नाहीं !

अखिल हिंदुस्थानच्या राजकीय रुधिराभिसरणाचें मुख्य हृदय महाराष्ट्रच. ही गर्वोक्ति नव्हे. इतिहासप्रसिद्ध प्रतिज्ञेची उक्ति आहे. अर्थात् हिंदूंच्या दिग्विजयाचा प्रश्न महाराष्ट्रानेंच उचल खाल्ल्याशिवाय रंगारूपास येणें शक्य नाहीं. पण आजचा महाराष्ट्र कसा आहे ? काय करीत आहे ? राजकीय क्षेत्रांत ढोंगी पुढाऱ्यांच्या सुळसुळाटामुळें तो परप्रत्ययनेय व आत्मवंचक बनला आहे.

धार्मिक क्षेत्रांत तो हटवादी मत्सरी आणि स्वार्थपरायण आहे. सामाजिक क्षेत्रांत तर त्याच्या विराट देहाचे राई राई एवढे लचके तुटले आहेत. जाति-द्वेषाचा तुफानी झंझावात बेफाम बोकाळल्यामुळें ब्राह्मण-ब्राह्मणेतरासारखे वाद आज हातघाईवर आले आहेत आणि उद्यां ब्राह्मणसंघाचा जन्म होतांच हें प्रकरण रक्तपातावर न जावो म्हणजे मिळविली. सातारा नगरकडून मगरूर भिक्षुकशाहीवर झुगारलेली ब्राह्मणेतरांची पाचर परवां खुद्द टिळकांच्या गायकवाड वाड्याच्या छातींत तर बिनचुक जाऊन रुतलीच आहे. सारांश, सांप्रतचा महाराष्ट्र हा **शिवाजीचा महाराष्ट्र** या नांवाला सर्वथैव अपात्रच नव्हे तर कुपात्र बनलेला आहे.

अशा प्रसंगीं शिवाजीच्या अभिमान्यांनीं पेशव्यांच्या सैतानशाही सांप्रदायिकांना कोंपरखळी मारून दूर बसविलें पाहिजे आणि महाराष्ट्राची अब्रु बचावण्यासाठीं मी मी म्हणून पुढें सरसावलें पाहिजे. असें करतांना कोणी ब्रह्मांडशहाणे तुमच्यावर वाटेल ते कुत्सित आरोप करतील; पण सबंध शरीराच्या हितासाठीं उपायापलिकडे गेलेला एकादा नासका कुसका अवयव छाटून टाकणें हेंच श्रेयस्कर असतें, हें विसरूं नका. छत्रपति शिवाजी महाराजांनीं उभारलेल्या हिंदवी स्वराज्याच्या गडाखालीं स्वार्थी कारस्थानांचा सुरुंग उडवून, त्यांच्या मनोदयाचा भिक्षुकशाहीनें केलेला भंग हें एक महाराष्ट्राच्या हृदयांत नित्य सलणारें शल्य आहे. शिवाजीच्या जातिवंत अभिमान्यांनीं हें शल्य सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत पदोपदीं अडविणाऱ्या सीमांचें उल्लंघन केलें तरच महाराष्ट्राला या उप्पर दिग्विजयाची कांहीं आशा आहे. महाराष्ट्रांत लोकशाही बळावल्याशिवाय हिंदुस्थानाचा भाग्योदय होणें नाहीं, एवढी खूणगांठ बांधून महाराष्ट्राची, चैतन्यदेवता—हिंदुस्थानची भाग्यदेवता—ज्याला जशी बुद्धि देईल तसें त्यानें देशोद्धारार्थ दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन करावें.

[ प्रबोधन, १-१०-२२ ]

# सर्वसमर्थ कोण ?

" God helps them who help themselves"—

पारतंत्र्यांतर्भूत असलेल्या दारिद्र्य, अज्ञान आणि द्वैत यांच्या खोल कुंडांत कुजत पडलेलें एकादें राष्ट्र उदयास यावें, आणि त्यावर स्वातंत्र्यांतर्भूत लक्ष्मी सरस्वतीच्या ऐक्याचीं सुवर्ण किरणें चमकूं लागावीं, अशा उदात्त व श्रेष्ठ विचारांवर ज्या ज्या व्यक्तींचे प्रयत्न चाललेले असतात, त्यांतच एक निर्जीव (?) पदार्थ आपली सर्व शक्ति एकवटून त्या त्या व्यक्तींना पूर्ण उत्तेजन देत असतो. आजपर्यंत पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत ज्या घडामोडी झाल्या; कोठें धर्मोन्नति तर कोठें अधर्मप्रवृत्ति; कोठें संतमंडळाचा उदय तर कोठें दुर्जनांचा सुळसुळाट; कोठें राजे महाराजे स्वपराक्रमानें तलवारीच्या धारेवर कमाविलेल्या एकाद्या अफाट प्रदेशाच्या राज्यासनावर स्वतःस राज्याभिषेक करून घेत आहेत, तर दुसरीकडे कित्येक नरपति कर्मगतीच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें आपल्या वंशपरंपरेच्या मयूरासनाला किंवा सिंहासनाला दुःखाश्रूंनीं चिंब भिजवून त्यांचा शेवटचा निरोप घेत घेत त्यांना आपल्या विजयी जेत्यांच्या स्वाधीन करीत आहेत; एकीकडे स्वातंत्र्याचा लख्ख उजेड तर दुसरीकडे पारतंत्र्याची काळीकुट्ट अमावास्येची रात्र; एका प्रदेशांत अज्ञानाच्या रानटीपणाचा कळस, तर दुसरा प्रांत सभ्य सुधारणेच्या नंदनवनांत विहार करणारा मूर्तिमंत वसंत; इत्यादि *सर्व घडामोडींच्या क्रांतीला कारण तो एकटा निर्जीव पदार्थच होय. आलेक्झांडर धी ग्रेट (शिकंदर) याला हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दीवर स्वारी करून पोरसराजाला खालीं तरवार ठेवण्यास भाग पाडण्याची जी स्फूर्ति झाली; तैमुरलंगानें हिंदुस्थानांत जी लुटालूट केली, त्यानंतर नादिरशहानें दिल्ली राजधानींत जी भयंकर अमानुष कत्तल केली आणि सोनपत पानपतच्या भारतीय युद्धांत महाराष्ट्राची कधींहि भरून

* श्लोक.

क्वचिद्वीणा वाद्यं क्वचिदपि च हा हेति रुदितम् ।
क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि च सुरामत्तकलहः ॥
क्वचिद्रम्या रामा क्वचिदपि जराजर्जरतनुः ।
न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ॥ १ ॥

न येणारी जी हानी अहमदशहा अबदलीच्या सैन्याकडून केली गेली, या सर्वांला कारण कोण ? हाच. रंगपंचमीच्या दिवशीं जाधवराव सिंदखेडकराच्या दरबारी महालांत त्याच्या मांडीवर क्रीडा करणाऱ्या लहान बालबालिकेचें गोजीरवाणें जोडपें पाहून त्याच्या तोंडून "हा जोडा छान दिसतो" या निघालेल्या शब्दांवर त्याला लग्नाच्या पेचांत आणण्याची स्फूर्ति व युक्ती त्या मालोजी बारगीराला कोणीं दिली ? यानेंच. सनातन धर्माचा ठिकठिकाणीं भ्रष्टाकार व उच्छेद चाललेला, गोब्राह्मणहत्येचा सुळसुळाट सुरू, देवळांच्या ठिकाणीं शुभ्र मशिदीचे घुमट झळकत आहेत, अशा स्थितींत त्रस्त भूमातेनें श्रीशंकराकडे आपल्या तरणोपायाची विनंति करण्याकरितां वकील पाठविला तो कोण ? हाच. शिवाजीचा स्वधर्मस्थापनेचा दृढ निश्चय झाल्यावर त्या भूसेवारूपी बायबलाचा उपदेश सर्वत्र प्रसृत करण्याकरितां प्रयागजी अनंत फगसे, विश्वासराव नानाजी यांच्यासारखे जे वीर-मिशनरी स्वयंस्फूर्तीनें बाहेर पडले, त्यांच्याबरोबरही हा होताच. एवंच जिकडे पहावें तिकडे तो सर्वसमर्थ निर्जीव पदार्थ आहेच आहे. तो जर या पृथ्वीवर नसता तर सृष्टिक्रमाचा ओघ पुढें पुढें न जातां तो मागेंच कोठें तरी थांबला असता. पण नाहीं. तशी ईश्वराची इच्छा नाहीं. तो असल्याशिवाय सृष्टि-रंगभूमीवरील नाटकास रंग येत नाहीं. सर्व नाटकांचा सूत्रधार हाच. यानें अनेक नाटकें रंगविलीं आहेत. कोंडाणा उर्फ सिंहगडावर अर्धचंद्राकृति हिरवें निशाण डुलतांना पाहून त्या गडाला काबीज करण्याकरितां माता जिजाईनें शिवबाला जो हुकूम फर्मावला, त्याचा कानमंत्र तिला यानेंच सांगितला. असा हा निर्जीव पदार्थ कोण ? निर्जीव म्हणावा तर सजीव व ज्ञानी म्हणविणाऱ्या हल्लींच्या मानवांपेक्षां तो जास्त कर्तव्यशक्तीचा दिसतो. मुका म्हणावा तर C. S I., G. C. S. I., इत्यादि पदव्यांचीं शिंगें शेंपट्या बाळगिणाऱ्या कौन्सिलरांपेक्षां तो फार स्पष्टवक्ता आहे. बरें, बहिरा किंवा आंधळा म्हणावा तर वॉरन् हेस्टिंग्ज् साहेबानें अयोध्येच्या बेगमांपासून पड्याआड घेतलेला लाखों रुपयांचा खजिना त्यानें प्रत्यक्ष पाहिला; आणि न्यायबुद्धीच्या पावित्र्याबद्दल ख्यात असलेल्या इंग्रजांचा प्रपितामह जो राबर्ट क्लैव्ह यानें उमीचंदाला धडधडीत खोटा दस्तऐवज करून फसवितांना प्रथम यानेंच पाहिलें. तेव्हां हा निर्जीव-सजीव, मुका-स्पष्टवक्ता आणि अंध-डोळस कोण ? सत्यासत्याचे सिद्धांत सोडविणारा रँग्लर हाच. रंकाचा राव व रावाचा रंक करणारा गारुडीहि हाच. असा तो गारुडी कोण ? तो कोठें आहे ? तो प्रत्येक राष्ट्रांत असतो. इतकेंच

नव्हे तर तो सर्व आबालवृद्धांस पूर्ण माहित आहे. प्रत्येक देशांत ज्या लहान मोठ्या चळवळीं सुरू होत्या, आहेत आणि पुढें होतील, त्या सर्वांना मूळ कारण हाच. एलीझाबेथ राणीच्या कारकीर्दीत इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट व कॅथलीक धर्मकलहाची योग्य संधी पाहून स्पेन राष्ट्रानें आपलें जगविख्यात 'स्पॅनीश आरमॅडा' भव्य आरमार, इंग्लंडावर स्वारी करून त्यास जिंकण्याच्या स्फूर्तीनें जेव्हां अटलांटीक महासागरांत लोटलें आणि " Rule Britania rule, Britania rule the waves. Britons never shall be slaves,"(ब्रिटानिया* महासागरावर राज्य करो. ब्रिटनलोक कधींहि गुलाम होणें शक्य नाहीं. ) या गर्विष्ठ कव्युक्तीला हाणून पाडण्याच्या महत्वाकांक्षेनें, स्पेनचे दर्यावर्दी वीर आपला राष्ट्रीय झेंडा ब्रिटानियावर फडकविण्यासाठीं स्पॅनीशप्रभूचा निरोप घेऊन आरमाराचीं शिडें हवेंत मोकळीं सोडून जेव्हां निघाले तेव्हां 'या परकीय टोळधाडीवर तुटून पडून ब्रिटनचें सौभाग्य रक्षण करण्यासाठीं सर्वांनीं धर्मकलह बंद ठेवून एक व्हावें आणि ब्रिटानियाच्या एकीचा तडाखा या स्पेनला दाखवून युद्धाच्या विजयोत्सवानंतर वाटेल तर धर्माच्या उलाढाल्या कराव्या,' असा उपदेश एलिझाबेथनें सर्व ब्रिटन राष्ट्रीयांना दिला, तो कोणाच्या उत्तेजनानें बरें ? याच्याच. पुढें त्याच अटलांटिक महासागरांत इंग्लंडनें स्पेनच्या आरमाराचा पार धुव्वा उडवून, गेल्या रूसोजपानी युद्धांतील पौर्वात्य पराक्रमाचा वामनावतार होईपर्यंत आपलें जलयुद्धसामर्थ्य जगांतील सर्व राष्ट्रांच्या निदर्शनास आणिलें, तें कोणाच्या बळावर ? याच्याच. सतत दहा वर्षें पारतंत्र्यांत राहून शेवटीं कर्नल हेन्री पॅट्रीकच्या वीस पंचवीस ओळींच्या व्याख्यानानें अमेरिकन युद्धाचा पाया घालण्याची जी स्फूर्ती अमेरिकनांस प्राप्त झाली, व त्यांनीं 'स्वतंत्र अमेरिकन

---

*मूळ इंग्रजी कविता अशी आहे.

When Britain first, at Heaven's command  
Arose from out the azure main,  
This was the charter of her land,  
And guardian angels sung the strain,  
Rule Britania ! Britania rule the waves !  
Britons never shall be slaves.

*Thomson.*

संस्थानांची' स्थापना केली, त्या कर्नलच्या वाक्शक्तींत इतकी प्रज्वलित चमक* कसली भरली होती ? याचीच. असा हा सर्वसमर्थ कोण ? अज्ञानांधःकारांतून व दारिद्र्याच्या तीव्र कचाट्यांतून धडपडत तडफडत ज्ञानरवीच्या उज्वल प्रकाशांत येण्यास, जें एकादें राष्ट्र पुढें पाऊल टाकतें त्यास मागाहून हाच नेट देत असतो. पूर्वजांची व वंशजांची स्थिती वर्णन करून वंशजांना जागृति देणारा आणि त्यांच्या हल्लाकीबद्दल पूर्ण निषेध व्यक्त करून त्यांच्या नसांतल्या रक्तास कर्तव्याची उसाळी मारावयास लावणाराहि हाच. असा हा सर्वव्यापी गुप्त पराक्रमी कोण ? तर—

## प्रत्येक राष्ट्राचा इतिहास.

प्रत्येक राष्ट्राला इतिहास हा अत्यवश्यक आहे. तो कधींकधीं भरभराटींत असतो, तर केव्हां केव्हां त्याला पालनपोषणाच्या अभावामुळें घरघराटहि लागतो. याला कारण फक्त त्या त्या राष्ट्राची स्वतंत्र व परतंत्र स्थिती हें होय. राष्ट्र स्वतंत्र असलें म्हणजे तेथील लोक इतिहासाची बरदास्त फार चांगली ठेवितात. व तेंच राष्ट्र परावलंबनांत गुंग झालें कीं, इतिहासहि त्याच्याबरोबर दास्यत्वाची कडू फळें चाखीत पडतो. स्वतंत्र राष्ट्रांनीं लिहिलेला स्वतःचा इतिहास आणि जेत्या राष्ट्रानें जित राष्ट्राकरितां लिहिलेला इतिहास यांत काळ्या पांढऱ्या इतकें जमीनअस्मानाचें अंतर असतें. खरा इतिहास फार जाज्वल्य स्वरूपांत असतो. त्याचा प्रकाश वेळीं सूर्यास दिपवितो असें कवि आपल्या कल्पनेनें भासवितात. खऱ्या इतिहासाला पदव्यांची जरूर नसते. त्याला कोणाची हांजी हांजी करणें बिलकूल खपत नाहीं. त्याला राजा काय आणि प्रजा काय सर्व सारखे. तो राणीसरकारच्या जाहिरनाम्यानें हुरळून जाणारा नाहीं किंवा वंगभंगा-

---

* कर्नल हेन्री पॅट्रीकच्या व्याख्यानांतील एक उतारा वाचकांकरितां येथें नमूद करितों.

"Is life so dear, or peace so sweet, as to be purchased at the price of chains and slavery? Forbid it, Almighty God! I know not what course others may take, but as for me give me LIBERTY or death!—"

मुळें खवळून जाणारा नाहीं. त्याला दिल्लीदरबारची फारशी किंमत वाटत नाहीं किंवा कलकत्त्याच्या ब्लॅकहोलची करुणा येत नाहीं. तो बोरवॉर, रुसोजपानी वॉर, पानपतचें भारतीयुद्ध यांच्या तोफांचा गडगडाट व भडीमार पाहून गांगरून जाणारा नव्हे, किंवा इंडियन पिनलकोडाच्या शाब्दिक कलमांनीं केली जाणारी शिक्षा ऐकून हतबल होणारा नव्हे. याच्या दरबारांत वाऱ्याच्या क्षुल्लक झुळके-चाहि रिपोर्ट दप्तरीं दाखल असतो. राष्ट्राच्या सरहद्दीवर राष्ट्रसंरक्षणार्थ जें सैन्य पहारा करीत असतें, त्याच्याबरोबर इतिहासहि पहारा करीत असतो. खरें कोणतें व खोटें कोणतें, तसेंच खरें किती व खोट्याची भेसळ किती, याचें तंतोतंत प्रमाण दाखविणारा कांटा त्याच्या दरबारीं आहे; परंतु हातांत न्यायाच्या समबुद्धि-दर्शकतेची तराजू घेतलेली पुतळी त्यानें आपल्या ऐतिहासिक दरबाराच्या इमा-रतीवर उभी केलेली नाहीं. आह्मीं खावें आम्हीं प्यावें आणि जमाखर्च तुमच्या नावें ही आपमतलबी राज्यपद्धत खऱ्या इतिहासाला बिलकूल आवडत नाहीं व तिचा तो जोरानें निषेध करितो. अधोगतीच्या वेळीं उपदेशाचे चार शब्द सांगून वाटेल त्याला तो उन्नत्यर्थ मदत करितो, परंतु ‘ कोणाचीच उन्नती न होतां माझी मात्र तुंबडी भरली पाहिजे, ही स्वार्थसाधुपणाची शक्कल त्याला बिलकूल माहीत नाहीं. इतक्या निस्पृहतेनें तो राहात आहे. कोणाच्या सुतळीच्या तुकड्याचीहि अपेक्षा न करितां परोपकारार्थ आपला देह पूर्ण झिजवीत असतां त्याचें राज्य व दरबारी थाट आज हजारों शतकें अबाधित व निष्कंटक चालला आहे; आणि दुसऱ्या बाजूकडे अर्थात् मानवी सृष्टीकडे नजर फेंकावी तों ‘परोप-काराय इदं शरीरम् ’ ची नौबद चांगली ठणठणत असतां शेंकडों राजक्रांत्या झाल्या व होत आहेत व पुढेंहि हाच क्रम चालावयाचा !

ऐतिहासिक चळवळ ही प्रत्येक राष्ट्रीय चळवळीचें प्रधान अंग आहे. या चळ-वळीशिवाय इतर चळवळी व्यर्थ होत. सर्व सुधारणांत समाजसुधारणा प्रथम अत्यवश्यक आहे. असल्या सर्व प्रकारच्या सामाजिक व राष्ट्रीय चळवळींचीं धोरणें कशीं असावीं हें इतिहास समजावून सांगेल. अमक्या प्रकारच्या चळ-वळीचा शेवट अमक्यांत होईल, हें इतिहास सप्रमाण सिद्ध करील. म्हणून ऐति-हासिक चळवळीकडे देशांतील लोक-धूरिणांचें लक्ष प्रथम गेलें पाहिजे. ऐति-हासिक माहिती मिळविणाऱ्या संस्था व त्यांचा प्रसार करणारे स्वयंसेवक पुढें आले पाहिजेत. करमणूकीचीं स्थानें इतिहासमय बनलीं पाहिजेत. नाटकांच्या रंगभूमीवर ऐतिहासिक वीर व वीरा यांचे प्रयोग दृष्टीस पडले पाहिजेत आणि घरीं दारीं

सर्व ठिकाणीं पूर्वजांचीं कृत्यें इतिहासद्वारा लहानापासून थोरापर्यंत सर्वांच्या दृष्टीसमोर मूर्तिमंत उभीं राहिलीं पाहिजेत. इतकें घडून आलें तर कोणत्याहि दुर्दैवी राष्ट्रानें हातांत माती घेतली तरी तिचें सोनें झाल्याविना राहणार नाहीं.

यक्षिणीच्या कांडीप्रमाणें इतिहास जी अद्भुत घडामोड घडवील तशी घडविण्याची शक्ती एकाद्या तलवारबहाद्दर वीराच्या मनगटांत क्वचितच आढळेल. देशाच्या कोणत्याहि परिस्थितींत आबालवृद्धांनीं इतिहास हा एक अवश्य वाचनापैकीं भाग केला पाहिजे. आमच्या हिंदी देशबांधवांनीं आपल्या राष्ट्रीय इतिहासाचीं फार शोधकबुद्धीनें पारायणें केलीं पाहिजेत. इतिहासाशीं ते व त्यांचीं मनें पूर्ण संलग्न झालीं कीं त्यांना ते ऐतिहासिक वीरपुरुष व त्या वीरांगना स्पष्ट दिसूं लागतील. त्यांच्याशीं ते बोलूं लागतांच ते वीर व वीरा त्यांना सर्व इतिहास स्वतःच बोलून दाखवितील. मराठी राज्य स्थापन केलें, परंतु त्याचा नीट बंदोबस्त करण्याइतकें आपल्याला पुरें आयुष्य उरलें नाहीं, म्हणून तळमळत असलेले शिवाजीछत्रपति आक्रोश करतांना दृष्टीस पडतील. स्वामिभक्त कलमबहाद्दर बाळाजी आवजी चिटणीस आपल्या वंशजांची लांगुलचालनाची भयंकर हांव पाहून टपटपा अश्रू गाळीत बसलेले दिसतील. निजामाला हजाम म्हणावयास न भिणारे तलवारबहाद्दर ब्राह्मणवीर आपल्या द्वैतभावी वंशजांस धिक्कार दर्शविण्यासाठीं हातांतील हुरडा हातांत ठेवून रागानें वर पहात असतांना जोंधळ्याच्या शेतांत घोड्यावर बसलेले अझून दिसतील. रणांगणांत मृत्यु न येतां म्लेंच्छ शत्रूकडून गफलतीनें प्राण घेण्यांत आला ह्मणून जनकोजी शिंदे पृथ्वीवर पुन्हां अवतार घेतलेले पाहण्यांत येतील. विश्वासराव भाऊसाहेब इराणी दुराणीच्या दुगाण्या हातांत धरून अस्मानांत भिरकावून देण्यासाठीं त्वेषानें डोळे लाल करून दीर्घ श्वास सोडीत फूं फूं करतांना दिसतील. इब्राहीमखान गारदी स्वामिसेवेची पराकाष्ठा अझूनहि व्हावयास पाहिजे ह्मणून दाढीमिशांवर पीळ देतांना दिसेल. रामशास्त्री प्रभुणे निस्पृहतेला हद्दपार झालेली पाहून क्रोधानें संतप्त असलेले स्पष्ट दिसतील. लालन बैरागीण सांप्रतच्या स्त्रियांची अवनति पाहून अश्रू गाळीत बसलेली इतिहासवाचकांच्या डोळयांना स्पष्ट दिसेल. अहल्याबाई व लक्ष्मीबाई सांप्रतच्या स्त्रीवर्गाची मानसिक गुलामगिरी पाहून त्यांचा निषेध करतांना आढळतील. अशा अनेक देखाव्यांनीं त्या इतिहासवाचकांची वृत्ति अगदीं तल्लीन होऊन जाईल. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा लोट वाहूं लागेल आणि त्यांचें हृदय भरून येईल.

इतिहास हा विषयच आधीं गोड व रसाळ. त्यांतच आमच्या वाडवडिलांच्या कीर्तीचा सुगंध रसरसून भरलेला. मग काय, सोन्याला जर सुगंध असता तर त्याची उपमा या इतिहास विषयास बरोबर शोभली असती. इतिहासा! तूं धन्य आहेस! धन्य तूं! असे शतशः धन्यवाद जरी आम्हीं तुला दिले तरी ते तुझ्या उपकाराच्या मानानें कांहींच नाहींत. मे गॉड् ब्लेस् यू! तुझें राज्य अबाधित चालो!

[ वन्दे जिनवरम. १९०८ ]

---

# सत्ता, सत्ताधीश व सत्ताधीन.

सत्ता ही एक विलक्षण स्थिति आहे. ती जितकी चित्ताकर्षक आहे, तितकीच जीविताकर्षकहि आहे. तिच्या अमृतसम गोडींतच हालाहल विषाची नांगी लपून बसलेली असते. सत्तेशिवाय शहाणपणाची शालजोडी आंगावर पांघरली जात नाहीं हें जितकें खरें आहे, तितकेंच सत्तेशिवाय आंगच्या दुर्गुणांचा तवंग उमलून बाहेर काढणारें दुसरें रेचक नाहीं, हेंहि खरें आहे. हातांत सत्ता येतांच इतरांना लत्ता मारण्याची ताकद येते खरी, पण अखेर स्वतः सत्ताधीशांनाच इतरांच्या लत्ता खाऊन असेल नसेल ती बुद्धिमत्ता व मालमत्ता गमावून गुलामांचें गुलाम बनावें लागतें. सत्ता शराबासारखी आहे. नव्हे, ती एक स्वादिष्ट उत्तेजक पण उन्मादकारक अशी शराबच आहे, आणि ती पचनीं पाडण्यासाठीं कोठ्याचें आरोग्यहि तसेंच दणकट व खंबीर असावें लागतें. याचें कारण ही सत्ता-शराब अशी चमत्कारिक मादक आहे कीं वेळीं दारूचा नाद सुटून सारीं माणसें मद्यपाननिषेधक बनतील, पण सत्तेच्या लालसेचा मानवी प्रवृत्तीला बसलेला चिकटा इतका जबरदस्त आहे कीं तो जगाच्या अंतापर्यंत निघणें शक्य नाहीं. केवळ तत्वज्ञानांत मग्न राहणाऱ्या स्थितप्रज्ञांना सत्तेच्या शराबाची तलफ ही चीज काय आहे, याची जरी कांहीं कल्पना नसली, तरी जो जो म्हणून मनुष्य आहे-मग तो कसल्याहि स्थितींत असो, त्याच्या कर्तबगारीचें क्षेत्र कितीहि संकुचित असो-तो तो या शराबाच्या एका घोटासाठीं वाटेल त्याच्या

नरडीचा घोट घ्यावयाला कमी करणार नाहीं. जगांतल्या सर्व धडपडी सत्तेसाठीं चालल्याआहेत. नवेनवे शोध लावून सृष्टीच्या सर्व शक्ती हाताच्या चिमटींत पकडण्याच्या खटपटी सत्तेसाठीं चालल्या आहेत. व्यापारांतील चढाओढ सत्तेसाठींच चालली आहे. शिक्षणप्रसाराचा आटारेटा सत्तेसाठींच सुरू असतो. महायुद्धाचीं रणशिंगें सत्तेची लालसाच फुंकीत असते, आणि समरांगणावर पडलेल्या प्रेतांच्या खचांत आणि रक्तमांसाच्या चिखलांत सत्तेची वर्चस्व-लालसाच कोल्ही कुत्रीं गिधाडांच्या बरोबरीनें सर्वत्र भडकत असते. मनुष्याला आपला जीव कितीहि प्यारा असला, तरी सत्तेसाठीं झगडतांना तो त्या जीवाचीहि पर्वा ठेवीत नाहीं. अब्रूसाठीं जीव देणारे लोक असतील, पण सत्तेचा टीचभर तुकडा पदरांत पडत असेल तर अब्रूचीहि पर्वा न करणारे पर्वरदिगार पुष्कळ सांपडतील. दिडकी दिडकीसाठीं जीवाचें रान करणारे लोक, नोकरींत एक इंच बढती मिळत असेल, तर पन्नास फूट लांबींत बसतील इतक्या रुपयांचा होम करायला मागें पुढें पहात नाहींत. मनुष्याला आपलीं बायका पोरें, आईबाप, भाऊ वहिणी या फार प्रिय असतात, असा सर्वसामान्य नियम आहे; पण सत्तेच्या प्राप्तीसाठीं त्यांचे बेधडक खून करणारे लोक जगांत झाले कीं नाहीं ? रगड झाले व रगड होतील. सारांश, प्राणीमात्राच्या सर्व धडपडींचा इतिहास ही सत्ताप्रियताच रंगवीत आली आहे. सत्तेच्या शराबाच्या गोडीपुढें मोक्षप्राप्तीच्या गोडीलाहि माणसांनीं लाथ हाणलेली आहे; मग बिचाऱ्या परमेश्वराची क्षेमकुशलता कोण पुसणार ? इष्काची निशा किंवा शराबाची निशा केव्हां तरी उतरते आणि दुसरा घोट घेण्यापूर्वी थोडा वेळ तरी माणूस माणुसकींत येतो. पण सत्तेच्या शराबाचा एकच बिंदु जिभेवर पडतांच, त्याच्या निशेची तार इतकी वाढते, त्याच्या घशाला इतकी कोरड पडते कीं साऱ्या विश्वाचा स्वाहा केला तरी त्याची सत्तेची तहान भागत नाहीं. जॉर्ज वॉशिंग्टन पाणी पाणी करून मेला, पण शिकंदर बादशहा 'पृथ्वीवर आतां जिंकायलाच कांहीं उरलें नाहीं' म्हणून ढळढळा रडत मेला ! !

सत्तेसाठीं माणसाची एवढी धडपड सुरू असते, म्हणून सत्ताप्राप्ति ही ईश्वरप्राप्ति इतकी कांहीं कठीण नाहीं. या नाठाळ जगांत सत्तेची प्राप्ति अत्यंत सुलभ आहे. दारू पिणें जितकें सोपें आहे, तितकें ती पचविणें फार कठीण आहे. सत्ता मिळविणें जितकें सोपें आहे, तितकेंच ती टिकवणें फार कठीण आहे. सत्तेच्या स्वयंवरांत सरळमार्गी पापभीरूंची डाळ कधींच शिजत नाहीं. ही नवरी उलटया काळजाच्या उमेदवारांवर बेहोष फिदा असते. परंतु तिनें एखाद्याला

माळ घातली म्हणजे ती त्या प्यार पुरुषाला कायमची काबूंत ठेवतां येईलच, असा मात्र भरंवसा नाहीं. राजाला विष्णूचा अवतार मानण्याची कल्पना, वंशपरंपरेनें राजसत्ता पुढें चालविण्याची वहिवाट, औरस नसला तर दत्तक घेण्याचा परिपाठ इत्यादि प्रकार सत्तेचा कैफ येनकेन प्रकारेण कसातरी कायम टिकविण्याचे कृत्रिम प्रकार होत. पण हे टिकाऊ नसतात हें इतिहासावरून आपणांस खासें शिकतां येतें. सत्ताप्राप्तीसाठीं तिच्या नथणींत अडकविण्याच्या गळाला शुद्ध लोकहितार्थेंच आमिष लावलेलें असतें. पार्लमेंटांत, कॉंग्रेसमध्यें, कौन्सिलांत किंवा मुन्सिपाल्टींत घुसणाऱ्या उमेदवारांची जिव्हा निवडणुकीच्या वेळीं साखरेलाही गोडींत जिंकते. पण पुढें काय दिवे लागतात ते दिसतातच. गेल्या महायुद्धाच्या वेळीं सुद्धां जर्मनांनीं काय किंवा इंग्रजांनीं काय, दोघांनींही याच आमिषाचा उपयोग करून झुकत्या दुनियेला झुकविली. रामराज्य येणार, आकाशांतल्या बापाच्या लेकाचें सत्ययुग सुरू होणार, गुलाम राष्ट्रें स्वतंत्र होणार, काय वाटेल तें होणार, असल्या जाहिराती फडकवून, युद्धाचार्य विल्सन दीक्षितांनीं बुद्धिसागराचें मंथन करून १४ रत्नें बाहेर काढलीं. पण अखेर काय झालें ? जर्मनीची क्षात्रवृत्ती व अमेरिकनांची मध्यस्थी यांना इंग्रजांच्या धोरणी डांवपेचांच्या प्रवृत्तीनें उलटी टांग मारून बोलबोलतां चीत केलें आणि युद्धदीक्षित विल्सन भटजी चवदाव्या रत्नाची खिरापत खात चतुर्थाश्रमांत प्रविष्ट झाले. हातची सत्ता टिकवावी कशी याची गुरुकिल्ली आजकाल फक्त इंग्रेजांपाशींच आहे.

सत्तेचा परिणाम सत्ताधीनांवर बरा होवो कीं वाईट होवो, सत्ता मिळविणें आणि ती बराच काळ टिकविणें, याला बुद्धीचें बळ तसेंच असामान्य पाहिजे, यांत शंका नाहीं. शस्त्रांचें बळ कितीहि प्रचंड असो, अस्त्रांची शक्ती केवढीहि जाज्वल्य असो, कुशाग्र बुद्धिबळाच्या जोरावर त्या दोनहि शक्तींना बसल्या बैठकीवरून कसें चीत करतां येतें, हें गेल्या महायुद्धांत इंग्रेजांनीं सर्व जगाच्या निदर्शनास आणलें आहे. ऐदी तत्वविवेचक आणि सत्तेच्या घरटांत दळले जाणारे बुद्धिहीन गुलाम, या बुद्धिबळाचें पृथक्करण करून, ‘ तें स्वार्थानें सडलेलें आहे, त्यांत माणुसकीचा नीचपणा ओतप्रोत भरला आहे,’ वगैरे गुलामी रडगाणीं खुशाल रडोत; ज्यांना सत्ता टिकवायची असते, ते आपल्या बुद्धिबळाची तेजस्विता बरी किंवा वाईट, सुष्ट किंवा दुष्ट, परोपकारी किंवा जुलमी, वाटेल त्या रंगाची ठेवल्याशिवाय मुळींच राहणार नाहींत. मुळीं सत्तेची उत्पत्ति जेथें

स्वार्थांच्या पोटीं, तेथें सत्ताधीनांच्या पाठीवर उडणारे कोरडे जुलमाच्या ताठ वाखाचे आहेत किंवा लपंडावीच्या राठ सालीचे आहेत, या प्रश्नाची किंमत काय? ज्याच्या हातीं शिकार तो पारधी, हा सनातन सिद्धांतच आहे. मुत्सद्दे-गिरीच्या बॅग्नेटाच्या टोकानें ३३ कोटी लोकवस्तीच्या हिंदुस्थानाला वचकांत ठेवणाऱ्या विदेशी इंग्रेजी सत्तेला नांवें ठेवणाऱ्यांच्या स्वदेशी सत्ताबाज पूर्वजांनीं तरी हाच सिद्धांत पाळला होता ना? आज इंग्रेजांनीं बुद्धिबळाच्या डावांत साऱ्या जगावर मात केली आहे. हा बुद्धीच्या वर्चस्वाचा प्रश्न आहे आणि कधींहि कोठेंहि सूर्य न मावळण्याइतका जगाचा भाग त्यांनीं जर आपल्या बुटाच्या टांचेखालीं दडपून धरला असेल, तर त्यांच्या बुद्धिबळाचा आक्रम' करण्याची कसोशी करावयाची कीं नुसत्या शिवीगाळीवर आपल्या कमजोर बुद्धीचें समर्थन करावयाचें?

वरचढ बुद्धिमत्ता आणि हातांत राजकीय सत्ता, या दोन गोष्टींच संयोग झाला, कीं इतरेजनांना पादाक्रांत करून सत्ता टिकविण्यासाठीं वाटेल त्या भल्याबुऱ्या उपायांचा अवलंब करणें, हा मनुष्याचा स्वभावधर्मच आहे. त्यावद्दल कोणी कोणास हसण्याचें किंवा द्वेष करण्याचें कारण नाहीं. हा शर्यतीचा प्रश्न आहे आणि बुद्धिबळाच्या टग् ऑफ वॉरमध्यें विजयी होणारे खेळाडू पराजित प्रति-स्पर्ध्यांना वाटेल तसे दडपूं लागले तर तेथें 'आत्मवत् सर्व भूतेषु' असल्या तत्व-ज्ञानाची वकीली राजकारणाच्या किंवा समाजकारणांच्या क्षेत्रांत कोणीहि विचारांत घेत नसतो. मनगटांत जोर असेल, बुद्धीचें तेज जाज्वल्य असेल, कर्तबगारीची धमक जिवंत असेल, डावपेंच लढविण्याची प्रवृत्ति लवचीक असेल, त्यानें जगज्जेतृत्वाची महत्वाकांक्षा खुशाल यशस्वी करून दाखवावी. या जगांत मर्दांच्या मर्दुमकीला मरणाचीहि आडकाठी नसते. अर्थात् जबरदस्त जेत्यांच्या बुद्धिवर्च-स्वानें हतवीर्य बनून गुलाम झालेल्यांना, आत्मविश्वासाची कसोशी करून आपा-पल्या बुद्धीची शक्ति प्रतिस्पर्ध्यांच्या बुद्धीला चीत करण्या इतकी प्रखरतम बनविल्याशिवाय मोक्षाचा दुसरा मार्ग लाभणें शक्य नाहीं. अमेरिकेंतल्या गुलाम निग्रोंच्या उन्नतीचा प्रश्न महात्मा बुकर टी. वाशिंगटन यानें आपल्या समाजाच्या आत्मविकसनानें झटझट सोडवून दाखविला. सत्तेच्या साधनानें शिरजोर झालेल्या प्रतिस्पर्ध्यांचा निवळ द्वेष करण्यापेक्षां त्याच्या शिरजोरपणाच्या शक्तीचें पृथक्करण करून त्यांतलीं उत्कृष्ट उत्कृष्ट तत्त्वें आत्मविकसनार्थ पचनीं पाडण्याचा उपक्रम केला, तर कालवशात् गुलामांनाहि स्वातंत्र्याची प्राप्ति होणें अशक्य नाहीं.

आपापल्या जातीच्या उन्नतीसाठीं प्रत्येक जातीनें खुशाल संघटित चळवळी कराव्या. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सर्व जातींनीं दोन विभागांत एकवटून खुशाल आपापल्या विशिष्ट संस्कृतीच्या आत्मविकसनाच्या भगीरथ खटपटी कराव्या. परंतु या खटपटींच्या धोरणाची दृष्टि हिंदु समाजाच्या व हिंदुराष्ट्राच्या एकमुखी व एकजिनशी पुनरुज्जीवनाकडे रोंखली जाईल, परस्परांच्या भिन्नभिन्न प्रवृत्तींचा योग्य प्रमाणांत विनिमय केला जाईल, तर पुण्यस्मरण शिवरायाच्या महाराष्ट्राच्या तंबोऱ्याच्या विविध तारा आज ज्या बेसुरतान झाल्या आहेत, त्या एकतान होतील आणि ब्राह्मण व ब्राह्मणेतर या भेदाच्या निर्मूलनांतून महाराष्ट्राच्या भाग्योदयाचीं किरणें फांकतील. असा सोन्याचा दिवस शिवरायाच्या पुण्यचरणाच्या प्रसादानें लवकरच उगवो.

[ प्रबोधन १६-१२-२२. ]

---

# नाना शंकरशेट.

गुदस्त सालीं वाक्पुष्पें वाहून नानांच्या पुण्यात्म्याचें यथामति पूजन करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें, यंदांच्या वर्षी त्यांच्या उज्वल स्मृतिचित्रावर विचार-सुमनांची ओंजळ लेखनद्वारा वाहण्याचा सुयोग दैवज्ञ प्रबोधिनिकारांनीं आणून दिला आहे. त्यांच्या चरणांना आमचें वंदन असो. नानांच्या नानारंगी चारित्र्याचा जसजसा अधिक विचार होईल, तसतसें त्याचें वास्तविक उज्वल स्वरूप महाराष्ट्राच्या प्रचितीस येत जाईल. आजकाल पुढाऱ्यांची व राष्ट्रनेत्यांची गर्दीच गर्दी उडाली आहे. विचारक्रांतीनें आचाराचेंहि रूप पालटलें आहे. नव्या नव्या आश्चर्यकारक कल्पनांच्या वादळांत आमच्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाची नौका परिस्थितीच्या लाटांबरोबर वर खालीं हेलकावे खात आहे. आजचा महाराष्ट्र स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या केवढयाहि लांबलांब बाता झोकीत असला तरी हें खरें कीं तें बरें, अशा किंकर्तव्यमूढ स्थितींत परिस्थितीच्या पाशांत तो बद्ध होऊन धडपडत आहे खास. तो आज परिस्थिती-चा दास आहे. महाराष्ट्रांतल्या भिन्न भिन्न समाजांच्या भिन्न भिन्न आकांक्षा स्वतःच्या निष्कलंक परंतु बिनतोड संवादी व्यक्तित्वांत केंद्रीभूत करणारा आणि

लोकमान्यतेच्या किचकट परीक्षेंत सोळा आणे गुण मिळवून, राजमान्यतेच्या दिव्यांतहि 'बुराख' न ठरणारा नेता आज राष्ट्राच्या धुरेवर एकहि दिसत नसल्यामुळें, नानांची आठवण अपरिहार्य आहे. नानाकालीन इतिहासाचा ओघ खटार–दौंडीचा आणि चालू काळचा मामला मोटरदौंडीचा असला, तरी त्यामुळें नानांनीं बजाविलेल्या शास्ताशासितमान्य राष्ट्रकर्तव्याचा कस आजला अणुरेणूहि हिणकस ठरत नाहीं, येथेंच त्यांच्या चारित्र्याचें रहस्य रसिकाला पटणारें आहे. हें रहस्य दाखवून दिसणारें नव्हे, सांगून पटणारें नव्हे, किंवा लिहून व्यक्त करतां येणारेंहि नव्हे. तें ज्यानें त्यानें आत्मचिंतनानेंच पारखून घ्यावें. सज्जन नागरीक, इभ्रतदार व्यापारी, सरकारचे धोरणी सल्लागार, जनतेचे अद्वैती प्रेमळ पुढारी, स्त्रीशिक्षणाचे धाडसी कैवारी, सुधारणेचे निर्भीड भोक्ते, जीर्ण–नवमतांच्या झगड्यांतील निस्पृह व न्यायी मध्यस्थ, अशा नाना दृष्टींनीं नानांचें नानापण, चवचाल लोकांच्या स्मृतीच्या बुळबुळीत उतरणीवरून जरी घसरलेलें असलें, तरी महाराष्ट्राच्या इतिहासानें तें जरतारी शेल्याच्या फदांत चिरंजीव राखलेलें आहे.

नानांच्या वेळच्या परिस्थितीची ज्यांना योग्य कल्पना असेल, त्यांनाच नानांच्या अचाट कर्तबगारीचें खरें माहात्म्य पटेल. हिंदवी स्वराज्याचा अधःपात, महाराष्ट्राच्या क्षात्रतेजाचा निःपात आणि परकीय राजसत्तेच्या मोहक मायेनें होऊं घातलेला आमच्या आत्मभावनेचा घात, अशा तिरपगड्या त्रांगड्यांत महाराष्ट्र संमूढ झाला असतांना, ज्या पठ्ठ्यानें परिस्थितीला तोंडबेडी चढवून बोलबोलतां देशकालमानाच्या रिंगणावर फिरविली आणि 'माझ्या महाराष्ट्रा, घाबरूं नकोस. ही परिस्थिति अजिंक्य नाहीं. तुझा आत्मविश्वास कायम ठेवशील, तर याहि परिस्थितीवर आरूढ होऊन अटकेपार मराठ्यांचा जरीपटका पुनश्च नाचविशील.' अशी हांक मारून त्याला कर्तव्यतत्पर केलें, त्या नाना शंकरशेटला, मुंबापुरीच्या नानांना, महाराष्ट्राच्या तत्कालीन धूरीणाला विसरण्या इतका आजचा तरुण महाराष्ट्र कृतघ्न कसा होईल बरें ?

परिस्थिति वीरांची माता कीं वीर परिस्थितीचा पिता, हा एक प्रश्न नानांनीं आपल्या उज्वल चरित्रांत स्पष्ट सोडविला आहे. वरवर पहाणारे असें म्हणतात कीं मुसलमानी गुंडगिरी बेफाम बोकाळली म्हणून शिवाजी अवतरला आणि म्हणूनच संतमंडळींनीं आपले भागवती टाळ जोरजोरानें ठोकण्याचा धडाका सुरू केला. भिक्षुकांची भिक्षुकशाही ढुंगणाचें डोक्याला गुंडाळून बेताल नाचूं लागली,

म्हणून एकनाथस्वामी अवतरले. त्याच प्रमाणें मोंगलाईला पादाक्रांत करणारी मराठेशाई आंग्लाईनें नेस्तनाबूद केली, म्हणून त्या क्रांतीचा साखळदंड उत्क्रांतीच्या नांवाला बेमालूम अडकविण्यासाठीं नाना शंकरशेट उत्पन्न झाले. पण किंचित् विचारांतीं ही 'थिअरी' चूक आहे, असेंच अखेर कबूल करणें भाग पडतें. 'पुरुष असे अर्थाचा दास' हें सूत्र भीष्माचार्यांनें म्हटलें, तरी अर्थाला लाथ मारून, आपलें पौरुषत्व गुलाम न बनवितां, स्वयंविहारी वायूप्रमाणें तें दाही दिशांस उधळविणारे मर्द जसे आजहि आहेत, तसे खुद्द भीष्माचार्यांच्या नाकासमोरहि होतेच कीं नाहीं? मग काय राहिली त्या सूत्राची क्रिंमत? परिस्थितीचा कुसवा वीरप्रसू असता, तर हें जग गुलामांचा पांजरापोळ कां बनतें? परिस्थितीच्या पायांत कुलंगी कुत्र्याप्रमाणें शेपटीचे गोंडे घोळायला मर्द वीर कधीं तरी इच्छील काय? परिस्थितीच्या पायाचे आंगठे गुलामांनींच चुंबावे, तें मर्दांचें काम नव्हे. मर्द वीर बेशिस्त परिस्थितीला कर्तबगारीच्या हंटरचे तडाखे लगाऊन, सर्कशींतल्या खुनशी सिंहिणीप्रमाणें, शिस्तवार कसरत करायला लावतो. वेळीं परिस्थिति तुफान होऊन गुरकाऊं लागली तरी खरा वीर आपलें पुढें टाकलेलें पाऊल रेंसभरहि मागें न घेतां, कधीं चुचकारून तर कधीं दरडावून, तिला ठरलेल्या कसरतीची गोलांटी उडी मारायला लावतोच लावतो; पण तिच्या नजरेला भिडलेली नजर लवमात्रहि नरमवणार नाहीं. नानावर राज्यक्रान्तीच्या धामधुमींत राजकीय बालंटांची भयंकर संक्रान्त खवळली होती; पण त्यावेळचें त्यांचें सौजन्य आणि त्यांचा सत्याग्रही बाणा पाहिला, कीं परिस्थितीला वीरप्रसू समजणाऱ्यांची कींव केल्याशिवाय कोण राहील? मराठेशाहीच्या जागीं अंग्रेजशाही, बाजीरावीच्या ठिकाणीं अलिपष्ठणी, अहम् वयम्च्या ऐवजीं यस फयस, केवढा भयंकर परिस्थितीचा ट्रन्स्फर सीन! पण त्यांतूनहि नानांनीं आपल्या अद्वितीय बुद्धिबलानें अनेक उमेदवार प्याद्यांचे फर्जी करून, शहाणपणाची मिजास मारणाऱ्या अंग्रेज बहादुरांना महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेचें पाणी पाजून गार बसवलें!

# हिंदवी स्वराज्याचा खून.

[ ता. २९ एप्रील १९२२ रोजीं सातारा येथें श्रीशिवजयंत्युत्सव प्रसंगीं श्री. ठाकरे यांनीं दिलेलें व्याख्यान. ]

भगिनीबांधवहो, आज आपण पुण्यश्लोक श्रीशिवाजी महाराज यांचा जन्मदिवस साजरा करण्याकरितां जमलों आहों. आजचा दिवस अत्यंत मंगल, अत्यंत पवित्र, आणि स्फूर्तिदायक असा आहे. या दिवशीं गुलाम महाराष्ट्राला स्वतंत्र करणारा, नामर्द मराठ्यांना मर्द बनविणारा आणि नांगरहाक्या अनाडी शेतकऱ्यांतून भीष्मार्जुनकर्णांपेक्षांहि सवाई भीष्मार्जुन निर्माण करणारा राष्ट्रवीर जन्माला आला. अर्थात् अशा मंगल प्रसंगीं ' शिवरायास आठवावें ' या विषयानुरूप शिवचरित्राबद्दल मीं कांहीं विवेचन करावें, अशी आपली अपेक्षा असणें साहजिक आहे व तसा माझाहि उद्देश होता. परंतु पाडळीला मोटारींत बसून मी साताऱ्याकडे येऊं लागतांच माझा तो बेत बदलला. शिवरायास आठवतां आठवतां सबंध शिवशाहीचा चित्रपट माझ्या अंतश्चक्षूंसमोर भराभर फिरूं लागला; आणि सातारच्या या निमकहराम स्वराज्यद्रोही राजधानींत मी येऊन दाखल होतांच, शिवाजीनें स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या अंतकाळचा भेसूर देखावा मला स्पष्ट दिसूं लागला. बांधवहो, आपण सातारकर असल्यामुळें आपल्याला साताऱ्याचा अभिमान असणें योग्य आहे. क्षमा करा, मला तितका त्याचा अभिमान नाहीं. सातारा ही पापभूमी आहे. सातारा ही हिंदवी स्वराज्याची ऱ्हासभूमी आहे. रायगडावर उदय पावलेल्या हिंदवी स्वराज्याचा सूर्य या साताऱ्यास अस्त पावला. रायगडाला जन्माला आलेल्या स्वराज्याच्या नरडीला नख देऊन भिक्षुकशाहीनें या साताऱ्यास त्या स्वराज्याचा मुडदा पाडला. दिल्लीच्या मोंगल बादशाहीच्या सिंहासनाला गदगदा हालवणारा, इतकेंच नव्हे, तर अटकेपार रूमशामच्या बादशाही तक्ताचा थरकांप उडविणाऱ्या हिंदवी स्वराज्याचें रक्त या साताऱ्याच्या पापभूमीवर सांडलेलें आहे. शिवछत्रपतीच्या विश्वव्यापी मनोरथाचा ज्या भूमींत नायनाट झाला, त्याच भूमीवर उभें राहून आजच्या मंगल प्रसंगीं पुण्यश्लोक शिवरायाचें गुणगायन करण्यापेक्षां, आमचें हिंदवी स्वराज्य कां नष्ट झालें, त्याच्या गळ्याला कोणकोणत्या अधमांनीं नख

लावलें आणि भिक्षुकशाहीनें कोणकोणतीं घाणेरडीं कारस्थानें करून आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मुडदा या साताऱ्यांत पाडला, त्याचा आज जर आपण इतिहासाच्या आधारानें विचार केला, तर सध्यांच्या स्वराज्योन्मुख अवस्थेंत आपल्याला आपल्या कर्तव्याचीं पावलें नीट जपून टाकितां येतील. स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे, असलीं तात्त्विक पुराणें सांगणारे टिळकानुटिळक आज पैशाला खंडीभर झाले आहेत. परंतु त्याच जन्मसिद्ध हक्कावर रखरखीत निखारे ठेवण्यास ज्या हरामखोरांची मनोदेवता महाराष्ट्रद्रोहाचा व्यभिचार करण्याचे कामीं किंचितसुद्धां शरमली नाहीं, त्यांचा खराखुरा इतिहास उजेडांत आणणारे मात्र आपल्याला मुळींच भेटणार नाहींत. आज स्वराज्य शब्दाचें पीक मनमुराद आलेलें आहे. फंडगुंडांच्या पोतड्या भरण्यासाठीं स्वराज्य हा एक ठगांचा मंत्र होऊन बसला आहे. परंतु स्वराज्य म्हणजे काय याची व्याख्या मात्र कोणीच स्पष्ट करीत नाहीं. अशा प्रसंगीं आपलें हिंदवी स्वराज्य आपण कां गमावलें, याचा नीट विचार केल्यास सध्यां महाराष्ट्रभर धुमाकूळ घालीत असलेल्या राष्ट्रीय गुंडांच्या स्वराज्यविषयक चळवळींत ब्राह्मणेतर संघानें किती जपून वागलें पाहिजे याचा खुलासा तेव्हांच होईल. राष्ट्रीयांचीं स्वराज्य-पुराणें म्हणजे गांवभवानीचीं पातिव्रत्यावरील व्याख्यानें आहेत; कारस्थानी वेदांत आहे; ठगांची ठगी आहे; स्वार्थसाधूंचा मायाजाल आहे. शिवरायास आठवावें; गोष्ट खरी! परंतु आज शिवछत्रपतीचें स्मरण होतांच त्यांच्या हिंदवी स्वराज्याच्या ऱ्हासाचें पृथक्करण करण्याकडे आपली स्मरणशक्ति वळते, त्याला इलाज काय?

तेव्हां आपण आतां छत्रपति प्रतापसिंह महाराज यांच्या कारकीर्दीकडे वळूं. प्रतापसिंह हे एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीचे करवीरकर शाहू छत्रपति होते. १८१८ सालीं रावबाजीचें व त्याबरोबर पुण्यांतल्या पेशवाईचें उच्चाटण पापस्मरण बाळाजीपंत नातूंनीं केल्यानंतर ईस्ट इन्डिया कंपनीनें प्रतापसिंह महाराजांना त्यांच्या पूर्वजांच्या सिंहासनावर स्थापन केलें. यापूर्वीं याच अजिंक्यताऱ्याच्या किल्ल्यावर प्रतापसिंह महाराजांना निमकहराम कृतघ्न पेशव्यांनीं सहकुटुंब सहपरिवार अनेक वर्षें कैदेंत ठेवलेलें होतें. सिंहासनाधिष्ठित होतांच, महाराजांनीं राजकारणाची यंत्ररचना ठाकठीक बसविल्यानंतर, ब्राह्मणेतरांच्या सामाजिक व धार्मिक उन्नतीचा प्रश्न हातीं घेतला. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ब्राह्मणेतरांच्या उन्नतीचा जो प्रश्न करवीरकर छत्रपतीनीं सध्यां हातीं घेतलेला आहे, तोच

प्रश्न प्रतापसिंह महाराजांनीं हातीं घेऊन दीनदुनियेला ब्राम्हणांच्या कारस्थानी भिक्षुकशाही बंडापासून मुक्त करण्याचा विडा उचलला. ब्राह्मणेतरांच्या अज्ञानावर मनमुराद चरण्यास सोकावलेल्या पेशव्यांच्या अभिमानी भिक्षुकांना महाराजांची ही चळवळ कशी बरें सहन होणार ? ती हाणून पाडण्यासाठीं भिक्षुकशाहीनें कमरा कसल्या. त्यावेळीं या कंपूचें पुढारपण स्वीकारण्यासाठीं पुढें झालेले त्यावेळेचे 'लोकमान्य' ह्मटले ह्मणजे पापस्मरण बाळाजीपंत नातु हे होत. इंग्रेजांकडून मिळणाऱ्या जहागिरीच्या लचक्याला लालचटलेल्या ज्या अधमानें स्वजातिवर्चस्वाच्या शनवारवाड्यावर इंग्रजांचा बावटा फडकवायला मागेंपुढें पाहिलें नाहीं तो चांडाळ, छत्रपतीच्या ब्राह्मणेतर संघाला उन्नतीचा एक श्वास देखील कसा घेऊं देईल ?

असले हे लोकमान्य नातु शेंडी झटकून पुढें सरसावतांच त्यांच्या पाठीमागें चिंतामणराव सांगलीकर, बाळाजी काशी किबे, बाळंभट जोशी, बाळकोबा केळकर, नागो देवराव, भोरचे पंत सचीव, कृष्णाजी सदाशिव भिडे, सखाराम बल्लाळ महाजनी, महादेव सप्रे, भाऊ लेले, (एक मावळाः—अर इचिभन ! हत वी भाऊ लेल्या ?) असले हे अस्सल ब्राह्मण वीर प्रतापसिंह छत्रपतीची चळवळ आमूलाग्र उखडून टाकण्यासाठीं कमरा कसून सिद्ध झाले. परंतु ही सर्व सेना जातीची पडली ब्राह्मण, एकरकमी चित्पावन, अस्सल राष्ट्रीय. तेव्हां आपल्या पक्षाला 'सार्वजनिकत्व' आणण्यासाठीं बाळाजीपंतांना एखाद्या फुल्याची गुंजाळाची किंवा औख्याची फारच जरूर भासूं लागली. लवकरच परशुरामाच्या कृपेनें बाळाजीपंतांच्या या राष्ट्रीय चळवळींत एक बिनमोल ब्राह्मणेतर प्यादें हस्तगत झालें. तें कोणतें ह्मणाल, तर खुद्द प्रतापसिंहाचे धाकटे भाऊ आप्पासाहेब भोंसले. खुद्द राजघराण्यांतलाच असला अस्सल मोहरा राष्ट्रीय चित्पावनी मंत्राच्या जाळ्यांत सांपडतांच नातूच्या राष्ट्रीय कटाला सार्वजनिकपणाचें स्वरूप तेव्हांच आलें आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या बगलेंत शिरून या राष्ट्रीय नातूकंपूनें इंग्रजांच्या हातून छत्रपतीच्या सिंहासनाचें परस्पर पावणेतेरा करण्याची आपली कारवाई सुरू केली. या कामीं त्यांनीं एकदोन शंकराचार्यसुद्धां बगलेंत मारले. नातूनीं विचार केला, कीं हा मरगट्टा छत्रपति ब्राह्मणेतरांत धार्मिक आणि सामाजिक जागृति करून आम्हां भूदेवांचें वर्चस्व कढीपेक्षांहि पातळ करणार काय ? थांब लेका ! तुझ्या सिंहासनाच्या खालींच माझ्या चित्पावनी कारस्थानाचा बांब गोळा ठेवून, कंपनी सरकारच्या हातूनच त्याचा स्फोट करवितों. मग पहातों तुझ्या ब्राह्मणेतरांच्या

उन्नतीच्या गप्पा ! बांधवहो, कोल्हापुरच्या श्रीशाहू छत्रपतींना 'स्वराज्यद्रोही' ठरविण्याची केसरीकारांची राष्ट्रीय चतुराई आणि प्रतापसिंहाला गुप्त कटाच्या फांसांत अडकवून जिवंत गाडण्याची नातुशाही या दोनही गोष्टींचा मसाला एकाच राष्ट्रीय गिरणीचा आहे, इतकें आपण लक्षांत ठेवलें म्हणजे झालें. नातु-कंपूंत सामील झालेल्या या सर्व पंचरंगी राष्ट्रीयांनीं कंपनीसरकारच्या गव्हर्नरा-पासून तों थेट साताऱ्याच्या रेसिडेंटापर्यंतच्या सर्व पात्रांच्या नाकांत आपल्या कार-स्थानाची वेसण 'खूप शर्तीनें' घातली. अर्थात् सर जेम्स कारनाकपासून तों थेट रेसिडेंट कर्नल ओव्हान्सपर्यंत सगळीं बाहुलीं लोकमान्य नातूंच्या सूत्राच्या हालचालीप्रमाणें 'लेफ्ट राइट' 'लेफ्ट राइट' करूं लागलीं. या पुढचा इतिहास अत्यंत भयंकर आणि मानवी अंतःकरणास जाळून टाकण्यासारखा आहे. परंतु तो प्रत्यक्ष घडवीत असतांना मात्र बाळाजीपंत नातू किंवा चिंतामणराव सांगली-कर यांपैकीं एकाचेंहि अंतःकरण चुकूनसुद्धां कधीं द्रवलें नाहीं. राष्ट्रीय अंतः-करण म्हणतात तें हें असें असतें. अनुयायांची गोष्ट काय विचारावी ? जेथें खुद्द आप्पासाहेब भोंसले, राज्यलोभानें सख्या भावाच्या गळयावर सुरी फिर-विण्यास सिद्ध झाला, तेथें आपल्या सदसद्विवेक बुद्धीची मुंडी पिरगळतांना इतरांना कशाची भीती ? प्रतापसिंह महाराजांनीं भिक्षुकशाहीचें बंड मोडून ब्राह्मणेतरांना धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य देण्याची चळवळ हातीं घेतांच, बाळाजीपंत नातूच्या उपरण्याखालीं जें राष्ट्रीय कुत्र्यांचें सार्वजनिक मंडळ जमा झालें, त्याला एवढीही कल्पना भासूं नये काय, कीं आपल्या या उलटया काळ-जाच्या कारस्थानामुळें श्रीशिवछत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याचें सिंहासन आपण जाळून पोळून खाक करीत आहोंत ? महाराष्ट्राच्या मानेवर सुरी फिरवीत आहोंत ? जाणूनबुजून क्षुल्लक स्वार्थासाठीं फिरंगी आपल्या घरांत घुसवीत आहोंत ? आजला त्याच हरामखोर नातूचे सांप्रदायिक जातभाई करवीरकर छत्रपतींना 'स्वराज्यद्रोही छत्रपति' म्हणून शिव्या देण्यास शरमत नाहींत. या-वरून एवढेंच सिद्ध होतें कीं, बाळाजीपंत नातूचा स्वराज्यद्रोही संप्रदाय अजून महाराष्ट्रांत जिवंत आहे. आम्हांला जर स्वराज्य मिळवावयाचेंच असेल, आमचें उद्याचें स्वराज्य चिरंजीव व्हावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर प्रताप-सिंहाच्या वेळीं भिक्षुकशाहीनें या साताऱ्यांत रायगडच्या स्वराज्याचा जसा मुडदा पाडला, तसाच उद्याचें स्वराज्य मिळविण्यापूर्वी महाराष्ट्रांत शिल्लक उरलेल्या स्वराज्यद्रोही नातु संप्रदायाचा आपणांस प्रथम बीमोड केला पाहिजे.

नव्हे, असें केल्याशिवाय तुम्हांला स्वराज्यच मिळणें शक्य नाहीं. बाळाजीपंत नातूचें चरित्र भ्रूणहत्या, स्त्रीहत्या, गोहत्या, राजहत्या, स्वराज्यहत्या, आणि सत्यहत्या, असल्या कल्पनातीत महापातकांनीं नुसतें वरबटलेलें आहे. अर्थात् जोंपर्यंत हा नातु, किंबे केळकर ॲन्ड कों० चा संप्रदाय महाराष्ट्रांतून हद्दपार होणार नाहीं, तोंपर्यंत आपल्याला खरेंखुरें स्वराज्य लाभणार नाहीं. या संप्रदायाच्या स्वराज्यद्रोही लीला जर नीट विचारांत घेतल्या नाहींत, तर तुमच्या पदरांत पडणारें स्वराज्य म्हणजे ब्राह्मणभोजनांतल्या खरकटया पत्रावळी हें खूब ध्यानांत ठेवा.

छत्रपति प्रतापसिंहानें ब्राह्मणेतरांची सुरू केलेली चळवळ हाणून पाडण्यासाठीं, खुद्द त्यालाच पदभ्रष्ट करून मुळांतलाच कांटा उपटण्याची बाळाजीपंत नातूच्या राष्ट्रीय कंपूची जी तयारी झाली, तिकडे आपण आतां वळूं. हरप्रयत्नानें घरभेद करून फोडलेल्या अप्पासाहेब भोसल्याला ता० २४ मार्च १८३९ रोजीं नातूनें रेसिदंट ओवन्सच्या चरणांवर नेऊन घातलें व त्याच्या झेंड्याखालीं सर्व स्वराज्यद्रोही गुप्तकटवाल्यांची मर्कटसेना भराभर जमा केली. कंपनी सरकारच्या गव्हर्नरापर्यंत सर्वांना प्रतापसिंहाविरुद्ध चिथावून देऊन, हा राजा इंग्रेजांचें राज्य उलथून पाडण्याचा गुप्त कट करीत आहे, आम्ही सर्व पुरावा आपल्याला देतों, माबाप कुंफणी सरकारची आह्मांला पूर्ण मदत असावी, असा मंत्र फुंकून रेसिदंट ओवन्सला नातूकंपूनें आपलें तोंड बनविलें. राजकीय बाब ओवन्सच्या मार्फत अशी पेटवून दिली, तों इकडे (अ) धर्ममार्तंड चिंतामणराव सांगलीकर यांनीं वेदोक्त पुराणोक्त तंटा उपस्थित करून छत्रपतीच्या विरुद्ध, कंपनी सरकाराकडे धार्मिक जुलमाबद्दल फिर्यादीच्या अर्जांचीं भेंडोळीं रवाना करण्यासाठीं आपली ब्राह्मणसेना जय्यत उभी केली. आज ज्याप्रमाणें ब्राह्मणेतरांविरुद्ध व विशेषतः सत्यशोधकांविरुद्ध अत्याचारांच्या खोट्यानाटया फिर्यादींची दंगल उडालेली आहे, त्याचप्रमाणें चिंतामणरावांच्या ब्राह्मणसैन्यानें आपला शंखध्वनीचा संप्रदाय मोठ्या नेटानें चालू केला. हे राष्ट्रीय ब्राह्मण नुसत्या कागदी अर्जांच्या कारस्थानावरच अवलंबून बसले नाहींत. निरनिराळया वेळीं कंपनी सरकारच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या छावण्यांपुढें हजारों ब्राह्मणांनीं जमून जाऊन प्रतापसिंहाच्या विरुद्ध धार्मिक व सामाजिक अत्याचारांची अकांडतांडवपूर्वक कोल्हेकुई करण्याची सुरवात केली. चिंतामणरावानें तर नातूचे व्याही कुप्रसिद्ध निळकंठ शास्त्री थत्ते यांच्या अध्वर्युत्वाखालीं ब्राह्मणेतरांना, विशेषतः मराठ्यांना

व कायस्थ प्रभूंना 'शूद्राधम चांडाळ' ठरविणारे (अ)धार्मिक ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याची एक मोठी गिरणीच सांगलीला काढली. छत्रपतीकडून होणाऱ्या ब्राह्मणांवरील अत्याचारांच्या बनावट हकीकती जिकडे तिकडे बेसुमार पसरविणाऱ्या कामगिरीनें त्या वेळच्या ब्राह्मण स्वयंसेवकांनीं अद्भुत 'राष्ट्रीय' कामगिरी बजाविली. विशेष चीड येण्यासारखी गोष्ट ह्मणजे ज्या शिवाजी महाराजांनीं या कृतघ्न ब्राह्मणांच्या बापजाद्यांचीं जानवेंशेंडी रक्षण केली, त्याच शिवाजीचा अस्सल वंशज प्रतापसिंह छत्रपति हा 'हिंदूच नव्हे, हा हिंदु धर्माचा वैरी आहे,' अशा अर्थाचे मोठमोठे जाहिरनामे चिंतामणराव सांगलीकरानें शहरोशहरीं व खेडोखेडीं सर्व हिंदुस्थानभर फडकविण्यांत बिलकूल कमतरता केली नाहीं! इतकें झालें तरीं नातूकंपूच्या मार्गांत एक मोठा कांटा अझून शिल्लकच होता, आणि तो मात्र कसल्याहि लांचलुचपतीला बळी न पडण्याइतका भक्कम व सडेतोड होता. तो कोण ह्मणाल, तर ज्याला आद्य छत्रपति शिवाजी महाराज 'बाळाजी माझा प्राण आहे' असें म्हणत असत, त्या बाळप्रभु चिटणिसाचा अस्सल वंशज बळवंतराव मल्हार चिटणिस हा होय. बळवंतराव जर आपल्या चिटणिशीवर चुकून माकून कायम राहता, तर त्याच्या चिटणिशी लेखणीच्या घोड्यांनीं नातूकंपूच्या घरादारांवर गाढवांचे नांगर फिरविले असते! परंतु चित्पावनी कार्‍याची पोंच जबरदस्त! बळवंतरावाचा पराक्रम नातू जाणून होता. चिटणिस कायम असेपर्यंत छत्रपतीचा रोमही वांकडा होणार नाहीं, ही त्याची पुरी खात्री होती. चिटणिशी लेखणीपुढें परशुरामाच्या वरप्रसादाची पुण्याई वांझोटी ठरणार हा अनुभव त्याच्या डोळ्यांपुढें होता. म्हणून हा चिटणिशी कांटा उपटण्यासाठीं नातूनें कर्नल ओवन्सकडून बळवंतराव चिटणिसाला एकाकीं अचानक पकडून बिनचौकशीनें पुण्याच्या तुरुंगांत फेकून दिलें. बिनचौकशीनें अटक करण्याच्या ब्रिटिश नोकरशाहीच्या पद्धतीविरुद्ध 'अन्याय' 'अन्याय' म्हणून कोलाहल करणाऱ्या राष्ट्रीयांनीं आपल्या संप्रदायाच्या पूर्वजांचें हें हलकट कृत्य विचारांत घेण्यासारखें आहे.

चिटणीसाचा काटा अशा रीतीनें उपटल्यावर नातूचा मार्ग बिनधोक झाला. छत्रपतीच्या राजवाड्यांतील अनेक प्रामाणिक नोकरांना पकडून, लांच देऊन, मारहाण करूण नानाप्रकारचे खोटे दस्तऐवजी पुरावे तयार केले, व रेसिडेंटापुढें खोट्या जबान्या देवविल्या. कांहीं नातूच्या कारस्थानास बळी पडले व कांहीं स्वामिनिष्ठेला स्मरून आनंदानें तुरुंगांत खितपत पडले. बाळकोबा केळकर या

कुबुद्धिमान् गृहस्थानें बनावट सह्या शिक्के बनविण्याचें राष्ट्रीय कार्य हातीं घेतलें. प्रतापसिंह छत्रपति हा ब्राह्मणांचा भयंकर छळ करतो, या नाटकाची उठावणी चिंतामणरावानें आपलेकडे घेतली होती आणि या कामीं त्यांनीं शंकराचार्यांच्या नरडीवरसुद्धां गुडघा देऊन खोटीं आज्ञापत्रें बळजवरीनें लिहून घेण्यास कमी केलें नाहीं. राजकारणाच्या बाबतींत छत्रपतीच्या गळयांत कंपनीसरकारविरुद्ध गुप्त-कटाची राजद्रोहाची घोरपड लटकविण्याचें पुण्य कार्य मात्र खुद्द महात्मा नातूनीं आपल्या हातीं ठेवलें होतें. या कामीं बनावट राजद्रोही पत्रें खलिते अर्ज्या या निर्माण करण्याच्या कामी हैबतराव व आत्माराम लक्ष्मण उर्फ अप्पा शिंदकर या दोघां ब्राह्म-णेतर पात्रांना हातीं धरून बाळाजी काशी किबे आपल्या कल्पकतेची कसोशी करीत होता. अखेर नातु कंपूचें सर्व कारस्थान शिजून तयार झालें. गोव्याच्या पोर्तु-गीज सरकारकडे प्रतापसिंहानें गुप्त संधान बांधून त्यांच्या मदतीनें इंग्रजांना हुसकून देण्याच्या बनावट कटाबद्दल कंपनी सरकारच्या गव्हर्नराची 'वेदोक्त' खात्री पटली. ब्राम्हणांच्या छळाविषयीं कंपनीसरकारनें जरी कानावर हात ठेविले,—कारण धार्मिक, सामाजिक बाबतींत तोंड न बुचकळण्याचा त्यांचा निश्चय जग-जाहीरच—तरी पण छत्रपतीविरुद्ध स्वराज्यद्रोहाचा आरोप बळकट करण्याच्या कामीं चिंतामणरावांचा राष्ट्रीय शंखध्वनी अगदींच कांहीं फुकट गेला नाहीं. प्रतापसिंहास या सर्व गोष्टी कळत नव्हत्या, अशांतली गोष्ट नव्हती. परंतु त्या वेळीं घरभेदेपणा अतोनात माजल्यामुळें, आणि नातूच्या राष्ट्रीय पक्षाकडून फंदफितु-रीचा भयंकर सुळसुळाट झाल्यामुळें महाराजांच्या आत्मविश्वासानें कच खाल्यास त्यांत नवल तें काय ? तथापि, काय वाटेल तें होवो आपण जर कोणाचें वाईट करीत नाहीं, सत्य मार्गानें जात आहोंत आणि कंपनी सरकारशीं कोणत्याही प्रकारें दुजाभावानें वागत नाहीं, तर माझें कोण काय वांकडें करणार ? अशा प्रामाणिक समजुतीवर महाराजांनीं नातुकंपूच्या वावटळीस तोंड देण्याचा निश्चय केला. चिटणिसाची अचानक उचलबांगडी झाल्यामुळें त्यांचा धीर बराच खचला. सरते शेवटीं दैवावर हवाला ठेवून सत्यासाठीं येतील तीं संकटें निमूटपणें सहन करण्याचें त्यांनीं ठरविलें.

ता. २२ आगस्ट १८३९ रोजीं मुंबईचे गव्हरनर सर जेम्स कारनॅक आपल्या लवाजम्यानिशीं नातूकंपूनें शिजवून ठेवलेली गुप्त कटाची हांडी फोड-ण्यासाठीं साताऱ्यास येऊन दाखल झाले. महाराजांना निमंत्रण जातांच दुपारीं तीन वाजतां ते त्यांच्या भेटीस गेले. त्यावेळीं त्यांचें झालेलें संभाषण सारांशानें असें होतें:—

सर जेम्सः—तुम्ही आमच्या विरुद्ध गुप्त कट चालविलेला आहे, आणि त्याचा सर्व पुरावा माझ्यापाशीं आहे.

महाराजः—काय ? आपल्याविरुद्ध मीं गुप्त कट केला आहे? अगदीं बनावट गोष्ट! आपण या बाबतींत वाटेल तर माझी उघड चौकशी खुशाल करावी.

सर जेम्सः—त्यांत काय चौकशी करायची. खऱ्या गोष्टी मला सर्व माहीत आहेत. याउपर चौकशीची यातायात करण्याची आम्हांला जरूर नाहीं. आतां आपल्याला एकच मार्ग मोकळा आहे, आणि तो हाच कीं, मी सांगतों या जबानी-पत्रकावर आपण मुकाट्यानें सही करावी. घासाघीस करायला मला वेळ नाहीं.

महाराजः—आपल्याला वेळ नसेल तर मी सर्व कागदपत्र ओव्हन्स साहेबाला दाखवून त्यांची खात्री पटवून देईन. माझ्यावरील किटाळाचा समतोल बुद्धीनें उघड न्याय व्हावा हीच माझी इच्छा आहे. कंपनी सरकारशीं दुजाभावानें मी कधींहि वागलों नाहीं. इंग्रज सरकारच्या मैत्रीसाठीं मी विहिरींत उडी घ्यायलाहि कमी करणार नाहीं. परंतु माझ्या कल्पनेंतहि कधीं न आलेल्या ज्या घाणेरड्या गोष्टी केल्याचा आरोप माझ्यावर आलेला आहे, त्याबद्दल माझा प्राण गेला तरी मी कबुली जबाब देणार नाहीं. सत्यासाठीं प्राण गेला तरी बेहत्तर !

सर जेम्सः—महाराज, मी काय ह्मणतों तें मुकाट्यानें करा. त्यांत तुमचा फायदा आहे. नाहींतर तुमचें राज्य राहणार नाहीं हें लक्षांत ठेवा.

महाराजः—मी राज्याची कधींच अपेक्षा केलेली नाहीं. इंग्रज सरकारच्या दोस्तीचा मात्र मी चाहता आहे. परंतु बिनचौकशीनें घाणेरडे बनावट आरोप कबूल करून या राज्यावर राहण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. तुमची इच्छा असेल, तर माझे राज्याधिकार आतांच घ्या, मी खुशाल भीक मागून आपलें पोट भरीन. माझ्या चिटणिसाप्रमाणें मला उचलून तुरुंगांत टाकावयाचें असेल, तर खुशाल टाका. तुमच्या संत्रीच्या देखरेखीखालीं मी भिक्षा मागून राहीन. आतां मी आपल्या बंगल्यावरच आहें. मी येथून घरीं परतच जात नाहीं, ह्मणजे झालें! काय तुम्हांला वाटेल तें करा.

सर जेम्सः—असें करूं नका. मी सांगतों याप्रमाणें या कागदावर मुकाट्यानें सही करून मोकळे व्हा. नाहींतर मला निराळीच तजवीज करावी लागेल.

महाराजः—तुह्मांला काय वाटेल ती तजवीज करा. ज्या गोष्टी मीं केल्या नाहींत, त्या केल्या ह्मणून आपल्याला लेखी जबानी देऊं काय? ही गोष्ट प्राणांतींही होणार नाहीं.

प्रतापसिंह महाराजांच्या या सत्यप्रिय आणि बाणेदार वर्तनाचें स्पष्टीकरण करतांना त्या वेळीं पार्लमेंटपुढें व्याख्यान देतांना मेजर जनरल रॉबर्टसननीं जे उद्गार काढले तेच मी आपणांस सांगतों. ते ह्मणाले The conduct of the Raja of Satara would do honour to the best days of ancient Rome, and is, in my opinion, in itself a sufficient refutation of all that has been urged against him. (भावार्थ—प्राचीन रोमन साम्राज्याचा नैतिक सुवर्णयुगाला साजे शोभेसेच वर्तन महाराजांनीं केलें व त्यांच्या सत्याग्रही तडफींतच त्यांच्याविरुद्ध रचलेल्या बनावट किटांळाचा फोलकटपणा सिद्ध होत आहे.) महाराजांविषयीं भिक्षुकशाहीच्या ज्वलज्जहाल द्वेषाची परिस्फुटता करतांना रॉबर्टसननीं काढलेले उद्गार चालू घटकेलासुद्धां विचार करण्यासारखे आहेत. राष्ट्रीय गुंडांच्या स्वराज्यपुराणांच्या चालू धामधुमींत ते उद्गार तुह्मी नीट मनन करा.

The Rajah had many reckless and influential enemies, and particularly that he had incurred the enmity of the Brahmins, and as it was on religious grounds that their enmity was founded, their hostility partook of all that deadly hatred which is so often mixed up in polemical disputes. I may add also, that there are no persons so unscrupulous as Brahmins when they have a Brahmanical object to carry. Every thing which is likely to promote their views, however unprincipled, is then resorted to, for they think that, in such a cause the end hollows the means......I believe among his many enemies, His Highness considers the Brahmin tribe as the most numerous, virulent and influential. I may state that, upon political grounds, there exists much jealousy and ill will on the part of that race to His Highness, merely because his restoration to the possession of that small share of power and importance which he now enjoys, results from the political overthrow of the Brahmin power.

( भावार्थ—राजाचें आणि ब्राह्मण लोकांचें भयंकर हाडवैर होतें. विशेषतः त्याचें मूळ धर्मविषयक तंटयांत असल्यामुळें तर भिक्षुकशाही त्याच्यावर जळजळीत आग पाखडीत असे. मी असें स्पष्ट म्हणतों कीं, या भटांना एखादा भटी कावा साधायचा असला म्हणजे ते काय काय अत्याचार व भानगडी करतील याचा नेमच नाहीं. त्यांचे बेत साधण्यासाठीं करूं नये त्या गोष्टीसुद्धां करायला ते मागेंपुढें पहात नाहींत; कारण त्यांना पक्कें माहीत असतें कीं हेतु साध्य झाला कीं साधनांच्या बरेवाईटपणाची चौकशी होते कसली?......राजाच्या दुष्मानांत ब्राह्मणांचा नंबर अगदीं पहिला. शिवाय ते बरेच असून जितके ते राक्षसी व दुष्ट आहेत, तितकेच वजनदारही आहेत. राजकारणाच्या बाबतींतसुद्धां ब्राह्मणांचा द्वेष कमी भयंकर नाहीं. त्या दृष्टीनें तर ब्राह्मण लोकांच्या डोळयांत तो रात्रंदिवस सलत असतो. याचें कारण काय, तर पेशव्यांची ब्राह्मणी राज्यसत्ता नष्ट झाली व या राजाची थोडीबहुत राज्यसत्ता जिवंत राहिली, हेंच.) सन १८४० सालचे हे उद्गार चालू घटकेलासुद्धां पुण्याची राष्ट्रीय भिक्षुकशाही व कोल्हापूरचे श्री शाहू छत्रपति यांच्या झगडयांत किती सापेक्ष रीतीनें सिद्ध होत आहेत, याचा आपणच नीट विचार करा. या हिंदुस्थानांत मराठ्याचें किंवा एखाद्या ब्राह्मणेतराचें एकहि राज्य कोठें शिल्लक राहूं नये, जिकडे तिकडे सारी भटभिक्षुकशाही माजावी, ब्राह्मणेतरांवर ब्राह्मणांची सनातन कुरघोडी असावी, यासाठीं या राष्ट्रीय गुंडांची केवढी धडपड चाललेली असते, हें जर आपण जरा लक्षपूर्वक विचारांत घ्याल, तर राष्ट्रीयांच्या स्वराज्याच्या गप्पा म्हणजे ब्राह्मणभोजनाच्या खरकट्या पत्रावळी असें जें मी म्हणतों, त्याचा तुम्हांला तेव्हांच उलगडा होईल.

तागडीच्या जोरावर सबंध हिंदुस्थानभर तंगडया पसरणाऱ्या कंपनी सरकारालासुद्धां छत्रपतीसारखा पाणीदार राजा व त्याचें संस्थान शिल्लक ठेवणें जिवावरच आलें होतें. त्यांत स्वदेशांतलेच ब्राह्मण लोक जर एकमुखानें स्वदेशी राजाला जिवत गाडण्याची चळवळ करीत आहेत, तर त्या चळवळीचा फायदा घेऊन परस्पर पावणे तेरा या न्यायानें नातूकंपूनें शिजविलेल्या बनावट राजद्रोहाच्या हांडीनें छत्रपतीचा कपाळमोक्ष होत असल्यास कंपनी सरकारला तें हवेंच होतें. म्हणजे आपला स्वार्थ साधण्यासाठीं नातू कंपूनें कंपनी सरकारला व कंपनी सरकारनें नातुकंपूला परस्पर मिठ्या मारण्यांत व्यभिचारी राजकारणाचें बेमालूम डावपेच दोघेहि खेळलें, हाच इतिहासाचा पुरावा आहे. असो. कंपनीसरकार आपलें कांहीं ऐकत नाहीं, न्यायाचा प्रश्न-

सुद्धां तें विचारांत घेत नाहीं, उलट हरामखोर ब्राह्मणांच्या पूर्ण पचनीं पडून पदभ्रष्ट करण्याच्या धमक्या देत आहेत, अशा परिस्थितींत केवळ सत्यावर भरंवसा ठेऊन, परमेश्वरी इच्छेच्या हातांत आपल्या दैवाचा झोला सोडून, प्रतापसिंहानें निःशस्त्र सत्याग्रह करण्याचें ठरविलें. कंपनी सरकारच्या सैन्यबळापुढें छत्रपतीचें सैन्यबळ जरी कांहींच नव्हतें, तरी छत्रपतीच्या तक्तासाठीं रक्ताचा थेंब न् थेंब खर्ची घालणारे मावळे-मराठे व ब्राह्मणेतर लोक वेळ पडल्यास मधमाशीच्या झुंडीप्रमाणें भराभर बाहेर पडण्यास कमी करणार नाहींत, याची जाणीव कंपनी सरकारला होती. नातूनें सुद्धां छत्रपतीचें उच्चाटन करण्यासाठीं इंग्रजी सैन्याची जय्यत तयारी करण्याचा मंत्र रेसिडेंट ओव्हन्सच्या कानांत फुंकला होता. आणि त्याप्रमाणें तोफखाना, घोडेस्वार यांसह ग्रेनेडिअरची पंचविसावी पलटण ३१ आगष्ट १८३९ रोजीं पुण्याहून निघून ४ सप्टेंबर रोजीं दुपारीं दोन वाजतां सातान्यास येऊन थडकली. ग्रामण्याच्या तंत्रमंत्रानें, राजकारणाच्या कागदी बुजगावण्यानें, किंवा मुंबईच्या गव्हर्नरच्या तोंडी धमकावणीनें प्रतापसिंहाचा प्रताप जेव्हां केसभरसुद्धां डळमळला नाहीं, तेव्हां इंग्रजी सैन्याच्या हिंमतीवर छत्रपतीला अचानक पकडून हद्दपार करण्याचा बळजबरीचा बेत नातूकंपूनें ठरविला. या बेताची कुणकुण महाराजांना लागतांच, त्यांनीं या जय्यत तयारीला तोंडघशी पाडण्याचा निश्चय केला. त्यांनीं विचार केला कीं, जर मी सर्वस्वी निष्कलंक आहे, तर कंपनी सरकारच्या सशस्त्र प्रतिकाराची मी कशाला पर्वा ठेवूं? ज्यांनीं आपल्या न्यायबुद्धीचाच खून पाडलेला आहे; सांगलीकर, नातू, किब्यासारख्या राज्यद्रोही हरामखोरांना जहागिरींचा मलीदा चारून माझ्या विरुद्ध उठविलेले आहे, त्यांनीं माझ्यावर शस्त्र चालवून माझा घात केला, तर त्यांत काय आश्चर्य? तावडतोब महाराजांनीं सेनापती बाळासाहेब राजे भोसले, यांच्याकडून स्वतःच्या सैन्याची कवाईत करविली, आणि आपण स्वतः सैनिकांच्या हातांतली सर्व शस्त्रें काढून घेतलीं. बाळासाहेब सेनापतीच्या कमरेची समशेर काढून घेऊन त्याला निःशस्त्र केलें. राजवाड्यांतल्या पटांगणांतल्या सर्व तोफांतील दारू काढून त्या पाण्यानें धुऊन रिकाम्या केल्या आणि सर्व सातारा शहरभर निःशस्त्र सत्याग्रहाचा जाहिरनामा पुकारला. प्रजाजनांना आपल्या गळ्याची शपथ घालून महाराजांनीं असें विनविलें कीं आज रोजीं कंपनीसरकारच्या गोऱ्या सोजिरांनीं जरी तुमची घरेंदारें लुटलीं, तरीं कोणीही आपला हात वर करतां कामा नये. बांधवहो, निःशस्त्र सत्याग्रहाची मोहीम महात्मा

गांधींच्याही पूर्वी शंभर वर्षें आपल्या प्रतापसिंह छत्रपतींनीं एक वेळ या खुद्द साताऱ्यांत आणि तीही अशा काळांत कीं हुं म्हणतांच कंपनीच्या साथीदारांची व सैन्याची एकजात कत्तल करण्याची धमक मावळ्यांच्या मनगटांत रसरसत होती, अशा स्थितींत शक्य करून दाखविली, हें ऐकून अंतःकरणांत कौतुकाचा व अभिमानाचा दर्या खळवळणार नाहीं, तें अंतःकरण मर्द मावळ्याचें नसून कारस्थानी भटाचेंच असलें पाहिजे. ता. ४ सप्टेंबर १८३९ ची संध्याकाळ झाली. आज बाळाजीपंत नातूच्या कारस्थानामुळें, साताऱ्च्या राजधानींत शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा भर मध्यरात्रीं मुर्दा पडणार, या कल्पनेनें अस्तास जाणारा सूर्यनारायण रक्ताचे अश्रु टपटपा गाळीत रक्तबंबाळ होऊन सह्याद्रीच्या शिखराआड नष्ट झाला. स्वराज्यद्रोही आप्पासाहेब भोसला, आणि महाराष्ट्राच्या मानेवर सुरी फिरविणारा कसाब बाळाजीपंत नातू या दोघांच्या अधिपत्याखालीं गोऱ्या सोजिरांच्या पलटणी सातारा शहराचीं सर्व नाकीं अडवून उभ्या राहिल्या. रेसिडेंट ओव्हन्स साहेबांची अश्वारूढ स्वारी इकडून तिकडे भराऱ्या मारूं लागली. पण साताऱ्यांत त्या वेळीं काय होतें ? जिकडे तिकडे सत्याग्रह ! शुद्ध स्मशानशांतता ! प्रतिकाराची उलट सलामी छत्रपति देतील, ही नातूची कल्पना फोल ठरली. प्रजाजनांनीं आपापलीं भोजनें उरकून यथास्थितपणें निद्रेची तयारी केली. खुद्द छत्रपति भोजनोत्तर आपल्या महालांत खुशाल झोंपीं गेले.

निष्कलंक मनोवृत्तीला निद्रादेवी कधींहि विचकत नाहीं, याचें प्रत्यंतर येथें दिसलें. शनिवार वाड्यावर झेंडे फडकविणारे राष्ट्रीय पक्षाचे ब्राम्हण वीर लोकमान्य नातू मध्यरात्रीच्या सुमारास ओव्हन्सच्या कानाला लागले. राजवाड्याला सोजिरांचा गराडा पडला. घरभेद्या आप्पासाहेब पुढें, पाठीमागें रेसिडेंट ओव्हन्स आणि चार पांच गोरे सोजीर, अशी ही चांडाळ चौकडी, आज आपण ज्या राजवाड्यासमोर जमलेले आहोंत त्या राजवाड्याच्या छातींतला प्राण हरण करण्याकरितां यमदूताप्रमाणें आंत घुसली. त्यांनीं देवघराचें पावित्र्य पाहिलें नाहीं, त्यांनीं झनान्यांतील राजस्त्रियांच्या अब्रूकडे पाहिलें नाहीं. ते खाडखाड बूट आपटित छत्रपतीच्या शयनमंदिराकडे गेले. आप्पासाहेबांनीं 'हे आमचे दादा' असें बोट करून दाखवितांच त्या वेळचा महाराष्ट्राचा ओडवायर कर्नल ओव्हन्स झटदिशीं पलंगाजवळ गेला आणि गाढ निद्रेंत घोरत असलेल्या छत्रपतीला त्यानें मनगटाला धरून खसकन पलंगावरून खालीं ओढलें आणि 'तुम हमारे साथ चलो' असें म्हणून तो त्यांना खेंचूं लागला. सत्याग्रही छत्रपति कांहींहि प्रतिकार

न करितां मुकाट्यानें चालूं लागले. त्यावेळीं ते फक्त एक मांडचोळणा नेसलेले होते. त्याशिवाय आंगावर दुसरें कांहींहि वस्त्र नव्हतें. छत्रपतींची अशा उघड्या बोडक्या स्थितींत उचल बांगडी झालेली पाहून झनानखान्यांत हलकल्लोळ उडाला. चाकर माणसें भयाभीत होऊन हातांत दिवट्या घेऊन सैरावैरा धांवपळ करूं लागलीं. एकच आकांत उडाला. सर्व लोक निःशस्त्र, त्यांतच खुद्द छत्रपतींची सत्याग्रहाची शपथ, यामुळें कोणाचाच कांहीं उपाय चालेना. महाराजांच्या दंडाला धरून ओव्हन्सनें त्यांना राजवाड्याबाहेर आणलें, आणि तयार असलेल्या पालखींत त्यांना कोंबलें. जवळच उभे असलेल्या बाळाजीपंत नातूच्या डोळ्याचें पारणें फिटलें. परशुरामाचा वर पूर्ण झाला. शिवाजी महाराजांच्या हिन्दवी स्वराज्याचें प्रेत भिक्षुकशाहीच्या तिरडीवर चढलेलें पाहून रेसिडेंट ओव्हन्सला स्वर्गप्राप्तीचा आनंद झाला. आप्पासाहेब भोंसल्याचा घरभेदेपणा कचकाऊन फळफळला. एक मिनिटाच्या आंत सोजिरांच्या पहाऱ्याखालीं सत्याग्रही छत्रपतींची पालखी चालूं झाली. प्रजाजन भराभर जमा होऊं लागले. मध्य रात्रीचा वेळ, तरीसुद्धां सातारचा राजरस्ता नरनारींनीं गजबजून गेला. आपला छत्रपति असा उघडा बोडका पकडून नेतांना पाहून त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे धबधबे वाहूं लागले. पण करतात काय ? महाराजांची सत्याग्रहाची शपथ अक्षरशः पाळणें जरूर होतें. इतक्यांत कोणी एकानें धांवत धांवत येऊन, आपल्या घरांतील एक शाल आणून महाराजांच्या आंगावर घातली. सातारच्या ब्राह्मणेतर प्रजेनें छत्रपतींना अखेरचा मुजरा ठोकला आणि क्रिस्टॉल नांवाच्या सोजिराच्या आधिपत्याखालीं पालखी साताऱ्याच्या हद्दपार झाली. इतक्यांत आप्पासाहेब भोंसल्यांच्या चिथावणीवरून सेनापती बाळासाहेब भोंसल्यांना कांहीं सोजिरांनीं पकडून धांवत धांवत छत्रपतींच्या पालखी जवळ नेलें व तें सेनापतीचें पार्सल धाडकन त्याच पालखींत फेंकून दिलें. बाळासाहेबानें ताडकन पालखीच्या बाहेर उडी मारली आणि त्वेषानें म्हणाला "खबरदार, ज्या छत्रपतीच्या पायाला स्पर्श करण्याची आजपर्यंत कोणाचीही ताकद झाली नाहीं, त्यांच्या बरोबरीला बसून छत्रपतीच्या तख्ताची मी अवहेलना करूं काय ? मी जरी निःशस्त्र असलों तरी अशाही स्थितींत मी पांच पन्नासांना लोळवायला कमी करणार नाहीं हें लक्षांत ठेवा." इंग्रेजांच्या लोकविश्रुत पॉलिसीप्रमाणें छत्रपतींचा हद्दपारीचा शेवटला मुकाम कोणालाही कळणें शक्य नव्हतें. पहिल्या दिवशीं क्रिस्टॉल कंपूनें आठ मैलाची मजल मारून निंबगांवांत मुक्काम केला. त्या ठिकाणीं गाई

ह्मशी बांधण्याच्या गोठ्यांत, जेथें शेण आणि मूत्र सर्वत्र पसरलेलें आहे, उंदीर झुरळें, चिलटें, पिसवा वगैरेचा सुळसुळाट आहे, अशा जागेंत छत्रपतींना आणून बसविलें. बांधवहो ! या वेळची छत्रपतींच्या मनःस्थितीची आपणच कल्पना करावी हें बरें. दुसऱ्या दिवशीं मागोमाग महाराजांची राणी, कन्या सौभाग्यवती गोजराबाई वगैरे कबिले येऊन दाखल झाले. गाई म्हशीच्या गोठ्यांत हिंदूंचा बादशहा हरामखोर ब्राह्मणांच्या कारस्थानामुळें अस्ताव्यस्त स्थितींत पडलेला पाहून राजवैभवांत वाढलेल्या त्या राजस्त्रियांच्या अंतःकरणाची स्थिती काय झाली असेल याची कल्पना करवत नाहीं ! पण कल्पना कशाला ? इतिहास कांहीं मेला नाहीं. राजहत्येबरोबर बाळाजीपंत नातूला भ्रूणहत्येचें पातक कमवायचें होतें. त्या पातकाचा फोटोग्राफ इतिहासांत उमटलेला आहे. नातूच्या वंशजांनीं आणि त्याच्या स्वराज्यद्रोही राष्ट्रीय सांप्रदायिकांनीं आपल्या बेचाळीस बाप-जाद्यांची पुण्याई जरी खर्ची घातली तरी तो ऐतिहासिक पुरावा नष्ट होणें शक्य नाहीं. आपला प्रियकर बाप, साताऱ्याचा छत्रपति, हिंदी स्वराज्याचा हिंदू बाद-शाहा, गाई म्हशीच्या गोठ्यांत वस्त्राशिवाय बसलेला पाहून गोजराबाईनें एक भयंकर किंकाळी फोडली व ती बेशुद्ध पडली. बांधवहो ! यापुढील प्रकार अत्यंत भयंकर. गोजराबाई आठ महिन्यांची गरोदर होती. बेशुद्ध पडतांच तिचा गर्भपात झाला. चहूंकडे जंगल, वैऱ्याच्या कैदेंत माणसें सांपडलेलीं, अशा स्थितींत त्या बिचारीला कसलें औषध आणि कसला उपचार ! दैवाची खैर, ह्मणून बिचा-रीचा जीव तरी वांचला. येथून मुक्काम हालतांच तिकडे बाळाजीपंत नातूचें विचारयंत्र सुरू झालें. या महात्म्यानें असा विचार केला कीं छत्रपतीच्याबरोबर बाळासाहेब सेनापती असणें ही मोठी घोडचूक. चिटणीसाला जसा अचानक उचकून फेकून दिला, तशी बाळासाहेब सेनापतीची वासलात लावली पाहिजे. नाहीं तर हा छत्रपति त्याच्या साह्याय्यानें एकादें नवीन स्वराज्य देखील निर्माण करायचा ! ह्मणून बाळाजीपंतानें आपला कुळस्वामी ओव्हनसाहेब याच्याकडून सेनापतीला पकडण्याचें वारंट सोडलें. वारंटांतील मजकूर असा होता कीं, साताऱ्यांत तुह्मांला लाखों रुपयांचें देणें आहे तें फेडल्याशिवाय तुह्मांला साता-ऱ्याबाहेर जातां येत नाहीं. हा आरोप बनावट होता हें सांगणें नकोच. तथापि दुसऱ्या मुक्कामावर वारंटाची टोळी येतांच सेनापतीनें आपल्या व सेवकांच्या आंगावरील उरलेले कांहीं दागदागीने देऊन त्या शिपायांची कांहीं तरी समजूत करून (कारण हे शिपाई पूर्वी सेनापतीच्याच हुकमतीखालीं होते व त्यांना खऱ्या

गोष्टी माहीत होत्या ) त्यांना सातान्यास परत रवाना केलें. मुकाम दर मुकाम घोडदौडीची पायीं चाल करून वाटेंत बाळासाहेब सेनापतीला आमांशाचा रोग जडला व रक्त पडूं लागलें. ह्मणून औषधोपचारासाठीं वाटेंत मुकाम करण्याबद्दल छत्रपतींनीं क्रिस्टॉल साहेबाची नानाप्रकारें विनवणी केली. ओव्हन्स रेसिडेंट हा जसा त्या वेळचा ओडवायर होता, तसाच त्याचा साथीदार हा नराधम क्रिस्टाल त्या वेळचा डायर म्हटला तरी चालेल. त्यानें विनंतीचा अवमान करून मुकामाची दौड चालूच ठेवली. मात्र बाळासाहेबाला त्यानें एका स्वतंत्र मेण्यांत चालविलें होतें. परंतु औषधोपचाराची तर गोष्टच राहूंद्या पण बिचान्याच्या नुसत्या अन्नपाण्याचीही कोणी व्यवस्था पाहिली नाहीं. अखेर एका मुक्कामावर क्रिस्टॉल साहेबांची सहज लहर लागली म्हणून मेणा उघडून पहातात तों बाळासाहेबांचें प्रेत कुजून त्याला घाण सुटलेली ! बाळा साहेबांचा मृत्यु होतांच त्यांच्या पतिपरायण पत्नीनें एक दोन दिवसांतच प्राणत्याग केला. अशा रीतीनें बाळाजीपंत नातूनें आपल्या ब्राह्मणी कारस्थानाच्या तिरडीवर आप्पासाहेब भोसल्यांच्या हातून बांधलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मुडद्याची प्रेतयात्रा बनारसला पोंचेपर्यंत वाटेंत अनेक हत्या घडल्या. बनारसला महाराज छत्रपति ह्यांना तुरुंगांत ठेवलें आणि अशा रीतीनें सध्यांच्या राष्ट्रीय पक्षांचे इतिहासप्रसिद्ध पूर्वज लोकमान्य बाळाजीपंत नातू, चिंतामणराव सांगलीकर, वगैरे भू-देवांचें स्वराज्यद्रोही कारस्थान परशुरामाच्या कृपेनें तडीस गेलें. बाळाजीपंत नातू यानें कंपनी सरकारकडून जहागिऱ्या मिळविल्या, अप्पासाहेब भोसल्याची दिवाणगिरी मिळविली, नौबदीचे अधिकार मिळवले, बाळा जोशी नांवाच्या एका हलकट वांईकर ब्राह्मणाला त्याच्या 'राष्ट्रीय' खटपटीबद्दल जहागिरी बक्षिस दिली, आणि नातूचे परात्पर गुरू रेसिडेंट ओव्हन्स साहेब यांना मुंबई सरकारच्या शिफारसीवरून वार्षिक चारशें पौंडांचा जादा मलीदा सुरू झाला. सख्या थोरल्या भावाच्या सर्वस्व-घाताच्या रक्तांनीं माखलेल्या अप्पासाहेब भोंसल्यानें १८ नोव्हेंबर १८३९ रोजीं आपणास राज्याभिषेक करून घेतला आणि रात्रौ दीपोत्सव करण्याच्या बाबतींत स्वराज्यद्रोही ब्राह्मणांनीं कस्सून मेहनत घेतली. बांधवहो ! स्वराज्याच्या अधःपाताचा हा इतिहास मीं आपणास फारच थोडक्यांत सांगितला आहे. हा इतिहास मी लवकरच ग्रंथरूपानें बाहेर काढणार आहें; त्यावेळीं स्वराज्यद्रोहाच्या रंगपटावर आणखी शेंकडों ब्राह्मण वीर महावीर आणि त्यांचीं असंख्य अमानुष कारस्थानें आपल्या दृष्टीला

पडतील. हा सर्व इतिहास जिवंत राखण्याचें श्रेय एका कायस्थ वीरानें मिळविलेलें आहे. प्रतापसिंहावर नातू कंपूनें अनन्वित किटाळ उभारून त्यांना तुरुंगांत टाकल्यानंतर या अन्यायाची दाद पार्लमेंटापर्यंत पोंचविण्याकरितां

**हिंदवी स्वराज्याचें पहिलें डेप्युटेशन**

विलायतेस घेऊन जाणारा सच्चा कायस्थ बच्चा रंगो बापूजी गुप्ते हा होय. यानें सतत सोळा वर्षें विलायतेंत झगडून न्याय मिळविण्याचा यत्न केला. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणा, किंवा योगायोगाची गोष्ट म्हणा कीं ज्या दादजी नरस प्रभूनें आद्य छत्रपति शिवाजी महाराज यांच्याशीं स्वराज्यस्थापनेची आणभाक केली, त्याच्याच अस्सल चौथ्या वंशजावर त्याच हिंदवी स्वराज्याचा भिक्षुकशाहीकडून झालेल्या खुनाचा न्याय मिळविण्यासाठीं विलायतेंत जाण्याचा प्रसंग यावा हा योगायोग विलक्षण नव्हे काय ? असो. रंगो बापुजीची विलायतेची कामगिरी हा एक स्वतंत्र विषय आहे. तो आपल्याला माझ्या पुस्तकांतच पहावयाला मिळेल, इतकें सांगून मी पुरें करितों.

[ विजयी मराठा, पुणें जून १९२२ ].

REFBK-0002228

दा. क्र.

विक्रीस तयार !          विक्रीस तयार !!

# श्रीसरस्वति मंडळाचीं पुस्तकें.

कै. राम गणेश गडकरीकृत.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| सचित्र **प्रेमसंन्यास** कापडी .... | १ | ४ | ० |
| सचित्र संगीत **पुण्यप्रभाव** कापडी .... | १ | ४ | ० |
| सचित्र संगीत **एकच प्याला** कापडी | १ | ४ | ० |
| सचित्र संगीत **भावबंधन** कापडी .... | १ | ८ | ० |
| सचित्र संगीत **राजसंन्यास** कापडी.... | १ | ४ | ० |
| **वाग्वैजयंती** (समग्र कविता संग्रह) | २ | ० | ० |

विनोदी लेख छापत आहेत.

श्रीयुत लक्ष्मण बळवंत भोपटकरकृत

| | | | |
|---|---|---|---|
| सचित्र **नवरत्नांचा हार** .... .... | १ | ० | ० |

श्रीयुत शंकर यादव पोंक्षेकृत

| | | | |
|---|---|---|---|
| **हिंदुस्थानची शासन पद्धती** .... | १ | ८ | ० |

श्रीयुत कॅप्टन गोपाळ गंगाधर लिमयेकृत

| | | | |
|---|---|---|---|
| **विनोदी लेख** .... .... .... | १ | ० | ० |

श्रीयुत शंकर विनायक सोवनीकृत

| | | | |
|---|---|---|---|
| सचित्र **फुटबॉल** .... .... .... | ० | ८ | ० |

**सरस्वति मंडळ,**

बुधवार पेठ, पुणें शहर.

## मराठी वाङ्मयांतील तीन रत्नें.

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकरकृत

## मराठे व इंग्रज.

या अत्यंत तेजस्वी पुस्तकाची तिसरी आवृत्ती तयार आहे. यांत ऐतिहासिक प्रसंगाचीं चार चित्रें घातलीं आहेत. कागद मोहोरेदार व बांधणी सुबक. किंमत २। रुपये पोस्टेज शिवाय.

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकरकृत

## विलायतचीं बातमीपत्रें.

कांग्रेस डेप्युटेशन विलायतेस गेलें असतांना तेथील घडलेली साद्यंत हकीगत यांत आलेली आहे. कागद मोहोरेदार व बांधणी सुबक. किंमत १॥ रुपया पोस्टेज शिवाय.

श्रीयुत चिंतामणराव विनायक वैद्यकृत

## महाभारताचा उपसंहार.

या अत्यंत उपयुक्त महाभारतकालीन माहितीचे पुस्तकावरून तत्कालीन सर्व गोष्टींचा वाचकांचे मनावर प्रकाश पडेल. महाभारत कालीन भारत वर्षाचा नकाशा सोबत जोडला आहे.

पृष्ठ संख्या ९१२. आकार आटोपशीर. बांधणी मजबूत.

किंमत ५ रुपये पोस्टेज शिवाय.

रावजी श्रीधर गोंधळेकर, बुकडेपो,

बुधवार चौक, पुणें शहर

# स्वाध्याय-संदेश वाचल्यावर

# प्रबोधन

## पाक्षिकाचे वर्गणीदार कां व्हावें ?

या प्रश्नाचें उत्तर देण्याची जरूरच नाहीं.

भारदस्त व रसाळ भाषाशैली, ओजस्वी व तडफदार विवेचन-पद्धति, मुद्देसूद सणसणीत ऐतिहासिक चर्चा, जीर्णमतांवर निर्भीड टीकांचे हल्ले, विश्वसनीय व निस्पृह ग्रंथपरीक्षण, खऱ्या लोकशाहीचें स्पष्ट निरूपण,

## आणि

सामाजिक व धार्मिक पुनर्घटनेवरच अखिल हिंदु समाजाचा अभ्युदय कसा अवलंबून आहे, याचें मार्मिक विवेचन, अवघ्या महाराष्ट्रांत

## फक्त प्रबोधन

. पाक्षिकांतच पहावयास मिळतें. वार्षिक वर्गणी फक्त अडीच रुपये. लवकरच दुप्पट पृष्ठें ( १६ ) होतील. सध्यां दुसरें वर्ष सुरू आहे.

पत्ताः—व्यवस्थापक, **प्रबोधन कचेरी,**

२० मिरांडाची चाळ, दादर,

मुंबई नं. १४




निराश मनाला चैतन्य
देणारें,
आळशाला उद्योगी
बनविणारें,
मोकाट वृत्तीला स्थिर
करणारें,
स्वाध्यायशीलतेची चटक
लावणारें,
निद्रित कर्तबगारीचें
प्रबोधन करणारें,
महाराष्ट्रांतील एकच सचित्र
चटकदार
मनोरंजक मासिक हेंच.

**वार्षिक वर्गणी फक्त सव्वा रुपाया.**

पत्ताः—'किर्लोस्कर' खबर कचेरी,
किर्लोस्कर वाडी, जि. सातारा.

---

# श्री रामभारती महाराज.

यांचे वाटेल त्या आकाराचे लहान मोठे फोटो विक्रीस तयार आहेत. फोटो काढणें, रंगविणें, लहान फोटोवरून मोठा फोटो करणें वगैरे सर्व तऱ्हेचीं कामें अत्यंत कुशलतेनें व मनपसंत करण्यांत येतात. दर माफक पण काम उत्तम.

पत्ताः—दत्तात्रय वामन गुप्ते, फोटोग्राफर,
६६३, लेडी जमशेटजी रोड, दादर,
मुंबई नं. १४.

छापत आहे !                    छापत आहे !!

श्रीयुत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर कृत

# सुदाम्याचे पोहे.

अर्थात्

# साहित्यबत्तिशी.

(सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ति)

कोल्हटकर आणि मंडळी,

२ कारवार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

---

## हिंदु मुसलमानांची दिलजमाई

व्हावी व ती झालीच पाहिजे हें प्रत्येक स्वराज्यवादी कबूल करतो. परंतु त्यांचे

## दंगे कां होतात ?


याची मीमांसा फारच थोड्यांनीं केली आहे. या विषयाचा चिकित्सापूर्वक अभ्यास करणाऱ्या प्रत्येक हिंदु आणि मुसलमान देशभक्तानें प्रबोधनकार श्री. ठाकरे कृत

## संस्कृतीचा संग्राम

आणि हिंदुधर्माचें दिव्य हें जोड पुस्तक मुद्दाम वाचावें. लवकरच प्रसिद्ध होईल. किंमत एक रुपया.

पत्ताः—नरेंद्र पुस्तकालय,

दादर, मुंबई १४.



# READY PLEASE!

**FOR EXCELLENT**

# PHOTOGRAPHS

**MAKE IT A POINT TO GO TO**

## THE ESPLANADE PHOTO STUDIO.

SCHOOL OF ART COMPOUND,
JUST OPPOSITE TO G. I. P. RLY.
THIRD-CLASS BOOKING OFFICE
HORNBY ROAD,
**BOMBAY.**

---

**TO ENSURE SATISFACTION**

# PHOTOGRAPHIC MATERIALS

**OF VARIOUS DESCRIPTIONS**

# MUST

BE BOUGHT OF :—

**MESSRS. B. N. KOPARDE & SONS.**

UNDER PERSONAL MANAGEMENT OF
**Mr. B. N. KOPARDE**
(Late Manager of S. MAHADEV & SONS, BOMBAY)

**B. N. KOPARDE & SONS,**
**Esplanade Studio,**
**Art School Compound.**
**Hornby Road,**
BOMBAY.

